

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली

लेखा परीक्षण अहवाल

2014-2015

उपसंचालक, महानगरपालिका लेखा लेखापरीक्षा, उपविभाग - 2, स्थानिक निधी
लेखापरीक्षा कार्यालय, नवी मुंबई
रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर

अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांनी 2014-2015 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका
वित्तीय वर्ष 2014-2015 चा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.स्था/18/ब/सां.मि.कु मनपा/ले.प./2014-15/ 606 Date : 16/10/2020

सह संचालक (मनपालेप)
स्थानिक निधी लेखापरीक्षा
7 वा मजला, रायगड भवन,
नवी मुंबई

प्रति,

मा.आयुक्त,
सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका
सांगली

सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या आर्थिक वर्ष 2014-2015 या वर्षाचे लेखापरीक्षण श्री. दि. धु. माडे, सहाय्यक संचालक व श्री. भा. वि. घुगे यांच्या पथकाव्दारे दिनांक 13.08.2018 ते दिनांक 28.06.2019 या कालावधीत पूर्ण केले असून प्रारुप लेखापरीक्षण अहवाल तयार केला आहे. सदर अहवालाचे श्री. नितिन पाठक, उप संचालक (मनपालेप), उप विभाग - 2, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी पुनर्विलोकन केले असून दिनांक 18.09.2020 रोजीच्या सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेस केलेल्या ईमेलव्दारे प्रारुप अहवाल एकतर्फी अंतिम करण्यात आला आहे. लेखापरीक्षण कालावधीमध्ये खालील पदाधिकारी व अधिकारी सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे कामकाज पाहात होते.

आयुक्त	
श्री. अजित कारथे	**दिनांक 01.04.2014 ते दिनांक 31.03.2015**
आयुक्त	
श्री. कांचन कांबळे	**दिनांक 01.04.2014 ते दिनांक 17.01.2015**
श्री. विवेक आप्पा कांबळे	**दिनांक 31.01.2015 ते दिनांक 31.03.2015**

अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण 1

I PART I :**मागील लेखा परीक्षण अहवाल** 3

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका 3

PART II 9

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका 9

कलम ९ अ खालील आक्षेप 10

1 अर्थसंकल्पावरील भाष्य 11

2 लेखा विभागाने निवृत्ती वेतन अंशदान निधी पुरेसा न ठेवणेबाबत. 19

3 सन 2014-15 या आर्थिक वर्षाची माहिती सोबतचे विवरणपत्र क्र.1 ते 11 मध्ये भरुन सादर करणेबाबत 20

4 पाणीपुरवठा विभागातील मनपाच्या स्वनिधीमधून केलेल्या वेगवेगळ्या कामातील उणीवा बाबत. 21

5 विदयुत विभागाकडील स्ट्रिट लाईट देखभाल व दुरुस्तीसाठी साहित्य खरेदी कामातील अनियमितता बाबत 24

6 विदयुत विभागाकडुन मनपा हद्दीमध्ये नवीन स्ट्रिट लाईट बसविणे साठी एजन्सी नियुक्ती व कामातील अनियमितता बाबत. 29

7 मिरज येथील पाणीपुरवठा विभागातील वर्ष 2014-15 मधील वार्ड क्र. 11 व 26 येथे पाण्याची पाईप लाईन टाकणे या कामातील अनियमिततेबाबत. 36

8 सांगली पाणीपुरवठा विभागातील वर्ष 2014-15 मधील वार्ड क्र. 9 किल्ला येथील उंच टाकीतून टाकली रस्ता भागात पाईप लाईन टाकणे या कामातील अनियमिततेबाबत. 40

9 पाणीपट्टीची थकबाकी रु 1870.66 लाख इतकी असून वसुलीबाबत ठोस कार्यवाही केली जात नाही. सांगली मनपाचे पाणीपुरवठा योजनेचे महसुली उत्पन्न 2014-15 साठी रु. 1331.26 लाख असून महसुली खर्च रु 1988.87 लाख आहे रु. 657.61 लाख तफावत असल्याचे दिसते. 45

10 मिरज पाणीपुरवठा विभागातील वर्ष 2014-15 मधील वार्ड क्र. 28 मध्ये बेडग रोड, मोतुगडेमळा, ढोले मळा व म्हैशाळ रोड कोकाटे मळा भागात नवीन पाईप लाईन टाकणे या कामातील अनियमिततेबाबत. 47

11 सांगलीवाडी येथे 15 लक्ष लि. क्षमतेची उंच टाकी बांधणे, शामरावनगर, सांगलीवाडी ई.भागातील वितरण व्यवस्थेसाठी DI K-7 PIPE पुरविणे, खोदाई करणे जोडणी करणे, चाचणी देणे, या केंद्र शासन पुरस्कृत कामातील अनियमिततेबाबत. 50

12 पाणीपुरवठा योजनेबाबतची माहिती विहित नमुन्यातील विवरणपत्रात उपलब्ध करून देणेबाबत 55

13 चुकीची पदोन्नती दिल्याने वेतन/निवृत्ती वेतन/उपदान/अशराशीकरण रक्कमेचे अतिप्रदान झाले बाबत. 56

14 महानगरपालिका अधिकारी/कर्मचा-यांच्या गटविमा योजनेच्या कपातीबाबत. 58

15 सांगली झुलेलाल चौक ते 100 फुटी द-उ रस्ता डांबरीकरणाने मजबुतीकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत 59
16 सांगली येथील हरिपूर रोड लिंगायत स्मशानभूमी ते राजेसाहेब बंगला द-उ रस्त्याचे (काळीवाटरस्ता) हॉटमिक्स डांबरीकरण करणे कामातील अनियमिततेबाबत 63
17 मिरज शिवाजीनगर रोड ते एस.टी.स्टँड पर्यन्तचा रस्ता डांबरीकरण करणे कामातील अनियमिततेबाबत.....68
18 कुपवाड हसनी आश्रम ते कुंभारमळापर्यन्तचा द.उ.रस्ता डांबरीकरण करणे या कामातील उणीवाबाबत. 72
19 सांगली एस.टी.स्टॅन्ड ते सिव्हील हॉस्पिटलचौक ते राममंदिर पर्यन्तचा रस्ता डांबरीकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत 76
20 इंदिरा घरकुल झोपडपट्टी स.न.138/ब येथे 155 + 651= 806 घरकुले बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. 80
21 बांधकाम परवानगी देतेवेळी वसुल केलेली व कामगार कल्याण मंडळाकडे जमा केलेली उपकर रक्कम याबाबत झालेली अनियमितता. 87
22 बांधकाम परवानगी देतेवेळी नगर रचना विभागकडुन विकास शुल्क आकारणी करताना झालेली अनियमितता. 89
23 नगर रचना विभागाकडुन बांधकाम परवानगी देतेवेळी उपकराची रककम आकरणी करताना झालेली अनियमितता. 92
24 नगर रचना विभागाकडुन मोबाईल टॉवर उभारणी परवानगी देतेवेळी झालेली अनियमितता. 95
25 नगर रचना विभागाकडुन बांधकाम परवानगी देतेवेळी स्थानिक संस्था कर(एल.बी.टी.) वसुली बाबत झालेली अनियमितता. 98
26 विधीज्ञांना अदा केलेली देयके/खर्च प्रमाणंके/संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत.....100
27 सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका मालमत्ता विभाग अंतर्गत सांगली कार्यालयाकडुन परवाना अभिलेखे/संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत. 102
28 सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका आरोग्य विभाग अंतर्गत सांगली, मिरज आणि कुपवाड कार्यालयाकडुन ना हरकत दाखले परवाना संचिका/अभिलेखे/ नोंदवहया लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत. 106
29 नगर सचिव विभागाने सन 2014-15 मधील महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची नोटीस स्थानिक वृत्तपत्रामध्ये देताना व महासभेत ऐन वेळेचे प्रस्ताव दाखल करुन घेताना झालेले अनियमितता बाबत. 107
30 वाहन कार्यशाळेतील वाहन व्यवस्थेतील देखभाल दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामातील अनियमिततेबाबत.111
31 आमराई येथील जळावू लाकूड व धोकादायक झाडांचा जागेवर लिलाव करण्यामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत. 113
32 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडील मिरज बेडग रोड येथील कत्तलखानाच्या निविदेबाबत.....114
33 मुख्य लेखापरीक्षकांनी महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक चाचणी केल्याचा तसेच 2014-15 या आर्थिक वर्षाच्या लेख्यावरील केलेल्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालाची प्रत लेखापरीक्षणास सादर करणेबाबत 115

कलम ९ ब खालील आक्षेप **118**

34 अग्निशमन विभागाकडील प्रलंबित वसूलीबाबत. 119

35 सफाई कर्मचाऱ्याची रिक्त पदे लाड समितीच्या शिफारसीप्रमाणे वारसा पद्धतीने भरण्याबाबत. 122

36 विवाह नोंदणी फी व शास्तीची रक्कम विलंबाने चलन करुन जमा करणे, नियमापेक्षा कमी रक्कम वसुल करणे, फी/शास्तीची रक्कम वसुल न करणे, रक्कम नगदी शाखेकडे जमा केलेली नाही. 124

37 विवाह नोंदणी फी व शास्तीची रक्कम शासनाकडे जमा करणे बाबत. 130

38 सुवर्ण जयंती शहरी रोजगार अंतर्गत शासनाकडुन प्राप्त रक्कमेवर मिळणारे व्याज शासन खाती जमा करणे, आयकर रक्कम कपात व प्रवास भत्ता देयक बाबत. 132

39 नगर सचिव विभागाकडुन महासभा/स्थायी सभेचे वेळी चहापान रक्कम खर्च करताना झालेली अनियमितता बाबत. 133

40 विदयुत विभागाकडील देयके सवलतीच्या दिनांकानंतर भरणा केल्याने महानगरपालिकेच्या होत असलेल्या आर्थिक नुकसानीबाबत. 134

41 विदयुत विभागा साहित्य खरेदी जड वस्तु संग्रह नोंदवही मध्ये नोंदी घेतलेले नाहीत. 136

42 सन 2014-15 विदयुत विभागाकडुन गणेशोत्सव कालावधीमध्ये तात्पुरती लाईट व्यवस्था करताना झालेली अनियमितता बाबत. 139

43 सन 2014-15 मध्ये स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले कर्मचारी यांचे शेवटचे दिवसाचे वेतन कपात केले नसले बाबत. 140

44 चुकीचे वेतन निश्चितीमुळे वेतन/निवृत्ती वेतन/उपदान/अंशराशीकरण/रजा रोखीकरण रक्कमेचे अतिप्रदान झाले बाबत. 142

45 UIDSSMT अंतर्गत माळबंगला,काळीखण व वसंत कॉलनी येथील झोन मधील, वितरण व्यवस्था,माळबंगला केंद्र ते काळी खणसंपपर्यंत रायझिंग मेन पाईप लाईन टाकणेची कामे या केंद्र शासन पुरस्कृत कामातील अनियमिततेबाबत. 146

46 UIDSSMT अंतर्गत कोल्हापूर रोड येथे 15 लक्ष लि.क्षमतेची उंच टाकी बांधणे, वितरण व्यवस्था व कम्पाउंड वॉल बांधणे या केंद्र शासन पुरस्कृत कामातील अनियमिततेबाबत. 151

47 पाणीपुरवठा विभागातील पाणी मीटर बंद असल्यामुळे तसेच पाण्याची देयके उशिराने दिल्यामुळे पाण्याच्या प्रत्यक्ष वापराप्रमाणे महसुली उत्पन्न मिळत नसल्याबाबत. 155

48 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत घेण्यात आलेल्या मिरज शहर भुयारी गटर योजनेमधील अनियमिततेबाबत 161

49 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत घेण्यात आलेल्या सांगली शहर भुयारी गटर योजनेमधील अनियमिततेबाबत. 165

50 माळबंगला येथे 70 दलली क्षमतेचे आधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामातील अनियमिततेबाबत. 171

51 सन 2014-15 मध्ये 50% 'शासन हिस्सा व 50% मनपा हिस्सा मधुन सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रातील नागरी वस्तीमध्ये पायाभुत व मुलभुत सुविधा पुरविणेसाठी रस्ते करणे या कामातील अनियमितता बाबत. 175
52 सन 2014-15 मध्ये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रातील अविकसित गुंठेवारी व विस्तारीत क्षेत्रातील नागरी वस्तीमध्ये पायाभुत व मुलभुत सुविधा पुरविणेसाठी 100% शासन विशेष अनुदान मधुन गटर करणे कामामधील अनियमितता. 187
53 सन 2014-15 मध्ये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रातील अविकसित गुंठेवारी व विस्तारीत क्षेत्रातील नागरी वस्तीमध्ये पायाभुत व मुलभुत सुविधा पुरविणेसाठी 100% शासन विशेष अनुदान मधुन करण्यात आलेल्या रस्ते कामामधील अनियमितता. 192
54 सन 2014-15 मध्ये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रातील अविकसित गुंठेवारी व विस्तारीत क्षेत्रातील नागरी वस्तीमध्ये पायाभुत व मुलभुत सुविधा पुरविणेसाठी 100% शासन विशेष अनुदान मधुन करण्यात आलेल्या रस्ते कामामधील अनियमितता. 198
55 सन 2014-15 मध्ये 50% 'शासन हिस्सा व 50% मनपा हिस्सा मधुन सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रातील नागरी वस्तीमध्ये पायाभुत व मुलभुत सुविधा पुरविणेसाठी रस्ते करणे या कामातील झालेली अनियमितता. 202
56 सन 2014-15 मध्ये 50% शासन अनुदान,50%मनपा अनुदान महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेमधुन रस्ते करणे या कामामधील झालेली अनियमितता. 210
57 सन 2014-15 मध्ये 100% 'शासन अनुदान मधुन सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रातील मुलभुत सुविधा निर्मिती साठी रस्ते करणे या कामाधील झालेली अनियमितता. 216
58 सन 2014-15 मध्ये 100% 'शासन अनुदान मधुन सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रातील मुलभुत सुविधा निर्मिती साठी रस्ते करणे या कामाधील झालेली अनियमितता. 221
59 सन 2014-15 मध्ये 100% 'मनपा अनुदान मधुन सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका स्थलमितेतील ऑप्टीकल फायबर केबल जाळे टाकणा-या संबधित टेलिफोन कंपन्याकडुन जमा झालेल्या रक्कमेमधुन चरी दुरुस्ती करण्यात आलेल्या कामामधील अनियमितता. 225
60 सन 2014-15 मध्ये 50% 'शासन हिस्सा व 50% मनपा हिस्सा मधुन सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रातील नागरी वस्तीमध्ये पायाभुत व मुलभुत सुविधा पुरविणेसाठी रस्ते करणे या कामातील झालेली अनियमितता. 227
61 सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक ते विश्रामबाग पै.प्रकाश हॉटेल रस्ता डांबरीकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत 233
62 कुपवाड प्रभागातील क्रांतीसिंह नाना पाटील कॉलनीमधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे कामातील अनियमिततेबाबत 236
63 गंगानगर अष्टविनायकनगर,विवेकानंद सोसायटी,मंगलमुर्ती कॉलनी व वारणाली परिसर अंतर्गत रस्ते करणे कामातील अनियमिततेबाबत 241

64 नगर रचना विभागाअंतर्गत बांधकाम परवानगी विभागातील कामातील अनियमिततेबाबत.....245
65 नगर रचना विभागाअंतर्गत बांधकाम परवानगी विभागातील कामातील अनियमिततेबाबत.....247
66 नगर रचना विभागाअंतर्गत बांधकाम परवानगी विभागातील कामातील अनियमिततेबाबत.....249
67 मनपा हद्दीतील सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी जमिनीचे नुकसान भरपाईपोटी भूमि संपादन विभागाकडे जमा केलेल्या रकमेबाबत.....252
68 गुंठेवारी विकासांचे नियमितीकरण व श्रेणीवाढ करणे या मधील अनियमिततेबाबत.....253
69 सांगली मिरज कुपवाड शहर मनपाच्या, सांगली विभागातील कर संकलन विभागाच्या मालमत्ता करातील अनियमिततेबाबत.....257
70 कर निर्धारण व कर संकलन विभागचे आर्थिक वर्ष 2014-15 या कालावधीतील मिळकत कराच्या थकबाकी वसुली बाबत.....260
71 करनिर्धारक व संकलक मिरज विभागाकडील सन 2014-15 मधील नवीन मिळकतीवर घरपट्टी आकरणी बाबत झालेली अनियमितता.....261
72 मनपा हद्दीमधील मिळकतीचे पुन:सर्व्हेषण करणे, भाडेवाढ केलेली नाही. याबाबत झालेली अनियमितता. ..265
73 सांगली मिरज कुपवाड शहर मनपाच्या, सांगली विभागातील कर संकलन विभागाच्या मालमत्ता करातील अनियमिततेबाबत.....266
74 सांगली मिरज आणि कुपवाड शहर महागनरपालिका पॅनेलवर विधीज्ञांनाची नियुक्ती करताना झालेली अनियमितता बाबत.....268
75 सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका मालमत्ता विभाग अंतर्गत मिरज कार्यालयाकडुन परवाना शुल्क आकारणी करताना झालेली अनियमितता.....269
76 संगणक विभागाकडील E-GOVERENCE अंतर्गत HCL कंपनीकडुन राबविण्यात येणा-या प्रकल्पाचे तांत्रिक लेखापरिक्षण करताना झालेले अनियमितता बाबत.....272
77 संगणक विभागाकडील E-GOVERENCE अंतर्गत घरपट्टी व पाणी पुरवठा, मालमत्ता ची बिले तयार करणेसाठी कंपनी नियुक्ती करताना व देयके अदा करताना झालेले अनियमितता बाबत.....274
78 भांडार विभागाकडून 2014-15 वर्षाकरिता लागणारे लेखन साहित्य व अनुषंगिक स्टेशनरी खरेदीतील अनियमिततेबाबत.....276
79 स्थानिक संस्था कराची अंदाजपत्रकातील प्रत्यक्ष जमा रक्कम व विभागाकडील जमा रक्कमेतील तफावती बाबत. 280
80 आर्थिक वर्ष 2014-15 मधील स्थानिक संस्था कराचे प्रलंबित निर्धारणा बाबत.....281
81 मोकाट कुत्र्यांच्या निर्बिजिकरणाबाबत चुकीचे धोरण अवलंबल्यामुळे दरवर्षी निष्फळ खर्च होण्याच्या शक्यतेबाबत.....283
82 मुद्रांक शुल्क कमी भरणा केलेबाबत.....285
83 कत्तलखाना विभागातील जमा किर्दीचे लेखापरीक्षणात आढळलेल्या अनियमिततेबाबत. 286

84 महानगरपालिका हद्दीतील खाजगी व ट्रस्टच्या मालकीचे खाजगी शुश्रूषा गृहांची नोंदणी व नूतनीकरण न केल्याने झालेल्या नुकसानीबाबत. 288
85 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका अंतर्गत कार्यान्वित मोफत अंत्यसंस्कार योजनेतील अनियमिततेबाबत. 291
86 सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे मालमत्ता विभागाचे अभिलेखे तपासले असता वसुली लिपिकाकडून जमानतनामे न घेण्यात आलेल्या अनियमिततेबाबत. 293
87 सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे मालमत्ता विभागाचे अभिलेखे तपासले असता निदर्शनास आलेल्या अनियमिततेबाबत. 294
88 सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे मालमत्ता विभागाचे अभिलेखे तपासले असता प्राथमिक शिक्षण मंडळ सांगली व मिरज यांचेकडील इमारत भाडे थकीत असलेबाबत. 296
89 मालमत्ता विभागाने मनपा आस्थापनेवर नसलेल्या व्यक्तींना निवास्थान वाटप केले बाबत तसेच त्यांचेकडून भाडेची रक्कम वसूल केली नसल्याबाबत 297
90 मिरज विभागाकडील मालमत्ता भाडे तत्वावरील गाळे, इमारती खुली जागा, धोबी कट्टे व मनपा लाकडी खोकी, खाजगी खोकी यांची थकबाकी 2013-14 अखेर व 2014-15 ची चालू थकित रक्कम वसुल केली नसलेबाबत. 300
91 सांगली विभागाकडील मालमत्ता भाडे तत्वावरील गाळे, इमारती खुली जागा, धोबी कट्टे यांची थकबाकी 2013-14 अखेर व 2014-15 चालूची थकित रक्कम वसुल केली नसलेबाबत 303
92 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका प्रभाग समिती एक अंतर्गत वार्डनंबर 3 पंचशील निवास ते हबिबाबी मंजिल पर्यंत गटर करणे. 307
93 प्रभाग समिती एक अंतर्गत वार्ड नंबर 3 संजयनगर पेट्रोल पंपासमोर दक्षिण उत्तर रस्त्यास क्रॉस पाइप बसविणे. अहिल्याबाई होळकर सर्कल व भीमनगर येथील स्वागत कमानीचे रंगकाम करणे स्वस्तिक व ब्रिज मागील गटारीवर स्लॅब टाकणे. 310
94 सांगली, मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्र. 2 अंतर्गत करण्यात आलेल्या सर्व कामांची अभिलेखे उपलब्ध करुन देणेबाबत. 312

कलम ९ क खालील आक्षेप 314

---------- निरंक ---------- 315

कलम ९ ड खालील आक्षेप 317

95 व्यवसायकर रकमा भरणा करणेबाबत शासनाकडून 5% रक्कम प्राप्त करून न घेतलेबाबत. 318
96 भविष्य निर्वाह निधी खाते व बँक गुंतवणूक नोंदवही यामधील अनियमिततेबाबत. 319
97 घसारा निधिबाबत. 321
98 अग्निशमन विभागात ठेवण्यात आलेल्या जडसंग्रह साठा नोंदवहीस वर्षअखेर पडताळणी करुन कार्यालय प्रमुखाने प्रमाणपत्र न नोंदविलेबाबत 322

99 आगसुरक्षा निधीची शिल्लक रक्कम मुदतीवर न ठेवल्यामुळे महानगरपालिकेस व्याजापोटी झालेल्या आर्थिक नुकसाणीबाबत. 323
100 फायरमन पदावर केलेल्या नियुक्तीबाबत. 324
101 सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका अग्निशमन दलाकडील फायर फायटर, वॉटर ट्रॉली, फायर टँकर यांचे तसेच विविध तपासणी कामी आकारणेत येणा-या फी मध्ये वाढ करणे बाबत. 325
102 प्राथमिक शिक्षण विभागाचे मनपा येणे/देणे रक्कमेचा तपशील व मनपा कडुन देण्यात आलेले अनुदान खर्ची व शिल्लक रककमेचा तपशील यामध्ये झालेल्या अनियमितता बाबत....326
103 संवर्ग बदलून चुकीच्या पद्धतीने दिलेल्या पदोन्नतीमुळे वेतन व भत्त्यांचे झालेल्या अतिप्रदानाबाबत. 327
104 विदयुत विभागाने सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये वीज वितरण कंपनीची मागील थकबाकी / व्याज अदा न केल्यामुळे आकारण्यात येत असलेल्या थकबाकी /व्याजामुळे महानगरपालिकेच्या होत असलेल्या आर्थिक नुकसानीबाबत....329
105 सन 2014-15 मध्ये निवृत्ती वेतन अदा करताना हयातीचा दाखला प्राप्त झाले नसताना ही निवृत्ती वेतन अदा केले बाबत. 336
106 डॉ.सौ.अनिगोळ सुमन शेषराव, एम.बी.बी.एस यांची नियुक्ती व सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत....338
107 नगर रचना विभागाने बांधकाम परवाना नोंदवही विहित नमुन्यात ठेवलेलली नसल्याने झालेली अनियमितता. 340
108 लेखापरीक्षणासाठी साठी प्रमाणके उपलब्ध करून न देणेबाबत. 342
109 नागरी कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत नागरी आरोग्य सेवा योजनेतील 17 केंद्रांना मिळणार्याधिकीत अनुदानाबाबत. 365
110 कोंडवाडा विभागाकडून जप्त केलेल्या गुराढोरांची परिरक्षा करणे संबंधीच्या फी वसुलीमधील अनियमिततेबाबत. 366
111 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका अंतर्गत घनकचरा विभागाकडून खालील अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून न दिलेबाबत....369
112 सन 2014-15 या कालावधीतील ग्रंथालय विभागाने लेखा विभागाकडे जमा केलेल्या वर्गणी/अनामत रकमांच्या अनियमिततेबाबत. 370
113 महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व अधिनियम 1975 अन्वयेचे कलम 7 (ख)नुसार झाडांची गणना पाच वर्षातून एकदा न करणेबाबत. 372
114 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेमधील विविध ड्रेनेज कामांमध्ये झालेल्या अनियमिततांबाबत तसेच मिरज शहरातील ठिकठिकाणी चेंबर्सची दुरूस्ती करून त्यावर फ्रेम व कव्हर्स बसविणे भाग-2 कामामधील अनियमितता. 372
115 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका अंतर्गत कोंडवाडा विभागाकडून खालील अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून न दिलेबाबत....376

116 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका प्रभाग समिती एक अंतर्गत वार्ड नंबर 16 दडगे गर्ल्स हायस्कूल पिछाडी पंजाब सिंध बँकेसमोर गटर करणे व ठिकठिकाणी गटारीवर स्लॅब टाकणे.....376
117 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका प्रभाग समिती एक अंतर्गत वार्ड नंबर 17 वखारभाग पूरोहित घर ते स्नेह बंगला पर्यन्त सांडपाणी निचऱ्यासाठी फूल राऊंड पाईप बसविणे.....379
118 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका प्रभाग समिती एक अंतर्गत वार्ड नंबर 3 हडको कॉलनी अंतर्गत पडलेल्या गटारी दुरुस्त करणे.....381
119 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका अंतर्गत अतिक्रमण विभागाकडून खालील अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून न दिलेबाबत.....383
120 माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र येथुन कुपवाड झोनकरीता नविन 200 HP क्षमतेचे पंप पुरविणे या कामामधील अनियमिततेबाबत.....384
121 UIDSSMT अंतर्गत शासनाकडून प्राप्त रक्कमेवर मिळणारे व्याज शासन खाती जमा न केलेबाबत.....387
122 प्लंबर लायसन्स परवाना, नुतनीकरण, व लायसन्सधारक यांचे कामकाजामधील त्रुटीबाबत. 388
123 सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हददीतील / क्षेत्रामध्ये सांगली शहरातील वाहने/ट्रक यांची पार्कींग फी वसूल करत नसलेबाबत.....390
124 सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी निवासस्थान, मासिक घरभाडे नियमानुसार वसुल केले जात नसलेबाबत. 391
125 वृक्ष प्राधिकरण समिती नियमानुसार गठीत न केलेबाबत तसेच वृक्षकर प्राधिकरण निधी न ठेवलेबाबत. ...393
126 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या सन 2014-15 या कालावधीतील उद्यान निगा राखणीवरील निविदा प्रक्रिया व खर्चाबाबत. 395
127 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका प्रभाग समिती 3 अंतर्गत गटर करणे कामातील अनियमिततेबाबत. 398
128 क्रिडा विभागावर 5% रक्कम खर्च न करणेबाबत. 401
129 सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रमांक 4 विभागाकडून खालील अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून न दिलेबाबत.....402
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र 405

विवरणपत्रे व जोडपत्रे.....406

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण

विभाग	९अ	९ब	९क	९ड
इतर	29, 30	35, 36, 37, 38, 39		101, 102, 103
सामान्य प्रशासन	13, 14	43, 44		105, 106
शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम	15, 16, 17, 18, 19, 20	51, 52, 53, 54, 55, 56, 57, 58, 59, 60, 61, 62, 63		
शहर अभियंता आणि विद्युत विभाग	4, 5, 6	40, 41, 42		104
पाणी पुरवठा व मल निसा:रण	7, 8, 9, 10, 11, 12	45, 46, 47, 48, 49, 50		120, 121, 122
लेखा विभाग	1, 2, 3			95, 96, 97
लेखापरीक्षण	33			
नगर रचना	21, 22, 23, 24, 25	64, 65, 66, 67, 68		107, 108
जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर		79, 80		
कर निर्धारण व संकलन		69, 70, 71, 72, 73		
आरोग्य		81, 82, 83, 84, 85		109, 110, 111, 112, 113
भूमी व मालमत्ता विभाग		86, 87, 88, 89, 90, 91		123, 124
विधी विभाग	26	74		
भांडार		78		
परवाना व मंडई विभाग	27, 28	75		
संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान		76, 77		
क्रिडा विभाग				128, 129
अग्निशमन विभाग		34		98, 99, 100

प्रभाग कार्यालये		92, 93, 94		127
उद्यान विभाग	31			125, 126
जल निस्सारण				114, 115, 116, 117, 118, 119
पशु वध गृह	32			

I Part I :मागील लेखा परीक्षण अहवाल

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

13 व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांचे व त्यांच्या अंतर्गत असलेल्या उपक्रमांचे वैधानिक लेखापरिक्षण वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक स्थानिले-1010/प्र.क्र.26 ब/ विमा प्रशा, दि.31/03/2011 अन्वये संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई यांचेकडे सोपविण्यात आले आहे. त्यानुसार 2011-12 लेखापरिक्षण सुरु करण्यात आले आहे. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमाचे कलम 10(4) नुसार लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून 4 महिन्याच्या आत अहवालातील आक्षेपांची पूर्तता करून पूर्तता अहवाल स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयास पाठविणे आवश्यक आहे. तथापि 2011-2012 ते 2013-2014 पर्यंतच्या लेखापरीक्षण अहवालातील खालीलप्रमाणे एकूण 419 परिच्छेद प्रलंबित आहेत. स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाच्या अभिप्रायाची/आक्षेपाची पूर्तता दाखविण्यात आलेली नाही.

प्रलंबित परिच्छेद खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	ले.प.वर्ष	परिच्छेद क्रमांक	एकूण
1	2011-12	1 ते 171 परिच्छेदांमधील बाबी.	171
2	2012-13	1 ते 142 परिच्छेदांमधील बाबी.	142

2013-2014 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेद.

परिच्छेद क्रमांक	शिर्षक
1	अर्थसंकल्पावरील भाष्य :- अंदाजपत्रकीय तरतुद व प्रत्यक्ष जमा व खर्च यामध्ये आढळून आलेल्या तफावतीबाबत.
2	वार्षिक प्रशासन अहवाल व वार्षिक लेखे लेखापरीक्षणास सादर केले नसलेबाबत.
3	स्थायी समीतीने लेखे ठेवणेसाठीचे निर्देशित केलेले विहित नमुने लेखा विभागाने लेखापरीक्षणास सादर केले नसलेबाबत तसेच उपर्जित द्विनोंद पध्द्तीने लेखे व ताळेबंद ठेवला नसलेबाबत.
4	कर्मचा-यांना दिलेल्या अग्रीम रक्कमांचे समायोजन केले नसलेबाबत.
5	जनरल फंड निधीच्या रोकडवही व बँकपासबुक रक्कमेमधील तफावतीचा ताळमेळ घेतला नसलेबाबत.

6	भविष्य निर्वाह निधी खाते मधील अनियमितताबाबत.
7	नविन पाणीपुरवठा कनेक्शनधारकांना मागणी देयके विलंबाने दिलेने महानगरपालिकेस पाणीपुरवठा देयकापोटी मिळणारी रक्कम वेळेत मिळत नसलेबाबत.
8	पाणी मिटर बंद असल्यामुळे पाण्याच्या प्रत्यक्ष वापरा प्रमाणे महसुली उत्पन्न मिळत नसल्याबाबत.
9	पाणीपट्टी थकबाकी वसूल करण्यासाठी नियमाप्रमाणे कार्यवाही केली जात नसलेबाबत.
10	माळबंगला येथे 70 दशलक्ष लिटर क्षमतेचे आधुनिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.
11	वाढीव व सुधारित सांगली व कुपवाड नळ पाणीपुरवठा योजना पॅकेज 3.1, 3.3 व 3.4 या कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत.
12	महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 67(3)(क) खाली करण्यात आलेल्या 17 कामांचे दप्तर लेखापरीक्षणास सादर केले नसल्याने रक्कम रु.7916484/- आक्षेपाधिन ठेवण्यात आलेबाबत.
13	इंदिरा घरकुल झोपडपट्टी स.न.138/ब येथे 155 + 651= 806 घरकुले बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.
14	संजय गांधीनगर मिरज स.नं.964/अ येथे 438 घरकूलांचे पायाभुत सुविधासह बांधकाम करणे या कामामधील अनियमिततेबाबत.
15	वॉर्ड क्र.13 काँग्रेस भवन समोर स्वागत कमान बांधणे हे काम नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन करता येत नसताना केलेने झालेल्या अनियमिततेबाबत.
16	आर्थिक वर्ष संपण्याचे अखेरीस बांधकाम विभागाने विकास कामाची टेंडर मागवुन त्याबाबतची कार्यवाही पुढील वर्षामध्ये केल्याने झालेल्या गंभीर वित्तिय अनियमिततेबाबत.
17	सुधारीत अंदाजपत्रपकाप्रमाणे खर्चामध्ये कपात करुन कामे न करता, मुळ अंदाजपत्रकातील तरतुदीनूसार निविदा मागवुन कामे केल्याने प्रलंबित देयकाचे दायित्व महानगरपालिकेवर वाढून झालेल्या वित्तिय अनियमिततेबाबत.
18	प्रभाग समिती क्रं.1 व 2 च्या कार्यक्षेत्रातील गणेशोत्सव निमित्त रस्त्यातील खड्डे मुरुमाने भरणे या कामामधील अनियमिततेबाबत.
19	वॉर्ड क्र.25 मधील हरीओम नगर मंदीर जवळ आर.सी.सी.कमान बांधणे हे काम नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन केलेने झालेल्या अनियमितते बाबत.
20	सांगली विभागाकडील मालमत्ता विभागाची थकबाकी रक्कम वसुल केली नसलेबाबत.
21	मालमत्ता विभागाने मनपा अस्थापनेवर नसलेल्या व्यक्तींना निवास्थान वाटप केले असुन त्यांचे कडून घरभाडेची रक्कम वसूल केली नसल्याबाबत.
22	नोंदणीकृत व्यावसायिकांनी स्थानिक संस्था कर रक्कमेचा कमी भरणा केलेबाबत.
23	मिरज घरपट्टी विभागातील जमा पावती पुस्तक क्र 456 उपलब्ध करुन दिले नसल्याबाबत.
24	घरपट्टीची मागणी देयके मालमत्ताधारकास विलंबाने दिलेने घरपट्टीचा भरणा उशिरा झाल्याने मनपास सदरची रक्कम वेळेत प्राप्त झाली नसलेबाबत.
25	पेट्रोल-डिझेल वाहनांच्या दुरुस्तीवर वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त खर्च केलेबाबत.
26	कार्यशाळा विभागाला स्टॉकसाठी लागणारे लुब्रिकेटिंग ऑईल खरेदी मधील अनियमिततेबाबत
27	विवाह नोंदणी शुल्क व शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरणा न केलेबाबत.

	कामातील अनियमितताबाबत.
49	सुजल निर्मल अभियान योजनेअंतर्गत मिरज पाणीपुरवठा विभागातील अस्तीत्वातील 19.20 द.ल.लि. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता 28.80 द.ल.लि. पर्यंत वाढवणे व अस्तीत्वातील जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करणे. या कामातील अनियमितता.
50	सांगली, मिरज आणि कुपवाड हद्दीतील अस्तित्वातील 22 उंच टाक्या व 3 संप पंप हाऊस दुरुस्त करणे या कामातील अनियमिततेबाबत.
51	सांगलीवाडी येथे 15 लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे तसेच शामरावनगर येथे वितरण नलिका टाकणे व विविध ठिकाणी कंपाऊंड वॉल बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.
52	कोल्हापूर रोड येथे 15 लाख लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे, वितरण व्यवस्था व कंपाऊंड वॉल बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.
53	माळबंगला येथे 25 लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ,वसंत कॉलनी,काळी खण ESR झोन येथे वितरण व्यवस्था व कंपौंड वॉल बांधणे या कामामधील अनियमिततेबाबत.
54	महानगरपालिका हद्दीत 15 लाख लिटर क्षमतेची उंच पाण्याची टाकी बांधणे, संजय नगर,माळबंगला परिसरात वितरण व्यवस्था करणे या कामामधील अनियमिततेबाबत.
55	माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र येथुन कुपवाड झोनकरीता नविन 200 HP क्षमतेचे पंप पुरविणे या कामामधील अनियमिततेबाबत.
56	मिरज शहर भुयारी गटर योजनेमध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत.
57	सांगली शहर भुयारी गटार योजनेच्या कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत.
58	मासिक विद्युत देयकाच्या रकमा अदा करताना सवलत कालावधीचा फायदा न घेतल्याने झालेल्या नुकसानीबाबत.
59	सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील अनियमिततेबाबत.
60	कॉम्पेक्टर नंबर MH-10-P1007 च्या दुरुस्तीमधील अनियमिततेबाबत.
61	वाहन विभागातील अनियमिततेबाबत
62	डंपर प्लेसर MH-10-P-22 च्या दुरुस्ती खर्चामधील अनियमिततेबाबत.
63	सुधारित वेतन बँड मध्ये कमाल टप्यावर पोहचलेल्या कर्मचा-यांना एक वेतनवाढ जादा दिल्याने व जादा ग्रेडवेतन मंजूर केल्याने वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती, उपदान, अंशराशीकरण रक्कमेच्या झालेल्या अतिप्रदानाबाबत.
64	अर्हताकारी सेवा 20 वर्ष पेक्षा कमी असताना स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजुर करुन निवृत्ती वेतन अंशराशीकरण रक्कम आदा केलेबाबत.
65	पदोन्नती साखळीतील पदोन्नतीचे पद नसताना एकाकी पदानुसार ग्रेडवेतन मंजूर करणे ऐवजी चुकीचे ग्रेडवेतन मंजूर केल्याने वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती, उपदान, अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झालेबाबत.
66	चुकीच्या वेतननिश्चीतीमुळे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती वेतन, उपदान व अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झालेबाबत.
67	वाढीव कुटुंब निवृत्ती वेतन विहीत मुदतीनंतर कमी केले नसल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.
68	मिरज विभागाने मालमत्ता कर आकारणी विलंबाने केल्याबाबत.

69	मिरज विभागाकडील मालमत्ता कर आकारणी मधील अनियमितताबाबत
70	सुजल निर्मल अभियान योजने अंतर्गत मिरज जलशुध्दीकरण येथे 10 द.ल.लि. क्षमतेचे अपारंपारिक जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.
71	चुकीच्या वेतननिश्चीतीमुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत
72	सुधारित वेतन बँड मध्ये कमाल टप्यावर पोहचलेल्या कर्मचा-यांना एक वेतनवाढ जादा दिल्याने व जादा ग्रेडवेतन मंजूर केल्याने झालेल्या वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन, उपदान, अंशराशीकरण रक्कम यांचे अतिप्रदान झालेबाबत.
73	क्षेत्रफळ कमी धरुन आकारणी केल्याने उपकर, स्थानिक संस्था कर व दंडात्मक शुल्काची रक्कम कमी वसुल झालेबाबत.
74	बांधकाम परवाना दिलेल्या व्यक्तिकडुन एल.बी.टी.ची उर्वरित 50 टक्के रक्कम वसुल केली नसलेने झालेल्या नुकसानीबाबत.
75	शालेय क्रिडा स्पर्धा 2013-14 च्या खर्च रक्कमेची उपप्रमाणके, विनियोग दाखले व खर्चा बाबतची अनुषंगिक अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नसलेबाबत.
76	वॉर्ड क्र. 21 मधील भिमनगर येथील रस्ते सिमेंट काँक्रीटीकरण करणे या कामामधील अनियमिततेबाबत.
77	चिंतामणी नगर येथील सांस्कृतीक हॉल बांधणे या कामामधील अनियमिततेबाबत.
78	वॉर्ड क्र. 30 नवीन वसाहत अंतर्गत रस्ते सिमेंट काँक्रीटचे करणे या कामामधील अनियमिततेबाबत.
79	वॉर्ड क्र. 59 गणेश नगर, डी.ए. पाटील घर, बेडकर किराणा दुकान, शास्त्रीनगर समाज मंदिर रस्ता सिमेंट काँक्रीट करणे या कामामधील अनियमिततेबाबत.
80	वॉर्ड क्र.14 केशव कॉलनी अंतर्गत रस्ते करणे या कामामधील अनियमिततेबाबत.
81	वॉर्ड क्र.69 मधील स्वामी समर्थ मंदिर परिसर येथील रस्ते डांबरी करणे या कामामधील अनियमिततेबाबत.
82	वॉर्ड क्र.21 भिमनगर अंतर्गत काँक्रीटचे रस्ते करणे या कामामधील अनियमितते बाबत.
83	दलित वस्ती सुधार योजनेमधुन करण्यात आलेल्या विकास कामामधील अनियमिततेबाबत.
84	प्रभाग समिती क्र. 4 मध्ये करण्यात आलेल्या विविध विकास कामामधील अनियमिततेबाबत.
85	कुपवाड प्रभाग समिती क्र.03 मध्ये करण्यात आलेल्या विविध विकास कामामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत.
86	प्रभाग समिती क्रमांक 2 मध्ये करण्यात आलेल्या विकास कामामधील अनियमिततेबाबत.
87	महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 67(3)(क) खाली करण्यात आलेल्या वॉनलेसवाडी नाल्यामध्ये आर.सी.सी.पाईप टाकणे या कामामधील अनियमिततेबाबत.
88	नगरसेवकांना देण्यात आलेल्या मोबाईल सेवेचे अर्थिक लाभ वसुल करण्याबाबत.
89	नविन कर्मचा-यांचे सेवापुस्तकामधील नोंदी अपुर्ण ठेवलेबाबत.
90	कर्मचा-यांना जादा वेतनवाढ दिल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.
91	नविन नियुक्त केलेले कर्मचा-यांच्या सेवापुस्तकातील नोंदी महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 नुसार घेतल्या नसलेबाबत.
92	रजा कालावधीचे वेतन वेतनवाढीच्या दिनांकापासून दिल्याने वेतन व भत्त्याचे अतिप्रदान झालेबाबत.

93	ग्रंथालय विभागाने सभासद थकबाकीची रक्कम वसुल केली नसलेबाबत
94	सफाई कर्मचा-यांची चुकीची वेतननिश्चिती केलेबाबत.
95	सेवानिवृत्त कर्मचा-यांना निवृत्तीवेतन व सेवा उपदानाच्या रक्कमेचे कमी प्रदान झालेबाबत.
96	वैद्यकिय प्रमाणपत्रा शिवाय मंजूर करण्यात आलेला असाधारण रजा अर्हताकारी सेवेतुन कमी न केल्याने निवृत्ती वेतन व उपदान यांचे अतिप्रदान झाले बाबत.
97	अधिकारी/कर्मचारी यांचे सेवापुस्तकामध्ये वारस नामनिर्देशनाच्या नोंदी घेतल्या नसलेबाबत.
98	प्लंबर लायसन्स परवाना,नुतनीकरण व लायसन्सधारक यांचे कामकाजामधील त्रुटीबाबत.
99	सांगली पाणीपुरवठा विभागाने ग्राहकांना नविन मिटर कनेक्शन देणेसाठी नळ कारागीर यांना लायसन्स दिले नसलेबाबत.
100	UIDSSMT योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र बांधणे या उपांगाचे काम अपुर्ण असल्याने, पुर्ण झालेल्या उंच टाक्या व वितरण व्यवस्था या उपांगावर झालेला खर्च रु.4866.89 लक्ष गुंतुन पडल्याबाबत.
101	UIDSSMT योजने अंतर्गत चालु असलेल्या कामावर मनपा हिश्श्याच्या रक्कमेची अंदाजपत्रकामध्ये तरतुद करुन खर्च केला नसल्याने निधी अभावी कामे प्रलंबित राहिल्याबाबत.
102	प्रलंबित दाव्याची माहिती विधी विभाग व वकीलांना दिली नसल्याने प्रलंबित राहिलेल्या दाव्याबाबत
103	कुपवाड विभागामधील मालमत्तांना मालमत्ता कर आकारणी विलंबाने केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत
104	भांडार विभागातील साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत.
105	मिरज व कुपवाड गुंठेवारी विभागाकडे धनाकर्षाने जमा केलेल्या प्रशमन शुल्क व विकास आकार रक्कमेच्या जमा पावत्या गुंठेवारीधारकास दिल्या नसलेबाबत.
106	HCL कंपनीस कामाची देयके कराराप्रमाणे मिळाली नसल्याने त्यांनी महानगर पालिकेस कायदेशीर नोटीस देवून कामकाज बंद केल्याने ई गव्हर्नन्स अंतर्गत मिळणा-या नागरी सेवांचे कामकाज विस्कळीत झाल्याबाबत.

उपरोक्त नमुद केलेल्या परिच्छेदांच्या संदर्भात त्या त्या वर्षाच्या प्रथम पुढील अभिप्रायांमध्ये नमुद केलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यात यावे.

वरील परिच्छेदांपैकी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 2011-12 व 2012-13 वर्षाच्या पुनर्विलोकन अहवालाकरिता निवडलेल्या परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	ले. प. वर्ष	परिच्छेद क्रमांक	एकूण
1.	2011-12	04, 05, 08, 10, 19, 24, 25, 29, 41, 55, 94, 97	12
2.	2012-13	02, 03, 04, 09, 12, 13, 17, 22, 23, 24, 25, 26, 29, 33, 46, 47, 66, 67, 68, 89, 96, 97, 98, 99, 101	25

Part II

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

भाग एक

गंभीर अनियमितता

कलम ९ अ, ब, क खालील आक्षेप

कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका, 2014-2015

आयुक्त जमा अंदाज (आकडे कोटीमध्ये)		जमा अंदाज (आकडे कोटी)		जमा
लेखा शिर्ष	रक्कम रुपये	महा सभा	महासभा सुधा.	प्रत्यक्ष
भाग 1 महसुली जमा अ				
अ) दर व कर घरपट्टी	23.37	23.37	22.50	15.76
ब)जकात	90.01	150.0	120.01	72.92
क)मालमत्ता	13.07	16.72	12.25	8.72
ड)अनुदान	9.27	9.27	11.37	9.03
इ)संकीर्ण	8.00	8.50	6.14	21.38
महसूली जमा अ	143.72	198.59	172.27	127.81
भाग 1 महसुली जमा क				
अ- जलनिस्सारण	3.79	3.79	3.11	1.88
ब – पाणीपुरवठा जमा	27.63	33.62	23.63	13.31
भाग 1 महसुली जमा क	31.42	37.41	26.74	15.19
महसूली जमा अ व क	**175.14**	**236**	**199.01**	**143**
भाग 2 भांडवली जमा अ	21.79	21.79	3.28	0.40
भाग 2 भांडवली जमा क	----	--------	--------	-------
भांडवली जमा अ व क	21.79	21.79	3.28	0.40
भाग 3 दुबेरजी जमा	55.09	55.09	56.77	48.37
भांडवली जमा ब	152.13	147.32	128.74	52.17
संभाव्य शिल्लकेसह एकुण जमा	404.39	470.32	504.11	349.54

अर्थसंकल्पात महसुली व भांडवली जमेचा रु . 470 कोटी 32 लाखाचा अंदाज वर्तविण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात रु . 349.54 कोटीचा महसुल जमा झाला आहे . तसेच खर्च बाजुस रु .568 कोटी 25 लाख महसुली व भांडवली खर्चाचा अंदाज वर्तविण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात महसुली व भांडवली खर्च रु.267 कोटी 18 लाख करण्यात आला आहे. अंदाजपत्रकाच्या तपासणी अंती असे दिसते की, अंदाजपत्रक तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानंतर त्यानुसार जमेच्या रक्कमा अवास्तव वाढविण्यात आल्या आहेत . वरील विव रणपत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की सुधारीत अंदाजपत्रकीय जमेचा अंदाज 504.11कोटी वर्तविण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात रु.349.54 कोटीचा महसुल प्रत्यक्ष जमा झाला आहे . एकुण जमेची टक्केवारी 69.34 टक्के इतकी आहे. तसेच 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये एकुण खर्च 267 कोटी 18 लाख इतका करण्यात आल्याने जमेशी खर्चाची टक्केवारी 76.38 टक्के इतकी आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 च्या नियम 26 (3)नुसार उत्पन्नाचे अंदाज हे मागील तीन वर्षाच्या जमेच्या तुलनेवर अधारलेले असले पाहिजेत . तसेच करापासुन मि ळणा-या उत्पन्नाचे व ज्यासाठी ठराविक मागणी असते अशा मार्गाने येणा -या उत्पन्नाचे अंदाज मात्र मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमेच्या सरासरीपर्यंत मर्यादित असावेत अथवा त्या वर्षाची मागणी ,अधिक वसुलीयोग्य वाजवी टक्केवारी या पैकी जी कमी असेल तेवढे असावेत तसेच नियम 26 (4) नुसार अर्थसंकल्प तयार करताना एकुण खर्चाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाची सरासरी अथवा अर्थसंकल्पीय वर्षाची अंदाजित जमा या दोहोपैकी जी कमी असेल त्यापेक्षा अधिक असु नयेत. महानगरपालिकेचा मागील तीन वर्षाचा महसुली प्रत्यक्ष जमा व खर्च पुढील प्रमाणे आहे . (आकडे कोटीमध्ये)

अ.क्र.	आर्थिक वर्ष	प्रत्यक्ष जमा रु.	प्रत्यक्ष खर्च रु.
1	2011-12	148.14	103.34
2	2012-13	157.34	111.03
3	2013-14	133.39	130.72
	एकुण	438.87	345.09
	सरासरी	146.29	115.03

महानगरपालिकेच्या 2011-12 ते 2013-14 या तीन आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष महसुली जमेची सरासरी रु .146 कोटी 29 लाख व महसुली खर्चाची सरासरी रु . 115 कोटी 03 लाख आहे. महानगरपालिकेच्या 2014 -15 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता महानगरपालिकेच्या महसुली जमेचा अंदाज प्रशासनाने रु .175 कोटी 14 लाखाचा तयार केला असुन महासभेने तो रु .236 कोटी 29 लाख इतका वाढवला आहे . प्रशासनाने मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष

महसुली जमेची सरासरी रु.146 कोटी 29 लाख या रक्कमे इतके अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असता ते रु.175 कोटी 14 लाखाचे तयार केलेने अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु.28.85 कोटीची वाढ केली आहे व महासभेने त्यामध्ये रु . 89.71 कोटीची वाढ केली आहे . महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 26(3) नुसार करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे व ज्यासाठी ठराविक मागणी असते अशा मार्गाने येणाऱ्या उत्पन्नाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमेच्या सरासरीपर्यंत मर्यादित असावेत अथवा त्या वर्षाची मागणी अधिक वसुलीयोग्य वाजवी टक्केवारी यापैकी जी कमी असेल तेवढे असणे आवश्यक असता प्रशासनाने त्याप्रमाणे कार्यवाही न करता त्यामध्ये नियमबाह्यरित्या वाढ केल्याचे दिसुन येते.

मागील तीन वर्षाचे करापासून मिळणारे उत्पन्न 2011-12 या वर्षामध्ये रु.148 कोटी 14 लाख, 2012-13 या वर्षामध्ये रू.157 कोटी 34 लाख व 2013-14 या वर्षामध्ये रू.133 कोटी 39 लाख प्राप्त झाले असुन त्याची एकूण सरासरी रु .146 कोटी 29 लाख येते. परंतु आयुक्त यांनी 2014-15 या आर्थिक वर्षासाठी रु.175 कोटी 14 लाखाचा अंदाज सुचविला आहे. तो वरील नियमाशी पूर्णपणे विसंगत आहे. तसेच 2013-14 या आर्थिक वर्षात एकुण महसुली व भांडवली जमा रु .419 कोटी 99 लाख व खर्च रु .298 कोटी 15 लाख झाला आहे . आयुक्त यांनी 2014-15 या आर्थिक वर्षाचे महसुली व भांडवली जमा व खर्चाचे अंदाजपत्रक रू.470 कोटी 32 लाखाचे केले आहे. म्हणजेच मागील वर्षाच्या प्रत्यक्ष जमेपेक्षा रु.50.33 कोटी वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1949 नियम 26(8) नुसार जर जमा व खर्च यांचे आकारामध्ये असामान्य चढ -उतार होत असतील तर येथे अशा चढ -उतारांच्या कारणांसह संक्षिप्त स्पष्टीकरण देणे आवश्यक असताना ते देणेत आलेले नाही.

महानगरपालिकेच्या 2014-15 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता महानगरपालिकेच्या महसुली जमेचा अंदाज प्रशासनाने रु .175 कोटी 14 लाखाचा केला असुन महासभेने त्यामध्ये वाढ करुन तो रु .236 कोटी 00 लाख इतका केला आहे . आयुक्त यांनी तयार केलेल्या महसुली अंदाजपत्रकामध्ये महासभेने रु .60.86 कोटीची वाढ केली आहे . महानगरपालिकेच्या 2016 -17 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.11 वर 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये जमा झालेल्या महसुलाचे नक्की आकडे दिले आहेत त्यानुसार या वर्षामध्ये एकुण रक्कम रु .143 कोटी 01 लाखाचा महसुल प्राप्त झाला आहे . त्यामुळे महानगरपालिकेस अंदाजित केलेल्या रक्कमेपेक्षा रु.92.99 कोटी कमी उत्पन्न प्राप्त झाले आहे. महानगरपालिकेस अंदाजित रक्कमेच्या 60.59 टक्केच महसुली उत्पन्न प्राप्त झाल्याचे दिसुन येते.

मनपा दर व कर या लेखाशिर्षांतर्गत घरपट्टी विभागाच्या जमा रक्कमांचा समावेश आहे . 2014 - 15 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये घरपट्टी विभागाची जमा महानगरपालिकेने रु.23.37 कोटी इतकी अंदाजित केली आहे . परंतु प्रत्यक्षात रु.15 कोटी 76 लाखांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे . म्हणजेच महानगरपालिकेस सरासरी 67.43 टक्के इतकेच उत्पन्न घरपट्टीच्या महसुलाद्वारे प्राप्त झाले

आहे.घरपट्टी विभागाकडून घरपट्टीची थकबाकीसह 100 टक्के वसुली होणे अपेक्षित असताना त्यांना वसुलीचा इष्टांक कमी करुन दिला जात असल्याने त्याचा घरपट्टी वसुलीवर परिणाम होत असल्याचे दिसुन येते.

ब - कराव्यतिरिक्त खास कायद्यान्वये उत्पन्न या लेखाशिर्षांतर्गत जकात व स्थानिक संस्था करापासुन मिळणारे उत्प न्न आयुक्त यांचे अंदाजपत्रकामध्ये रु .90.01 कोटी अंदाजित केले आहे. महासभेने त्यामध्ये वाढ करुन ते 150 कोटी केले आहे . परंतु प्रत्यक्षात रु . 72.92 कोटी स्थानिक संस्था कराची वसुली करण्यात आली आहे . अंदाजपत्रकामधील एकुण जमेच्या तरतुदीमध्ये जकाती पासुन मिळणा-या उत्पन्नाची टक्केवारी 51.39 टक्के इतकी गृहीत धरण्यात आली आहे. परंतु स्थानिक संस्था कर विभागाने करांच्या वसुलीसाठी प्रयत्न न केल्याने महानगरपालिकेस या करापोटी एकुण जमा अंदाज रक्कम रु.175 कोटी 14 लाख या रक्कमेच्या 41.63 टक्के इतकेच उत्पन्न प्राप्त झाले आहे. स्थानिक संस्था कर हा महानगरपालिके च्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असल्याने या कराची वसुली करणेसाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक असता महानगरपालिकेने प्रयत्न न केल्याने या कराची वसुली अत्यल्प झालेने महानगरपालिकेचे आर्थिक नियोजन पुर्णपणे कोलमडल्याचे दिसुन येते.

मालमत्ता विभागाकडुन 2014-15 या आर्थिक वर्षासाठी रु . 13 कोटी 7 लाखाचे उत्पन्न प्राप्त होणार असल्याचे अंदाजित केले होते परंतु प्रत्यक्षात रु. 8 कोटी 72 लाख इतकेच उत्पन्न प्राप्त झाले आहे . महानगरपालिकेस या विभागाकडुन 38.68 टक्के इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे . मालमत्ता विभागाने अंदाजपत्रकामध्ये रॉकेल डेपोपासुन मिळणारे उत्पन्न रु .1.20 कोटी प्राप्त होणार असल्याचे अंदाजित केले आहे . परंतु प्रत्यक्षात या लेखाशिर्षांतर्गत मागील तीन वर्षापासुन कोणतीही रक्कम प्राप्त झालेली नाही . सदर रक्कम वसुल करणेबाबत कोणतीही कार्यवाही मालमत्ता विभागाकडुन झालेली नसल्याने अंदाजपत्रकामधील जमेचे अंदाज फुगविण्यात आलेचे स्पष्ट होते.

2014-15 च्या अंदाजपत्रकामधील पृष्ठ क्र . 7 वर जलनि:सारण करापोटी 3.79 कोटी व पाणीपुरवठा विभागाकडून द्विनोंद कोड E314C मिटरने पाणी पुरविलेबाबतच्या आकारापोटी रु . 24 कोटी मिळणार असल्याचे अंदाजित केले आहे . परंतु प्रत्यक्ष जमा बाजूची तपासणी केली असता महानगरपालिकेस रु.13 कोटी 91 लाख प्राप्त झाले आहेत . वसुलीची टक्केवारी 57.95 टक्के इतकी आहे. सदर रक्कम वसूल करणेबाबत कोणतीही कारवाई पाणीपुरवठा विभागाकडून झा लेली नसल्याने अंदाजपत्रकातील जमेचे अंदाज फुगविण्यात आलेचे स्पष्ट होते.

2) आर्थिक वर्ष 2014-15 च्या सुधारीत अंदाजपत्रकामधील पृष्ठ क्रं . 12, द्विनोंद कोड C609C वर रु. 34 कोटी 70 लाख नगरोत्थान योजनेमधुन ड्रेनेजच्या कामासाठी शासनाकडुन प्राप्त होणार असल्याचे अंदाजित केले आहे . प्रत्यक्षात या योजनेसाठी रु .14.12 कोटी प्राप्त झाले आहेत . सदर योजनेसाठी शासनाकडून 50 टक्के रक्कम मिळणार असुन 50 टक्के रक्कम महानगरपालिकेने स्वनिधीमधून अथवा कर्जरुपाने उभी करावयाची आहे . त्यासाठी महानगरपालिकेने अंदाजपत्रकामध्ये नगरोत्थान योजने अंतर्गत जलनि :सारण मनपा हिस्सा (कर्ज) या लेखाशिर्षांतर्गत द्विनोंद कोड

C609D ने रु. 30 कोटीची तरतुद केली आहे . परंतु प्रत्यक्ष जमेचे आकडे तपासले असता या लेखाशिर्षांतर्गत रक्कम निरंक दाखविली आहे . यावरुन महानगरपालिकेने या योजनेच्या खर्चासाठी स्वनिधी हिस्सा म्हणुन कर्ज उभारणीसाठी कोणतेही प्रयत्न केलेले नसलेचे दिसुन येते . महानगरपालिकेने या योजनेवर 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये द्विनोंद कोड 41310 ने रक्कम रु. 31.91 कोटी खर्च केला असुन केवळ 3.15 लक्ष मनपातून केला आहे व उर्वरीत सर्व खर्च शासन निधीमधुन केला आहे . (अंदाजपत्रक 2016-17 पृष्ठ क्र.64, 2014-15 आर्थिक वर्षामधील खर्चाचा नक्की आकडा). महानगरपालिकेने या योजनेवर स्वनिधीमधुन किरकोळ खर्च केला असल्याने निधी अभावी या योजनेची कामे रखडणार असल्याचे स्पष्ट होते .. यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत 2014-15 या आर्थिक वर्षात शासननिधीमधुन द्विनोंद कोड 41221 ने रक्कमरु. 6 कोटी 2 लाख व सुजल निर्मल योजनेसाठी द्विनोंद कोड ने रु .1 कोटी 4 लाख खर्च करण्यात आला असुन महानगरपालिकेच्या हिश्श्यामधुन कोणताही खर्च करण्यात आलेला नाही पाणीपुरवठा विभागाच्या 2014-15 या आर्थिक वर्षाच्या ज मा बाजुस अंदाजपत्रकामध्ये मिटरने पाणीपुरवठा करणे या लेखाशिर्षांतर्गत रु. 33.62 कोटी जमेची तरतुद केली आहे . परंतु प्रत्यक्षात रु .13 कोटी 31 लाख इतकेच उत्पन्न प्राप्त झाले आहे. जमेची एकुण टक्केवारी 39.59 टक्के इतकीच आहे.

यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजनेच्या मनपा हिस्सापोटी कर्ज रु. 30 कोटी काढणेचे 2014-15 चे सुधारीत अंदाजपत्रामध्ये प्रस्तावित केले आहे .परंतु महानगरपालिकेने कर्ज काढले नसल्यामुळे महानगरपालिकेने स्वनिधीमधुन यायोजनेच्या कामावर खर्च करणे आवश्यक होते . परंतु महानगरपालिकेचे जमेचे मुख्य स्त्रोत अ सलेल्या मिटरने पाणीपुरवठा करणे या लेखाशिर्षांतर्गत अपेक्षित जमा झालेली नसलेने महानगरपालिकेने शासन निधीमधुनच खर्च केला आहे.वरील योजनेसाठी महानगरपालिकेने स्वनिधीची रक्कम उभी केली नसल्याने निधी अभावी या योजनांची प्रगती रेंगाळणार असल्याचे स्पष्ट होते.

3) नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 26(2) प्रमाणे अंदाजपत्रकीय वर्षारंभापूर्वी जी विदयमान देणी फेडता येणे अशक्य असतील अशांची खात्री करुन घेवुन त्यांची तरतुद त्या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये आवश्यक आहे. त्याप्रमाणे 2014-15 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.64 वर 2013-14 मध्ये तरतुद असलेल्या परंतु 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये लेखाशिर्ष नसलेली तसेच लेखाशिर्षावर तरतुद शुन्य असलेली आदा करावयाची देयके या लेखाशिर्षांतर्गत रु .15 कोटीची तरतुद केली आहे. आर्थिक वर्ष 2016-17 च्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र.56 वर 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये खर्चाचे नक्की आकड्यामध्ये या लेखाशीर्षाखाली रक्कम रु .07 कोटी 86 लाख खर्च झालेचे नमुद आहे. तसेच 2015-16 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये पृष्ठ क्र .56 वर द्विनोंद कोड 41254 ने 2014-15 मध्ये तरतुद असलेल्या परंतु 2015-16 या आर्थिक वर्षामध्ये लेखाशिर्ष नसलेली तसेच लेखाशिर्षावर तरतुद शुन्य असलेली आदा करावयाची देयके या लेखाशिर्षांतर्गत रु .5 कोटीची तरतुद केली आहे. परंतु 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये 2 कोटी 19 लाख रक्कमेची देयके

आदा केली आहेत. त्यामुळे महानगरपालिकेकडे दरवर्षी प्रलंबित देयकाची संख्या व आदा करावयाची रक्कम प्रलबिंत असल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम क्र.25 (2) नुसार महानगरपालिकेने पुढील वर्षाचे अंदाजपत्रक सादर करताना चालु वर्षाचे 1 एप्रिल ते 30 नोव्हेंबर या कालावधीचे प्रत्यक्ष उत्पन्न व खर्च आणि चालु वर्षाच्या उर्वरित भागातील उत्पन्न व खर्चाचे अंदाज वर्तविणे आवश्यक आहे . त्याप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये कपात करुन सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. या नियमानुसार महानगरपालिकेने अंदाजपत्रक तयार केले आहे. परंतु महानगरपालिकेस प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा आढावा लेखा विभागाकडे करुन त्यांचे अभिप्राय प्रत्येक कामाच्या नस्तीवर घेवुन त्याप्रमाणे प्रत्येक विभागाने विकास कामे करणे आवश्यक असता , अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे विकास कामे आयुक्तांच्या मंजुरीने केल्याने इतक्या मोठ्या प्रमाणात देयके प्रलंबित राहिलेचे स्पष्ट होते . महानगरपालिकेने अंदाजपत्रकामध्ये तरतुद केल्याप्रमाणे करांची वसुली करुन जमा महसूल वाढविणे आवश्यक आहे . महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे रक्कम जमा होते किंवा नाही या बाबतचा आढावा घेणा री कोणतीही यंत्रणा कार्यरत नसल्याने करांच्या वसुलीबाबत अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे दिसुन येते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 102 नुसार संपूर्ण अर्थसंकल्पीय अनुदान किंवा त्याचा कोणताही भाग , ज्या वर्षासाठी ते अनुदान अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करणेत आले असेल त्या वर्षाचे अखेरीस खर्च न होता तसेच राहिले असेल व ते पुढील दोन वर्षापैकी कोणत्याही वर्षाचे अर्थसंकल्पात नमुद केलेल्या यथास्थिती नगरपालिका निधीच्या प्रारंभिक शिल्लकेत हिशेबात घेतले नसेल तर स्थायी समिती किंवा परिवहन समितीस यथा स्थिती असे अर्थसंकल्पीय अनुदान किंवा त्याची खर्च न झालेली रक्कम पुढील दोन वर्षाचे मुदतीत कोणत्याही अन्य प्रयोजनासाठी किंवा उदिष्टासाठी नव्हे तर ज्यासाठी ते अर्थसंकल्पीय अनुदान मंजुर करणेत आले होते ते प्रयोजन किंवा उद्दिष्ट हे , मुळ उद्देशा प्रमाणे किंवा मं जुरीप्रमाणे साध्य करणेसाठी खर्च करणेस मंजुरी देता येईल . या अधिनियमातील तरतुदी प्रमाणे महानगरपालिकेने मागील दोन वर्षातील न केलेल्या कामांची यादी तयार करुन त्या यादीतील प्रलंबित कामे प्राधान्याने करणे आवश्यक आहे . परंतु महानगरपालिकेने त्याप्रमाणे कामांची यादी तयार केली नसल्याने मागील प्रलंबित असलेली कामे कशा प्रकारे करणार आहे ते समजुन येत नाही.

आर्थिक वर्ष 2014-15 मध्ये एकुण महसुली जमा रु .143 कोटी 01 लाख झाली असुन महसुली खर्च रक्कम रु. 125 कोटी 6 लाख इतका करण्यात आला आहे. पैकी रु.63.52 कोटी इतकी रक्कम कर्मचा-यांच्या वेतन व भत्त्यापोटी खर्च करण्यात आली आहे . तसेच निवृत्तीवेतन व कुटूंब निवृत्ती वेतनावर रु.14 कोटी 45 लाख, प्राथ.शिक्षण मंडळास वेतनासाठी वर्ग रक्कम रु.10.07 कोटी, प्रशासकीय खर्च रु . 12.38 कोटी असा एकुण खर्च रु .100.42 कोटी करण्यात आला आहे . एकुण महसुली जमेच्या 70.2 % इतकी रक्कम अस्थापनेवर खर्ची पडली आहे.

4) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95(अ) अन्वये ज्या विभागांना अर्थसहाय्य

देण्यात आले आहे त्याचे विवरण पत्र , महानगरपालिकेच्या 2016-17 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकासोबत खालील प्रमाणे सादर करण्यात आले आहे.

अ.क्र.	अर्थसहाय्य दिलेल्या विभागाचे नाव	विभागाची जमा रु. 2014-15	विभागाचा खर्च रु. 2014-15 (कोटी)	विभागाची तुट रु.
1	पाणी पुरवठा व जलनि:सारण	16,64,86,667	24,13,56,264	7,48,69,597
2	आरोग्य विभाग	3,69,42,635	23,11,00,017	19,41,573,382
3	दिवाबत्तीची सोय करणे	0	8,73,05,284	8,73,05,284
	एकुण	20,34,29,302	55,97,61,545	35,63,32,243

सदर सेवेचा जादा झालेला खर्च हा महसुली उत्पन्नातुन करण्यात आला असुन या विभागामार्फत ज्या सोयी पुरविण्यात आल्या आहेत. त्याचा फायदा महानगरपालिका क्षेत्रातील 90 टक्के नागरीकांना होत असल्याचे अर्थसहाय्याबाबत केलेल्या टिपणीमध्ये नमुद आहे. महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा व जलनि:सारण या विभागाकडून महानगरपालिकेस महसुली उत्पन्न मिळत असल्याने ही सेवा सक्षम करणे आवश्यक आहे. त्यासाठी पाणीपट्टीच्या दरामध्ये सुधारणा करणे, पाणीपट्टीची देयके नागरीकांना वेळेत आदा करणे , पाणीपट्टीची थकबाकी वसुलीसाठी विशेष प्रयत्न करणे , वितरण व्यव स्थेमधील गळती काढणे या आवश्यक बाबींची अंमलबजावणी तात्काळ करणे आवश्यक आहे.

5) शासनाकडुन 2014 -15 या वित्तिय वर्षामध्ये खालील प्रमाणे अनुदान शिल्लक व खर्च झाले आहे.

अ.क्र.	योजनेचे नाव	एकुण निधी	खर्च निधी	टक्केवारी
1	UIDSSMT	6 कोटी 65 लाख	6 कोटी 2 लाख	90.53
2	नगरोत्थान जलनि:सारण	14 कोटी 13 लाख	31 कोटी 91 लाख	-
3	सुजल निर्मल	1 कोटी 83 लाख	1 कोटी 4 लाख	56.83
4	13 वित्त आयोग	29 कोटी 31 लाख	15 कोटी 86 लाख	54.11
5	प्रशमन शुल्क	03 कोटी 63 लाख	17 लाख 36 हजार	4.78
6	विकास आकार	13 कोटी 86 लाख	1 कोटी 9 लाख	7.86

उपरोक्त माहितीचे अवलोकन केले असता शासनाकडुन नगरोत्थान (जलनि:सारण) योजनेसाठी 14 कोटी 13 लक्ष निधी उपलब्ध असताना 31 कोटी 91 लक्ष खर्च करण्यात आला. तेव्हा 17 कोटी 78 लक्ष एवढा जास्तीचा खर्च कसा भागविण्यात आला याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 120, दि.26/06/2019 अन्वये खुलासा करणेबाबत कळविले असता खुलासा केलेला नाही.

2014-15 या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिकेस , केंद्र व राज्य शासनाकडून विविध योजनासाठी रक्कम रु . 146.10 कोटीचे अनुदान मिळाले असुन महानगरपालिकेने रक्कम रु .100 कोटी 77 लाख अनुदान खर्च केले आहे. महानगरपालिकेन 68.97 टक्के अनुदान खर्च केले असुन 31.02 टक्के अनुदान अखर्चित आहे.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 कलम 106 (3) अन्वये प्रत्येक आर्थिक वर्ष सुरु झालेनंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिका लेखा परीक्षकाने महानगरपालिकेच्या मागील आर्थिक व र्षाच्या संपुर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीसमोर सादर करुन वार्षिक लेखे मंजुर करुन घेणे आवश्यक आहे . तथापि महानगरपालिकेकडे वार्षिक लेखे ठेवण्यात आलेले नाहीत . त्यामुळे महानगरपालिकेच्या प्रत्यक्ष आर्थिक स्थितीवर भाष्य करता येत नाही.

मुंबई प्रां तिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण चार -अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे यामधील कलम 60 अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे (1) (3) (पाच) नुसार प्रत्येक तिमाही नंतर दोन महिन्यांच्या आत त्या तिमाहीचा लेखा परिक्षीत ताळेबंद , जमा व खर्च आणि पैशाचा ओघ (CASH FLOW) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र इंटरनेटवर प्रसिध्द करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केली जात नसलेने महानगरपालिकेच्या वित्तिय स्थितीची माहिती नागरिकांना समजून येत नाही.

FMDDDMM7001 (Ref No : 113, Hmm No : 120)

2 लेखा विभागाने निवृत्ती वेतन अंशदान निधी पुरेसा न ठेवणेबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : निवृत्ती वेतन 01 निधी

अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 136(1) प्रमाणे स्वतंत्र निधी स्थापन करुन महानगरपालिकेतील कर्मचा-यांना देय असणा-या निवृत्ती वेतनासाठी पदाच्या सरासरी खर्चाच्या 1/9 एवढे अंशदान निधीत जमा करुन नियम 6(ड) नुसार निवृत्ती वेतन अंशदान निधी ठेवण्यात आलेला नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कोल्हापुर सन 2014-2015 या आर्थिक वर्षाच्या रोखवही पडताळणी केली असता, मार्च-2015 अखेर निवृत्ती वेतन अंशदान निधीची रक्कम

काढण्यात आलेली नाही.

1.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 136(1) प्रमाणे स्वतंत्र निधी स्थापन करुन महानगरपालिकेतील कर्मचा-यांना देय असणा-या निवृत्ती वेतनासाठी पदाच्या सरासरी खर्चाच्या 1/9 एवढे अंशदान निधीत जमा करुन नियम 6(ड) नुसार नमूद केलेल्या कार्यपध्दतीने सदर रकमा राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणूक करणे आवश्यक आहे. तथापि महानगरपालिकेने निवृत्ती वेतन अंशदान निधीची रक्कम ठेवण्यात आलेली नसुन निर्धारीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार सदर निधी ठेवण्याची कार्यवाही केलेली नाही.

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 135 नुसार निधीचा लेखा नमूना क्रमांक 101 प्रमाणे विहीत नमून्यात परिरक्षित करणे आवश्यक असतांना नियमोचित कार्यवाही झालेली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका लेखा विभागास अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र.56 दि.20/10/2018 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 23, Hmm No : 56)

3 सन 2014-15 या आर्थिक वर्षाची माहिती सोबतचे विवरणपत्र क्र.1 ते 11 मध्ये भरुन सादर करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ

अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत.

लेखा विभागाकडून वेगवेगळया निधीचे नोंदवहयामध्ये नोंदी घेण्यात येत असतात. त्या अनुषंगाने विवरणपत्र क्र. 1 ते 11 यासोबत संलग्न करुन देण्यात आले होते. तरी सन 2014-15 या वित्तीय वर्षातील लेखाविभागाकडून ठेवण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने मागविण्यात आलेल्या विवरणपत्रातील परिपूर्ण माहिती अर्धसमास पत्र क्रमांक 104 दि.14/03/2019 देऊनही ती भरुन देणेत आलेली नाही.

FMDDDMM7001 (Ref No : 127, Hmm No : 104)

4 पाणीपुरवठा विभागातील मनपाच्या स्वनिधीमधून केलेल्या वेगवेगळ्या कामातील उणीवा बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 10

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा विभाग 01 निधी

अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 30929.00/-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागातील कामाकरिता तांत्रिक मान्यता घेताना मूळ अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये 5% रक्कम लेबर पार्ट म्हणून वाढवून अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये वाढ केल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच ठेकेदारास प्रदान केलेल्या रकमेमधून आयकराची रक्कम रु.5059/- वसूलपात्र करण्यात यावी. ठेकेदारास निविदा मान्य रक्कमेच्या मर्यादेत रक्कम प्रदान करणे आवश्यक असताना ठेकेदारास र.रु.17741/- वसूलपात्र करण्यात यावी. कामाच्या देयकामधून व्हॅटची रक्कम रु.2852/- ची वसुली करण्यात यावी. तसेच कामाचा व कामगारांचा विम्याची रक्कम रु.5277/- वसूलपात्र करण्यात यावी.

अ.क्र.	निविदा क्र.	कामाचे नांव	ठेकेदाराचे नांव	कामाची मान्य निविदा र.रु.	कामावर झालेला खर्च	प्रमाणक क्र. व दिनांक
	3/13-14	हिराबाग, माळबंगला जलशुद्धीकरण केंद्रच्या मेनपाईप वितरण व्यवस्था मधील देखभाल दुरुस्तीबाबत	मे.कृष्णा इंडस्ट्रीज, सांगली 7.50% कमी दराने मान्य	28779	269535	27.2.2015
2.	3/2013-	सांगलीवाडी,जुना	मे.कृष्णा	233655	236383	17.03.15

	14	बुधगांव रस्ता, कर्नाळ रस्ता, काका नगर ई. परिसरात दुरुस्त्याचे काम करणे.	इंडस्ट्रीज, सांगली 7.50% कमी दराने मान्य			

वरील कामाच्या निविदा नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

अ) हिराबाग, माळबंगला जलशुद्धीकरण केंद्रच्या मेनपाईप, रायझिंग मेनपाईप, डिस्ट्रीब्युशन पाईप वरील गळत्या दुरस्त करणेच्या कामातील अनियमिततेबाबत.

1) निविदा क्रमांक 3/2013-14 – वार्षिक दरकरार निविदाद्वारे

2) कामाचे आदेश –मनपा/पापुवि/सां/442/2014-15 दिनांक 10.09.2014

3) कामाचा कालावधी – 20 दिवस (दि. 10/09/14 ते 30/09/2014 पर्यंत)

4) ठेकेदाराचे नांव:- मे.कृष्णा इंडस्ट्रीज, सांगली.

5) काम पूर्ण झाल्याचा दिनांक 23.09.2014

6) निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. 287796/- तांत्रिक मान्यता क्र.30/2014, दिनांक 21.07.2014 अन्वये मंजूर

7) स्थायी समिती ठराव क्रमांक 10/दिनांक 29.05.2014 अन्वये मागील

वर नमूद कामाच्या निविदा नस्तीचे, प्रमाणके,पत्रव्यवहाराची नस्ती तसेच मोजमापपुस्तिकेचे लेखापरीक्षण केले असता सदरच्या कामातील उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 30 दिनांक 26.09.2018 अन्वये विभागाकडून विचारणा करण्यात आली असता विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) आयुक्त मान्यता ठराव क्रमांक 168 दिनांक 03.09.2013 अन्वये परिशिष्ट बी ची रक्कम रु. 299619/- आहे. सदर रक्कमेमध्ये मनपा आवारातील लेबर पार्ट म्हणून 5% रक्कम रु. 11511/- अधिक करून घेतली आहे. सदरची रक्कम अधिक करण्याबाबतचे अधिनियमातील तरतूद लेखापरीक्षणास अवगत करण्याबाबत सूचित करण्यात आले होते परंतु अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरची रक्कम वाढविण्याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही.

2) तांत्रिक मान्यता रक्कम रु. 287796/- करिता कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे मंजूर बाब क्र. 30/2014 दिनांक 21.07.14 अन्वये देण्यात आली आहे. ठेकेदाराने सादर केलेल्या निविदेप्रमाणे तांत्रिक मान्यता रक्कमेच्या 7.50% कमी दराप्रमाणे ठेकेदारास अदा करणे आवश्यक असताना त्यांना र.रु. 266211/- च्या मर्यादेत रक्कम प्रदान करणे आवश्यक होते. परंतु ठेकेदारास रक्कम रु. 269535/- प्रदान केली आहे. तरी सदरची जास्तीची प्रदान केलेली रक्कम रु.3324/- ठेकेदाराकडून वसूल करून मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करावे.

3) ठेकेदाराने केलेल्या कामाच्या देयकाची रक्कम रु. 279871/- च्या देयकामध्ये 5% मनपा आवारातील लेबर पार्ट म्हणून र.रु.11518/- ची रक्कम अधिक करून एकूण रक्कम रु.291389/- मधून 7.50% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या र.रु. 21854/- कमी करून ठेकेदारास रु 269535/- प्रदान केली आहे. ठेकेदाराने केलेल्या कामाच्या रक्कमेमध्ये 5% रक्कम वाढविण्याबाबत कोणत्या शासन निर्णयान्वये करण्यात आली याबाबत खुलासा केलेला नाही.

सदरच्या रक्कमेमधून आयकराची रक्कम रु. 5391/- कपात करणेऐवजी रु. 2695/- कपात केली आहे.

आयकराच्या कमी वसूल केलेली तफावतीची रक्कम रु. 2695/- वसूलपात्र करून मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करावे.

4) कामावरील देयकाच्या रक्कमेमधून व्हॅटची 2% रक्कम रु.5391/-कपात करण्याऐवजी रु.4475/- कपात केली असून तफावतीची रक्कम रु. 916/- वसूलपात्र करून मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करावे.

5). विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3-11-2003 तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत. सदरचे काम दि. 10.09.2014 ते 30.09.2014 या कालावधीतील असून सदरच्या कामाचा विमा आणि कामगारांचा विमा उतरविण्यात आलेला नाही. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रका नुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. वरील कामाचे कंत्राटी मूल्य रक्कम रु. 287796/- असून 1% दंडनीय विमा रक्कम रु. 2877/- वसूल करून शासकीय विमा संचालनालयाकडे जमा केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर करावे.

वसूलपात्र रक्कम रु. 9812/-

ब) **सांगलीवाडी, जुना बुधगांव रस्ता,कर्नाळ रस्ता, काकानगर, पंचशीलनगर, लक्ष्मीनगर ,अजिक्यनगर, शिवोदयनगर,गवळी गल्ली,पाटील गोठा,पेठभाग,वाल्मिकी आवास योजना, शिंदे मळा,रेपे प्लॉट-मेड्गुले प्लॉट इत्यादी परिसरातील मेन पाईप, व्हॉल्व्ह वरील गळत्या दुरुस्त्या,मेनपाईप शिफ्टिंग स्वरुपाची कामे करणे** कामातील अनियमिततेबाबत

1) निविदा क्रमांक 3/2013-14 – वार्षिक दरकरार निविदाद्वारे

2) कामाचे आदेश –मनपा/पापुवि/सां/31/2014-15 दिनांक 07.03.2015

3) कामाचा कालावधी – 20 दिवस (दि. 07.03.2015 ते 22.03.2015 पर्यंत)

4) ठेकेदाराचे नांव:- मे.कृष्णा इंडस्ट्रीज, सांगली.

5) काम पूर्ण झाल्याचा दिनांक 17.03.2015

6) निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. 239942/- तांत्रिक मान्यता क्र.54/2014-15, दिनांक 15.01.2015 अन्वये मंजूर

7) स्थायी समिती ठराव क्रमांक 10/दिनांक 29.05.2014 अन्वये

वर नमूद कामाच्या नस्तीची व प्रमाणके तसेच मोजमापपुस्तिकेचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) आयुक्त मान्यता ठराव क्रमांक 168 दिनांक 03.09.2013 अन्वये परिशिष्ट बी ची रक्कम रु. 252600/- आहे. सदर रक्कमेमध्ये मनपा आवारातील लेबर पार्ट म्हणून 5% रक्कम रु. 6796/- अधिक करून घेतली आहे. सदरची रक्कम अधिक करण्याबाबतचे अधिनियमातील तरतूद लेखापरीक्षणास अवगत करण्याबाबत सूचित करण्यात आले होते परंतु अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरची रक्कम वाढविण्याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही.

2) तांत्रिक मान्यता रक्कम रु. 239942/- करिता कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे मंजूर बाब क्र. 54/2014-15 दिनांक 15.01.2015 अन्वये देण्यात आली आहे. ठेकेदाराने सादर केलेल्या निविदेप्रमाणे तांत्रिक मान्यता

रक्कमेच्या 7.50% कमी दराप्रमाणे ठेकेदारास अदा करणे आवश्यक असताना त्यांना र.रु. 221966/- च्या मर्यादेत रक्कम प्रदान करणे आवश्यक होते. परंतु ठेकेदारास रक्कम रु. 236383/- प्रदान केली आहे. तरी सदरची जास्तीची प्रदान केलेली रक्कम रु. 14417/- ठेकेदाराकडून वसूल करून मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर करावे.

3) ठेकेदाराने केलेल्या कामाच्या देयकाची रक्कम रु. 248362/- च्या देयकामध्ये 5% मनपा आवारातील लेबर पार्ट म्हणून र.रु.7182/- ची रक्कम अधिक करून एकूण रक्कम रु.255549/- मधून 7.50% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या र.रु. 19166/- कमी करून ठेकेदारास रु 236383/- प्रदान केली आहे. ठेकेदाराने केलेल्या कामाच्या रक्कमेमध्ये 5% रक्कम वाढविण्याबाबत कोणत्या शासन निर्णयान्वये करण्यात आली याबाबत खुलासा केलेला नाही.

सदरच्या रक्कमेमधून आयकराची रक्कम रु. 4728/- कपात करणेऐवजी रु. 2364/- कपात केली आहे. आयकराच्या कमी वसूल केलेली तफावतीची रक्कम रु. 2364/- वसूलपात्र करण्यात येऊन मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करण्यात यावे.

4) कामावरील देयकाच्या रक्कमेमधून व्हॅटची 2% रक्कम रु.4728/-कपात करण्याऐवजी रु.2792/- कपात केली असून तफावतीची रक्कम रु. 1936/- वसूलपात्र करण्यात येऊन अनुपालन सादर करावे.

5). विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3-11-2003 तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत. सदरचे काम दि. 07.03.2015 ते 22.03.2015 या कालावधीतील असून सदरच्या कामाचा विमा आणि कामगारांचा विमा उतरविण्यात आलेला नाही. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रका नुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. वरील कामाचे कंत्राटी मूल्य रक्कम रु. 239942/- असून 1% दंडनीय विमा रक्कम रु. 2400/- वसूल करून शासकीय विमा संचालनालयाकडे जमा केलेल्या रक्कमेच्या चलनासह अनुपालन सादर करावे.

वसूल पात्र रक्कम रु. 21117/-

एकूण (अ+ब) वसूलपात्र रक्कम रु. 30929/-

DATBVGM6801 (Ref No : 8, Hmn No : 30)

5 विदयुत विभागाकडील स्ट्रिट लाईट देखभाल व दुरुस्तीसाठी साहित्य खरेदी कामातील अनियमितता बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष : विद्युत विभाग महानगरपालिका स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 8468366.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3000000.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 3300.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 5352866.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 112200.00/-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम नियम क्र.73 (ड) अन्वये आयुक्त यांना रुपये 25,00,000/- पर्यंत खर्चाचे अधिकार असुन त्यावरील खर्चास स्थायी समितीची च महासभेची मान्यता घेण्यात आलेली नाही. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 कलम 34 ब व महसुल व वन विभाग यांची अधिसुचना दिनांक 23/04/2006 अनुच्छेद 63 नुसार कार्यकंत्राट करारनामासाठी मुंद्राक वापरण्यात आलेले नाही. वेळेत निविदा प्रक्रिया पुर्ण झालेले नसल्याने जास्तीचा खर्च झालेला आहे. डी.एस.आर.दर लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये मनपा हद्दीमधील स्ट्रिट लाईट देखभाल व दुरुस्तीसाठी साहित्य खरेदी करणेबाबतची खालील प्रमाणे उपलब्ध संचिका/देयकाची तपासणी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे अनियमितता झालेचे दिसुन येते.

मे.प्रसाद इलेक्ट्रीकल्स अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजि.		
Sr.no.	Bill no, & date	Amount
1	-/23.11.14	699034
2	37/26.08.14	494654
3	36/26.08.14	495406
4	35/12.09.14	464069
5	38/12.09.14	382481
6	34/15.10.14	362738
7	35/05.10.14	495677
8	40/13.10.14	492899
9	41/20.10.14	408993
एकुण रुपये		4295951

मे. श्रेयश इलेक्ट्रीकल्स		
Sr.no.	Bill no, & date	Amount
1	CR/0056/11.02.15	423122
2	CR/0064/21.02.15	357298
3	CR/0058/16.02.15	402538
4	CR/0067/23.03.15	423368
5	CR/0068/23.03.15	372574
6	CR/0069/23.03.15	287729
7	CR/0070/24.03.15	331361
8	CR/0071/24.03.15	252222
9	CR/0072/24.03.15	337615
10	CR/0073/24.03.15	295022
11	CR/0074/24.03.15	389566
एकुण रुपये		3872415

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.लोकसभा/विधानसभा निवडणुक आचारसंहिता असल्याचे नमुद करुन सन 2014-15 ची साहित्य खरेदीची निविदा प्रक्रिया होईपर्यंत सन 2013-14 मध्ये साहित्य पुरवठादार मे.प्रसाद इलेक्ट्रीकल्स अँड इलेक्ट्रीनिक्स इंजि.मिरज यांचेकडुन सन 2013-14 मधील डी.एस.आर मधील दराचे 1% कमी दराने आयुक्त निर्णय क्र.(अ)410/2014-15, दि.21/08/2014 अन्वये 15 लाख,(ब) आयुक्त निर्णय क्र.463/2014-15, दि.29/09/2014 अन्वये 15 लाख, (क)आयुक्त निर्णय क्र.11/2014-15, दि.05/05/2014 अन्वये 25 लाख (ड) आयुक्त निर्णय क्र.486/2014-15, दि.11/11/2014 अन्वये 7 लाख असे डिसेंबर अखेर साहित्य खरेदीसाठी आदेश निर्गमित करण्यात आलेले असुन त्यांचेकडुन डिसेंबर 2014 अखेर रुपये 55,00,000/- चे स्ट्रिट लाईट देखभालीसाठी लागणारे साहित्य खेरदी

करण्यात आलेचे संचिकेवरुन दिसुन येते. सन 2013-14 व 2014-15 साठी डि.एस.आर. दरामध्ये बदल झाले नसल्याचे नमुद केले असुन, सन 2011-12 नंतर निविदा प्रकिया करण्यात आलेली नाही. नमुद डी.एस.आर.हे लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नसल्याने त्याबाबत खात्री करता आलेली नाही.

2.माहे 06/2014 पुर्वी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपलेली असल्याने निविदा प्रक्रिया पुर्ण शक्य असताना ती केलेली नाही. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम नियम क्र.73 (ड) अन्वये आयुक्त यांना रुपये 25,00,000/- पर्यंत खर्चाचे अधिकार असुन त्यावरील खर्चास स्थायी समितीची व महासभेची मान्यता नसल्याने रक्कम रुपये 30,00,000/- ही आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3.मे.प्रसाद इलेक्ट्रीकल्स अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजि.मिरज यांचेकडुन स्ट्रिट लाईटसाठी साहित्य खेरदी करणेसाठी रक्कम रुपये 1300/- चे मुद्रांक शुल्क वापरुन करारनामा केल्याचे दिसुन येते. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 कलम 34 ब व महसुल व वन विभाग यांची अधिसुचना दिनांक 23/04/2006 अनुच्छेद 63 नुसार कार्यकंत्राट करारनामा रुपये 10,00,000/- लाखाचे रुपये 100/-व पुढील प्रत्येक रुपये 1,00,000/- लाखासाठी रुपये 100/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे. नमुद कामासाठी 55,00,000/-रक्कमेसाठी रुपये 4600/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक असल्याने रक्कम रुपये 3300/- चा स्टॅम्प पेपर कमी वापरल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे तरी रक्कम रुपये 3300/- ही मे.प्रसाद इलेक्ट्रीकल्स अँड इलेक्ट्रीनिक्स इंजि.मिरज यांचेकडुन वसुल करुन शासन खाती चलनाने जमा करावी.

4.मे.प्रसाद इलेक्ट्रीकल्स अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजि.मिरज यांचेकडुन स्ट्रिट लाईटसाठी रुपये 55,00,000/- इतक्या रक्कमेचे सन 2014-15 मध्ये साहित्य खरेदी करण्यात आल्याचे टिपणीमध्ये नमुद करण्यात आलेले आहे परंतु प्रत्यक्षात वरील प्रमाणे रक्कम रुपये 4295951/- ची देयके लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नसल्याने त्याबाबत खात्री करता आलेली नाही.

5.सन 2014-15 साठी स्ट्रिट लाईटसाठी साहित्य खरेदीसाठी दिनांक 12/07/2014 रोजीचे दैनिक पुढारी मधुन निविदा प्रसिध्दी करण्यात आली त्यास अल्प प्रतिसाद मिळल्याने दिनांक 31/07/2014 रोजीचे दैनिक पुढारी मधुन नमुद निविदेस प्रथम दिनांक 07/08/2014 अखेर निविदा भरणा करणेसाठी मुदतवाढ देण्यात आली. ऑनलाईन प्राप्त झालेल्या निविदा उघडण्याची दिनांक 08/08/2014 अशी असताना प्रत्यक्षात दिनांक 02/09/2014 रोजी निविदा उघडण्यात आल्याचे दिसुन येते. प्राप्त निविदामधुन श्रेयश इलेक्ट्रीकल्स यांची निविदा डी.एस.आर.दरापेक्षा रुपये 3.04 दराने कमी असल्याने स्थायी समिती ठराव क्र.187, दि.01/01/2015 अन्वये मान्यता देवुन दि.28/01/2015 ते 31/03/2015 अखेर साहित्य पुरवठा करणेसाठी दि. 28/01/2015 रोजी

आदेश निर्गमित करण्यात आले.

प्राप्त निविदा तपशील खालील प्रमाणे

1.श्रेयश इलेक्ट्रीकल्स - 3.04 कमी दराने

2.पामा इंजि. - 2.5 कमी दराने

3.प्रसाद इलेक्ट्रीकल्स - 1.5 कमी दराने

6.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.जाहिरात 2009/प्र.क.137/का-34 दि.29/08/2009 अन्वये निविदा प्रसिध्द करण्यात आलेली नसल्याने जाहिर निविदेस पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी मिळालेली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा घेता आला नाही. संबधित निविदा धारकास वाटाघाटी (negotiation) साठी बोलवुन त्याचेशी नमुद साहित्य पुरवठाबाबत वाटाघाटी (negotiation) करुन नमुद साहित्याची दरनिश्चिती करुन त्यानुसार दरकरार करुन त्यास पुरवठा आदेश देणे आवश्यक असताना तसे करण्यात आलेले नसल्याने महानगरपालिकेचा जास्तीचा खर्च झालेला आहे.

6.लोकसभा निवडणुक आचारसंहिता ही माहे 03/2014 पासुन लागु झालेली असल्याने निविदा प्रक्रिया वेळेत पुर्ण करुन घेणे शक्य असताना ती करण्यात आलेली नसल्याने रुपये 3.04% कमी दराने साहित्य खरेदी करणे शक्य असताना ते 1% कमी दराने खरेदी करण्यात आल्याने रुपये 55,00,000/- रक्कमेचे साहित्य 2.04 जादा दराने खरेदी झालेली असल्याने रुपये 1,12,200/- चे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले असल्याने सदरची रक्कम अमान्य करण्यात येत आहे.

मुद्रांक शुल्क वसुल पात्र रक्कम रुपये - 3300/-

अमान्य रक्कम रुपये - 1,12,200/-

आक्षेपाधीन रक्कम रुपये - 30,00,000/-

उपरोक्त अनियमिततेबाबत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका विद्युत विभागास अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र.35 दि.28/09/2018 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 30, Hmm No : 35)

6 विदयुत विभागाकडुन मनपा हद्दीमध्ये नवीन स्ट्रिट लाईट बसविणे साठी एजन्सी नियुक्ती व कामातील अनियमितता बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 11

लेखा शीर्ष : विद्युत विभाग महानगरपालिका स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 20348655.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 293866.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3375318.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 14388721.00/-

निविदेस पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी मिळालेली नसल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा घेता आलेला नाही. एल.ई.डी.बल्ब निविदा प्रक्रिया करुन दर निश्चिती केलेली नसल्याने जास्तीचा खर्च झालेला आहे. स्ट्रीट लाईटची कामे पुर्ण झाली नसताना देयके विदयुत शाखेकडे ठेकेदाराने मंजुरीसाठी सादर केल्याचे दिसुन येते. करारपत्र व निविदा, पुरवठा आदेश यामध्ये कोणत्या कंपनीचे साहित्य वापरावे याबाबत उल्लेख नसल्याने डी.एस.आर.दरसुची व उत्पादीत कंपनीचे साहित्य कशाचे आधारे वापर केले हे समजुन येत नाही. रक्कम रुपये 2,93,866/- रक्कमेची देयके लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाहीत. रक्कम रुपये 1,43,88,721/- इतक्या खर्चास स्थायी समितीची व महासभेची मान्यता घेण्यात आलेली नाही. स्ट्रिट लाईट कामाचा अपेक्षित खर्च व प्रत्यक्षात झालेले काम पाहता यामध्ये मोठया प्रमाणावर तफावत दिसुन येते. तरी मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 कलम 34 ब व महसुल व वन विभाग यांची अधिसुचना दिनांक 23/04/2006 अनुच्छेद 63 नुसार कार्यकंत्राट करारनामा करताना मुंद्राक शुल्क वापरण्यात आलेले नाही. देयकामधुन 5% दराने सुरक्षा ठेव कपात करुन घेणे आवश्यक असताना ती 2.5% दराने कपात करण्यात आल्याने उर्वरित 2.5% सुरक्षा ठेव रक्कम रुपये 3,59,718/- इतकी कपात करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/ नवि-20, दि.02/03/2009 अन्वये कामाची गुणवत्ता/दर्जा तपासणीसाठी त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेण्यात आलेले नाही. देयकामध्ये फक्त कामाचे ठिकाण नमुद करुन एकत्रित रक्कम दर्शविण्यात आलेले असल्याने प्रत्यक्षात साहित्य वापराबाबत खात्री होत नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये महापौर/उप महापौर/स्थायी समिती सभापती/प्रभाग समिती सभापती/नगरसेवक यांचे स्थानिक निधीमधुन मनपा हद्दीमधील नवीन स्ट्रिट लाईट उभारणेसाठी वार्षिक एजन्सी नियुक्ती बाबतची उपलब्ध संचिका/देयकाची तपासणी केली असता सन 2014-15 मध्ये मे.यश इलेक्ट्रो पुणे यांचेकडुन

खालील प्रमाणे स्ट्रिट लाईटची कामे करुन घेण्यात आल्याचे उपलब्ध संचिका/देयकावरुन दिसुन येते.

मे.यश इलेक्ट्रो. पुणे यांची निविदा ही रुपये 4.99/- जादा दराने भरणा केलेली आहे. सन 2013-14 मध्ये डी.एस.आर.दरामध्ये सरासरी रुपये 4.23 दराने वाढ झालेली असल्याने त्यानुसार मे.यश इलेक्ट्रो पुणे यांनी काम करण्यास संमती दर्शविल्याने स्थायी समिती ठराव क्र.95, दि.05/03/2014 अन्वये 4.23 वाढीव दराने रुपये 6253800/- खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

अ.क्र.	कामाचा तपशील	बिल क्रमांक	दिनांक	रक्कम रुपये
1	प्रभाग समिती क्र.1	SMKC/01/14-15	17/11/14	337194
2	प्रभाग समिती क्र.2	SMKC/19/14-15	17/11/14	436369
3	प्रभाग समिती क्र.3	SMKC//20/14-15	17/11/14	337194
4	प्रभाग समिती क्र.4	SMKC/21/14-15	17/11/14	436369
5	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 14	SMKC/08/14-15	17/11/14	285621
6	मनपा सदस्य सुचित ठिकाणी	SMKC/22/14-15	17/11/14	99173
6	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 14	SMKC/16/14-15	17/11/14	295206
7	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 5	SMKC/18/14-15	17/11/14	299462
8	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 15	SMKC/17/14-15	17/11/14	146881
9	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 7	SMKC/10/14-15	17/11/14	299232
10	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 25	SMKC/03/14-15	-	42734
11	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 4	SMKC/06/14-15	17/11/14	262474
12	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 4	SMKC/07/14-15	17/11/14	218472
13	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 5	SMKC/09/14-15	17/11/14	297796
14	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 8	SMKC/15/14-15	17/11/14	295727
15	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 8	SMKC/04/14-15	17/11/14	282297

16	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 15	SMKC/11/14-15	17/11/14	113110
17	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 8	SMKC/05/14-15	17/11/14	243929
18	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 7	SMKC/14/14-15	17/11/14	299232
19	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 6	SMKC/13/14-15	17/11/14	289624
20	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 23	SMKC/48/14-15	25/03/15	99680
21	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 23	SMKC/5/14-15	27/03/15	98123
22	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 23	SMKC/50/14-15	27/03/15	99644
23	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 34	SMKC/41/14-15	27/03/15	39670
24	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 38	SMKC/55/14-15	27/03/15	68595
25	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 23	SMKC/62/14-15	27/03/15	49363
26	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 34	SMKC//14-15	30/03/15	49063
27	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 15	SMKC/29/14-15	17/01/15	40102
28	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 34	SMKC/ /14-15	30/03/15	36672
29	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 33	SMKC/ /14-15	30/03/15	99227
30	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 33	SMKC/34/14-15	17/01/15	81362
31	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 33	SMKC/39/14-15	23/03/15	208017
32	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 38	SMKC/28/14-15	17/01/15	166824
33	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 20	SMKC/31/14-15	17/01/15	101728
34	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 24	SMKC/28/14-15	17/01/15	185060
35	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 37	SMKC/30/14-15	17/01/15	166393
36	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 34	SMKC/44/14-15	23/03/15	173217

37	प्रभाग समिती क्र.1 वॉर्ड 1,2,3,16,17,18,19,22	SMKC/P03/14-15	26/12/14	3596635
38	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 25	SMKC/02/14-15	17/11/14	244562
39	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 24	SMKC/35/14-15	19/01/15	90305
40	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 14	SMKC/ /14-15	26/03/15	53554
41	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 8	SMKC/47/14-15	23/03/15	14289
42	प्रभाग समिती क्र.4 वॉर्ड 4	SMKC/24/14-15	23/03/15	275309
43	मनपा सदस्य सुचित ठिकाणी	SMKC/43/14-15	23/03/15	199371
44	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड	SMKC/42/14-15	23/03/15	199392
45	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 31	SMKC/32/14-15	23/03/15	198000
46	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 34	SMKC/40/14-15	23/03/15	275167
47	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 32	SMKC/33/14-15	17/01/15	194754
48	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 37	SMKC/37/14-15	23/03/15	189104
49	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 21	SMKC/46/14-15	23/03/15	198306
50	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड-	SMKC/37/14-15	17/11/14	121563
51	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 33	SMKC/ /14-15	31/03/15	98607
52	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 20	SMKC/32/14-15	17/01/15	90889
53	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 38	SMKC/38/14-15	23/03/15	282176
54	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 28	SMKC/23/14-15	23/03/15	95695
55	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 24	SMKC/38/14-15	23/03/15	291448
56	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 14	SMKC/ /14-15	26/03/15	53554
57	प्रभाग समिती क्र32 वॉर्ड 34	SMKC/23/14-15	19/01/15	74212

58	प्रभाग समिती क्र.4 वॉर्ड 11,12,13,26,27,28,29 30,31	SMKC/38/14-15	10/02/15	5167857
59	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 32	SMKC/27/14-15	17/01/15	198100
60	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 37	SMKC/37/14-15	23/03/15	189104
61	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 37	SMKC/41/14-15	23/03/15	293762
62	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड 23	SMKC/45/14-15	23/03/15	198600
63	प्रभाग समिती क्र.2 वॉर्ड -	SMKC/36/14-15	17/01/15	190230
64	प्रभाग समिती क्र.3 वॉर्ड 4	SMKC/ /14-15	26/03/15	193274
एकुण				20348655

यावर खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1.महानगरपालिका हद्दीमध्ये नवीन स्ट्रिट लाईट उभारणीसाठी सन 2011-12 चे डी.एस.आर.नुसार रक्कम रुपये 60,00,000/- चे ठोबळ मानाने खर्च अपेक्षित धरुन दिनांक 16/02/2013 अन्वये तांत्रिक मान्यता देवुन दि.07/08/2013 रोजी दैनिक पुढारी मधुन निविदा प्रसध्दि करण्यात आली त्यास अल्प प्रतिसाद मिळल्याने दि.08/09/2013 रोजीचे दैनिक पुढारी मधुन प्रथम 7 दिवासासाठी मुदतवाढ व दि.18/10/2013 रोजी दैनिक पुढारीमधुन दुसरी 10 दिवसासाठी मुदत वाढ देण्यात आली. दोन वेळा मुदतवाढ देवुनही एकच ऑनलाईन निविदा मे.यश इलेक्ट्रो लाईन पुणे यांची प्राप्त झाल्याने निविदा उघडण्याची दिनांक 29/10/2013 असताना प्रत्यक्षात ती दि29/01/2014 रोजी म्हणजेच तीन उशीराने उघडण्यात आली. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.झेडपीए 2008/प्र.क्र.358/वित-9, दि.24/06/2008 अन्वये नुसार निविदेस मुदतवाढ देण्यात आल्याचे दिसुन येत नाही. तसचे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.जाहिरात 2009/प्र.क.137/का-34 दि.29/08/2009 अन्वये निविदा प्रसिध्द करण्यात आलेली नसल्याने निविदेस पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी मिळालेली नसल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा घेता आलेला नाही.

2.संबधित निविदा धारकास वाटाघाटी (negotiation) साठी बोलवुन त्याचेशी नमुद साहित्य पुरवठाबाबत वाटाघाटी (negotiation) करुन नमुद साहित्याची दरनिश्चिती आवश्यक प्रत्येक साहित्यप्रमाणे करणे आवश्यक असताना तसे केल्याचे दिसुन येत नाही. उदाहरण दाखल सन 2011-

12 व 2013-14 चे डिएसआर दर विचारत घेता 40 व्हॅट टयुब सेट दर सन 2011-2 पेक्षा 2013-14 मध्ये 20% दर कमी झालेले असताना सन 2011-12 चे दराने साहित्य खरेदी करण्यात आलेले असल्याने जास्तीचा खर्च झालेला आहे. तसेच प्रभाग समिती क्र.1 साठी 15 व्हॅटचे 372 नग वरील अ.क्र.37 मधील एलईडी विनानिविदा खरेदी करण्यात आलेले आहेत. सदर बाबतचे दर हे डिएसआर नमुद नसल्याने चालु बाजार दराने खरेदी करण्यात आलेले आहेत. सदर बाबत निविदा प्रक्रिया करुन दर निश्चिती केलेली नसल्याने जास्तीचा खर्च झालेला आहे.

3.यश इलेक्ट्रो पुणे यांचेकडील दिनांक 26/06/2015 रोजीचे पत्रान्वये सन 2014-15 रक्कम रुपये 2,06,42,521/- ची स्ट्रिट लाईटची कामे पुर्ण झाले बाबत व त्यास शहर अभियंता यांचेकडील दि.03/03/2016 रोजीचे पत्रान्वये नमुद रक्कमेची कामे पुर्ण झालेबाबत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.साबाविवि/221/15-16, दि.28/01/2016 अन्वये यश इलेक्ट्रो पुणे यांना वरील प्रमाणे नमुद कामाची मुदत ही दिनांक 31/03/2015 अखेर अशी होती परंतु दिनांक 28/01/2016 अखेर नुमद स्ट्रिट लाईटचे काम अद्याप पुर्ण झाले नसलेबाबत कळविलेचे दिसुन येते. नमुद कामे पुर्ण होणेपुर्वी संबधित कंत्राटदार यांचे देयक सादर केले असुन विदयुत विभागाने शहर अभियंता व विदयुत अभियंता यांचे स्वाक्षरीने नमुद काम पुर्ण झालेचे प्रमाणपत्र देयकासोबत जोडुन लेखा विभागास सादर केल्याचे संचिकेवरुन दिसुन येते. तसेच नमुद देयकानुसार पुरवठा केलेले साहित्य गॅरन्टी कालावधीचे आत बंद पडलेले असुन ते दुरुस्त करण्यात आले नसलेबाबत कळविले आहे. त्यामुळे नमुद काम झाले नसताना देयके विदयुत शाखेकडे ठेकेदाराने मंजुरीसाठी सादर केल्याचे दिसुन येते.

4.यश इलेक्ट्रो पुणे यांनी नमुद कामासाठी साहित्य हे मे. क्रॉम्पटन ग्रीव्हज या कंपनीचे वापरलेबाबत दि.07/04/2015 रोजीचे पत्रामध्ये नमुद केले असुन त्याच प्रमाणपत्र दिलेले आहे. परंतु करारपत्र व निविदा, पुरवठा आदेश यामध्ये कोणत्या कंपनीचे साहित्य वापरावे याबाबत उल्लेख नसल्याने डी.एस.आर.दरसुची व उत्पादीत कंपनीचे साहित्य कशाचे आधारे वापर केले हे समजुन येत नाही.

5.सन 2014-15 मध्ये रक्कम रुपये 2,93,866/- रक्कमेची देयके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नसल्याने सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

6.स्थायी समिती ठराव क्र.95, दि.05/03/2014 अन्वये रुपये 60,00,000/- यास रुपये 4.23 वाढीव दराने रुपये 62,53,800/- खर्चास मान्यता असताना त्यावरील खर्चास रक्कम रुपये 1,43,88,721/- इतक्या खर्चास स्थायी समितीची व महासभेची मान्यता घेण्यात आल्याचे दिसुन येत नसल्याने सदरची रक्कम अमान्य करण्यात येत आहे.

7.स्ट्रिट लाईट कामाचा अपेक्षित खर्च व प्रत्यक्षात झालेले काम पाहता यामध्ये मोठया प्रमाणावर तफावत दिसुन येते. नमुद कामाची एकत्रित पाहणी करुन त्यानुसार निविदा प्रक्रिया करणे आवश्यक

असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8.मे.यश इलेक्ट्रो पुणे यांचेकडुन नमुद कामासाठी रक्कम रुपये 5100/- चे मुद्रांक शुल्क वापरुन करारनामा केल्याचे दिसुन येते. करारपत्रा मध्ये वाढीव कामासाठी वेळावेळी मुंद्राक शुल्क वसुल करणेबाबत नमुद असताना ही त्यांचेकडुन उर्वरित रक्कमेवर मुंद्राक शुल्क वसुल करण्यात आलेला नाही. तरी मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 कलम 34 ब व महसुल व वन विभाग यांची अधिसुचना दिनांक 23/04/2006 अनुच्छेद 63 नुसार कार्यकंत्राट करारनामा रुपये 10,00,000/- लाखाचे रुपये 100/-व पुढील प्रत्येक रुपये 1,00,000/- लाखासाठी रुपये 100/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे. रक्कम रुपये 2,06,42,521/- वर कार्यकंत्राटदार मे.यश इलेक्ट्रो. पुणे यांचेकडुन मुंद्रक शुल्काची रक्कम रुपये 20700/- इतकी होत असताना रुपये 5100/- चे मुद्रांक शुल्क वापरण्यात आल्याने उर्वरित रक्कम रुपये 15,600/- वसुल करुन शासन खाती चलनाने जमा करावी.

9.मे.यश इलेक्ट्रो पुणे यांचेकडुन करारपत्रानुसार रक्कम रुपये 5% सुरक्षा ठेव ही 2.5% कामाचे आदेशावेळी व उर्वरित 2.5% रक्कम रुपये देयकामधुन कपात करणे यानुसार रक्कम रुपये 60,00,000/- वर 5% दराने सुरक्षा ठेव कपात करुन घेण्यात आल्याची दिसुन येते परंतु रक्कम रुपये 1,43,88,721/- देयकामधुन 5% दराने सुरक्षा ठेव कपात करुन घेणे आवश्यक असताना ती 2.5% दराने कपात करण्यात आल्याने उर्वरित 2.5% सुरक्षा ठेव रक्कम रुपये 3,59,718/- इतकी कपात करण्यात आलेली नाही.

10.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/ नवि-20, दि.02/03/2009 अन्वये कामाची गुणवत्ता/दर्जा तपासणीसाठी त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेण्यात आलेले नसल्याने कामाची गुणवत्ता/दर्जा याबाबत खात्री करुन न घेता देयके अदा करण्यात आलेली आहेत.

11.वरील प्रमाणे देयका नुसार साहित्य वापरुन कामे झालेली नोंदवही व मोजमाप पुस्तिका/शासनाची सन 2011-12 व 2013-14 ची डीएसआर दर सुची वांरवार मागणी करुनही लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत. तसेच देयकावर नमुद साहित्य वापरल्याचा पुर्ण तपशील नमुद करणे आवश्यक असताना देयकामध्ये फक्त कामाचे ठिकाण नमुद करुन एकत्रित रक्कम दर्शविण्यात आलेले असल्याने प्रत्यक्षात साहित्य वापराबाबत खात्री होत नाही. तसचे साहित्य साठा व विनियोग यांची नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाही.

1.मुंद्राक शुल्क वसुल रुपये - 15,600/-

2.सुरक्षा ठेव वसुल रुपये - 3,59,718/-

3.अमान्य रक्कम रुपये - 1,43,88,721/

4.आक्षेपाधीन रक्कम रुपये - 2,93,866/-

उपरोक्त अनियमिततेबाबत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका विद्युत विभागास अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र..36 दि.28/09/2018 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 31, Hmm No : 36)

7 मिरज येथील पाणीपुरवठा विभागातील वर्ष 2014-15 मधील वार्ड क्र. 11 व 26 येथे पाण्याची पाईप लाईन टाकणे या कामातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
No. of Irregularities: 08

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा विभाग महानगरपालिका स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ
आक्षेपाधीन रक्कम रु. 2306169.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 77053.00/-

ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमेमधून आयकराची रक्कम रु. 29027/- कमी वसूल करण्यात आलेली आहे सदरची रक्कम वसूल पात्र करण्यात यावी. कामगार कल्याण उपकराची रक्कम रु. 14612/- कमी वसूल करण्यात आलेली आहे सदरची रक्कम वसूल पात्र करण्यात यावी.ठेकेदाराने सदरच्या कामाचा विमा व कामगारांचा विमा काढलेले नसल्यामुळे 1% विम्याची रक्कम रु. 29029/- वसूल केलेली असून सदरची रक्कम शासकीय विमा संचालनालय यांच्याकडे जमा करण्यात आलेली नसून ती मनपाच्या सुरक्षा ठेव स्वरुपात ठेवण्यात आली आहे. सदरची रक्कम विमा संचालनालयाकडे जमा करण्यात यावी. त्यामुळे सदरची रक्कम आक्षेपाधीन त्ठेवण्यात येत आहे. अंदाजपत्रकातील परिमाणापेक्षा जास्त परिमाण कामावरवापरलेले असून सदरच्या परिमाणास मनपाच्या सक्षम प्रधीका-याची मान्यता घेतल्याबाबतचे अभिलेखे उपलब्ध झाली नाहीत त्यामुळे सदरची र.रु. 157640/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. DI-K-7 Grade Pipes चे गुणवत्ता तपासणीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नसल्यामुळे त्यावरील खर्चाची र.रु. 2119500/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. रॉयल्टीची रक्कम रु.33414/- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांचे शासन परिपत्रक दि.10/2/2010 अन्वये वसुल करण्यात आली नाही.

सांगली,मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने जाहीर प्रकटन क्रमांक 14/2013-14 ने एकूण 9,46,44,700/- किमतीच्या एकूण 42 कामांची एकत्रित जाहिरात निविदा दिनांक 24.02.2014 रोजी दैनिक पुढारी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आली असून निविदा मागविण्यात आल्या होत्या. जाहीर निविदा प्रत्येक कामाची स्वतंत्र नस्ती बांधकाम विभागाने तयार केली आहे. या प्रत्येक कामाच्या नस्तीमध्ये कामाची गरज, अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली कामाची लेखाशीर्षनिहाय अंदाजित तरतूद करून कामाचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर कामाच्या प्राकलनास जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचे पत्र क्रमांक नियोजन/का-14(5) नपा/प्र.क्र.18/488/2013 दिनांक 21.02.2014 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदरच्या जिल्हा नियोजन समितीच्या नियोजनबद्ध कार्यक्रमानुसार 50% शासकीय अनुदानानुसार सदरच्या कामाचे नियोजन आहे. त्याप्रमाणे या प्रत्येक स्वतंत्र कामाच्या टिपणीस मुख्य लेखापरीक्षक व उपायुक्त यांची काम करणेबाबतची शिफारस घेवून नस्ती आयुक्त यांचेकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. या टिपणीवर आयुक्त यांनी कामास प्रशासकीय मान्यता दिली असून काम जाहीर निविदा मागवून करणेस तसेच प्रत्येक कामास आयुक्त यांनी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेचे स्वतंत्र आदेश काढण्यात आले आहेत. व त्यानंतर सर्व कामांचा समावेश करून एकूण 42 कामांची निविदा जाहिरात वर्तमान पत्रामध्ये प्रसिद्ध करून महानगरपालिकेच्या मान्य ठेकेदाराकडून ईनिविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे सदरच्या कामाकरिता एकूण 4 निविदाधारकांनी निविदा सादर केल्या आहेत.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	प्राप्त झालेला दर
1.	मे. अभय आर.पाटील. कुपवाड	1.98% जादा दराने अंदाजपत्रकीय रक्कमेच्या
2.	मे.जावेद एस.शेख.मिरज	4.85% -------"----
3.	मे.मुस्ताफाजी.मुश्रीफ, मिरज	25% --------"--------
4.	मे.प्रवीण एस.कोले,वाळवा	कगदोपत्री अपात्र

त्यापैकी तीन निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या असून निविदेचे दुसरा लिफाफा दिनांक 21.05.2014 रोजी टेंडर कमिटीसमोर उघडण्यात आले त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. अभय आर.पाटील, कुपवाड यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.98% जास्त दाराची प्राप्त झाली आहे. त्या निविदेबबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

1) निविदा क्रमांक 14/1-2013-14 प्रसिद्धी दिनांक 24.02.2014 रोजी

2) अंदाजपत्रकीय निविदा रक्कम रु. 28,48,000/-

3) अंदाजपत्रकीय रक्कमेस स्थायी समिती ठराव क्रमांक 55 दिनांक 20.01.2014 अन्वये मान्यता.

4). निविदा विहित मुदतीमध्ये एकूण प्राप्त - 4 निविदा प्राप्त.

5) प्राप्त निविदा पैकी 3 निविदा पात्र झाल्या असून त्यापैकी एक निविदा अपात्र ठरविण्यात आली.

6) प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. 28,48,000/- च्या 1.98% जास्त दराची प्राप्त झालेली असून ती मे. अभय आर.पाटील, कुपवाड यांची आहे.

7) अंदाजपत्रकीय रक्कम रु. 28,48,000/- च्या 1.98% जादा दराने मे. अभय आर.पाटील, कुपवाड यांचा निविदा दर शे. 1.98% जास्त या दराच्या मर्यादेत रक्कम रु. 2904390/- खर्चास स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 94 दिनांक 05.08.2014 अन्वये जादा दरास व खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

8) ठेकेदाराचे नांव:- मे. अभय आर.पाटील, कुपवाड

9) सदरच्या कामाच्या करारनामा दिनांक 22.08.2014 रोजी र.रु.2000/- च्या मुद्रांकावर करण्यात आला.

10) कामाचे आदेश क्रमांक मनपा/मिरज/1459 दिनांक 04.09.2014

11) कामाचा कालावधी - 60 दिवस (दिनांक 03.10.2014 पर्यंत)

12) सुरक्षा अनामत रक्कम रु. 71200/- दिनांक 24.02.2014रोजी मनपाकडे पावती क्रमांक 115576 ने जमा केली आहे. उर्वरित 2.5 अनामत रक्कम चालू देयकामधून वसूल केली जाईल.

13) एकूण कामावर झालेला खर्च र.रु. 2902829/-

14) मोजमापपुस्तिका क्रमांक 13 पान क्र. 13 ते 14 व 36 ते 40

वार्ड क्र. 11 व 26 येथे पाण्याची पाईप लाईन टाकणे या कामाच्या नस्तीचे, निविदा नस्तीचे आणि मोजमाप पुस्तिकेचे लेखापरीक्षण केले असता त्यातील आढळून आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्र.29 दिनांक 26.09.2018 अन्वये विभागाकडून खुलासा मागविण्यात आला होता. परंतु पाणीपुरवठा विभागाने लेखा परीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) ठेकेदारा मे. अभय आर. पाटील, कुपवाड यांच्या नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक 9/19 दिनांक 07.09.2011 अन्वये महानगरपालिकेकडून शहर अभियंता यांनी ठेकेदारास नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आलेले असून सदरच्या प्रमाणपत्राप्रमाणेच वॉटर वर्क्स व ड्रेनेज विभागाकडील कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील ही नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. अशी करारनाम्यातील अटी व शर्तक्रमांक 8 नुसार घेण्याबाबत तरतूद आहे. त्याप्रमाणे सदरच्या ठेकेदाराने पाणीपुरवठा विभागातील पाण्याची पाईप लाईन टाकण्याचे कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील नोंदणी प्रमाणपत्र घेतल्याची कागदपत्रे निविदा स्वीकृतीच्या वेळी घेतल्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. ते एम.जी.पी कडील नोंदणी प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामुळे सदरचे कामावर केलेल्या खर्चाची रक्कम रु. 2902829/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2) वार्ड क्र. 11 व 26 येथे पाण्याची पाईप लाईन टाकणे या कामावर एकूण दोन देयके प्रदान केली आहेत.

1) पहिले चालू देयक रक्कम रु. 1461162/- चे प्रदान प्रमाणक क्र.निरंक दिनांक उपलब्ध केले नाही.

2) दुसरे अंतिम देयक रक्कम रु. 1441667/- चे प्रदान प्रमाणक क्र. निरंक दिनांक उपलब्ध केले नाही.

उपरोक्तप्रमाणे एकूण र.रु. 2902829/- ठेकेदारास प्रदान केले असून सदरच्या रक्कमेमधून ठेकेदाराकडून 2% प्रमाणे आयकराचे रक्कम रु. 58,056/- वसूल करणे आवश्यक होती. परंतु मनपाने 29029/- इतकी रक्कम वसूल केलेली आहे. त्यामुळे उर्वरित आयकराची रक्कम रु. 29027/- वसूल करण्यात येऊन सदरची रक्कम आयकर विभागाकडे भरणा करून जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करण्याबाबत विचारणा करण्यात आली होती त्याप्रमाणे विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

3) ठेकेदारास प्रदान केलेल्या एकूण रक्कम रु. 2902829/- च्या रक्कमेमधून कामगार कल्याण उपकराची रक्कम 1% वसूल करणे आवश्यक असून त्याकरिता र.रु. 29028/- इतकी वसूल करणे आवश्यक असताना मनपाने ठेकेदाराच्या देयकातून र.रु. 14417/- इतकीच वसूल केलेली असल्याने उर्वरित कामगार कल्याण उपकराची र.रु.14612/- वसूल करण्यात येऊन सदरची रक्कम शासनाकडे जमा केल्याच्या चलनासह अनुपालन सादर करण्यात यावे.

4) विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3.11.2003 तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत. सदरचे काम दिनांक 04.09.2014

ते 03.10.2014 या कालावधीपर्यंत मुदत होती. सदरच्या कामाचा विमा काढल्याचे निदर्शनास आले नाही. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रका नुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. मनपाने ठेकेदारास प्रदान केलेल्या दोन्ही देयकामधून एकूण रक्कम रु. 29029/- वसूल केलेली आहे. परंतु सदरची रक्कम रु. 29029/- ही विमा संचालनालय यांच्याकडे भरणा केलेली नसून ती मनपाच्या खाती सुरक्षा अनामत ठेव स्वरुपात ठेवल्याचे निदर्शनास आले आहे. तरी सदरची रक्कम रु. 29029/- विमा संचालनालया कडे का जमा करून अनुपालन सादर करण्यात यावे. तोपर्यंत सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

5) प्रस्तुत कामामध्ये कामाचे अंदाजपत्रकात बाब निहाय नमूद केलेले परिमाण व प्रत्यक्षात कार्यान्वयित केलेले बाब निहाय परिमाण यामध्ये खालील प्रमाणे तफावत आहे.

बाब क्र.	बाब	अंदाजपत्रकानुसार परिमाण	कार्यन्वित केलेले परिमाण	तफावत	दर.	एकूण रक्कम
2	P&S Sluice Valve-300 MM dia	1	2	1	37695	37695
	100 mm dia	6	12	6	6812	40872
3	P&S ISI Mark c.i.d.i. Standard M.S. Specials-					
	D.I. Specials	328	1067	739	107	79073
	एकूण					157640/-

वरीलप्रमाणे अंदाजपत्रकातील परिमाणा पेक्षा कामावर कार्यान्वित केलेले परिमाण यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. कामाचे जागेवरील स्थळपाहणी अहवालानुसार अंदाजपत्रक तयार केलेले असताना प्रत्यक्षात कामावर जादा परिमाण वापरण्याची कारणमीमांसा तसेच कामाच्या ठिकाणी ठेवलेले work order book आणि cross Section Level sheet लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावी. अन्यथा वर नमूद केलेल्या बाबीवर जास्तीच्या केलेल्या खर्चाची रक्कम रु. 157640/- आक्षेपाधीन ठेवण्यात येईल.

6) पुरवठा करण्यात आलेल्या DI-K-7 Grade Pipe 300 mm dia च्या पुरवठ्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. तरी सदरच्या पुरवठा केलेल्या 300 mm dia चे नग 750 Rmt पाईप कामाच्या ठिकाणी आणल्याचे चलन उपलब्ध झाले नाही. तसेच सदरच्या DI-K-7 Grade Pipes चे गुणवत्ता तपासणीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावे. अन्यथा सदरच्या पाईपची रक्कम रु. 2119500/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

7) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रजाहिरात-2009/प्र.क्र/137/का-34/दिनांक 31.08.2009 अन्वये महामंडळ,जिल्हा परिषद ,महानगरपालिका,नगरपालिका प्रशासन यांना जाहिरात देताना शासनाचे दर अवलंबावेत असे आदेश आहेत. महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या विकास कामे, योजनेची कामे यांच्या जाहिराती मुंबई महानगरपालिका अधिनियम-1949 कलम 469 व 470 अन्वये किमान 2 स्थानिक वर्तमानपत्रात देणे बंधनकारक आहे. बांधकाम विभागाने 2014-15 मध्ये वर्तमानपत्रात देण्यात आलेल्या जाहिराती किमान 2 वर्तमानपत्रात देण्याएवजी एकाच वर्तमानपत्रात दै. पुढारी मध्ये दिलेली असल्यामुळे सदरच्या निविदेकरिता स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे

मनपाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झालेले आहे. याबाबत विभागाने खुलासा केलेला नाही.
8) पाईप लाईन खोदाईतील निघालेला राडारोडा एकूण 472.82 घ.मी. असून सदरच्या कामात गौण खनिज वसुलीबाबत कोणतीच कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदरच्या खोदाईबाबत मोजमाप पुस्तिकेत नोंद आहे. परंतु बिलातून रॉयल्टी वसुली केल्याचे दिसून येत नाही. अथवा ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याच्या पावत्या सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे प्रती घनमीटर रु.70.67/- प्रमाणे रॉयल्टीची रक्कम रु. 33414/- , महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांचे शासन परिपत्रक दि.10/2/2010 अन्वये वसुल करणेबाबत कार्यवाही करण्यात येऊन तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदरची रक्कम वसूलपात्र आहे.
आक्षेपाधीन रक्कम रु. 23,06,169/-
वसूलपात्र रक्कम रु. 77053/-

DATBVGM6801 (Ref No : 9, Hmm No : 29)

8 सांगली पाणीपुरवठा विभागातील वर्ष 2014-15 मधील वार्ड क्र. 9 किल्ला येथील उंच टाकीतून टाकली रस्ता भागात पाईप लाईन टाकणे या कामातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
No. of Irregularities: 09

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा विभाग महानगरपालिका स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ
आक्षेपाधीन रक्कम रु. 2575999.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 247436.00/-

ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमेमधून आयकराची रक्कम रु. 14,225/- कमी वसूल करण्यात आलेली आहे सदरची रक्कम वसूल पात्र करण्यात यावी. ठेकेदाराने सदरच्या कामाचा विमा व कामगारांचा विमा काढलेले नसल्यामुळे 1% विम्याची रक्कम रु. 28449/- वसूल केलेले असून सदरची रक्कम शासकीय विमा संचालनालय यांच्याकडे जमा केलेली नसून मनपाच्या खाती सुरक्षा ठेव म्हणून ठेण्यात येवून ठेकेदारास परत केल्याबाबत निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेण्यात येत आहे. अंदाजपत्रकातील परिमाणापेक्षा जास्त परिमाण कामावरवापरलेले असून सदरच्या परिमाणास मनपाच्या सक्षम प्रधीका-याची मान्यता घेतल्याबाबतचे अभिलेखे उपलब्ध झाली नाहीत त्यामुळे सदरची र.रु. 1157600/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. DI-K-7 Grade Pipes चे गुणवत्ता तपासणीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नसल्यामुळे त्यावरील खर्चाची र.रु. 1390850/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. रॉयल्टीची रक्कम रु. 233211/- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांचे शासन परिपत्रक दि.10/2/2010 अन्वये वसुल करण्यात आली नाही.

सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने जाहीर प्रकटन क्रमांक 10/2013-14 ने एकूण 10.00 कोटीच्या किमतीच्या एकूण 105 कामांची एकत्रित जाहिरात निविदा दिनांक 01.01.2014 रोजी दैनिक पुढारी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आली असून निविदा विक्री दिनांक 13.01.2014 अखेर मागविण्यात आल्या होत्या. निविदेस मुदतवाढ देऊन दिनांक 27.01.2014 अखेर मागविण्यात आल्या होत्या. जाहीर निविदा प्रत्येक कामाची स्वतंत्र नस्ती बांधकाम विभागाने तयार केली आहे, या प्रत्येक कामाच्या नस्तीमध्ये कामाची गरज, अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली कामाची लेखाशीर्षनिहाय अंदाजित तरतूद करून कामाचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर कामाच्या प्राकलनास शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेऊन या कामाच्या नस्ती प्रशासकीय मान्यतेसाठी प्रशासनाकडे पाठविण्यात आल्या आहेत. या प्रत्येक स्वतंत्र कामाच्या टिपणीस मुख्य लेखापरीक्षक व उपायुक्त यांची काम करणेबाबतची शिफारस घेवून नस्ती आयुक्त यांचेकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. या टिपणीवर आयुक्त यांनी कामास प्रशासकीय मान्यता दिली असून काम जाहीर निविदा मागवून करणेस तसेच प्रत्येक कामास आयुक्त यांनी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेचे स्वतंत्र आदेश काढण्यात आले आहेत. व त्यानंतर सर्व कामांचा समावेश करून एकूण 105 कामांची निविदा जाहिरात वर्तमान पत्रामध्ये प्रसिद्ध करून महानगरपालिकेच्या मान्य ठेकेदाराकडून ईनिविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे सदरच्या कामाकरिता एकूण 4 निविदाधारकांनी सादर केल्या आहेत.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	प्राप्त झालेला दर
1.	मे.तुळजाई कन्स्ट्रक्शन,सांगली.	10.35% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या कमी दराने
2.	मे.पी.आर.कन्स्ट्रक्शन, सांगली.	9,25% ——"——
3.	मे.पी.टी.माली, सांगली.	9.99% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
4.	मे.सी.एच.हुडेद, मिरज	कगदोपत्री अपात्र

त्यापैकी तीन निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या असून निविदेचे दुसरा लिफाफा दिनांक 31.01.2014 रोजी कमिटीसमोर उघडण्यात आले त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. तुळजाई कन्स्ट्रक्शन, सांगली यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 10.35%कमी दाराची प्राप्त झाली आहे. त्या निविदेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

1) निविदा क्रमांक 10/3-2013-14 प्रसिद्धी दिनांक 01.01.2014 रोजी

2) अंदाजपत्रकीय निविदा रक्कम रु. 31,99,253/-

3) अंदाजपत्रकीय रक्कमेस स्थायी समिती ठराव क्रमांक 40 दिनांक 24.12.2013 अन्वये मान्यता.

4) निविदा विहित मुदतीमध्ये (मुदतवाढीच्या कालावधीसह) एकूण प्राप्त -4 निविदा प्राप्त.

5) प्राप्त निविदा पैकी 3 निविदा पात्र झाल्या असून त्यापैकी एक निविदा अपात्र ठरविण्यात आली.

6) प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. 31,99,253/-च्या 10.35% कमी दराची प्राप्त झालेली असून ती मे.तुळजाई कन्स्ट्रक्शन, सांगली यांची आहे.

7) अंदाजपत्रकीय रक्कम रु. 31,99,253/- च्या 10.35% कमी दराने मे. तुळजाई कन्स्ट्रक्शन, सांगली यांचा निविदा दर शे.10.35% कमी या दराच्या मर्यादेत रक्कम रु. 2868130/- खर्चास स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 80 दिनांक 21.02.2014 अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

8) ठेकेदाराचे नांव:- मे. तुळजाई कन्स्ट्रक्शन, सांगली.

9) सदरच्या कामाच्या करारनामा दिनांक 21.02.2014 रोजी र.रु.2500/- च्या मुद्रांकावर करण्यात आला.
10) कामाचे आदेश क्रमांक मनपा/मिरज/1446 दिनांक 28.02.2014
11) कामाचा कालावधी - 90 दिवस (दिनांक 28.05.2014 पर्यंत)
12) सुरक्षा अनामत रक्कम रु. 79985/- दिनांक 24.02.2014रोजी मनपाकडे जमा केली आहे. उर्वरित 2.5 अनामत रक्कम चालू देयकामधून वसूल केली जाईल.
13) एकूण कामावर झालेला खर्च र.रु. 2844761/-
14) मोजमापपुस्तिका क्रमांक 3 पान क्र.83 ते 91

वार्ड क्र. 9 किल्ला येथील उंच टाकीतून टाकली रस्ता भागात पाईप लाईन टाकणे या कामाच्या नस्तीचे, निविदा नस्तीचे आणि मोजमाप पुस्तिकेचे लेखापरीक्षण केले असता त्यातील आढळून आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्र. 31 दिनांक 26/09/2018 अन्वये विचारणा करण्यात आली होती परंतु विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) ठेकेदारा मे.तुळजाई कन्स्ट्रक्शन, सांगली यांच्या नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक 4/12 दिनांक 13.01.2012 अन्वये महानगरपालिकेकडून शहर अभियंता यांनी ठेकेदारास नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आलेले असून सदरच्या प्रमाणपत्रा प्रमाणेच वॉटर वर्क्स व ड्रेनेज विभागाकडील कामाकरिता महाराष्ट्र जीवनप्राधिकरणाकडील ही नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. त्याप्रमाणे सदरच्या ठेकेदाराने पाणीपुरवठा विभागातील पाण्याची पाईप लाईन टाकण्याचे कामाकरिता महाराष्ट्र जीवनप्राधिकरणाकडील नोंदणी प्रमाणपत्र घेतल्याची कागदपत्रे निविदा स्वीकृतीच्या वेळी घेतल्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. ते एम.जी.पी कडील नोंदणी प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावे. अन्यथा सदरचे कामावर केलेल्या खर्चाची रक्कम रु. 28,44,761/- आक्षेपाधीन ठेवण्यात येईल.

2) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाचे अभियंता यांचे पत्र क्रमांक मनपा/सामिकु/पापुवि/45/2014 दिनांक 24.04.2014 अन्वये 150 मी.मी.व्यासाची डी.आय.पाईप मिरज पाणीपुरवठा विभागाकडे देणेबाबत मे.रचना इंजिनिअर्स कोल्हापूर यांना लिहिलेल्या पत्रानुसार मिरज पाणीपुरवठा विभागांतर्गत टाकळी रोड परिसरात किल्ला येथील उंच टाकीतून 160 मी.मी.व्यासाची एच.डी.पी.पाईप लाईन टाकणेचे कामावर 150 मी.मी. व्यासाचे डी.आय. पाईप 15 नग तातडीने सदरचे काम करणाऱ्या मे. तुळजाई कन्स्ट्रक्शन, सांगली यांना उपलब्ध करून देण्याबाबतचे अभिलेखे निविदा नस्तीमध्ये असताना सदरचे पाईप मनपा मार्फत ठेकेदारास पुरवठा केल्याचे दिसून येत असताना त्या पुरवठा केलेल्या पाईपच्या प्रदानांची रक्कम सदरचे काम करणारे ठेकेदारास प्रदान केल्याचे दिसून येत आहे. तसेच ज्या ठेकेदाराने सदरचे पाईप पुरवठा केलेला आहे त्यांना ही याबाबतचे देयकाची रक्कम अदा केली किंवा नाही याबाबत खात्री करता आली नाही. त्यामुळे सदरच्या 160 मी.मी.व्यासाच्या एच.डी.पी.पाईप वर करण्यात आलेल्या खर्चाची रक्कम रु. 1156700/- आक्षेपाधीन का ठेवण्यात येत आहे.

3) वार्ड क्र. 9 किल्ला येथील उंच टाकीतून टाकळी रस्ता भागात पाईप लाईन टाकणे या कामावर एकूण तीन देयके प्रदान केली आहेत.

1) पहिले व चालू देयक रक्कम रु. 1642643/- चे प्रदान प्रमाणक क्र.1 दिनांक 29.3.2014 अन्वये
2) दुसरे व चालू देयक रक्कम रु. 778065/- चे प्रदान प्रमाणक क्र.1 दिनांक 21.5.2014 अन्वये आणि

3) तिसरे व अंतिम देयक रक्कम रु. 424230/- चे प्रदान प्रमाणक क्र.9 दिनांक 24.7.2014 अन्वये एकूण र.रु. 28,44,938/- ठेकेदारास प्रदान केली असून सदरच्या रक्कमेमधून ठेकेदाराकडून 2% प्रमाणे आयकराचे रक्कम रु. 56,899/- वसूल करणे आवश्यक होती. परंतु मनपाने 42,674/- इतकी रक्कम वसूल केलेली आहे. त्यामुळे उर्वरित आयकराची रक्कम रु. 14,225/- वसूल करण्यात येऊन सदरची रक्कम मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करण्याबाबत विचारणा करण्यात आली होती परंतु विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

4) प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूची 2012-13 नुसार तयार करण्यात आले असून 10.35% कमी दराची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे. तथापि ठेकेदाराकडून तपशीलवार दर पृथःकरण प्राप्त करून न घेताच निविदा मान्य करण्यात आली. ठेकेदाराने दिलेले दर 10.35% ने कमी असल्याने अंदाजपत्रक तयार करताना बाजारभावा पेक्षा जास्त दराने तयार केल्याचे दिसून येते. या बाबत खुलासा करण्यात आलेला नाही.

5) प्रस्तुत कामामध्ये कामाचे अंदाजपत्रकात बाब निहाय नमूद केलेले परिमाण व प्रत्यक्षात कार्यान्वयित केलेले बाब निहाय परिमाण यामध्ये खालील प्रमाणे तफावत आहे.

बाब क्र.	बाब	अंदाजपत्रकानुसार परिमाण	कार्यन्वित केलेले परिमाण	तफावत	दर.	एकूण रक्कम
A	P& S HDPE Pipes-90 MM Dia	2100	3050	950	167	158650
-	110 mm dia	700	900	200	243	48600
-	160 mm dia	2700	2200	-	538	-
B	P&S Sluice Valve -80 MM dia	15	22	7	4737	33159
-	150 mm dia	3	2	-	9460	-
-	Item no. 2 - P&S M.S. Specials-					
-	90 mm m.s.t.p.	98	193	95	750	71250
-	110 mm m.s.t.p.	50	92	42	825	34650
-	150 mm m.s.t.p	45	49	4	1260	5040
C	Excavation for foundation					
-	Hard murum	1650	2664.18	1014.18	123	124744
	एकूण					476093/-

वरीलप्रमाणे अंदाजपत्रकातील परिमाणा पेक्षा कामावर कार्यान्वयित केलेले परिमाण यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. कामाचे जागेवरील स्थळपाहणी अहवालानुसार अंदाजपत्रक तयार केलेले असताना प्रत्यक्षात कामावर जादा परिमाण वापरण्याची कारणमीमांसा तसेच कामाच्या ठिकाणी ठेवलेले work order

book आणि cross Section Level sheet लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात द्यावी. अन्यथा वर नमूद केलेल्या बाबीवर जास्तीच्या केलेल्या खर्चाची रक्कमेबाबत खुलासा सादर करावा.

6) पुरवठा केलेल्या परिमाणा पेक्षा कमी परिमाण कामावर वापरल्यामुळे झालेल्या जादा प्रदानांच्या वसुली करण्याबाबत.

बाब क्र.	बाब	कामावर पुरविण्यात आलेले परिमाण	कार्यन्वित केलेले परिमाण (rmt)	तफावत	दर.	एकूण रक्कम
A	Jointing of HDPE Pipes- 90 MM Dia	3050	3460	410	167	68470
	160 mm dia	2200	2150	50	538	26900
	एकूण					95370/-

वरीलप्रमाणे ठेकेदाराने सदरच्या कामावर पुरवठा केलेल्या 90 MM Dia HDPE pipes चे 3050 Rmt पाईप पुरविलेले असून त्यांची रक्कम रु.167/-प्रमाणे प्रदान केलेली आहे. परंतु प्रत्यक्षात कामावर 3050 Rmt पाईप बसविण्याऐवजी 3460 Rmt चे पाईप बसविण्यात आलेले आहेत. त्यामुळे तफावती मधील 410 Rmt पाईप पुरविलेला नसताना वाढीव बसविण्यात आल्याबाबत विभागाकडून खुलासा मागविण्यात आलेला होता.

त्याचप्रमाणे 160 mm dia चा pipes चे एकूण 2200 Rmt पुरवठा केलेला असताना सदरच्या कामावर 2150 Rmt नगाचा वापर/बसविण्यात आलेला असल्यामुळे ठेकेदारास प्रदान केलेल्या 160 mm dia pipes चे 50 नगाची रक्कम रु.26900/- वसूलपात्र करून मनपाच्या खाती जमा करण्यात येणेबाबत विभागाकडून खुलासा मागविण्यात आलेला होता. परंतु विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केले नाही.

7) पुरवठा करण्यात आलेल्या HDPE Pipes च्या चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. तरी सदरच्या पुरवठा केलेल्या 90 mm dia चे नग 3460 Rmt, 2) 110 mm dia चे नग 900 Rmt, 3) 160 mm dia चे नग 2200 Rmt पाईप कामाच्या ठिकाणी आणल्याचे चलन उपलब्ध झाले नाही. तसेच सदरच्या HDPE Pipes चे गुणवत्ता तपासणीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावे. अन्यथा सदरच्या पाईपची रक्कम रु. 1390850/- आक्षेपाधीन ठेवण्यात येईल.

8) विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3.11.2003 तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत.सदरचे काम दिनांक 28.02.2014 ते 28.05.2014 या कालावधीपर्यंत मुदत होती. सदरच्या कामाचा विमा काढल्याचे निदर्शनास आले नाही. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रका नुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. मनपाने ठेकेदारास प्रदान केलेल्या तिन्ही देयकामधून एकूण रक्कम रु. 28449/- वसूल केलेली आहे. परंतु सदरची रक्कम रु. 28449/- ही विमा संचालनालय यांच्याकडे भरणा केलेली नसून ती मनपाच्या खाती सुरक्षा अनामत ठेव स्वरुपात ठेवल्याचे निदर्शनास

आले आहे. तरी सदरची रक्कम विमा संचालनालया कडे का जमा करण्यात आलेली नाही याबाबत विभागाकडून खुलासा मागविण्यात आला असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

8) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रजाहिरात-2009/प्र.क्र/137/का-34/दिनांक 31.08.2009 अन्वये महामंडळ,जिल्हा परिषद ,महानगरपालिका,नगरपालिका प्रशासन यांना जाहिरात देताना शासनाचे दर अवलंबावेत असे आदेश आहेत. महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या विकास कामे, योजनेची कामे यांच्या जाहिराती मुंबई महानगरपालिका अधिनियम-1949 कलम 469 व 470 अन्वये किमान 2 स्थानिक वर्तमानपत्रात देणे बंधनकारक आहे. बांधकाम विभागाने 2014-15 मध्ये वर्तमानपत्रात देण्यात आलेल्या जाहिराती किमान 2 वर्तमानपत्रात देण्याएवजी एकाच वर्तमानपत्रात दै. पुढारी मध्ये दिलेली असल्यामुळे सदरच्या निविदेकरिता स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे मनपाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झालेले आहे. याबाबत विभागाने खुलासा करावा.

9) पाईप लाईन खोदाईतील निघालेला राडारोडा एकूण 3300.00 घ.मी. असून सदरच्या कामात गौण खनिज वसुलीबाबत कोणतीच कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदरच्या खोदाईबाबत मोजमाप पुस्तिकेत नोंद आहे. परंतु बिलातून रॉयल्टी वसुली केल्याचे दिसून येत नाही. अथवा ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याच्या पावत्या सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे प्रती घनमीटर रु.70.67/- प्रमाणे रॉयल्टीची रक्कम रु. 233211/- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांचे शासन परिपत्रक दि.10/2/2010 अन्वये वसुल करणेबाबत कार्यवाही करण्यात येवून मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर करण्यात यावे.

आक्षेपाधीन रक्कम रु. 25,75,999/-

वसूलपात्र रक्कम रु. 247,436/-

DATBVGM6801 (Ref No : 10, Hmm No : 31)

9 पाणीपट्टीची थकबाकी रु 1870.66 लाख इतकी असून वसुलीबाबत ठोस कार्यवाही केली जात नाही. सांगली मनपाचे पाणीपुरवठा योजनेचे महसुली उत्पन्न 2014-15 साठी रु. 1331.26 लाख असून महसुली खर्च रु 1988.87 लाख आहे रु. 657.61 लाख तफावत असल्याचे दिसते.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा विभाग महानगरपालिका स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 65761000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 187066523.00/-

सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेतील पाणीपुरवठा विभागातील 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाकरिता पाणीपट्टीची थकबाकी रु 1870.66 लाख इतकी असून वसुलीबाबत ठोस कार्यवाही केली नाही. मनपाचे पाणीपुरवठा योजनेचे महसुली उत्पन्न 2014-15 साठी रु. 1331.26 लाख असून महसुली खर्च रु 1988.87 लाख आहे रु. 657.61 लाख तफावत असल्याचे दिसते.

सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका अंतर्गत पाणीपुरवठा विभागाचे 2014-15 चे लेखापरीक्षण केले असता खालील उणीवा दिसून आल्या. त्याबाबत अर्धसमास क्र. 32 दिनांक 29.09.2018 नुसार खुलासा मागविला असता अनुपालन प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1.व्यावसायिक नळ जोडणी व घरगुती नळ जोडणीच्या पाणीपट्टी आकारणी मीटरद्वारे केली जाते. सन 2014-15 अखेर मोठ्या प्रमाणावर पाणीपट्टीचे थकीत असल्याचे दिसून आले.

रुपये लाखात

वर्षे	आरंभीची शिल्लक	चालू वर्षातील मागणी	एकूण मागणी शिल्लक	एकूण झालेली वसुली	अखेरची शिल्लक (थकबाकी))
2011-12	825.36	1514.70	2340.06	1434.13	905.93
2012-13	905.93	1620.30	2536.23	1626.49	899.74
2013-14	899.74	1693.96	2593.71	1096.84	1496.85
2014-15	1496.85	1765.49	3262.35	1391.68	1870.66

मागील तीन वर्षातील वसुलीवरून असे दिसून येते कि चालू वर्षातील एकूण थकबाकी व मागणी यांच्यात रक्कमेची तुलना केली असता चालू वर्षातील मागणीच्या प्रमाणा इतकीही वसुली होत नसल्याचे दिसून येत आहे. अखेरची शिल्लक (थकबाकी) मध्ये तफावत वाढत चालली आहे. पाणीपुरवठा विभागाकडे एकूण 44606 इतके मीटर नळ कनेक्शन असून त्यापैकी 28914 इतके मीटर बंद असल्याबाबत लेखापरीक्षणास माहिती उपलब्ध झाली आहे. उर्वरित 15692 इतके नळ कनेक्शनचे मिटर्स चालू असल्याचे निदर्शनास आले आहे. एकूण कनेक्शनपैकी 64.82% मीटर बंद आहेत. त्यामुळे मनपाच्या पाणीपट्टीची वसुलीची रक्कम मोठ्याप्रमाणावर प्रलंबित राहत असल्याचे दिसून येत आहे. यावरून असे दिसून येत आहे कि, प्रलंबित असलेल्या रकमा वसूल करण्यासाठी ठोस उपाययोजना केली जात नसल्याचे निदर्शनास येत आहे.

2.मार्च 2015 अखेर पाणीपुरवठा विभागांतर्गत शहरातील करण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योजनेमधील प्रत्येक ग्राहकास मीटर निरीक्षक यांच्याकडून पाणीपुरवठा विभागाने नळजोडणी केल्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे.

एकूण नळजोडणी	बंद मीटर	बंद मीटर टक्केवारी
44606	28914	64.82%

64.82% मीटर्स बंद असल्याने काटकसरीने पाण्याच्या वापर करणे व वापरानुसार पाणीपट्टी आकारणे हा उद्देश सफल होत नसल्याचे लेखापरीक्षणामध्ये निदर्शनास आले आहे. तसेच अनधिकृत नळजोडणी किती आहेत याबाबतची माहिती महानगरपालिकेकडे उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा

योग्य वापर होत आहे किंवा नाही याबाबतची खात्री करता येत नाही. तसेच अनधिकृत नळजोडण्याची माहिती लेखापरीक्षणास लेखापरीक्षण कालावधी संपण्यापूर्वी उपलब्ध करून देण्यात यावी.
3.पाणीपुरवठ्याचा संचलन व देखभाल दुरुस्तीचा (महसुली खर्च) हा पाणीपुरवठा योजनेच्या महसुली उत्पन्नातून भागविला जाणे आवश्यक आहे. सांगली, मिरज व कुपवाड शहर मनपाचे पाणीपुरवठा योजनेचे महसुली उत्पन्न 2014-15 साठी रु. 1331.26 लाख असून महसुली खर्च रु. 1988.87 लाख आहे. यावरून असे दिसून येते कि, महसुली जमेपेक्षा महसुली खर्चाची रक्कमेमध्ये र. रु.657.61 लाख तफावत असल्याचे दिसते. सदरच्या तफावतीच्या रक्कमा खर्च / प्रदान करण्याबाबत निधी स्रोत कोणता वापरला याबाबत लेखापरीक्षणास खुलासा सादर करावा अन्यथा सदरची रक्कम रु. 65761000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.
वसूलपात्र रक्कम रु. 187066523/-
आक्षेपाधीन रक्कम रु. 65761000/-

DATBVGM6801 (Ref No : 24, Hmm No : 32)

10 मिरज पाणीपुरवठा विभागातील वर्ष 2014-15 मधील वार्ड क्र. 28 मध्ये बेडग रोड, मोतुगडेमळा, ढोले मळा व म्हैशाळ रोड कोकाटे मळा भागात नवीन पाईप लाईन टाकणे या कामातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा विभाग महानगरपालिका स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ
आक्षेपाधीन रक्कम रु. 760401.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 25393.00/-

ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमेमधून व्हॉटची रक्कम रु. 8,284/- वसूल करण्यात आलेली नाही. सदरची रक्कम वसूलपात्र करण्यात यावी. कामगार कल्याण उपकराची रक्कम रु. 7604/- वसूल करण्यात आलेली नाही. तसेच स्थानिक संस्था कराची रक्कम रु. 1901/- वसूल केली नाही. सदरच्या एकूण रक्कम रु. 17789/- वसूलपात्र करण्यात यावी. ठेकेदाराने सदरच्या कामाचा विमा व कामगारांचा विमा काढलेले नसल्यामुळे 1% विम्याची रक्कम रु. 7604/- वसूल केलेली असून सदरची रक्कम शासकीय विमा संचालनालय यांच्याकडे जमा करण्यात आलेली नसून ती मनपाच्या सुरक्षा ठेव स्वरुपात ठेवण्यात आली आहे. सदरची रक्कम विमा संचालनालयाकडे जमा करण्यात यावी. त्यामुळे सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

ने मनपा क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधांच्या विकास कामासाठी र.रु. 10.00 कोटीच्या विशेष अनुदानातून (50% शासन अनुदान +50% मनपा हिस्सा)एकूण र.रु. 20.00 कोटीच्या कामासाठी दिनांक 03.03.2014 महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दैनिक सकाळमध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. विहित मुदतीत एकूण चार निविदा प्राप्त झाल्या आहेत.सदरच्या निविदा समिती समोर दिनांक 21.05.2014 रोजी उघडण्यात आल्या असता एक निविदाधारक कागदोपत्री अपात्र ठरल्याने उर्वरित तीन निविदाधारक कागदोपत्री पात्र असल्याने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदा उघडण्यात आल्या आहेत.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	प्राप्त झालेला दर
1.	निविदा क्र.	15/2013-14
1.	मे.अभय आर पाटील, कुपवाड	4.99% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या कमी दराने
2.	मे.जावेद एस.शेख ,मिरज.	0.10 % ------"----
3.	मे.मुस्ताफ जी.मुश्रीफ,मिरज.	7.20% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
4.	मे.एस.एस.मुश्रीफ, मिरज	कगदोपत्री अपात्र

त्यापैकी तीन निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या असून निविदेचे दुसरा लिफाफा दिनांक 21.05.2014 रोजी कमिटीसमोर उघडण्यात आले त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. मे.अभय आर पाटील, कुपवाड यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 04.99%कमी दराची प्राप्त झाली आहे. त्या निविदेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

1. निविदा क्रमांक 15/-2013-14 प्रसिद्दी दिनांक 03.03.2014 रोजी
2. अंदाजपत्रकीय निविदा रक्कम रु. 15,74,000/-
3. अंदाजपत्रकीय रक्कमेस स्थायी समिती ठराव क्रमांक 49 दिनांक 08.01.2014 अन्वये मान्यता.
4. निविदा विहित मुदतीमध्ये एकूण प्राप्त - 4 निविदा प्राप्त.
5. प्राप्त निविदा पैकी 3 निविदा पात्र झाल्या असून त्यापैकी एक निविदा अपात्र ठरविण्यात आली.
6. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. 15,74,000/- च्या 04.99% कमी दराची प्राप्त झालेली असून ती मे.अभय आर.पाटील, कुपवाड यांची आहे.
7. अंदाजपत्रकीय रक्कम रु. 15,74,000/- च्या 04.99% कमी दराने मे. अभय आर.पाटील, कुपवाड यांचा निविदा दर शे. 04.99% कमी या दराच्या मर्यादेत रक्कम रु. 14,95,457/- खर्चास स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 93 दिनांक 05.08.2014 अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
8. ठेकेदाराचे नांव:- मे. अभय आर.पाटील, कुपवाड.
9. सदरच्या कामाच्या करारनामा दिनांक 22.08.2014 रोजी र.रु. 600/- च्या मुद्रांकावर करण्यात आला.
10. कामाचे आदेश क्रमांक मनपा/मिरज/1460 दिनांक 04.09.2014
11. कामाचा कालावधी - 60 दिवस (दिनांक 03.10.2014 पर्यंत)
12. सुरक्षा अनामत रक्कम रु. 39250/- दिनांक 24.08.2014 रोजी मनपाकडे जमा केली आहे. उर्वरित 2.5 अनामत रक्कम चालू देयकामधून वसूल केली जाईल.
13. एकूण कामावर झालेला खर्च र.रु. 995,193/-
14. मोजमापपुस्तिका क्रमांक 13 पान क्र. 02 ते 4

वार्ड क्र. 28 मध्ये बेडग रोड,मोतुगडेमळा,ढोले मळा व म्हैशाळरोड कोकाटे मळा भागात नवीन पाईप लाईन टाकणे या कामाच्या नस्तीचे, निविदा नस्तीचे आणि मोजमाप पुस्तिकेचे लेखापरीक्षण केले असता त्यातील आढळून आलेल्या उणीवाबाबत विभागास अर्धसमास क्र.49 दिनांक 17.10.2018 अन्वये विचारणा करण्यात आली होती परंतु विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) ठेकेदारा मे. अभय आर. पाटील, कुपवाड यांच्या नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक 9/19 दिनांक 07.09.2011 अन्वये महानगरपालिकेकडून शहर अभियंता यांनी ठेकेदारास नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आलेले असून सदरच्या प्रमाणपत्रा प्रमाणेच वॉटर वर्क्स व ड्रेनेज विभागाकडील कामाकरिता महाराष्ट्र जीवनप्राधिकरणाकडील ही नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. त्याप्रमाणे सदरच्या ठेकेदाराने पाणीपुरवठा विभागातील पाण्याची पाईप लाईन टाकण्याचे कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील नोंदणी प्रमाणपत्र घेतल्याची कागदपत्रे निविदा स्वीकृतीच्या वेळी घेतल्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. ते एम.जी.पी कडील नोंदणी प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावे. अन्यथा सदरचे कामावर केलेल्या खर्चाची रक्कम रु. 760401/- आक्षेपाधीन ठेवण्यात येईल.

2) वार्ड क्र. 28 मध्ये बेडग रोड, मोतुगडेमळा, ढोले मळा व म्हैशाळरोड कोकाटे मळा भागात नवीन पाईप लाईन टाकणे या कामावर एकूण एक देयक प्रदान केले आहे. पहिले चालू देयक रक्कम रु. 995193/- चे प्रदान प्रमाणक क्र.25 दिनांक 09.10.2014 अन्वये निधी अभावी एकूण र.रु.787000/-(र.रु. 760401/-ची नोंद अभिलेख्यात उपलब्ध आहे) ठेकेदारास शासन अनुदानाची रक्कम प्रदान केली असून सदरच्या रक्कमेमधून ठेकेदाराकडून 2% प्रमाणे व्हॉटची रक्कम रु. 15,208/- वसूल करणे आवश्यक होती. परंतु मनपाने 6924/- इतकी रक्कम वसूल केलेली आहे. त्यामुळे उर्वरित व्हॉटची रक्कम रु. 8,284/- वसूल करण्यात यावी., तसेच कामगार कल्याण उपकराची रक्कम रु. 7604/- वसूल केलेली नाही. त्याच प्रमाणे स्थानिक संस्था कराची रक्कम रु. 1901/- वसूल केली नाही. तरी वर नमूद एकूण रक्कम रु. 17789/- वसूल करण्यात येऊन सदरची रक्कम मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनासह अनुपालन सदर करण्यात यावे.

3) विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3.11.2003 तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत. सदरचे काम दिनांक 04.09.2014 ते 03.10.2014 या कालावधीपर्यंत मुदत होती. सदरच्या कामाचा विमा काढल्याचे निदर्शनास आले नाही. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रका नुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. मनपाने ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकामधून एकूण रक्कम रु. 7604/- वसूल करण्यात आलेली नाही. तरी सदरची रक्कम वसूल करून विमा संचालनालयाकडे जमा केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर करावे.

4) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.जाहिरात-2009/प्र.क्र/137/का-34/दिनांक 31.08.2009 अन्वये महामंडळ,जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका प्रशासन यांना जाहिरात देताना शासनाचे दर अवलंबावेत असे आदेश आहेत. महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या विकास कामे, योजनेची कामे यांच्या जाहिराती मुंबई महानगरपालिका अधिनियम-1949 कलम 469 व 470

अन्वये किमान 2 स्थानिक वर्तमानपत्रात देणे बंधनकारक आहे. बांधकाम विभागाने 2014-15 मध्ये वर्तमानपत्रात देण्यात आलेल्या जाहिराती किमान 2 वर्तमानपत्रात देण्याएवजी एकाच वर्तमानपत्रात दै. सकाळ मध्ये दिलेली असल्यामुळे सदरच्या निविदेकरिता स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे मनपाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झालेले आहे. याबाबत विभागाने खुलासा करावा.

5) कामाचा कालावधी 60 दिवसांचा दिनांक 03.10.2014 पर्यंत असताना सदरच्या नस्तीमध्ये काम पूर्ण झाल्याबाबतचे काम पूर्णत्वाचा दाखला निदर्शनास आलेला नाही. त्यामुळे काम विहित मुदतीमध्ये झाले किंवा नाही. याबाबत खात्री करता आली नाही.

6) सदरच्या कामाकरिता एकूण शासन अनुदान किती प्राप्त झाले आणि सदरच्या कामावर किती खर्च करण्यात आले याबाबतचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

वसूलपात्र रक्कम रु. 25393/-

आक्षेपाधीन रक्कम रु. 760401/-

DATBVGM6801 (Ref No : 25, Hmm No : 49)

11 सांगलीवाडी येथे 15 लक्ष लि. क्षमतेची उंच टाकी बांधणे, शामरावनगर, सांगलीवाडी ई.भागातील वितरण व्यवस्थेसाठी DI K-7 Pipe पुरविणे, खोदाई करणे जोडणी करणे, चाचणी देणे, या केंद्र शासन पुरस्कृत कामातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 7

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा शासन निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 214269.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1215148.00/-

कामाच्या अटी व शर्तीनुसार स्थानिक संस्था कराची रक्कम एकूण झालेल्या कामाच्या खर्चाच्या रक्कमेवर र.रु. 44,058/- इतकी कमी वसूल केलेली आहे. सदरच्या कामाकरिता ठेकेदाराने विहित मुदतीमध्ये काम पूर्ण केलेले नसल्यामुळे मनपाने ठेकेदारास विलंबकालावधीकरिता दंडाची कार्यवाही केलेली असून सदरच्या दंडाच्या रक्कमेची ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकामधून र.रु. 5,90,000/- वसूल केलेली नाही. तरी सदरची रक्कम वसूलपात्र करण्यात यावी. तसेच सदरच्या निविदेकरिता ठेकेदाराने कामाचा व कामगारांचा विमा अर्धवट कालावधीचा काढलेला असल्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1% रक्कम रु. 5,74,005/- वसूलपात्र करून शासकीय विमा संचालनालयाकडे भरण्यात यावी. त्याचप्रमाणे बँक गॅरन्टी घेताना कमी रक्कमेच्या मुद्रांकावर करारनामा केलेला असल्यामुळे र.रु. 7085/-चे नुकसान झाले आहे. सदरची रक्कम वसूलपात्र करावी. बँक

गॅरन्टीची मुदतवाढीच्या पत्राची प्रत लेखापरीक्षण कालावधीत दिनांक 31.03.2015 पर्यंत घेतल्याचे दिसून आले नाही. कामगार कल्याण उपकराची रक्कम रु. 2,14,269/- वसूल केलेली असून सदरची रक्कम शासनाकडे भरणा करणे आवश्यक असताना ती भरलेली नसल्यामुळे आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

सांगली,मिरज व कुपवाड शहर महानगरपालिके अंतर्गत सांगलीवाडी येथे 15 लक्ष लि.क्षमतेची उंच टाकी बांधणे, शामरावनगर,सांगलीवाडी ई.भागातील वितरण व्यवस्थेसाठी DI K-7 Pipe पुरविणे, खोदाई करणे जोडणी करणे,चाचणी देणे, कम्पाउंड वॉल बांधणे इत्यादी कामे केंद्र शासन पुरस्कृत व UIDSSMT कार्यक्रमा अंतर्गत योजनेमधून करण्यात आलेली आहेत. वरील कामाची निविदा नोटीस क्र. 12/1 सन 2012-13 नुसार निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे निविदेचे दुसरा लिफाफा दिनांक 20.02.2013 रोजी उघडण्यात आले असून में. विजय व्ही. साळुंखे, पुणे यांचा देकार सर्वात कमीच म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 12.88% जादा दराने सादर केलेला आहे. सदर निविदा हया महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्न्हया सन 2011-12 च्या दरसूचीवर आधारित आहेत. एम.जी.पी आणि पी.डब्ल्यू. डी. विभागाच्या सन 2012-13 सालच्या दरसूची महानगरपालिकेकडील कामासंठी लागू करणेबाबतच्या केलेल्या ठरावानुसार ठेकेदाराने सादर केलेल्या निविदा दराप्रमाणे सध्या लागू असलेल्या चालू सन 2012-13 च्या दरसूचीनुसार तुलनात्मक तक्ता प्रमाणे 7.04% जादाचे होत असल्याने सदरच्या कामासाठी ठेकेदाराने सादर केलेल्या दरान्वये 12.88% जादाचे दराने काम करून घेण्यास आयुक्त यांनी दिनांक 01.04.2013 रोजी सदर निविदेस मान्यतेसाठी महासभेच्या मान्यतेकरीता सादर करण्याबाबत शिफारस करण्यात आली. त्यानुसार मूळ मंजूर योजना सन 2005-06 सालच्या दरावर आधारित असून प्रस्तावित काम्माची मंजूर किमंत रु. 269.02 लक्ष आहे. ठेकेदाराने सादर केलेल्या दरान्वये होणारी रक्कम रु. 574.01 लक्ष इतकी आहे. मंजूर किमंत व ठेकेदाराने सादर केलेल्या दरामधील तफावतीची रक्कम रु. 304.99 लक्ष जादा खर्च आपेक्षित आहे. या योजनेचा मिशन कालावधी मार्च 2014 पर्यंत पूर्ण होणे आवश्यक आहे.

सन 2013-14 या आर्थिक वर्षापर्यंत सदरच्या कामाचे निविदा प्रकियेवर आतापर्यंत एकूण खर्च रु.1,84,26,962/- इतका खर्च एकूण 2 देयकापर्यंत झालेला आहे. सदरच्या निविदा नस्तीची माहिती खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

अ.क्र.	विवरणपत्र/ निविदासंबधीची माहिती.	तपशील
1.	निविदा क्रमांक.	12/1-2012-13
2.	निविदा अंदाजपत्रकीय रक्कम	5,08,50,950/- ची निविदा
3.	प्रशासकीय मान्यता -	याबाबतचे अभिलेखे उपलब्ध करून देण्यात यावेत.
4.	तांत्रिक मान्यता	तांत्रिक मान्यतेची प्रत उपलब्ध करून देण्यात यावी.
5.	निविदा मान्य दर व रक्कम	महासभा ठराव क्र.06 दिनांक 06.04.2013 अन्वये निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (र.रु. 5,08,50,950/-) 12.88% जादा दराने

		परंतु रक्कम रु. 5,74,00,552/-च्या मर्यादेत खर्च करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे.
6.	ठेकेदाराचे नाव	मे.विजय व्ही.साळुंखे, पुणे.
7.	कामाचा कार्यादेश क्रमांक.	पाणीपुरवठा विभाग आदेश क्र. मनपा/पापुवि/सांगली/116/13-14 दिनांक 10.05.2013 अन्वये
8.	कामाचा कालावधी.	कार्यादेशाच्या आदेशापासून 12 महिने दिनांक 09.05.2014 पर्यंत.
9.	कामास प्रथम मुदतवाढ	मुदतवाढ घेतल्याबाबतचे अभिलेखे नस्तीत उपलब्ध झाले नाही.
10.	कामावर 2014-15 अखेरपर्यंत झालेला खर्च	र.रु. 2,14,26,962/- इतकी रक्कम ठेकेदारास आदा केली आहे.
11.	बँक गॅरन्टी bg no.044 - 71/gper/001113	रक्कम रु. 1435,000/- दिनांक 10.10.201 4 पर्यंत मुदत
12.	करारनामा	करारनामा र.रु. 56600/- च्या मुद्रांकावर करण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून जाहिरात प्रसिद्ध करण्यात आल्याबाबतची मूळ नस्ती (छायाकिंत प्रत उपलब्ध) उपलब्ध झाली नाही. विहित मुदतीत एकूण चार निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदरच्या निविदा समितीसमोर दिनांक 20.02.2013 रोजी उघडण्यात आल्या असता चार निविदाधारक कागदोपत्री पात्र असल्याने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदा उघडण्यात आल्या आहेत.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	प्राप्त झालेला दर
1.	मे.व्ही.व्ही.साळुंखे,पुणे.	12.88% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
2.	मे.एस.व्ही.जाधव,	14.50% -------"----
3.	मे.रचना इंजिनिअरींग	15.50% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
4.	मे.लक्ष्मी सिव्हील इंजिनियरिंग	16.10% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने

वरील चारही निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या असून निविदेचे दुसरा लिफाफा दिनांक 20.02.2013 रोजी कमिटीसमोर उघडण्यात आले त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. व्ही.व्ही.साळुंखे,पुणे. यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 12.88% जादा दराची प्राप्त झाली आहे. त्या निविदेबाबतची माहिती वरीलप्रमाणे आहे.

वर नमूद केलेल्या निविदा नस्तीचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या उनिवाबाबत अर्धसमास क्रमांक 48 दिनांक 17.10.2018 अन्वये विभागाकडून खुलासा मागविण्यात आलेला होता. परंतु विभागाने अनुपालन सादर केलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3.11.2003 तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत. सदरचे काम दिनांक 10.05.2013 ते 09.05.2014 या कालावधीपर्यंत मुदत होती. परंतु सदरच्या मूळ कालावधीत काम पूर्ण झालेले नसून सदरचे काम 31.03.2015

पर्यंत चालू असल्याचे दिसून आले असून सदरच्या कामाचा विमा व कामगारांचा विमा काढलेला नाही. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रका नुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. वरील कामाचे कंत्राटी मूल्य रक्कम रु. 5,74,00,552/- असून 1% दंडनीय विमा रक्कम रु. 5,74,005/- वसूल करून शासकीय विमा संचालनालयाकडे भरणे आवश्यक आहे. तरी ठेकेदाराकडून वसूल केलेली रक्कम रु.5,74,005/- विमा संचालनालय, मुंबई यांचे कडे जमा करण्यात येऊन जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करावे.

2) कामाच्या अटी व शर्तीनुसार स्थानिक संस्था कराची रक्कम एकूण झालेल्या कामाच्या रक्कमेवर 0.25% वसूल करून मनपा खाती जमा करणे आवश्यक होते. सदरच्या कामावर एकूण झालेला खर्च रक्कम रु. 2,14,26,962/- असून त्यावर स्थानिक संस्था कराची रक्कम रु.53567/- वसूल करणे आवश्यक होती परंतु ठेकेदाराकडून 9509/- इतकीच रक्कम वसूल केलेली आहे. त्यामुळे उर्वरित रक्कम रु. 44,058/-वसूल करून मनपाच्या खाती जमा करून तसे अनुपालन सादर करावे.

3) कामाच्या अटी व शर्तीनुसार कामगार कल्याण कराची रक्कम एकूण झालेल्या कामाच्या रक्कमेवर 1% वसूल करून मनपा खाती जमा करून ठेवण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. सदरची वसूल केलेली रक्कम रु. 214,269/- कामगार कल्याण अधिकारी महाराष्ट्र शासन यांच्याकडे भरणा करून सदरच्या चलनासह अनुपालन सदर करण्यात यावे. तो पर्यंत सदरची रक्कम रु. 214,269/- आक्षेपाधीन हेवण्यात येत आहे.

4) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाने सदरचे काम विहित मुदतीमध्ये पूर्ण केलेले नसल्यामुळे पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता याचे पत्र क्रमांक 164 दिनांक 21.06.2014 अन्वये आदेशाच्या दिनांकापासून प्रतिदिन रु.1000/- दंडनीय रक्कम करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार आकरणी करण्यात येण्याबाबत आदेशीत केलेले आहे. त्याच प्रमाणे समक्रमांकाचे पत्र क्रमांक 235 दिनांक 30.07.2014 अन्वये दिनांक 31.07.2014 पासून काम पूर्ण होईपर्यंत दंडनीय रक्कम रु. 1000/- प्रतिदिनऐवजी र.रु.2000/- वसूल करण्याबाबत आदेशित करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे वरील दोन्ही आदेशानुसार दंडनीय व्याजाच्या रक्कमेचा तक्ता पुढीलप्रमाणे

अ.क्र.	तपशील / कालावधी	दंडाची रक्कम
1.	दि.21.06.2014 ते 30.07.2014 एकूण 40 दि.प्रतिदिन 1000/-प्रमाणे	40,000/-
2.	दि.31.07.14 ते 31.03.2014 पर्यंत एकूण 244 दि.प्रतिदिन 2000/-	5,50,000/-
	एकूण दंडाची रक्कम रु.	5,90,000/-

वरीलप्रमाणे दंडाची रक्कम ठेकेदारांच्या देय देयकामधून वसूल करण्यात येवून तसे अनुपालन सादर करावे. त्याप्रमाणे सदरची रक्कम दंडाची म्हणून वसूल केलेली असलीतरी मनपाच्या पाणीपुरवठा /लेखा विभागणी दंडाची रक्कम म्हणून वसूल न करता अतिरिक्त सुरक्षा रक्कम म्हणून वसूल दाखवून सुरक्षा ठेव नोंदवहीत नोंदी घेण्यात येतात. याबाबत लेखाविभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत खुलासा सादर करावा.

5) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार सदरच्या कामाचा कालावधी पावसाळ्यासह 12 महिनेचा असल्याने

सदरचे काम ठेकेदाराने विहित मुदतीमध्ये पूर्ण करणे आवश्यक होते. त्याबाबत मनपाच्या कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभागाने त्यांचे पत्र मनपा/पापुवि/मि/तांशा/164/14 दिनांक 21.06.2014 अन्वये सांगलीवाडी येथील 15 लक्ष क्षमतेच्या उंच टाकीचे काम बरेच दिवस काम बंद आहे. तसेच आपल्या कामाची मुदत ही दिनांक 09.05.2014 रोजी संपलेली असल्याबाबत पत्रान्वये ठेकेदारास कळविण्यात आले होते. तसेच सदरच्या पत्रान्वये विहित मुदतीमध्ये काम पूर्ण केलेले नसल्यामुळे दिनांक 21.06.2014 पासून प्रतिदिन रु.1000/- दंड का आकारण्यात येऊ नये याबाबत पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यांचे ठेकेदाराने कोणताही प्रतिसाद दिला नसल्यामुळे मनपाच्या पाणीपुरवठा विभागाने पुन्हा त्यांचे पत्र क्रमांक मनपा/पापुवि/मि/तांशा/235/14 दिनांक 30.07.2014 बाबत ठेकेदाराने काम सुरु न केल्यामुळे आणि पूर्वी दिलेल्या पत्रावर खुलासा सादर केला नसल्यामुळे दंडाची रक्कम रु. 1000/- प्रतिदिनऐवजी र.रु. 2000/- दंड आकारण्याबाबतचे पत्र रजिस्टर पोस्टाने क्रमांक RM513822825 अन्वये ठेकेदाराच्या पत्यावर पाठ्विल्याबाबत अभिलेख्यावरून दिसून येत आहे. याबाबतही ठेकेदाराने मनपास प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही.

ठेकेदाराने त्यांचे पत्र क्रमांक दिनांक 04.07.2014 अन्वये खुलासा सादर करताना मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकरी अभियंता यांनी पावसाळा संपेपर्यंत पाईपलाईनचे काम थांबविणेबाबत आदेश दिले आहे असे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. त्याकरिता अभिलेख्याचे तपासणी केली असता काम थांबविण्याबाबतचे आदेशाची प्रत अभिलेख्यात आढळून आली नाहीत. तरी पावसाळ्याच्या कालावधीमध्ये ठेकेदारास काम थाबविण्याबाबातचे आदेशाची प्रत आणि मुदतवाढीच्या आदेशाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावी. अन्यथा ठेकेदाराकडून वर नमूद केलेली दंडाची रक्कम रु. 5,90,000/- वसूल करण्यात यावी. सदरची रक्कम अतिरिक्त सुरक्षा ठेव म्हणून घेण्यात येत असल्याचे अभिलेख्यावरून दिसून येत आहे. तरी ती पुन्हा ठेकेदारास प्रदान केली किंवा कसे याबाबत विभागाने खुलासा सादर करावा.

6) (बँक गॅरंटी वर मुद्रांक शुल्काची रक्कम कमी घेतल्यामुळे शासन महसुलाचे झालेले नुकसान)

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची 1 मधील कलम 54(ii)व 40(b) 2500 पेक्षा जास्त रक्कमेच्या बँक गॅरन्टीवर प्रत्येक हजाराकरिता रु.5/- प्रमाणे मुद्रांक शुल्क वसूल करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने सदरच्या कामाकरिता बँक गॅरंटीची रक्कम रु. 14,35,000/- घेतली असून त्यावर रु.100/- चे मुद्रांक लावून हमीपत्र घेण्यात आले आहे. कमी शुल्क आकारल्यामुळे शासन महसुलाचे रु 7085/- चे नुकसान झाले आहे.

अ.क्र.	B.G.No.	बँक ग्यारंटी ची रक्कम	वसूल करावयाची मुद्रांक शुल्काची रक्कम	भरलेले मुद्रांक शुल्क	तफावतीची रक्कम रु.
1	BG no.04471G-PER/001113	1435000/-	7175	100	7085
				एकूण वसुली	7085/-

7) बँक गॅरन्टी BG no.04471 gper/001113 दिनांक 10.10.2014 पर्यंत मुदत होती. सदरची बँक गॅरन्टीची मुदतवाढीच्या पत्राची प्रत लेखापरीक्षण कालावधीत दिनांक 31.03.2015 पर्यंत घेतल्याचे दिसून आले नाही. तरी

याबाबत विभागाने खुलासा सादर करावा.

वसूलपात्र रक्कम रु. 12,15,148/-

आक्षेपाधीन रक्कम रु. 2,14,269/-

DATBVGM6801 (Ref No : 29, Hmm No : 48)

12 पाणीपुरवठा योजनेबाबतची माहिती विहित नमुन्यातील विवरणपत्रात उपलब्ध करून देणेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 4

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा महानगरपालिका स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेतील पाणीपुरवठा विभागाचे 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाकरिता पाणीपट्टीची मागणी, वसूली, थकबाकी, नळजोडण्या, पाणी गळतीचे प्रमाण, पाणीपुरवठा योजनेवरील खर्च, ईत्यादी बाबतची माहिती उपलब्ध झाली नाही.

सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेतील पाणीपुरवठा विभागाचे 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाकरिता पाणीपुरवठा योजनेसंदर्भात खालील प्रमाणे विहित प्रपत्रात माहिती उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास क्रमांक 28 दिनांक 26.09.2018 आणि अर्धसमास क्रमांक 42 दिनांक 09.10.2018 अन्वये विहित नमुन्यामध्ये माहिती मागविण्यात आली होती परंतु विभागाने सदरच्या अर्धसमासाचे अनुपालन लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत सादर केलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) पाणीपुरवठा विभागाद्वारे पाणीपुरवठा योजनेसंदर्भात आर्थिक वर्ष 2014-15 या वित्तीय वर्षात करण्यात आलेले अंदाजपत्रकीय महसुली उत्पन्न व महसुली खर्च व त्यानुषंगाने प्रत्यक्षात प्राप्त झालेले महसुली उत्पन्न व केलेला प्रत्यक्ष खर्च याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही.

2) आर्थिक वर्ष 2011-12 ते 2014-15 या वित्तीय वर्षात वर्षनिहाय निश्चित करण्यात आलेले पाणीपट्टीचे दराचे ठरावाच्या प्रति उपलब्ध करण्यात आल्या नाहीत.

3) CPHEEO (Central Public Health & Environment Engineering Organisation) यांचे

मानकानुसार पाणी गळतीचे प्रमाण (NRW) 15 टक्के पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तरी सां.मि. व कुपवाड महानगरपालिकेतील पाणीपुरवठा विभागाकडील आकडेवारीनुसार आर्थिक वर्ष 2012-13 ते 2014-15 या वित्तीय वर्षात वर्षनिहाय पाणी गळतीचे प्रमाण किती आहे याबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही.

4) सां.मि. व कुपवाड शहर महानगरपालिकेला विविध स्त्रोतातून (MIDC/जलसंपदा विभाग/मनपा) उपलब्ध होणारा पाणीपुरवठा व त्याकरिता खर्च केलेली रक्कम यांचा वर्षनिहाय तपशिल खालील नमुन्यात माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही.

वर्ष	स्त्रोत	पा.पु. दर	विहित पाणीसाठा	प्रत्यक्ष उचल	अदा केलेली रक्कम
2011-12					
2012-13					
2013-14					
2014-15					

DATBVGM6801 (Ref No : 52, Hmm No : 28)

13 चुकीची पदोन्नती दिल्याने वेतन/निवृत्ती वेतन/उपदान/अशराशीकरण रक्कमेचे अतिप्रदान झाले बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : निवृत्ती वेतन 01 निधी

अनियमितता कलम : 9अ

वर्ग 4 मधुन वर्ग 3 मध्ये पदोन्नती देताना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.आरटीआर-1174/2032/बारा, दि.23/09/1975 व शासन निर्णय क्र. क्र.आरटीआर-1174/20321390/ बारा, दि.07/07/1976 अन्वये कार्यवाही करण्यात आलेली नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महागनरपालिकेकडील सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये सेवानिवृत्त झालेले खालील नमुद कर्मचारी यांना चुकीचे पध्दतीने पदोन्नती लाभ देण्यात आलेले आहेत.

अ).श्री मंहमंद हनीफ गफर शेख - ट्रेसर (अनुरेखक), सेवानिवृत्ती दिनांक - 31/08/2014

1)मा.कार्याध्यक्ष स्थायी समिती ठराव क्र.189/79-80, दि.07/07/1979 अन्वये श्री मंहमंद हनीफ गफर शेख यांना दिनांक 25/07/1979 पासुन रुपये 200-3-230-4-244-4-280 या वेतनश्रेणीमध्ये शिपाई वर्ग-4 चे नियुक्ती करण्यात आली.

2)दि.12/10/1982 ते 31/12/1982 अखेर 260-10-390-15-420 दरो 15-495 या वेतनश्रेणी मध्ये ट्रेसर पदी तात्पुरती पदोन्नती देण्यात आली.

3)दि.01/01/1983 ते 31/03/1983 अखेर 260-10-390-15-420 दरो 15-495 या वेतनश्रेणी मध्ये ट्रेसर पदी तात्पुरती पदोन्नती देण्यात आली.

4)दि.01/04/1983 ते 30/09/1983 अखेर 260-10-390-15-420 दरो 15-495 या वेतनश्रेणी मध्ये ट्रेसर पदी तात्पुरती पदोन्नती देण्यात आली.

5)मा.प्र.मं.क्र./188/83-84 दि.16/09/1983 अन्वये दिनांक 01/07/1983 पासुन कायम स्वरुपाने अनुरेखक(ट्रेसर) या पदी 260-10-390-15-420 दरो 15-495 या वेतनश्रेणी मध्ये कायमस्वरुपी नेमणुक करण्यात आलेली आहे.

ब) श्री सुनिल राजाराम कांबळे -पंप ऑपरेटर, सेवानिवृत्ती दिनांक - 31/05/2014

1)मा.स्थायी समिती ठराव क्र.39 दि.26/04/1978 अन्वये दिनांक 11/05/1978 पासुन रुपये 200-3-230-4-244-4-280 या वेतनश्रेणीमध्ये सफाईगार वर्ग-4चे नियुक्ती करण्यात आली.

2) मा.स्थायी समिती ठराव क्र.408 दि.03/10/1986 अन्वये दिनांक 01/11/1986 पासुन पंप ऑपरेटर या पदी 250-7-285-10-435 या वेतनश्रेणी मध्ये कायम पदोन्नती देण्यात आली.

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.आरटीआर-1174/2032/बारा, दि.23/09/1975 व शासन निर्णय क्र. क्र.आरटीआर-1174/20321390/बारा, दि.07/07/1976 अन्वये वर्ग 4 चे पदावर नियमित 3 वर्षाची सेवा पुर्ण केलेले कर्मचारी यांना फक्त लिपिक या संर्वगात पदोन्नती देणेबाबत नमुद असताना वरील नमुद कर्मचारी यांना नियमबाहयपणे वर्ग-3चे तांत्रिकपदी पदोन्नती देण्यात आलेली असुन सदरची पदोन्नती ही नियमबाहयपणे दिल्याने व त्यापुढे त्यांना नियमित नमुद पदावर वेतनवाढी दिल्याने त्यांचे नमुद कालावधीमध्ये वेतन/निवृत्ती वेतन/सेवा उपदान/अशंराशीकरण इत्यादी रक्कमाचे अतिप्रदान झालेले आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका आस्थापना/निवृत्ती वेतन विभागास अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र.53 दि.19/10/2018 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 20, Hmm No : 53)

14 महानगरपालिका अधिकारी/कर्मचा-यांच्या गटविमा योजनेच्या कपातीबाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष : निवृत्ती वेतन 01 निधी

अनियमितता कलम : 9अ

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक डीओआय/2081/4701/एडीएम-5 दिनांक 26.03.1982 नुसार शासकिय कर्मचा-यांना दिनांक 01.05.1982 पासून गट विमा योजना राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद व महानगरपालिका कर्मचा-यांनाही जशाच्या तशी लागु असल्याने दिनांक 01.10.1990 पासून ही योजना स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू झालेली आहे. याबाबत शासनाचे शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक ग.वि.यो.1183/ प्र.क्र.66/ 84/प्र-5 दिनांक 28.02.1986 अन्वये महानगरपालिका अधिकारी/कर्मचा-यांच्या गटविमा योजना लागु करण्यात आलेली नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांचे सन 2014-2015 या आर्थिक वर्षामध्ये सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांना गट विमा योजना लागु करण्यात आलेली नसल्याने त्यांचे वेतन देयकाची पडताळणी केली असता त्यांचे वेतनातुन गट विमा योजनेच्या रक्कमा कपात केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे त्यांना गट विमा योजनेच्या हक्कापासुन वंचित ठेवण्यात आलेले आहे.

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक डीओआय/2081/4701/एडीएम-5 दिनांक 26.03.1982 नुसार शासकिय कर्मचा-यांना दिनांक 01.05.1982 पासून गट विमा योजना राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद व महानगरपालिका कर्मचा-यांनाही जशाच्या तशी लागु असल्याने दिनांक 01.10.1990 पासून ही योजना स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू झालेली आहे. याबाबत शासनाचे शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक ग.वि.यो.1183/ प्र.क्र.66/ 84/प्र-5 दिनांक 28.02.1986 अन्वये निर्देश दिलेले आहेत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी त्यांचेकडील कार्यरत असणा-या अधिकारी/कर्मचारी यांचे गट विमा योजनेबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय विचारात घेऊन अधिकारी व कार्यालयीन कर्मचा-याकडून गट विमा योजनेअंतर्गत वर्गणी वसुली करुन शासनाच्या 8011 या लेखाशिर्षाखाली जमा करुन सदर योजनेचा लाभ मनपा आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात यावा.

उपरोक्त अनियमिततेबाबत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका आस्थापना/निवृत्ती वेतन विभागास अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र.55 दि.20/10/2018 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 22, Hmm No : 55)

15 सांगली झुलेलाल चौक ते 100 फुटी द-उ रस्ता डांबरीकरणाने मजबुतीकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
No. of Irregularities: 13

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग महानगरपालिका स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ
आक्षेपाधीन रक्कम रु. 517255.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 327751.00/-

ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमेमधून व्हॉटची रक्कम रु. 713/- वसूल करण्यात आलेली नाही. सदरची रक्कम वसूलपात्र करण्यात यावी. स्थानिक संस्था कराची रक्कम रु.90/- वसूल करण्यात आलेली नाही. सदरच्या एकूण रक्कम रु. 803/- वसूलपात्र करण्यात यावी. ठेकेदाराने सदरच्या कामाचा विमा व कामगारांचा विमा काढलेले नसल्यामुळे 1% विम्याची रक्कम रु. 35,695/- वसूल केलेली नाही. तसेच तांत्रिक मान्यता घेतेवेळी आणि सदरच्या कामावर झालेल्या खर्चाच्या एकूण रक्कमेवर 1% कामाच्या विम्याची रक्कम रु.31828/- वाढवून त्यावर 12.10% निविदा दराने वाढ करून एकूण र.रु. 35,343/- ठेकेदारास प्रदान केलेली असल्याने सदरची रक्कम वसूलपात्र करण्यात यावी. निविदा मान्य दरापेक्षा रक्कम रु. 2,55,910/- इतकी ठेकेदारास मर्यादेपेक्षा जास्त प्रदान केलेली असल्याने सदरची रक्कम वसूल करण्यात यावी. सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली मधील नियम 134 बी नुसार बचती मधून केलेल्या जादा बाबीसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता ण घेताच खर्च करण्यात आलेली रक्कम रु. 517255/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-1087/सीआर-136/इमारत दि.4/05/1988 नुसार निविदा स्वीकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% जादा दराने प्राप्त झाल्यास सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील नियम 313 नुसार वाढीव खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नाही.

सांगली,मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने जाहीर प्रकटन क्रमांक 16/45-2013-14 ने मनपा क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधांच्या विकास कामासाठी र.रु. 20.00 कोटीच्या विशेष अनुदानातून 100% शासन अनुदान कामासाठी दिनांक 05.03.2014 महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दैनिक लोकमतमध्ये एकूण 53 कामासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन दिनांक 28.03.2014 पर्यंत मागविण्यात आल्या होत्या. विहित मुदतीत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.सदरच्या निविदा समिती समोर दिनांक 30.04.2014 रोजी उघडण्यात आल्या असता तिन्ही निविदाधारक कागदोपत्री पात्र ठरल्याने उर्वरित तीन निविदाधारक कागदोपत्री पात्र असल्याने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदा दिनांक 02.05.2014 रोजी उघडण्यात आल्या आहेत.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	प्राप्त झालेला दर
1.	निविदा क्र.	16/45-2013-14
1.	मे.शिवपार्वती कन्स्ट्रक्शन,सांगली.	19.90% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
2.	मे.ज्योती कन्स्ट्रक्शन,सांगली.	22.00% ------"----
3.	मे.बी.बी.गुंजाटे	27.55% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने

वरीलपैकी तिन्ही निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या असून निविदेचे दुसरा लिफाफा दिनांक 02.05.2014 रोजी कमिटीसमोर उघडण्यात आले त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. शिवपार्वती कन्स्ट्रक्शन,सांगली. यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 19.90% जादा दराची प्राप्त झाली आहे. त्या निविदेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

1. निविदा क्रमांक 16/45-2013-14 प्रसिद्धी दिनांक 05.03.2014 रोजी
2. अंदाजपत्रकीय निविदा रक्कम रु. 29,56,000/-
3. अंदाजपत्रकीय रक्कमेस स्थायी समिती ठराव क्रमांक 49 दिनांक 10.01.2014 अन्वये मान्यता.
4. निविदा विहित मुदतीमध्ये एकूण प्राप्त - 3 निविदा प्राप्त.
5. प्राप्त निविदा पैकी तिन्हीहि निविदा पात्र झाल्या आहेत.
6. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. 29,56,000/- च्या 19.90% जादा दराची प्राप्त झालेली असून ती मे. शिवपार्वती कन्स्ट्रक्शन,सांगली. यांची आहे. सदरच्या जादा दराच्या निविदेतील दर कमी करण्याबाबत ठेकेदाराशी वाटाघाटीनुसार 12.10% जादा दराने करण्याबाबत ठेकेदाराने सहमती दर्शविल्यामुळे र.रु.33,13,676/- च्या मर्यादेत खर्च करण्यास स्थायी समिती सभा क्रमांक 01 ठराव क्रमांक 27 दिनांक 29.05.2014 अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
7. ठेकेदाराचे नांव:- मे. शिवपार्वती कन्स्ट्रक्शन,सांगली.
8. सदरच्या कामाच्या करारनामा दिनांक 13.06.2014 रोजी र.रु. 2100/- च्या मुद्रांकावर करण्यात आला.
9. कामाचे आदेश क्रमांक मनपा/सांगली/बांधवि/316/14-15 दिनांक 23.05.2014
10. कामाचा कालावधी - 60 दिवस (दिनांक 22.07.2014 पर्यंत)
11. सुरक्षा अनामत रक्कम रु. 29,560/- दिनांक 13.06.2014 रोजी मनपाकडे जमा केली आहे. उर्वरित 2.5 अनामत रक्कम चालू देयकामधून वसूल केली जाईल.
12. एकूण कामावर झालेला खर्च र.रु. 35,69,586/-
13. मोजमापपुस्तिका क्रमांक 11 पान क्र. 01 ते 3 लहान मोजमाप पुस्तिका 28 पान क्र.18 ते 23 सांगली झुलेलाल चौक ते 100 फुटी द-उ रस्ता डांबरीकरणाने मजबुतीकरण करणे या कामाच्या नस्तीचे, निविदा नस्तीचे आणि मोजमाप पुस्तिकेचे लेखापरीक्षण केले असता त्यातील आढळून आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 151 दिनांक 23.10.2018 अन्वये खुलासा मागविण्यात आलेला होता परंतु विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) ठेकेदारास सदरचे काम करण्याकरिता दिनांक 23.05.2014 रोजी कामाचे आदेश देण्यात आले होते. मनपाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालय यांचे आदेश क्रमांक निरंक दिनांक 24.05.2014 अन्वये सदरचे काम पुढील आदेशापर्यंत काम स्थगित ठेवण्याबाबत आदेश देण्यात आले असून त्यानंतर सदरचे

काम चालू करण्याकरिता दिनांक 01.11.2014 अन्वये आदेशित केले आहे. याबाबत सदरचे कामाचा कालावधी दिनांक 01.11.2014 ते 30.12.2014 पर्यंत काम पूर्ण करणेचा कालावधी होता असे गृहीत धरून सदरचे काम मूळ आदेशानुसार दिनांक 22.07.2014 रोजी पूर्ण करणे आपेक्षित होते. परंतु विहित मुदतीमध्ये ठेकेदाराने सदरचे काम दिनांक 27.11.2014 रोजी पूर्ण केलेले असल्यामुळे विहित मुदतीमध्ये काम पूर्ण ण करण्याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

2) सांगली झुलेलाल चौक ते 100 फुटी द-उ रस्ता डांबरीकरणाने मजबुतीकरण करणे या कामावर एकूण पहिले व अंतिम देयक प्रदान केले आहे. देयकाची रक्कम रु. 35,69,586/- चे प्रदान प्रमाणक क्र.45 दिनांक 08.12.2014 अन्वये प्रदान केल्याची अभिलेख्यात नोंद असून सदरच्या नस्तीमध्ये मूळ प्रमाणके लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाली नाहीत. सदरचा खर्च शासन अनुदानच्या मुलभूत सोयी सुविधा निर्मित्तच्या कामाकरिता प्राप्त अनुदान रक्कम रु. 20.00 कोटींमधून करण्यात आले आहे.

3) ठेकेदारास शासन अनुदानाची रक्कम प्रदान केली असून सदरच्या रक्कमेमधून ठेकेदाराकडून 2% प्रमाणे व्हॉटची रक्कम रु. 71,391/- वसूल करणे आवश्यक होती. परंतु मनपाने 70,678/- इतकी रक्कम वसूल केलेली आहे. त्यामुळे उर्वरित व्हॉटची रक्कम रु. 713/- वसूल करण्यात यावी., तसेच कामगार कल्याण उपकराची रक्कम वसूल केली असून त्याच प्रमाणे स्थानिक संस्था कराची रक्कम रु. 8924/- वसूल करणे आवश्यक असताना र.रु. 8835/- इतकी रक्कम वसूल केली असल्याने उर्वरित रक्कम रु. 90/- वसूल पात्र करण्यात यावीत. तरी वर नमूद एकूण रक्कम रु. 803/- वसूल करण्यात येऊन सदरची रक्कम मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करण्यात आले नाही.

5) विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3.11.2003 तसेच निविदेतील अटी व शर्तींनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत. सदरचे काम दिनांक 23.05.2014 ते 22.07.2014 या कालावधीपर्यंत मुदत होती. परंतु ठेकेदाराने सदरच्या कालावधीत कामाचा विमा व कामगारांचा विमा काढल्याचे निदर्शनास आले नाही. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रका नुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. मनपाने ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकामधून एकूण रक्कम रु. 35,695/- वसूल करण्यात आलेली नाही. तरी सदरची रक्कम वसूल करून विमा संचालनालयाकडे जमा केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर करण्यात यावे.

6) त्याचप्रमाणे सदरच्या निविदेतील कामास तांत्रिक मान्यता घेते वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाच्या मूळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. 29,26,745/- च्या 1% रक्कम रु.29,267/- विम्याची रक्कम म्हणून वाढविण्यात येऊन कामाची तांत्रिक मान्यता रु. 29,56,000/- अशी केलेली असून ठेकेदारास सदरच्या वाढीव रक्कमेच्या प्रमाणत कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे ठेकेदाराने सदरच्या कामावर केलेल्या कामाच्या खर्चाची एकूण रक्कम रु.31,52,759/- च्या 1% विम्याची रक्कम रु.31,528/-वाढवून र.रु. 31,84,287/- करण्यात आली आहे. त्यावर निविदा मान्य दर 12.10% जादा दराने वाढ देण्यात आलेली असून ठेकेदारास एकूण रक्कम रु. 35,343/- इतकी रक्कम अतिप्रदान केल्याचे आढळून येत आहे. तरी सदरची रक्कम रु. 35,343/- (31528+3815) वसूल करण्यात येऊन जमा केलेल्या चलनाच्या प्रतीसह अनुपालन सादर करण्यात यावे.

7) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.जाहिरात-2009/प्र.क्र/137/का-34/दिनांक

31.08.2009 अन्वये महामंडळ,जिल्हा परिषद, महानगरपालिका,नगरपालिका प्रशासन यांना जाहिरात देताना शासनाचे दर अवलंबावेत असे आदेश आहेत. महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या विकास कामे, योजनेची कामे यांच्या जाहिराती मुंबई महानगरपालिका अधिनियम-1949 कलम 469 व 470 अन्वये किमान 2 स्थानिक वर्तमानपत्रात देणे बंधनकारक आहे. बांधकाम विभागाने 2014-15 मध्ये वर्तमानपत्रात देण्यात आलेल्या जाहिराती किमान 2 वर्तमानपत्रात देण्याएवजी एकाच वर्तमानपत्रात दै. लोकमतमध्ये दिलेली असल्यामुळे सदरच्या निविदेकरिता स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे मनपाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झालेले आहे. याबाबत विभागाने खुलासा करावा.

8) प्रस्तुत कामामध्ये कामाचे अंदाजपत्रकात बाब निहाय नमूद केलेले परिमाण व प्रत्यक्षात कार्यान्वयित केलेले बाब निहाय परिमाण यामध्ये खालील प्रमाणे तफावत आहे.

बाब क्र.	बाब	अंदाजपत्रकातील परिमाण	कार्यन्वित केलेले परिमाण	तफावत	दर.	एकूण रक्कम
7	P& Laying BBM SARFACE 75 MM	2206	4000	1794	266.7	478460
8	P & Laying BM with 40-60 tonnes per hours	123.75	129.42	5.67	6842.15	38795
	एकूण					517255/-

वरीलप्रमाणे अंदाजपत्रकातील परिमाणा पेक्षा कामावर कार्यान्वयित केलेले परिमाण यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. कामाचे जागेवरील स्थळपाहणी अहवालानुसार अंदाजपत्रक तयार केलेले असताना प्रत्यक्षात कामावर जादा परिमाण वापरण्याची कारणमीमांसा तसेच कामाच्या ठिकाणी ठेवलेले work order book आणि cross Section Level sheet लेखापरीक्षणास अभिलेख्यात उपलब्ध झाले नाही. तरी सदरचे अभिलेखे उपलब्ध करून देण्यात यावे अन्यथा वर नमूद केलेल्या बाबीवर जास्तीच्या केलेल्या खर्चाची रक्कम रु. 517255/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

9) कामाचा कालावधी 60 दिवसांचा दिनांक 22.07.2014 पर्यंत असताना सदरच्या नस्तीमध्ये काम पूर्ण झाल्याबाबतचे काम पूर्णत्वाचा दाखला दिनांक 27.11.2014 रोजीचा आहे. त्यामुळे काम विहित मुदतीमध्ये झालेले नाही. सदरच्या विलंबाने काम पूर्ण केल्याबाबत विलंब शुल्क का आकारणी केली नाही याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही.

10) सदरच्या कामाकरिता एकूण शासन अनुदान किती प्राप्त झाले आणि सदरच्या कामावर किती खर्च करण्यात आले याबाबतचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

11) संपूर्ण कामावर एकूण रक्कम रु. 35,69,586/- इतका खर्च केला आहे. कामाची मूळ पु.ग.प. रक्कम रु. 29,56,000/-च्या अनुषंगाने 12.10 टक्के जादा दराने निविदा मान्य रक्कम रु. 33,13,676/- च्या मर्यादेत कामावर खर्च करणे अपेक्षित होते. त्या मर्यादेत ठेकेदारास खर्चाची रक्कम प्रदान करणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात रु. 35,69,586/- इतकी रक्कम अदा केली असून रु. 2,55,910/- चे मर्यादेपेक्षा जादा प्रदान केले आहे. मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्यामुळे कोणत्याबाबीवर खर्च जादा केलेला आहे याबाबत खात्री करता आली नाही.तसेच देयकाचे अवलोकन करता कोणतीही जादा बाब अथवा जादा

परिमाणकरिता सक्षम प्राधिका-याची मंजुरी घेतलेली नाही. त्यामुळे सदरच्या जादा खर्चाची रक्कम रु. 2,55,910/- ठेकेदारास झालेले अतिप्रदानाची रक्कम वसूल करून मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करावे.

12) सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली मधील नियम 134 बी नुसार बचती मधून केलेल्या जादा बाबीसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि जादा बाबीवरील खर्चासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेतली नाही. याबाबत विभागाने खुलासा सादर करावा.

13) सदर कामाची निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 12.10% जादा दराने स्वीकृत करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-1087/सीआर-136/इमारत दि.4/05/1988 नुसार निविदा स्वीकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% जादा दराने प्राप्त झाल्यास सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील नियम 313 नुसार वाढीव खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि विभागाने सुधारित मान्यता न घेताच निविदा अंतिम केली आहे. याबाबत विभागाने खुलासा सादर करावा अन्यथा कामावर झालेल्या खर्चाची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येईल

वसूलपात्र रक्कम रु. 3,27,751/-

आक्षेपाधीन र.रु. 5,17,255/-

DATBVGM6801 (Ref No : 32, Hmm No : 151)

16 सांगली येथील हरिपूर रोड लिंगायत स्मशानभूमी ते राजेसाहेब बंगला द-उ रस्त्याचे (काळीवाटरस्ता) हॉटमिक्स डांबरीकरण करणे कामातील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 12

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग महानगरपालिका स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 591689.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 940177.00/-

ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमेमधून आयकराची आणि व्हॉटची अनुक्रमे रक्कम रु. 1,131 आणि रु. 1,131/- वसूल करण्यात आलेली नाही. सदरची रक्कम रु. 2262/- वसूलपात्र करण्यात यावी. ठेकेदाराने सदरच्या कामाचा विमा व कामगारांचा विमा काढलेले नसल्यामुळे 1% विम्याची रक्कम रु. 56,535/- वसूल केलेली नाही. तसेच तांत्रिक मान्यता घेतेवेळी आणि सदरच्या कामावर झालेल्या खर्चाच्या एकूण रक्कमेवर 1% कामाच्या विम्याची रक्कम रु.49,790/- वाढवून त्यावर 12.51% निविदा दराने वाढ रु.6229/- करून एकूण र.रु. 56,019/- ठेकेदारास प्रदान केलेली असल्याने सदरची रक्कम वसूलपात्र करण्यात यावी. निविदा मान्य दरापेक्षा रक्कम रु. 4,431/- इतकी ठेकेदारास मर्यादेपेक्षा जास्त प्रदान केलेली असल्याने सदरची रक्कम वसूल करण्यात यावी. सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली मधील नियम 134 बी नुसार बचती मधून केलेल्या जादा

बाबीसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता ण घेताच खर्च करण्यात आलेली रक्कम रु. 591689/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-1087/सीआर-136/इमारत दि.4/05/1988 नुसार निविदा स्वीकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% जादा दराने प्राप्त झाल्यास सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील नियम 313 नुसार वाढीव खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नाही. गौण खनिजासाठी मुंबई गौण खनिज उत्खनन नियम 1955 नियम 18, 22 व 29 प्रमाणे ठेकेदाराकडून र.रु. 820930/- वसूल केलेली नाही.

सांगली,मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने जाहीर प्रकटन क्रमांक 10/5-2013-14 ने एकूण 10.00 कोटीच्या किमतीच्या एकूण 105 कामांची एकत्रित जाहिरात निविदा दिनांक 01.01.2014 रोजी दैनिक पुढारी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आली असून निविदा विक्री दिनांक 13.01.2014 अखेर मागविण्यात आल्या होत्या. निविदेस मुदतवाढ देऊन दिनांक 27.01.2014 अखेर मागविण्यात आल्या होत्या. जाहीर निविदा प्रत्येक कामाची स्वतंत्र नस्ती बांधकाम विभागाने तयार केली आहे, या प्रत्येक कामाच्या नस्तीमध्ये कामाची गरज, अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली कामाची लेखाशीर्षनिहाय अंदाजित तरतूद करून कामाचे प्राकलनास तयार करण्यात आले आहे. सदर कामाच्या प्राकलनास शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेऊन या कामाच्या नस्ती प्रशासकीय मान्यतेसाठी प्रशासनाकडे पाठविण्यात आल्या आहेत. या प्रत्येक स्वतंत्र कामाच्या टिपणीस मुख्य लेखापरीक्षक व उपायुक्त यांची काम करणेबाबतची शिफारस घेवून नस्ती आयुक्त यांचेकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. या टिपणीवर आयुक्त यांनी कामास प्रशासकीय मान्यता दिली असून काम जाहीर निविदा मागवून करणेस तसेच प्रत्येक कामास आयुक्त यांनी दिलेल्या प्रशासकीय मान्यता स्थायी समिती ठराव क्रमांक 40 दिनांक 24.12.2013 अन्वये घेण्यात आली आहे. व त्यानंतर सर्व कामांचा समावेश करून एकूण 105 कामांची निविदा जाहिरात वर्तमान पत्रामध्ये प्रसिद्ध करून महानगरपालिकेच्या मान्य ठेकेदारांकडून ईनिविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे सदरच्या कामाकरिता एकूण 3 निविदाधारकांनी सादर केल्या आहेत.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	प्राप्त झालेला दर
1.	मे.शिवपार्वती कन्स्ट्रक्शन,सांगली.	17.51% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
2.	मे.बी.बी.गुंजाटे, सांगली.	22.00% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
3.	मे.डी.बी.गुंजाटे, सांगली.	22.00% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने

त्यापैकी तिन्ही निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या असून निविदेचे दुसरा लिफाफा दिनांक 30.01.2014 रोजी कमिटीसमोर उघडण्यात आले त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. शिवपार्वती कन्स्ट्रक्शन,सांगली. यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 17.51% जादा दाराची प्राप्त झाली आहे. त्या निविदेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे.

1. निविदा क्रमांक 10/5-2013-14 प्रसिद्दी दिनांक 01.01.2014 रोजी
2. अंदाजपत्रकीय निविदा रक्कम रु. 50,24,900/-
3. अंदाजपत्रकीय रक्कमेस स्थायी समिती ठराव क्रमांक 40 दिनांक 24.12.2013 अन्वये मान्यता.
4. निविदा विहित मुदतीमध्ये (मुदतवाढीच्या कालावधीसह) एकूण प्राप्त -3 निविदा प्राप्त.

5. प्राप्त निविदा पैकी 3 निविदा पात्र झाल्या आहेत.
6. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. 50,24,900/-च्या 17.51% जादा दराची प्राप्त झालेली असून ती मे.शिवपार्वती कन्स्ट्रक्शन,सांगली. यांची आहे. सदरच्या जादा दराच्या निविदेतील दर कमी करण्याबाबत ठेकेदाराशी वाटाघाटीनुसार 12.51% जादा दराने करण्याबाबत ठेकेदाराने सहमती दर्शविल्यामुळे र.रु. 56,53,515/- च्या मर्यादेत खर्च करण्यास स्थायी समिती सभा क्रमांक 01 ठराव क्रमांक 21 दिनांक 29.05.2014 अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
7. ठेकेदाराचे नांव:- मे. शिवपार्वती कन्स्ट्रक्शन,सांगली
8. सदरच्या कामाच्या करारनामा दिनांक 13.06.2014 रोजी र.रु.4200/- च्या मुद्रांकावर करण्यात आला.
9. कामाचे आदेश क्रमांक मनपा/मिरज/1446 दिनांक 23.05.2014
10. कामाचा कालावधी - 90 दिवस (दिनांक 22.08.2014 पर्यंत)
11. सुरक्षा अनामत रक्कम रु. 50250/- दिनांक 13.06.2014 रोजी मनपाकडे जमा केली आहे. उर्वरित 2.5 अनामत रक्कम चालू देयकामधून वसूल केली जाईल.
12. एकूण कामावर झालेला खर्च र.रु. 56,57,946/-
अ) पहिले देयक रक्कम रु. 12,89,358/- चे प्रदान प्रमाणक क्र.10 दिनांक 24.07.2014 अन्वये
ब) दुसरे व अंतिम देयक रक्कम रु. 43,68,587/- चे प्रदान प्रमाणक क्र.68 दिनांक 08.12.2014
13. मोजमापपुस्तिका क्रमांक 8 पान क्र.1 ते 4 व 12 पान क्र.12 टे 30 (ले.प.साठी उपलब्ध झाली नाही.)

सांगली येथील हरिपूर रोड लिंगायत स्मशानभूमी ते राजेसाहेब बंगला द-उ रस्त्याचे (काळीवाटरस्ता) हॉटमिक्स डांबरीकरण करणे या कामाच्या नस्तीचे, निविदा नस्तीचे आणि मोजमाप पुस्तिकेचे लेखापरीक्षण केले असता त्यातील आढळून आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 159 दिनांक 30.11.2018 अन्वये खुलासा मागविण्यात आलेला होता परंतु विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.
1. सदरच्या कामावर एकूण र.रु. 56,57,945/- ठेकेदारास प्रदान केली असून सदरच्या रक्कमेमधून ठेकेदाराकडून 2% प्रमाणे आयकराचे रक्कम रु. 1,13,159/- वसूल करणे आवश्यक होती. परंतु मनपाने 1,12,028/- इतकी रक्कम वसूल केलेली आहे. त्यामुळे उर्वरित आयकराची रक्कम रु. 1,131/- वसूल करण्यात येऊन सदरची रक्कम आयकर विभागाकडे जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करण्यात आले नाही.
2) सदरच्या कामावर एकूण र.रु. 56,57,945/- ठेकेदारास प्रदान केली असून सदरच्या रक्कमेमधून ठेकेदाराकडून 2% प्रमाणे वर्क्स कॉंट्रक्टची रक्कम रु. 1,13,159/- वसूल करणे आवश्यक होती. परंतु मनपाने 1,12,028/- इतकी रक्कम वसूल केलेली आहे. त्यामुळे उर्वरित वर्क्स कॉंट्रक्टची रक्कम रु. 1,131/- वसूल करण्यात येऊन सदरची रक्कम मनपाच्या खात्यात जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करण्यात आला नाही.
3) प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूची 2012-13 नुसार तयार करण्यात आले असून 12.51% जादा दराची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे. तथापि ठेकेदाराकडून तपशीलवार दर पृथ:करण प्राप्त करून न घेताच निविदा मान्य करण्यात आली. ठेकेदाराने दिलेले दर 12.51% ने जादा असल्याने अंदाजपत्रक तयार करताना बाजारभावापेक्षा जास्त दराने तयार केल्याचे दिसून येते. या बाबत खुलासा करण्यात आला नाही.

4) प्रस्तुत कामामध्ये कामाचे अंदाजपत्रकात बाब निहाय नमूद केलेले परिमाण व प्रत्यक्षात कार्यान्वयित केलेले बाब निहाय परिमाण यामध्ये खालील प्रमाणे तफावत आहे.

बाब क्र.	बाब	अंदाजपत्रकानुसार परिमाण	कार्यन्वित केलेले परिमाण	दर	तफावत	एकूण रक्कम
2	Supply & spreading hard murum	663	1399.40	437.30	736.4	322028
3	Compacting the H.M. kankar	2210	9310	4.20	7100	29820
5	Supplying soft murum at site	171.06	243.54	432	72.48	31311
7	P&L B.B.M surface 75 mm thick	3421.25	4203.14	266.70	781.89	208530
	एकूण					591689

वरीलप्रमाणे अंदाजपत्रकातील परिमाणा पेक्षा कामावर कार्यान्वयित केलेले परिमाण यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. कामाचे जागेवरील स्थळपाहणी अहवालानुसार अंदाजपत्रक तयार केलेले असताना प्रत्यक्षात कामावर जादा परिमाण वापरण्याची कारणमीमांसा तसेच कामाच्या ठिकाणी ठेवलेले work order book आणि cross Section Level sheet लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात द्यावी. अन्यथा वर नमूद केलेल्या बाबीवर जास्तीच्या केलेल्या खर्चाची रक्कम रु. 591689/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

5) विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3.11.2003 तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत.सदरचे काम दिनांक 23.05.2014 ते 22.08.2014 या कालावधीपर्यंत मुदत होती. सदरच्या कामाचा विमा दिनांक 16.07.2014 ते 28.08.2014 या अर्धवट कालावधीचा काढलेला असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रका नुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. त्याबाबत मनपाने ठेकेदाराकडून अर्धवट विमा काढलेला असल्यामुळे निविदा रक्कमेच्या 1% येणारी रक्कम रु. 56,535/- वसूल करून विमा संचालनालय यांच्याकडे जमा केलेल्या चलनाच्या प्रतीसह अनुपालन सादर करण्यात आले नाही.

6) सदर कामाची निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 12.51% जादा दराने स्वीकृत करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-1087/सीआर-136/इमारत दि.4/05/1988 नुसार निविदा स्वीकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% जादा दराने प्राप्त झाल्यास सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील नियम 313 नुसार वाढीव खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि विभागाने सुधारित मान्यता न घेताच निविदा अंतिम केली आहे. याबाबत विभागाने खुलासा सादर केला नाही.

7) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रजाहिरात-2009/प्र.क्र/137/का-34/दिनांक 31.08.2009 अन्वये महामंडळ,जिल्हा परिषद, महानगरपालिका,नगरपालिका प्रशासन यांना जाहिरात देताना शासनाचे दर अवलंबावेत असे आदेश आहेत. महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या विकास कामे, योजनेची कामे यांच्या जाहिराती मुंबई महानगरपालिका अधिनियम-1949 कलम 469 व 470 अन्वये किमान 2 स्थानिक वर्तमानपत्रात देणे बंधनकारक आहे. बांधकाम विभागाने 2014-15 मध्ये वर्तमानपत्रात देण्यात आलेल्या जाहिराती किमान 2 वर्तमानपत्रात देण्याएवजी एकाच वर्तमानपत्रात दै. लोकमतमध्ये दिलेली असल्यामुळे सदरच्या निविदेकरिता स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे मनपाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झालेले आहे. याबाबत विभागाने खुलासा सादर केला नाही.

8) संपूर्ण कामावर एकूण रक्कम रु. 56,57,945/- इतका खर्च केला आहे. कामाची मूळ पु.ग.प. रक्कम रु. 50,24,900/- च्या अनुषंगाने 12.51 टक्के जादा दराने निविदा मान्य रक्कम रु. 56,53,515/- च्या मर्यादेत कामावर खर्च करणे अपेक्षित होते. त्या मर्यादेत ठेकेदारास खर्चाची रक्कम प्रदान करणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात रु. 56,57,946/- इतकी रक्कम अदा केली असून रु. 4,431/- चे मर्यादेपेक्षा जादा प्रदान केले आहे. मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. निविदा अंदाजपत्रकीय बाबीवरील जास्तीच्या खर्चाकरीता सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेशिवाय खर्च केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदरच्या जादा खर्चाची रक्कम रु. 4,431/- ठेकेदारास झालेले अतिप्रदानाची रक्कम वसूल करून मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर केले नाही.

9). सदर कामामध्ये खालील प्रमाणे गौण खनिजाचा वापर केल्याचे देयकावरून दिसून येत आहे.

अ.क्र.	कामाचा तपशील / विवरणपत्र	खोदाई तील मटेरियल
1.	Exacavation for roadways in soil	663.28
2.	Supplying of hard murum	1399.40
3	Compacting the hard murum	9310.16
5.	Supplying soft murum at road site	243.54
	Total	11,616.38 cum

वरील प्रमाणे एकूण 11,616.38 घ.मी.गौण खनिजाचा वापर कामावर झालेला असून खोदाईमधून निघालेल्या 663.28 घ.मी. राडारोड्याबाबतची कोणत्याप्रकारे विल्हेवाट लावली याबाबत अभिलेख्यामध्ये नोंदी घेतल्याचे दिसून येत नाही. तरी याबाबत खुलासा करण्यात आला नाही.

10) लेखापरीक्षणाकरिता मोजमापपुस्तिका उपलब्ध झाली नाही. तरी सदरची मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून देण्यात यावी.

11) गौण खनिजासाठी मुंबई गौण खनिज उत्खनन नियम 1955 नियम 18, 22 व 29 प्रमाणे वेळोवेळी विहीत केलेल्या दरानुसार वापरण्यात आलेल्या खनिज साहित्याच्या स्वामित्वधनाची रक्कम शासनास चलनाव्दारे भरणा करावयाची आहे. शासन महसूल व वन विभाग अधिसूचना दि.11 फेब्रुवारी 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून बांधकामावर वापरण्यात आलेले दगड, दगडाची भुकटी, गोटे, बारीक मुरूम, वाळू, यावर स्वामित्वधनाची रक्कम प्रती ब्रास रु.200/- (प्रती घ.मी.रु.70.67) प्रमाणे रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. धावते देयक क्रमांक 1 व 2 ची पडताळणी केली असता ठेकेदाराने 11616.38 घ.मी गौण खनिजाचा वापर केला असून 70.67 प्रती घ.मी प्रमाणे एकूण रक्कम रु. 820930/- देयकातून वसूल करणे आवश्यक होते. तथापि स्वामित्वधनाची रक्कम ठेकेदाराकडून वसूल केलेली नसल्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झाले आहे. तरी रु. 820930/- ठेकेदाराकडून वसूल करून शासन खाती जमा करून, जमा

केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.
12) त्याचप्रमाणे सदरच्या निविदेतील कामास तांत्रिक मान्यता घेते वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाच्या मूळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. 49,75,145/- च्या 1% रक्कम रु.49,751/- विम्याची रक्कम म्हणून वाढविण्यात येऊन कामाची तांत्रिक मान्यता रु. 50,24,900/- अशी केलेली असून ठेकेदारास सदरच्या वाढीव रक्कमेच्या प्रमाणत कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे ठेकेदाराने सदरच्या कामावर केलेल्या कामाच्या खर्चाची एकूण रक्कम रु.49,79,049/- च्या 1% विम्याची रक्कम रु.49,790/- वाढवून र.रु. 50,28,838/- करण्यात आली आहे. त्यावर निविदा मान्य दर 12.51% जादा दराने वाढ करून रु. 6229/- देण्यात आलेली असून ठेकेदारास एकूण रक्कम रु. 56,57,945/- इतकी रक्कम ठेकेदारास प्रदान केल्याचे आढळून येत आहे. तरी सदरची रक्कम रु. 56,019/-(49790+6229) वसूल करण्यात येऊन जमा केलेल्या चलनाच्या प्रतीसह अनुपालन सादर करण्यात यावे.
आक्षेपाधीन रक्कम रु. 5,91,689/-
वसूलपात्र रक्कम रु. 9,40,177/-

DATBVGM6801 (Ref No : 33, Hmm No : 159)

17 मिरज शिवाजीनगर रोड ते एस.टी.स्टँड पर्यन्तचा रस्ता डांबरीकरण करणे कामातील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
No. of Irregularities: 08

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग महानगरपालिका स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ
आक्षेपाधीन रक्कम रु. 166821.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 909095.00/-

ठेकेदाराने सदरच्या कामाचा विमा अर्धवट कालादाधीचा आणि कामगारांचा विमा काढलेले नसल्यामुळे 1% विम्याची रक्कम रु. 1,49,216/- वसूल केलेली नाही. तसेच तांत्रिक मान्यता घेतेवेळी आणि सदरच्या कामावर झालेल्या खर्चाच्या एकूण रक्कमेवर 1% कामाच्या विम्याची रक्कम रु. 1,47,629/- वाढवून त्यावर 13.00% निविदा दराने वाढ रु.19192/- करून एकूण र.रु. 1,66,821/- ठेकेदारास प्रदान केलेली असल्याने सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. निविदा मान्य दरापेक्षा रक्कम रु. 22,545/- इतकी ठेकेदारास मर्यादेपेक्षा जास्त प्रदान केलेली असल्याने सदरची रक्कम वसूल करण्यात यावी. सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली मधील नियम 134 बी नुसार बचती मधून केलेल्या जादा बाबीसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेताच खर्च करण्यात आलेले आहे.तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-1087/सीआर-136/इमारत दि.4/05/1988 नुसार निविदा स्वीकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% जादा दराने प्राप्त झाल्यास सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील नियम 313 नुसार वाढीव

खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नाही.
रॉयल्टीची रक्कम रु. 7,33,334/- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांचे शासन परिपत्रक दि.10/2/2010 अन्वये वसुल करण्यात आली नाही.

सांगली,मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने जाहीर प्रकटन क्रमांक 16/4-2013-14 ने मनपा क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधांच्या विकास कामासाठी र.रु. 20.00 कोटीच्या विशेष अनुदानातून 100% शासन अनुदान कामासाठी दिनांक 05.03.2014 महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दैनिक लोकमतमध्ये एकूण 53 कामासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन दिनांक 28.03.2014 पर्यंत मागविण्यात आल्या होत्या. विहित मुदतीत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.सदरच्या निविदा समिती समोर दिनांक 30.04.2014 रोजी उघडण्यात आल्या असता तिन्ही निविदाधारक कागदोपत्री पात्र ठरल्याने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदा दिनांक 02.05.2014 रोजी उघडण्यात आल्या आहेत. त्यातील निविदाधारकाची नावे खालीलप्रमाणे.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	प्राप्त झालेला दर
1.	निविदा क्र.	16/4-2013-14
1.	मे.राजेंद्र बी,आडमुठे,सांगली	30.00% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
2.	मे.गौबन कन्स्ट्रक्शन, सांगली.	29.00% -------"----
3.	मे. डी.बी.गुंजाटे, सांगली	22.55% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने

वरीलपैकी तिन्ही निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या असून निविदेचे दुसरा लिफाफा दिनांक 02.05.2014 रोजी कमिटीसमोर उघडण्यात आले त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. डी.बी.गुंजाटे, सांगली यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 22.55% जादा दराची प्राप्त झाली आहे. त्या निविदेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

1. निविदा क्रमांक 16/4-2013-14 प्रसिद्दी दिनांक 05.03.2014 रोजी
2. अंदाजपत्रकीय निविदा रक्कम रु. 1,49,21,600/-
3. अंदाजपत्रकीय रक्कमेस स्थायी समिती ठराव क्रमांक 49 दिनांक 10.01.2014 अन्वये मान्यता.
4. निविदा विहित मुदतीमध्ये एकूण प्राप्त - 3 निविदा प्राप्त.
5. प्राप्त निविदा पैकी तिन्हीहि निविदा पात्र झाल्या आहेत.
6. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. 1,49,21,600/- च्या 22.55% जादा दराची प्राप्त झालेली असून ती मे. डी.बी.गुंजाटे, सांगली यांची आहे. सदरच्या जादा दराच्या निविदेतील दर कमी करण्याबाबत ठेकेदाराशी वाटाघाटीनुसार 13.00% जादा दराने करण्याबाबत ठेकेदाराने सहमती दर्शविल्यामुळे र.रु. 1,68,61,408/- च्या मर्यादेत खर्च करण्यास स्थायी समिती सभा क्रमांक 01 ठराव क्रमांक 27 दिनांक 29.05.2014 अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
7. ठेकेदाराचे नांव:- मे. डी.बी.गुंजाटे, सांगली.
8. सदरच्या कामाच्या करारनामा दिनांक 17.06.2014 रोजी र.रु.14900/-च्या मुद्रांकावर करण्यात आला असून निविदा मान्य रक्कमेवर र.रु.16000/-च्या मुद्रांकावर करणे आवश्यक होते.
9. कामाचे आदेश क्रमांक मनपा/सांगली/बांधवि/1127/14-15 दिनांक 23.05.2014

10. कामाचा कालावधी - 100 दिवस (दिनांक 31.08.2014 पर्यंत) (डांबरीकरणाचे काम असल्यामुळे पावसाळ्यात दिनांक 28.05.2014 पासून पुढील आदेशापर्यंत स्थगित ठेवण्यात आले होते. दिनांक 17.11.2014 पासून सदरचे काम पुन्हा सुरु करण्याबाबतशहर अभियंता यांनी आदेशित केलेले आहे. त्यामुळे कामाचा कालावधी दिनांक 19.02.2015 पर्यंत पूर्ण होणे आवश्यक आहे.)
11. सुरक्षा अनामत रक्कम रु. 149220/- दिनांक 18.06.2014 रोजी मनपाकडे जमा केली आहे. उर्वरित 4 अनामत रक्कम चालू देयकामधून वसूल केली जाईल.
12. एकूण कामावर झालेला खर्च र.रु. 1,68,83,953/- (पहिले चालू देयक र.45,90,745/- प्रमाणक क्र.9 दि.19.09.14 व दुसरे अंतिम देयक रु.1,22,93,208/- प्रमाणक रक. 52 दिनांक 26.12.14, ठेकेदारास प्रदान केलेले आहेत.)
13. मोजमापपुस्तिका क्रमांक 1 पान क्र.1 ते 2 व 12 पान क्र.14 ते 15

मिरज शिवाजीनगर रोड ते एस.टी.स्टँडपर्यन्तचा रस्ता डांबरीकरण करणे या कामाच्या नस्तीचे, निविदा नस्तीचे आणि मोजमाप पुस्तिकेचे लेखापरीक्षण केले असता त्यातील आढळून आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 158 दिनांक 30.11.2018 अन्वये खुलासा मागविण्यात आलेला होता परंतु विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) ठेकेदारास सदरचे काम करण्याकरिता दिनांक 23.05.2014 रोजी कामाचे आदेश देण्यात आले होते. मनपाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालय यांचे आदेश क्रमांक निरंक दिनांक 28.05.2014 अन्वये सदरचे काम पुढील आदेशापर्यंत स्थगित ठेवण्याबाबत आदेश देण्यात आले असून त्यानंतर सदरचे काम चालू करण्याकरिता दिनांक 17.11.2014 अन्वये आदेशित केले आहे. याबाबत सदरचे कामाचा कालावधी दिनांक 23.05.14 ते 28.05.14 आणि दि. 17.11.14 ते 19.02.15 पर्यंत काम पूर्ण करणेचा कालावधी होता. असे गृहीत धरून सदरचे काम मूळ आदेशानुसार दिनांक 26.12.2014 रोजी पूर्ण केले आहे. काम बंद करणे व चालू करण्याबाबतची नियमातील तरतुदीसह खुलासा सादर केलेला नाही.
2) विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3.11.2003 तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत. सदरचे काम दिनांक दिनांक 23.05.14 ते 28.05.14 आणि दि. 17.11.14 ते 19.02.15 या कालावधीपर्यंत मुदत होती. परंतु ठेकेदाराने सदरच्या कालावधीत कामाचा विमा दिनांक 01.12.14 ते 10.03.2015 हया अर्धवट कालावधीचा म्हणजे सदरचे काम पूर्ण झाल्याच्या कालावधीनंतरचा काढलेला असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच कामगारांचा विमा काढलेला नाही. त्यामुळे सदरचा विमा ग्राह्य धरता येत नाही. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रका नुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. मनपाने ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकामधून एकूण रक्कम रु. 1,49,216/- वसूल करण्यात आलेली नाही. तरी सदरची रक्कम वसूल करून विमा संचालनालयाकडे जमा केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर करण्यात यावे.
3) त्याचप्रमाणे सदरच्या निविदेतील कामास तांत्रिक मान्यता (क्र.268 दिनांक 08.11.2013 अन्वये) घेते वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाच्या मूळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. 1,47,73,889/- च्या 1%

रक्कम रु.147,739/- विम्याची रक्कम म्हणून वाढविण्यात येऊन कामाची तांत्रिक मान्यता रु. 1,49,21,600/- अशी केलेली असून ठेकेदारास सदरच्या वाढीव रक्कमेच्या प्रमाणत कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे ठेकेदाराने सदरच्या कामावर केलेल्या कामाच्या खर्चाची एकूण रक्कम रु. 1,47,62,917/- च्या 1% विम्याची रक्कम रु. 1,47,629/- वाढवून र.रु. 149,10,546/- करण्यात आली आहे. त्यावर निविदा मान्य दर 13.00% जादा दराने वाढ र.रु. 19192/- देण्यात आलेली असून ठेकेदारास एकूण रक्कम रु. 1,66,820/- इतकी रक्कम वाढीव प्रदान केल्याचे आढळून येत आहे. तरी सदरची रक्कम रु. 1,66,820/- (1,47,629+19192) जास्तीची प्रदान केलेली आहे. तरी याबाबत खुलासा सादर करण्यात यावा. त्यामुळे सदरची रक्कम रु. 1,66,820/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.जाहिरात-2009/प्र.क्र/137/का-34/दिनांक 31.08.2009 अन्वये महामंडळ,जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका प्रशासन यांना जाहिरात देताना शासनाचे दर अवलंबावेत असे आदेश आहेत. महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या विकास कामे, योजनेची कामे यांच्या जाहिराती मुंबई महानगरपालिका अधिनियम-1949 कलम 469 व 470 अन्वये किमान 2 स्थानिक वर्तमानपत्रात देणे बंधनकारक आहे. बांधकाम विभागाने 2014-15 मध्ये वर्तमानपत्रात देण्यात आलेल्या जाहिराती किमान 2 वर्तमानपत्रात देण्याएवजी एकाच वर्तमानपत्रात दै. लोकमतमध्ये दिलेली असल्यामुळे सदरच्या निविदेकरिता स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे मनपाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झालेले आहे. याबाबत विभागाने खुलासा केलेला नाही.

5) सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली मधील नियम 134 बी नुसार बचती मधून केलेल्या जादा बाबीसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि जादा बाबीवरील खर्चासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेतली नाही. याबाबत अनुपालन सादर केले नाही.

6) सदर कामाची निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 13.00% जादा दराने स्वीकृत करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-1087/सीआर-136/इमारत दि.4/05/1988 नुसार निविदा स्वीकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% जादा दराने प्राप्त झाल्यास सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील नियम 313 नुसार वाढीव खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि विभागाने सुधारित मान्यता न घेताच निविदा अंतिम केली आहे. याबाबत विभागाने खुलासा सादर करावा अन्यथा कामावर झालेल्या खर्चाची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

7) संपूर्ण कामावर एकूण रक्कम रु. 1,68,83,953/- इतका खर्च केला आहे. कामाची मूळ पु.ग.प. रक्कम रु. 1,49,21,600/- च्या अनुषंगाने 13.00 टक्के जादा दराने निविदा मान्य रक्कम रु. 1,68,61,408/- च्या मर्यादेत कामावर खर्च करणे अपेक्षित होते. त्या मर्यादेत ठेकेदारास खर्चाची रक्कम प्रदान करणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात रु. 1,68,83,953/- इतकी रक्कम अदा केली असून रु. 22,545/- चे मर्यादेपेक्षा जादा प्रदान केले आहे. मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्यामुळे कोणत्याबाबीवर खर्च जादा केलेला आहे याबाबत खात्री करता आली नाही.तसेच देयकाचे अवलोकन करता कोणतीही जादा बाब अथवा जादा परिमाणकरिता सक्षम प्राधिका-याची मंजुरी घेतलेली नाही. त्यामुळे सदरच्या जादा खर्चाची रक्कम रु. 22,545/- ठेकेदारास झालेले अतिप्रदानाची रक्कम वसूल करून मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करण्यात यावे.

8) रस्त्याच्या खोदाईतील निघालेला राडारोडा तसेच कामावर पुरवण्यात आलेल्या गौण खनिजाचे एकूण परिमाण 10,376.88 घ.मी. असून सदरच्या कामात गौण खनिज वसुलीबाबत कोणतीच कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदरच्या खोदाईबाबत मोजमाप पुस्तिकेत नोंद आहे. परंतु बिलातून रॉयल्टी वसुली

केल्याचे दिसून येत नाही. अथवा ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याच्या पावत्या सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे प्रती घनमीटर रु.70.67/- प्रमाणे रॉयल्टीची रक्कम रु. 7,33,334/- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांचे शासन परिपत्रक दि.10/2/2010 अन्वये वसुल करणेबाबत कार्यवाही करण्यात येवून मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर करण्यात यावे.
9) सदरच्या कामाकरिता वापरण्यात आलेली मोजमापपुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आली नाही. तरी सदरची मोजमापपुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात अआली नाही.
वसूलपात्र रक्कम रु. 9,05,095/-
आक्षेपाधीन र.रु. 1,66,821/-

DATBVGM6801 (Ref No : 34, Hmm No : 158)

18 कुपवाड हसनी आश्रम ते कुंभारमळापर्यन्तचा द.उ.रस्ता डांबरीकरण करणे या कामातील उणीवाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
No. of Irregularities: 11

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग महानगरपालिका स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ
आक्षेपाधीन रक्कम रु. 48118.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 176419.00/-

ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमेमधून आयकराची रक्कम रु. 44160/- कमी वसूल करण्यात आली आहे. सदरची रक्कम वसूलपात्र करण्यात यावी. मुद्रांक शुल्कची रक्कम रु. 400/- वसूली करण्यात यावी. ठेकेदाराने सदरच्या कामाचा विमा व कामगारांचा विमा काढलेले नसल्यामुळे 1% विम्याची रक्कम रु. 40128/- वसूल केली नाही. तसेच तांत्रिक मान्यता घेतेवेळी आणि सदरच्या कामावर झालेल्या खर्चाच्या एकूण रक्कमेवर 1% कामाच्या विम्याची रक्कम रु. 43,724/- वाढवून त्यावर 10.05% निविदा दराने वाढ करून एकूण र.रु. 4394/- ठेकेदारास प्रदान केलेली असल्याने सदरची रक्कम रु.48118/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली मधील नियम 134 बी नुसार बचती मधून केलेल्या जादा बाबीसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेताच खर्च करण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-1087/सीआर-136/इमारत दि.4/05/1988 नुसार निविदा स्वीकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% जादा दराने प्राप्त झाल्यास सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील नियम 313 नुसार वाढीव खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नाही. रॉयल्टीची रक्कम रु. 64,731/-इतकी कमी वसूल केलेली आहे. ती वसूलपात्र करण्यात यावी. त्याच प्रमाणे सदरचे काम ठेकेदाराने विहित मुदतीमध्ये पूर्ण केलेले नसल्यामुळे विलंब आकाराची रक्कम रु. 27000/- वसूलपात्र करण्यात यावी.

सांगली,मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने जाहीर प्रकटन क्रमांक 16/43-2013-14 ने मनपा क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधांच्या विकास कामासाठी र.रु. 20.00 कोटीच्या विशेष अनुदानातून 100% शासन अनुदान कामासाठी दिनांक 05.03.2014 महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दैनिक लोकमतमध्ये एकूण 53 कामासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन दिनांक 28.03.2014 पर्यंत मागविण्यात आल्या होत्या. विहित मुदतीत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.सदरच्या निविदा समिती समोर दिनांक 30.04.2014 रोजी उघडण्यात आल्या असता तिन्ही निविदाधारक कागदोपत्री पात्र ठरल्याने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदा दिनांक 02.05.2014 रोजी उघडण्यात आल्या आहेत. त्यातील निविदाधारकाची नावे खालीलप्रमाणे.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	प्राप्त झालेला दर
1.	निविदा क्र.	16/43-2013-14
1.	मे.एस.एफ.चौगुले,सांगली	30.00% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
2.	मे.आर.एन.पाटील	25.00% -------"----
3.	मे. हरुगडे कन्स्ट्रक्शन, सांगली	27.20% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने

वरीलपैकी तिन्ही निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या असून निविदेचे दुसरा लिफाफा दिनांक 02.05.2014 रोजी कमिटीसमोर उघडण्यात आले त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.आर.एन.पाटील, सांगली यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 25.00% जादा दराची प्राप्त झाली आहे. त्या निविदेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

1. निविदा क्रमांक 16/43-2013-14 प्रसिद्दी दिनांक 05.03.2014 रोजी
2. अंदाजपत्रकीय निविदा रक्कम रु. 40,12,800/-
3. अंदाजपत्रकीय रक्कमेस स्थायी समिती ठराव क्रमांक 49 दिनांक 10.01.2014 अन्वये मान्यता.
4. निविदा विहित मुदतीमध्ये एकूण प्राप्त - 3 निविदा प्राप्त.
5. प्राप्त निविदा पैकी तिन्हीहि निविदा पात्र झाल्या आहेत.
6. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. 40,12,800/- च्या 25% जादा दराची प्राप्त झालेली असून ती मे. आर.एन.पाटील, सांगली यांची आहे. सदरच्या जादा दराच्या निविदेतील दर कमी करण्याबाबत ठेकेदाराशी वाटाघाटीनुसार 10.05% जादा दराने करण्याबाबत ठेकेदाराने सहमती दर्शविल्यामुळे र.रु. 44,16,086/- च्या मर्यादेत खर्च करण्यास स्थायी समिती सभा क्रमांक 01 ठराव क्रमांक 27 दिनांक 29.05.2014 अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
7. ठेकेदाराचे नांव:- मे. आर.एन.पाटील, सांगली.
8. सदरच्या कामाच्या करारनामा दिनांक 17.06.2014 रोजी र.रु.3200/-च्या मुद्रांकावर करण्यात आला असून निविदा मान्य रक्कमेवर र.रु.3600/-च्या मुद्रांकावर करणे आवश्यक होते.
9. कामाचे आदेश क्रमांक मनपा/सांगली/बांधवि/1175/14-15 दिनांक 23.05.2014
10. कामाचा कालावधी - 90 दिवस (दिनांक 21.08.2014 पर्यंत) (सदरचे काम विहित कालावधीत पूर्ण झालेले नाही. दि. 15.10.2014 पर्यंत पूर्ण झाले आहे.)
11. सुरक्षा अनामत रक्कम रु. 40200/- दिनांक 18.06.2014 रोजी मनपाकडे जमा केली आहे. उर्वरित 4 अनामत रक्कम चालू देयकामधून वसूल केली जाईल.

12. एकूण कामावर झालेला खर्च र.रु. 44,16,041/- (पहिले चालू देयक र.16,62,419/- प्रमाणक क्र.47 दि.16.12.14 व दुसरे अंतिम देयक रु.19,45,522/- प्रमाणक क्र. 70 दिनांक 21.01.15,आणि तिसरे अंतिम देयक र.रु.808100/- प्र.क्र.83 दिनांक 11.02.15 अन्वये ठेकेदारास प्रदान केलेले आहेत.)

13. मोजमापपुस्तिका क्रमांक 5 पान क्र.21 ते 23 व 31 पान क्र.31ते 34

कुपवाड हसनी आश्रम ते कुंभारमळापर्यन्तचा द.उ.रस्ता डांबरीकरण करणे या कामाच्या नस्तीचे, निविदा नस्तीचे आणि मोजमाप पुस्तिकेचे लेखापरीक्षण केले असता त्यातील आढळून आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 160 दिनांक 30.11.2018 अन्वये खुलासा मागविण्यात आलेला होता परंतु विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) ठेकेदारास सदरचे काम करण्याकरिता दिनांक 23.05.2014 रोजी कामाचे आदेश देण्यात आले होते. याबाबत सदरचे कामाचा कालावधी दिनांक 23.05.14 ते 22.08.14 पर्यंत काम पूर्ण करणेचा कालावधी होता. असे गृहीत धरून सदरचे काम मूळ आदेशानुसार दिनांक 15.10.2014 रोजी पूर्ण केले आहे. तरी विलंबाच्या कालावधी एकूण 54 दिवसांनी कामास उशीर झालेला असून विलंब आकारणी प्रतिदिन 500/- रुपयेप्रमाणे 27,000/- ठेकेदारांच्या देयकतून वसूल करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही, याबाबत खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

2) विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3.11.2003 तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत. सदरचे काम दिनांक दिनांक 23.05.14 ते 22.08.14 या कालावधीपर्यंत मुदत होती. परंतु ठेकेदाराने सदरच्या कालावधीत कामाचा विमा दिनांक 21.11.14 ते 18.02.2015 हया कालावधीचा म्हणजे सदरचे काम पूर्ण झाल्याच्या कालावधीनंतरचा काढलेला असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच कामगारांचा विमा काढलेला नाही. त्यामुळे सदरचा विमा ग्राह्य धरता येत नाही. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रका नुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. मनपाने ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकामधून एकूण रक्कम रु. 40128/- वसूल करण्यात आलेली नाही. तरी सदरची रक्कम वसूल करून विमा संचालनालयाकडे जमा केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर करण्यात आले नाही.

3) त्याचप्रमाणे सदरच्या निविदेतील कामास तांत्रिक मान्यता (क्र. 308 दिनांक 08.11.2013 अन्वये) घेते वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाच्या मूळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. 3973116/- च्या 1% रक्कम रु.39731/-विम्याची रक्कम म्हणून वाढविण्यात येऊन कामाची तांत्रिक मान्यता रु. 40,12,800/-अशी केलेली असून ठेकेदारास सदरच्या वाढीव रक्कमेच्या प्रमाणत कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे ठेकेदाराने सदरच्या कामावर केलेल्या कामाच्या खर्चाची एकूण रक्कम रु. 43,72,465/- च्या 1% विम्याची रक्कम रु. 43,724/- वाढवून र.रु. 44,16,189/- करण्यात आली आहे. त्यावर निविदा मान्य दर 10.05% जादा दराने वाढ देण्यात आलेली असून ठेकेदारास एकूण रक्कम रु. 48,118/- इतकी अतिप्रदान केल्याचे आढळून येत आहे. तरी सदरची रक्कम रु. 48,118/- (43,724+4394) जास्तीची प्रदान केलेली आहे. तरी याबाबत खुलासा सादर करण्यात यावा. त्यामुळे सदरची रक्कम रु. 48,118/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.जाहिरात-2009/प्र.क्र/137/का-34/दिनांक

31.08.2009 अन्वये महामंडळ, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका प्रशासन यांना जाहिरात देताना शासनाचे दर अवलंबावेत असे आदेश आहेत. महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या विकास कामे, योजनेची कामे यांच्या जाहिराती मुंबई महानगरपालिका अधिनियम-1949 कलम 469 व 470 अन्वये किमान 2 स्थानिक वर्तमानपत्रात देणे बंधनकारक आहे. बांधकाम विभागाने 2014-15 मध्ये वर्तमानपत्रात देण्यात आलेल्या जाहिराती किमान 2 वर्तमानपत्रात देण्याएवजी एकाच वर्तमानपत्रात दै. लोकमतमध्ये दिलेली असल्यामुळे सदरच्या निविदेकरिता स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे मनपाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झालेले आहे. याबाबत विभागाने खुलासा करावा.

5) सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली मधील नियम 134 बी नुसार बचती मधून केलेल्या जादा बाबीसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि जादा बाबीवरील खर्चासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेतली नाही.

6) सदरच्या कामाकरिता एकूण शासन अनुदान किती प्राप्त झाले आणि सदरच्या कामावर किती खर्च करण्यात आले याबाबतचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

7) सदर कामाची निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 10.05% जादा दराने स्वीकृत करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-1087/सीआर-136/इमारत दि.4/05/1988 नुसार निविदा स्वीकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% जादा दराने प्राप्त झाल्यास सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील नियम 313 नुसार वाढीव खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि विभागाने सुधारित मान्यता न घेताच निविदा अंतिम केली आहे. याबाबत विभागाने खुलासा सादर करावा अन्यथा कामावर झालेल्या खर्चाची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

8) रस्त्याच्या खोदाईतील निघालेला राडारोडा तसेच कामावर पुरवण्यात आलेल्या गौण खनिजाचे एकूण परिमाण 2331 घ.मी. असून सदरच्या कामात गौण खनिज वसुलीबाबत कोणतीच कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदरच्या खोदाईबाबत मोजमाप पुस्तिकेत नोंद आहे. परंतु बिलातून रॉयल्टी वसुली केल्याचे दिसून येत नाही. अथवा ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याच्या पावत्या सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे प्रती घनमीटर रु.70.67/- प्रमाणे रॉयल्टीची रक्कम रु. 1,64,731/-महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांचे शासन परिपत्रक दि.10/2/2010 अन्वये वसुल करणे आवश्यक असताना विभागाने ठेकेदाराकडून र.रु.1,00,000/- वसूल केलेली असून उर्वरित रक्कम रु. 64,731/- वसूलपात्र करण्यात यावी.

9) सदरच्या कामाकरिता वापरण्यात आलेली मोजमापपुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आली नाही. तरी सदरची मोजमापपुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही.

10)मुद्रांक शुल्कची रक्कम रु. 3200/- वर करारनामा करणे आवश्यक असताना 3200/- वर केलेला असल्याने र.रु. 400/-चे शासनाचे नुकसान झाले आहे तरी सदरची रक्कम वसूल करण्यात यावी.

11) ठेकेदारास शासन अनुदानाची रक्कम प्रदान केली असून सदरच्या रक्कमेमधून ठेकेदाराकडून 2% प्रमाणे आयकराची रक्कम रु. 88,320/- वसूल करणे आवश्यक होती. परंतु मनपाने 44,160/- इतकी रक्कम वसूल केलेली आहे. त्यामुळे उर्वरित व्हॉटची रक्कम रु. 44,160/- वसूल करण्यात यावी., तरी वर नमूद एकूण रक्कम रु. 44,160/- वसूल करण्यात येऊन सदरची रक्कम मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करण्यात आले नाही.

वसूलपात्र रक्कम रु. 176,419/-

आक्षेपाधीन र.रु. 48,118/-

DATBVGM6801 (Ref No : 39, Hmm No : 160)

19 सांगली एस.टी.स्टँन्ड ते सिव्हील हॉस्पिटलचौक ते राममंदिर पर्यन्तचा रस्ता डांबरीकरण करणे या कामातील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 11

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग महानगरपालिका स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 2253897.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2280798.00/-

ठेकेदाराने सदरच्या कामाचा विमा काम स्थगित कालावधीचा आणि कामगारांचा विमा काढलेले नसल्यामुळे 1% विम्याची रक्कम रु. 1,49,514/- वसूल केलेली नाही. तसेच तांत्रिक मान्यता घेतेवेळी आणि सदरच्या कामावर झालेल्या खर्चाच्या एकूण रक्कमेवर 1% कामाच्या विम्याची रक्कम रु. 1,32,468/- वाढवून त्यावर 11.75% निविदा दराने वाढ रु.15565/- करून एकूण र.रु. 1,48,033/- ठेकेदारास प्रदान केलेली असल्याने सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. निविदा मान्य दरापेक्षा रक्कम रु. 12,89,965/- इतकी ठेकेदारास मर्यादेपेक्षा जास्त प्रदान केलेली असल्याने सदरची रक्कम वसूल करण्यात यावी. सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली मधील नियम 134 बी नुसार बचती मधून केलेल्या जादा बाबीसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेताच खर्च करण्यात आलेले आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-1087/सीआर-136/इमारत दि.4/05/1988 नुसार निविदा स्वीकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% जादा दराने प्राप्त झाल्यास सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील नियम 313 नुसार वाढीव खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नाही. तसेच रॉयल्टीची रक्कम रु. 8,41,319/- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांचे शासन परिपत्रक दि.10/2/2010 अन्वये वसुल करण्यात आली नाही.

सांगली,मिरज व कुपवाड शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने जाहीर प्रकटन क्रमांक 16/02-2013-14 ने मनपा क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधांच्या विकास कामासाठी र.रु. 20.00 कोटीच्या विशेष अनुदानातून 100% शासन अनुदान कामासाठी दिनांक 05.03.2014 महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दैनिक लोकमतमध्ये एकूण 53 कामासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन दिनांक 28.03.2014 पर्यंत मागविण्यात आल्या होत्या. विहित मुदतीत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.सदरच्या निविदा समिती समोर दिनांक 30.04.2014 रोजी उघडण्यात आल्या असता तिन्ही निविदाधारक कागदोपत्री पात्र ठरल्याने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदा दिनांक 02.05.2014 रोजी उघडण्यात आल्या आहेत. त्यातील निविदाधारकाची नावे खालीलप्रमाणे.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	प्राप्त झालेला दर
1.	निविदा क्र.	16/02-2013-14
1.	मे.शिवपार्वती कन्स्ट्रक्शन,	19.90% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
2.	मे.ज्योती कन्स्ट्रक्शन, सांगली.	22.00% -------"----
3.	मे. बी..बी.गुंजाटे	27.55% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने

वरीलपैकी तिन्ही निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या असून निविदेचा दुसरा लिफाफा दिनांक 02.05.2014 रोजी कमिटीसमोर उघडण्यात आले. त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. शिवपार्वती कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 19.90% जादा दराची प्राप्त झाली आहे. त्या निविदेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

1. निविदा क्रमांक 16/02-2013-14 प्रसिद्दी दिनांक 05.03.2014 रोजी
2. अंदाजपत्रकीय निविदा रक्कम रु. 1,22,25,000/-
3. अंदाजपत्रकीय रक्कमेस स्थायी समिती ठराव क्रमांक 49 दिनांक 10.01.2014 अन्वये मान्यता.
4. निविदा विहित मुदतीमध्ये एकूण प्राप्त - 3 निविदा प्राप्त.
5. प्राप्त निविदा पैकी तिन्हीहि निविदा पात्र झाल्या आहेत.
6. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रु. 1,22,25,000/- च्या 19.90% जादा दराची प्राप्त झालेली असून ती मे. शिवपार्वती कन्स्ट्रक्शन यांची आहे. सदरच्या जादा दराच्या निविदेतील दर कमी करण्याबाबत ठेकेदाराशी वाटाघाटीनुसार 11.75% जादा दराने करण्याबाबत ठेकेदाराने सहमती दर्शविल्यामुळे र.रु. 1,36,61,438/- च्या मर्यादेत खर्च करण्यास स्थायी समिती सभा क्रमांक 01 ठराव क्रमांक 27 दिनांक 29.05.2014 अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
7. ठेकेदाराचे नांव:- मे. शिवपार्वती कन्स्ट्रक्शन सांगली
8. सदरच्या कामाच्या करारनामा दिनांक 13.06.2014 रोजी र.रु.11400/-च्या मुद्रांकावर करण्यात आला आहे.
9. कामाचे आदेश क्रमांक मनपा/सांगली/बांधवि/1116/14-15 दिनांक 23.05.2014
10. कामाचा कालावधी - 100 दिवस (दिनांक 02.09.2014 पर्यंत) (डांबरीकरणाचे काम असल्यामुळे पावसाळ्यात दिनांक 05.07.2014 पासून पुढील आदेशापर्यंत स्थगित ठेवण्यात आले होते. दिनांक 13.10.2014 पासून सदरचे काम पुन्हा सुरु करण्याबाबत शहर अभियंता यांनी आदेशित केलेले आहे. त्यामुळे कामाचा कालावधी दिनांक 9.12.2014 पर्यंत पूर्ण होणे आवश्यक आहे.)
11. सुरक्षा अनामत रक्कम रु. 122250/- दिनांक 13.06.2014 रोजी मनपाकडे जमा केली आहे. उर्वरित 4 अनामत रक्कम चालू देयकामधून वसूल केली जाईल.
12. एकूण कामावर झालेला खर्च र.रु. 1,49,51,403/- (पहिले चालू देयक र.28,04,207/- प्रमाणक क्र.7 दि.23.07.14 व दुसरे अंतिम देयक रु.121,47,196/- प्रमाणक क्र. 50 दिनांक 18.12.14 अन्वये)
13. मोजमापपुस्तिका क्रमांक 13 पान क्र.1 ते 8 आणि 08 ते 10

सांगली एस.टी.स्टँन्ड ते सिव्हील हॉस्पिटलचौक ते राममंदिर पर्यन्तचा रस्ता डांबरीकरण करणे या कामाच्या नस्तीचे, निविदा नस्तीचे आणि मोजमाप पुस्तिकेचे लेखापरीक्षण केले असता त्यातील आढळून आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 162 दिनांक 10.12.2018 अन्वये खुलासा मागविण्यात आलेला होता परंतु विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्यामुळे खालील

प्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) ठेकेदारास सदरचे काम करण्याकरिता दिनांक 23.05.2014 रोजी कामाचे आदेश देण्यात आले होते. मनपाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालय यांचे आदेश क्रमांक निरंक दिनांक 05.07.2014 अन्वये सदरचे काम पुढील आदेशापर्यंत स्थगित ठेवण्याबाबत आदेश देण्यात आले असून त्यानंतर सदरचे काम चालू करण्याकरिता दिनांक 13.10.2014 अन्वये आदेशित केले आहे. याबाबत सदरचे कामाचा कालावधी दिनांक 23.05.14 ते 4.07.14 आणि दि.13.10.14 ते 9.12.2014 पर्यंत काम पूर्ण करणेचा कालावधी होता असे गृहीत धरून सदरचे काम मूळ आदेशानुसार दिनांक 27.11.2014 रोजी पूर्ण केले आहे. काम बंद करणे व चालू करण्याबाबतची नियमातील तरतुदीसह खुलासा विभागाकडून प्राप्त झालेले नाही.

2) विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3.11.2003 तसेच निविदेतील अटी व शर्तींनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत. सदरचे काम दिनांक 23.05.2014 ते 05.07.2014 आणि दि.13.10.14 ते 9.12.14 या कालावधीपर्यंत मुदत होती. परंतु ठेकेदाराने सदरच्या कालावधीत कामाचा विमा दिनांक दि.16.07.14 ते 04.09.14 व कामगारांचा विमा 16.07.14 ते 05.09.14 हया काम स्थगित असलेल्या कालावधीचा काढल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रका नुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. मनपाने ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकामधून एकूण रक्कम रु. 1,49,514/- वसूल करण्यात आलेली नाही. तरी सदरची रक्कम वसूल करून विमा संचालनालयाकडे जमा केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर करावे.

3) त्याचप्रमाणे सदरच्या निविदेतील कामास तांत्रिक मान्यता (क्र.266 दिनांक 08.11.2013 अन्वये) घेते वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाच्या मूळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. 1,20,73,982/- च्या 1% रक्कम रु.120,740/- विम्याची रक्कम म्हणून वाढविण्यात येऊन कामाची तांत्रिक मान्यता रु. 1,22,25,000/- अशी केलेली असून ठेकेदारास सदरच्या वाढीव रक्कमेच्या प्रमाणात कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे ठेकेदाराने सदरच्या कामावर केलेल्या कामाच्या खर्चाची एकूण रक्कम रु. 1,32,46,863/- च्या 1% विम्याची रक्कम रु.1,32,468/- वाढवून र.रु. 1,33,79,331/- करण्यात आली आहे. त्यावर निविदा मान्य दर 11.75% जादा दराने वाढ र.रु. 15565/- देण्यात आलेली असून ठेकेदारास एकूण रक्कम रु. 1,48,033/- इतकी रक्कम वाढीव प्रदान केल्याचे आढळून येत आहे. तरी सदरची रक्कम रु.1,48,033/- (132468+15565) आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

5) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.जाहिरात-2009/प्र.क्र/137/का-34/दिनांक 31.08.2009 अन्वये महामंडळ,जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका प्रशासन यांना जाहिरात देताना शासनाचे दर अवलंबावेत असे आदेश आहेत. महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या विकास कामे, योजनेची कामे यांच्या जाहिराती मुंबई महानगरपालिका अधिनियम-1949 कलम 469 व 470 अन्वये किमान 2 स्थानिक वर्तमानपत्रात देणे बंधनकारक आहे. बांधकाम विभागाने 2014-15 मध्ये वर्तमानपत्रात देण्यात आलेल्या जाहिराती किमान 2 वर्तमानपत्रात देण्याएवजी एकाच वर्तमानपत्रात दै. लोकमतमध्ये दिलेली असल्यामुळे सदरच्या निविदेकरिता स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे मनपाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झालेले आहे. याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

6) प्रस्तुत कामामध्ये कामाचे अंदाजपत्रकात बाब निहाय नमूद केलेले परिमाण व प्रत्यक्षात कार्यान्वयित

केलेले बाब निहाय परिमाण यामध्ये खालील प्रमाणे तफावत आहे.

बाब क्र.	बाब	अंदाजपत्रकानुसार परिमाण	कार्यन्वित केलेले परिमाण	तफावत	दर.	एकूण रक्कम
1	Excavation for roadway in earth soil	1369.60	2737.63	1368.03	184.30	252128
2	Supplying & spreading 60 mm trap stone oversize.	708.75	1033.94	325.19	738.00	239990
4	Supplying & spreading 40 mm metal..	280	515.50	235.50	738.60	173940
6	Compacting the size metal with power roller	13250	15312	2062	14.70	303114
7	P& I BBM surface 75 mm thick	5260	7054.57	1794.57	266.70	478612
8	P& I BM with 60/40 tonnes per hour hot mixplant	475	563.26	88.26	7456.15	658080
	एकूण					2105864

वरीलप्रमाणे अंदाजपत्रकातील परिमाणापेक्षा कामावर कार्यान्वयित केलेले परिमाण यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. कामाचे जागेवरील स्थळपाहणी अहवालानुसार अंदाजपत्रक तयार केलेले असताना प्रत्यक्षात कामावर जादा परिमाण वापरण्याची कारणमीमांसा तसेच कामाच्या ठिकाणी ठेवलेले work order book आणि cross Section Level sheet लेखापरीक्षणास अभिलेख्यात उपलब्ध झाले नाही. तरी सदरचे अभिलेखे उपलब्ध करून देण्यात यावे अन्यथा वर नमूद केलेल्या बाबीवर जास्तीच्या केलेल्या खर्चाची रक्कम रु. 2105864/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

7) सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली मधील नियम 134 बी नुसार बचती मधून केलेल्या जादा बाबीसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि जादा बाबीवरील खर्चासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेतली नाही.

8) सदरच्या कामाकरिता एकूण शासन अनुदान किती प्राप्त झाले आणि सदरच्या कामावर किती खर्च करण्यात आले याबाबतचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

9) सदर कामाची निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 11.75% जादा दराने स्वीकृत करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-1087/सीआर-136/इमारत दि.4/05/1988 नुसार निविदा स्वीकृत करताना त्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या 5% जादा दराने प्राप्त झाल्यास सार्वजनिक बांधकाम नियमावली मधील नियम 313 नुसार वाढीव खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता

घेणे आवश्यक आहे. तथापि विभागाने सुधारित मान्यता न घेताच निविदा अंतिम केली आहे. याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

10) संपूर्ण कामावर एकूण रक्कम रु.1,49,51,403/- इतका खर्च केला आहे. कामाची मूळ पु.ग.प. रक्कम रु. 1,22,25,000/- च्या अनुषंगाने 11.75 टक्के जादा दराने निविदा मान्य रक्कम रु. 1,36,61,438/- च्या मर्यादेत कामावर खर्च करणे अपेक्षित होते. त्या मर्यादेत ठेकेदारास खर्चाची रक्कम प्रदान करणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात रु. 1,49,51,403/- इतकी रक्कम अदा केली असून रु. 12,89,965/- चे मर्यादेपेक्षा जादा प्रदान केले आहे. मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्यामुळे कोणत्याबाबीवर खर्च जादा केलेला आहे याबाबत खात्री करता आली नाही. तसेच देयकाचे अवलोकन करता कोणतीही जादा बाब अथवा जादा परिमाणकरिता सक्षम प्राधिका-याची मंजुरी घेतलेली नाही. त्यामुळे सदरच्या जादा खर्चाची रक्कम रु. 12,89,965/- ठेकेदाराकडून वसूलपात्र करून मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करण्यात यावे.

11) रस्त्याच्या खोदाईतील निघालेला राडारोडा तसेच कामावर पुरवण्यात आलेल्या गौण खनिजाचे एकूण परिमाण 11,904.90 घ.मी. असून सदरच्या कामात गौण खनिज वसुलीबाबत कोणतीच कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदरच्या खोदाईबाबत मोजमाप पुस्तिकेत नोंद आहे. परंतु बिलातून रॉयल्टी वसुली केल्याचे दिसून येत नाही. अथवा ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याच्या पावत्या सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे प्रती घनमीटर रु.70.67/- प्रमाणे रॉयल्टीची रक्कम रु. 8,41,319/- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांचे शासन परिपत्रक दि.10/2/2010 अन्वये वसुल करणेबाबत कार्यवाही करण्यात येवून मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

वसूलपात्र रक्कम रु. 22,80,798/-

आक्षेपाधीन र.रु. 2253897/-

DATBVGM6801 (Ref No : 40, Hmm No : 162)

20 इंदिरा घरकुल झोपडपट्टी स.न.138/ब येथे 155 + 651= 806 घरकुले बांधणे या कामातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 10

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 160657000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 257165529.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 6493511.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 130200.00/-

बांधकाम विभागाने या योजनेमधील मंजुर घरकुलाची योजना 3798 घरकुलाऐवजी 1395 घरकुलापर्यंत सिमित केल्याने शासनास रक्कम रु.77372000/ तसेच प्राप्त अनुदानावरील व्याजाची रक्कम

रु.83285610/- अशी एकुण रक्कम रु.160657000/- शासनास परत देणे आवश्यक असता ती परत दिलेली नाही. या कामाच्या प्राकलनामध्ये 1 टक्के विम्याच्या रक्कमेचा समावेश करण्यात आला आहे. परंतु देयकामधुन विम्याची रक्कम रु. 2146505/- कपात करुन शासकीय विमा निधीकडे भरणा केलेली नाही. म्हाडाचे जा.क्र.मु.अ. / उमुअ- जेएनयु आरएम / 778 / 10 / दि.10/11/10 अन्वये केंद्र शासनाने प्रती घरकुल किंमत रु.100000/- निश्चित केली आहे. याकरीता केंद्रशासनाचे अनुदान 80 टक्के म्हणजे रु.80000/- असुन राज्य शासनाचे आरक्षित गटासाठी 10 टक्के व सर्वसाधारण गटासाठी 8 टक्के अनुदान देय आहे. 806 घरकुलांची महानगरपालिका हिश्श्याची एकुण रक्कम रु.134003801/- महानगरपालिकेने स्वनिधी म्हणुन अंदाजपत्रकामध्ये तरतुद करुन खर्च करणे आवश्यक असता रु.8.80 कोटी खर्च करण्यात आला असल्याने रक्कम रु. 4,60,03,801/- इतका कमी खर्च स्वनिधीमधुन केला आहे. इंदिरानगर घरकुल योजनेची किंमत रु.309880216/- इतकी असुन 2014-15 या आर्थिक वर्षाअखेर एकुण रक्कम रु.25,71,65,529/- खर्च करण्यात आला आहे. या कामावर 2014-15 अखेर 82.99 टक्के इतका खर्च झालेला आहे. ठेकेदारास काम पुर्ण करण्याची मुदत दि.मार्च 2015 अखेर दिली असुन कामावर झालेला खर्च पाहता काम संथगतीने चालु असलेचे व काम दिलेल्या मुदतीत पुर्ण होणार नसल्याचे स्पष्ट आहे. ठेकेदाराकडून आयकराची रक्कम रु. 701236/- वसूल केली नाही. Retention ची रक्कम रु. 32,75,019/- वसूलपात्र आहे, स्थानिक संस्था कराराची रक्कम रु. 370751/- वसूलपात्र करावी.मुद्रांकाची र.रु. 130200/- कमी वसूल केलेली आहे

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत टप्पा क्र. 2 मध्ये 3798 घरकुल बांधणे कामी दि.26 फेब्रु.2009 रोजी केंद्रिय मान्यता समितीने रु.93.88 कोटी रक्कमेच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. या प्रकल्पामध्ये मनपा मालकीच्या 5 व शासन मालकीच्या दोन अशा 7 झोपडपट्टीच्या जागेवरील 3798 झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पाच्या निविदा नस्तीची माहिती खालीलप्रमाणे थोडक्यात नमूद करण्यात येत आहे.

अ क्र.	घरकुलाचा तपशील	एकूण बांधावयाची घरे (संख्या)
1.	कामाचे नांव	इंदिरा घरकुल झोपडपट्टी येथे घरकुल बांधणे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत टप्पा क्र.2 मध्ये घरकुल बांधणे
2.	योजनेवरील खर्च	र.रु.93.88 कोटी रक्कमेच्या प्रस्ताव केंद्रीय मान्यता समितीचे पत्र दिनांक 26.02.2009 अन्वये मान्यता दिलेली आहे.
3.	एकूण घरकुलांची संख्या	मनपा मालकीच्या 5 आणि शासन मालकीच्या 2 असे एकूण 7 झोपडपट्टीच्या जागेवर 3798 घरकुल बांधणे. 3798 घरकुलापैकी 2105 झोपडपट्टीधारकांचे आहे त्याच जागेवर, आणि 1693 झोपडपट्टी धारकांना त्यांचे लगतच्या प्रस्तावित जागेवर स्थलांतरीत करणे.
4.	निविदेचे कामाचे आदेशाबाबत	एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टीविकास कार्यक्रमासाठी महराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकासप्राधिकरनाचे पत्र जा.क्र. मु.अ.र./ उपमुअ.2/जेएनयुआरएम सेल/ /09 दि.2/3/2009 चे पत्रान्वये आयुक्त यांना अंदाजपत्रकीय दरानुसार थेट पध्दतीने काम देण्याचे अधिकार

		देण्यात आले आहेत.
5.	स्थायी समितीची मान्यता	स्थायी समिती सभा क्र.22 ठराव क्र. 458 दिनांक 13.12.2011 अन्वये प्रति घरकुल र.रु. 202500/- आणि मुलभूत सोयीसुविधा दर 85000/- या दराने करण्यास मान्यता देण्यात येऊन निविदा मंजुरी समज बांधकाम विभागाने ठेकेदारास दिनांक 22.12.2011 रोजी देण्यात आली.
6	ठेकेदाराचे नांव	ए.ई.इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीस थेट पध्दतीने देण्यात आले
7	कामाची मुदत	एक वर्षाची मुदत आहे.
8	कामाचे आदेश क्र.	दिनांक 29.12.2011 अन्वये देण्यात आले.
9	बांधण्यात येणारी घरकुलांची अडचण	झोपडपट्टीधारकांचे वास्तव्य असलेल्या जागेतच बैठ्या घराची मागणी करून झोपड्या काढण्यास विरोध करून कोर्टात दावा दाखल केल्याने बांधकाम चालू करण्याकरिता एक वर्षाचा कालावधी उलटून गेला.
10.	मनपाच्या जागेवरील बांधकामाबाबत	झोपडपट्टी लगतच्या पाण्याच्या टाकीलगत जागा उपलब्ध झाल्याने बांधकाम परवाना क्र.98 दि.14.02.2012 अन्वये ठेकेदारास बांधकामाचे आदेश दिनांक 29.11.2012 रोजी 186 सुरु करण्याबाबत आदेश दिले परंतु प्रत्यक्षात 155 घरकुलाचे काम सुरु झाले.
11	मनपाच्या जागेवरील बांधकामाबाबत	स्थायी समिती महासभा क्रमांक 12, ठराव क्र.459, विषय क्र.ऐन, दि.20/03/2013 ने प्रशासनाने सादर केलेल्या विषयपत्रानुसार मक्तेदारास झोपडपट्टीचे तात्पुरते स्थलांतर झाल्यामुळे मोकळया झालेल्या जागेवर G+3 स्वरुपातील प्रस्तावित 682 घरकुले सन 2012-13 च्या जिल्हा दरसूचीप्रमाणे बांधकाम करणे (एकूण 155+682=837) चे काम प्रस्तावित केले आहे.
12	मोबिलायाझेशन ॲडव्हान्स	र.रु.178825,000च्या 5% 89,41,250/- दि.4.2.2012 रोजी प्रदान व दि. 15.07.2013 रोजी र.रु.2,20,46,771/- असा एकूण 3,09,88,021/- मोबिलायाझेशन ॲडव्हान्स देण्यात आलेला आहे.
13	सेक्युअर्ड ॲडव्हान्स	प्रमाणक क्र.09 दि.6.8.2013 रोजी र.रु. 40,73,804/- प्रदान केला

या कामामधील अनियमिततेबाबतचा आक्षेप परिच्छेद क्र.46, 2012-13 आणि 2013-14 मध्ये आक्षेप परिच्छेद क्र.67 लेखापरीक्षण अहवालामध्ये घेण्यात आलेले आहे.

या कामाची वर्क ऑर्डर बांधकाम विभागाने ठेकेदारास दि.29/12/2011 रोजी दिली असुन कामाची मुदत 12 महिने देण्यात आली आहे.

इंदिरा घरकुल मिरज स.न.138/ ब येथे 155 + 651= 806 घरकुलांचे पायाभुत सुविधासह बांधकाम करणे या कामाची 2011-12 ते 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये 12 धावत्या देयकापर्यंत रक्कम रु. 9,81,76,927/- इतका खर्च झालेला असून वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये 26 व्या धावत्या देयकापर्यंत 15,89,88,602/- इतका झालेला असून आतापर्यंत एकूण झालेला खर्च र.रु. 25,71,65,529/- चे प्रदान करण्यात आले आहे. उदाहरणा दाखल वर्ष 2014-15 मधील देयकांचा तपशिल खालील प्रमाणे देणेत येत आहे.

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	Retention Amt
1	29.04.2014	6283303	188499

2	08.05.2014	6457839	193735
3	29.05.2014	12059871	361796
4	19.06.2014	3189693	95691
5	14.07.14	9793157	293795
6	15.07.14	11920532	357616
7	14.08.14	6745446	0
8.	22.08.14	3680414	110412
9	25.08.14	15288791	458664
10	08.09.14	4010625	0
11	23.09.14	2207917	66238
12	23.09.14	5497890	164937
13	16.10.14	5741428	172243
14	16.10.14	9075882	272276
15	21.10.14	5888663	176660
16	21.10.14	3284971	98550
17	10.11.14	2167707	65031
18	08.12.14	5121334	146610
19	18.12.14	2189981	65700
20	03.01.15	1717527	51526
21	03.01.15	7774601	233238
22	03.02.15	2208249	66247
23	03.02.15	3796725	113902
24	03.02.15	4653709	139611
25	03.02.15	13891050	416731
26	03.03.15	4341297	130239
	2014-15 चा खर्च	158988602	4439947
	एकूण खर्च	257165529/-	7714965
	तफावतीची र.रु.	वसूलपात्र	3275019

या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तक, प्रमाणके यांची तपासणी करुन या कामामधील अनियमिततेबाबत अर्धसमास 172 दिनांक 31.12.2018 अन्वये विभागाकडून खुलासा मागविण्यात आलेला होता विभागाचे पत्र क्रमांक मनपा/शनादानिक/382/18-19 दिनांक 03.02.2019 अन्वये विभागाने अनुपालन सादर केलेले असून सादर केलेले अनुपालन संयुक्तिक नसल्याने खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) मे.ए.ई.इन्फ्रा प्रोजेक्ट यांचेशी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत इंदिरानगर मिरज स.न. 138/ब येथे 622 घरकुलांचे बांधकाम करणे या जुन्या कामाचे करारपत्र महानगरपालिकेने दि. 29/12/2011 रोजी केले असुन त्यामध्ये या कामाची एस्टिमेट रक्कम रु.178825000/ (एकूण घरकुले 622, प्रती घरकुल रु. 202500/- व पायाभुत सुविधेसाठी रु.85000/-) इतकी असल्याचे नमुद

आहे व या रक्कमेवर मुद्रांक शुल्कापोटी रक्कम रु.180000/- ई स्टँपने Certificate No. IN-MH05944272568982 ने ठेकेदाराने शासनाकडे भरणा केले आहेत. परंतु झोपडपट्टीधारकांनी जागा ताब्यात देण्यास नकार दिल्याने तसेच याबाबत ते न्यायालयामध्ये गेल्याने जागा महानगरपालिकेच्या ताब्यात येण्यास विलंब लागल्याने ठेकेदाराने जुन्या दराने काम करण्यास नकार दिला आहे व सन 2012-13 च्या जिल्हा दरसूचीनुसार काम करणेस तयार असल्याचे पत्र महानगरपालिकेस दि.17/01/2013 रोजी दिले आहे. बांधकाम विभागाने सन 2012-13 चे दरसूचीनुसार 651 घरकुलांचे कामाची किंमत रु.183263010/- व 806 मुलभुत सोयी सुविधाचे कामाची किंमत रु.95229706/- व पुर्वी सुरू असलेल्या 155 घरकुलांचे कामाची किंमत रु.31387500/- होत असुन या सर्व कामांची एकुण किंमत रु.309880216/- चे एस्टिमेट बांधकाम विभागाने तयार केले आहे. त्यामुळे ठेकेदाराने (2012-13 नुसारची घरकुल किंमत रक्कम रु.309880216 - या पुर्वीची घरकुल किंमत रु.178825000 = रु.131055216/-) या रक्कमेवर, महसूल व वनविभाग अधिसुचना दि.23/4/2006 अन्वये मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34, तसेच नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचेकडील जा.क्र.12 /कलम/ मुं.मुं.शु./113/09 दि.20/7/2009 नुसार कार्यकंत्राटासंबधीत करारनामा रु.10 लाख पर्यंत रु.100 व पुढील प्रत्येक लाखास रु.100 व जास्तीत जास्त 5 लाख पर्यंत मुद्रांकावर मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक असताना ठेकेदाराने मुद्रांक शुल्काचा रक्कम रु.1,30,200/- कमी भरणा केला आहे. सदरची कमी मुद्रांक शुल्क भरल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. तरी सदरची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करून, वसूल केलेली रक्कम मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्याकडे भरणा करून भरलेल्या चलनाच्या प्रति सादर करण्यात येत आहेत असे अनुपालन सादर केलेले आहे परंतु रक्कम भरलेल्या चलनाच्या प्रति सादर केलेल्या नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

2) नगरअभियंता यांनी पत्र क्र.मनपा/सा/नादानिक/1/338/14-15 शहरी नागरी दारिद्र्य निर्मुलन कक्ष दि.18.02.2015 चे पत्राने इंदिरा घरकुल मिरज येथील 806 घरकुले बांधनेचे काम सुरु असून सदर घरकुल बांधकामाची मुदत मार्च 2015 अखेर असलेने या कालावधीत सर्व घरकुलाची कामे सर्वाथाने पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतु अद्यापी फेज-1 मधील 155 घरकुलांचे संडास बाथरूमचे तपासणी चेंबर, सेप्टिक टँकचे कनेक्शन त्याच प्रमाणे सर्व घरकुलाना पाणी पुरवठ्याची सोय, आतील सर्व दरवाजे , आतील सर्व रंग काम त्याच प्रमाणे ओपन टूस्काय जागेतील पेव्हिंग तसेच रस्ते व गटारी ई.कामे अद्यापी होणेची आहेत. सदर घरकुलान एम.एस.ई.बी.चे विद्युत कनेक्शनसाठी एम.एस.ई.बी.ऑफिसला संपर्क करून पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

फेज 2 मधील जागेवर 124 क्लस्टर ची एक इमारत, 93 क्लस्टरची एक इमारत आणि 62 क्लस्टरच्या सात इमारती याप्रमाणे जागेवर 651 घरकुलाचे बांधकाम संथगतीने चालु असल्याबाबत ठेकेदारास नोटीस दिनांक 30.01.2015, व दि.18.02.2015 पाठविण्यात आली आहे. परंतु बांधकाम विभागाने काम पुर्ण होण्याची मुदत संपण्याचे 1 महिना अगोदर ठेकेदारास काम संथगतीने सुरु असलेबाबतची समज दिली आहे. तसेच या पत्राने दिलेल्या समजेमध्ये या कामाची मुदत मार्च 2015 अखेर असल्याने कामाची मुदत वाढवावी अन्यथा वेळेत काम न झाल्यास निविदा अटी शर्तीनुसार दंडात्मक कारवाई करणेत येईल असे नमुद आहे. कामाच्या नस्तीची तपासणी केली असता मार्च 2015 अखेर सदर काम पुर्ण झालेले नसल्याचे दिसुन आले. काम अपुर्ण असलेबाबत ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतच्या निविदा अटी शर्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत. तरी सदरच्या निविदा अटी व शर्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत.

3) उपायुक्त यांनी दि.03/06/2013 रोजीचे पत्रान्वये ठेकेदारास कार्यादेश देण्यात आला आहे.

कार्यादेशा मधील अट क्र.13 नुसार प्रस्तावित काम एक वर्षाचे आत पुर्ण करणेचा बार चार्ट ठेकेदाराने सदर पत्र मिळताच 10 दिवसाचे आत सादर करणेचा आहे. या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता नस्तीमध्ये बार चार्ट आढळुन आलेला नाही. काम दि.23/05/2013 ते दि.22/05/2014 या कालावधीमध्ये पुर्ण करणे आवश्यक असता आर्थिक वर्ष 2015 अखेर एकाही घरकुलाचा पुर्णत्वाचा दाखला कार्यकारी अभियंता यांनी दिला नसल्याने काम अपुर्ण असल्याचे स्पष्ट होते. ठेकेदाराकडुन कामाचा बार चार्ट आणि मुदतवाढ घेतलेली कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत.

4) या घरकुलांचे बांधकामांना एकुण रु. 3,09,88,021/- मोबीलायझेशन ॲडव्हान्स दिला आहे. तसेच प्रमाणक क्र.9 दि.06/08/2013 ने रक्कम रु.40,73,804/- सळी खरेदीपोटी सेक्युअर्ड ॲडव्हान्स दिला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. आयकर-1091/प्र.क्र.132/का/अर्थ मंत्रालय मुंबई दि. 13.10.1993 अन्वये 2% आयकर या रक्कमेवर कपात करणे आवश्यक असताना तो कपात केला नसल्याने रु.3,50,61,825/- वर 2 टक्के प्रमाणे रक्कम रु.7,01,236 /- ठेकेदाराच्या देयकामधुन वसुल करणे आवश्यक असताना सदर रक्कम वसुल केलेली नाही. तरी सदरची आयकराची रक्कम रु. 7,01,236/- ठेकेदाराकडून तात्काळ वसूल करून शासनाकडे जमा केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर केलेले नाही.

5) या कामाच्या प्रमाणकांची तपासणी केली असता Retention Amt पोटी खालील रक्कमा देयकामधुन कपात केलेल्या नाहीत. ठेकेदारास आतापर्यंत एकूण रक्कम रु. 25,71,65,529/- प्रदान करण्यात आलेली असून सदरच्या रक्कमेमधून Retention Amt पोटी देयकामधून 3% रक्कम वसूल करणे आवश्यक होती. परंतु ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमेमधून 77,14,966/- इतकी रक्कम वसूल करणे आवश्यक असताना मनपाने ठेकेदाराकडून र.रु. र.रु. 44,39,947/- इतकी रक्कम वसूल केलेली आहे. तरी उर्वरित तफावतीची रक्कम रु. 32,75,019/- इतकी रक्कम वसूल करण्यात येऊन मनपाच्या खाती जमा केलेल्या चलनाच्या प्रतिसह अनुपालन सादर केलेले नाही.

6) सदरच्या घरकुल योजनेवर आतापर्यंत झालेला एकूण खर्च र.रु. 25,71,65,529/- इतका झालेला असून सदरच्या रक्कमेमधून स्थानिक संस्था कराची रक्कमे रु. 642914/- इतकी रक्कम वसूल करणे आपेक्षित असताना प्रदान केलेल्या रक्कमेतून र.रु. 272162/-इतकी वसूल केली आहे. त्यामुळे उर्वरित रक्कम रु. 3,70,751/- ची वसूल करून, उर्वरित स्थानिक संस्था कराची रक्कम वसूल केलेल्या चलनासह अनुपालन सादर केलेले नाही.

7) बांधकाम विभागाने 651 घरकुलाचे प्राकलन 2012-13 या आर्थिक वर्षाच्या जिल्हा दरसूचीनुसार तयार केले असुन या कामाच्या गोषवा-यानुसार (Recompilation Sheet), Floor Rise@3.50%, Work Insurance 1% धरुन प्रती घरकुलाची किंमत रु.281510/- आलेली आहे. त्यामुळे कामाच्या देयकामधुन 1 टक्के प्रमाणे कार्यकंत्राटी विमा कपात करणे आवश्यक असताना तो कपात केलेला नाही. 651 घरकुलांची रु.281510/- प्रति घरकुलाप्रमाणे एकुण किंमत रु.183263010/- व 155 घरकुलांची रु.202500/प्रती घरकुलाप्रमाणे एकुण किंमत रु.31387500/- इतकी झाले आहे. या ठिकाणी एकुण बांधावयाच्या 806 घरकुलांची एकुण किंमत रु. 214650510/- होत असल्याने 1 टक्के प्रमाणे एकुण विमा रक्कम रु.2146505/- कपात करणे आवश्यक आहे. परंतु देयकामधुन विम्याची 1 टक्का रक्कम कपात करण्यात आलेली नाही. कामाचा विमा काम सुरू होण्यापुर्वी उतरणे आवश्यक असुन विमा न उतरल्यास ठेकेदाराच्या देयकामधुन विम्याची रक्कम कपात करुन ती शासकीय विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक असताना रक्कम रु. 2146505/- वसुल केली नाही.

8) म्हाडाचे जा.क्र.मु.अ. / उमुअ- जेएनयु आरएम / 778 / 10 / दि.10/11/10 अन्वये केंद्र शासनाने

प्रती घरकुल किंमत रु.100000/- निश्चित केली आहे. याकरीता केंद्रशासनाचे अनुदान 80 टक्के म्हणजे रु.80000/- असुन राज्य शासनाचे आरक्षित गटासाठी 10 टक्के व सर्वसाधारण गटासाठी 8 टक्के अनुदान देय आहे. महानगरपालिकेने 651 घरकुलांची किंमत 2012-13 च्या जिल्हा दरसूचीनुसार प्रती घरकुल किंमत रु.281510/- ठरविली असुन त्यानुसार ठेकेदारास काम करण्याचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. केंद्रशासन व राज्य शासना कडुन या कामासाठी प्रती घरकुल रु.1 लाख मंजुर केले असल्याने प्रत्येक घरकुलाची उर्वरित रक्कम रु.181510/- प्रती X 651 घरकुले प्रमाणे रु.118116301/- तसेच 155 घरकुलांचे काम रु.202500/- दराने मंजुर केल्याने उर्वरित प्रत्येक घरकुलाची रक्कम रु.102500 X 155 घरकुले प्रमाणे रु.15887500/- असे 806 घरकुलांची महानगरपालिका हिश्श्याची एकुण रक्कम रु.134003801/- महानगरपालिकेने स्वनिधी म्हणुन अंदाजपत्रकामध्ये तरतुद करुन खर्च करणे आवश्यक होते. महानगरपालिकेच्या 2015-16 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता पृष्ठ क्र.61 वर व्दिनोंद क्र.41137 एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम (मनपा हिस्सा) ट्रान्सफर या लेखाशिर्षांतर्गत केलेल्या प्रत्यक्ष खर्चाचे आकडे देण्यात आले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेने या योजनेवर 2011-12 या आर्थिक वर्षात रु.1,02,62,779/- व 2012-13 या आर्थिक वर्षात रु. 21284546/- व 2013-14 व 2014-15 मध्ये 6.00 कोटी अशी एकूण रक्कम रु. 8,80,00,000/- इतकी स्वनिधीमधून खर्च करण्यात आली असल्याचे संबधित रोजकीर्दवरून दिसून येत आहे. तरी मनपाच्या स्वनिधीमधून आतापर्यंत एकूण रक्कम रु. 13,40,03,801/- इतकी खर्च करणे अपेक्षित होती. उर्वरित रक्कम रु. 4,60,03,801/- इतकी रक्कम शासन अनुदानमधून मनपाने घरकुल योजनेवर खर्च केल्याचे दिसून येत आहे. सदरची रक्कम शासनाकडे वर्ग करण्याबाबत यापूर्वीच्या 2013-14 च्या लेखापरीक्षणामध्ये सूचित केलेले होते. परंतु अद्यापही सदरची जादाची रक्कम शासनाकडे वर्ग केलेली नसल्याचे दिसून येत आहे.याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात येण्याबाबत सूचित केले होते परंतु विभागाने अनुपालन सादर केले नाही. सदरच्या घरकुल योजनेवर दिनांक 31.03.2015 पर्यंत र.रु. 25,71,65,529/- इतका खर्च झालेला आहे. परंतु याच्या नोंदी 2015-16 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये प्रत्यक्ष खर्चाच्या नक्की आकडयाच्या बाजूस चुकीच्या घेण्यात आल्या असल्याने अंदाजपत्रक तयार करताना खर्च करण्यात आलेल्या रक्कमांचे आकडे बरोबर घेण्यात आले आहेत किंवा नाही याची काळजीपुर्वक तपासणी लेखा शाखेकडून करण्यात येत नसल्याचे दिसून येत आहे.

9) या योजनेच्या रोजकीर्दीची तसेच मुख्यलेखाधिकारी यांनी क्र.मनपा/लेखावि/470/2013-14, दि.12/03/2014 रोजी शहर अभियंता यांना अनुदानावरील व्याज रक्कमेबाबत पाठविलेल्या पत्राची तपासणी केली असता, सन 2008 पासून दि.31/03/2015 अखेर या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडुन प्राप्त अनुदानाची रक्कम लेखा विभागाने वेळोवेळी मुदतबंद ठेवीमध्ये गुंतविली असुन त्यापोटी एकुण रक्कम रु.8,32,85,610/- इतके व्याज मिळालेचे निदर्शनास आले आहे. म्हाडाचे पत्र जा.क्र.एमएच/मुअ-1/उमुअ/परीपत्रके/न.क्र.148/1165/13 दि.18/06/2013 नुसार जेएनयुआरएम अंतर्गत केंद्र व राज्य शासनाने वितरीत केलेल्या अखर्चित निधीवरील व्याजाचा परतावा करणेबाबत परिपत्रक काढले आहे. त्यामध्ये 1) केंद्र शासनाच्या संदर्भादिन पत्र क्र.1) श्री.राजेशकुमार अवरसचिव नर्म-1 नगरविकास विभाग नवी दिल्ली यांचे पत्र दि. 07 मार्च 2013 पत्र अन्वये केंद्राने वितरीत केलेल्या परंतु अखर्चित राहिलेल्या निधीवर राज्य व्याज मिळवित असल्याची बाब कॅग ने निदर्शनास आणलेली आहे. केंद्र शासनाने तपासणी अंती जमा झालेल्या व्याजाचा भरणा विविध लेखाशिर्षाखाली जमा करण्याचे आदेश दिले आहेत. ही जमा झालेली रक्कम मनपाच्या बँक खात्यात जमा झाली आहे. त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यासाठी या कार्यालयाने वित्त नियंत्रक/प्रा.यांना पत्र क्र.एमएच/मुअ-1 /उमुअ/जे/प्रा/न.क्र.30 /509/13 दि.06/03/2013 ने

कळविले आहे. तथापि ही बाब संबंधित मनपाच्या निदर्शनास आणुन केंद्र व राज्य शासनाच्या वितरीत निधीवरील जमलेल्या व्याजाचा परतावा केंद्राच्या त्या त्या लेखाशिर्षाखाली जमा करण्याबाबत सुचना करण्याचे प्रस्तावित केले आहे. सदर निर्णयानुसार महानगरपालिकेस प्राप्त झालेली व्याजाची रक्कम रु. 8,32,85,610/- शासनाकडे तात्काळ भरणा करणे आवश्यक असतानाही मार्च 2018 अखेर भरणा केलेली नाही. सदरची रक्कम भरणा करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे असे अनुपालन सादर केलेले आहे. परंतु सदरची रक्कम शासनाकडे वर्ग केलेली नाही.

10) म्हाडाने सांगली महानगरपालिकेस जा.क्र.एमएच/मुअ-2/ उमुअ/काअ-1/जे/प्रा/न.क्र.8अ- III/ 1148/15 दि.04/11/2015 रोजी केंद्र व राज्य शासनाचा अतिरिक्त निधी सव्याज परत करणे बाबत स्मरणपत्र पाठविले आहे. सदर पत्रामध्ये सांगली टप्पा क्र. 2 अंतर्गत सांगली महानगरपालिकेस 3798 घरकुले बांधणेसाठी केंद्र शासनाकडून रक्कम रु. 2491.60 लक्ष व राज्य शासनाकडून रक्कम रु.423.64 लक्ष अनुदान वितरीत केले असुन महानगरपालिकेने अंतिम कार्यक्रमाप्रमाणे एकुण 1395 घरकुला पर्यंतच योजना सिमीत केली आहे. त्याप्रमाणे या योजनेची प्रकल्प किंमत अंतिम कार्यक्रमाप्रमाणे केंद्र शासन रु.1830.32 लक्ष व राज्य शासन रु. 311.20 लक्ष झाली असल्याचे पत्रामध्ये नमुद आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेने केंद्र शासनाची रक्कम रु.661.28 लक्ष व राज्य शासनाची रक्कम रु.112.44 लक्ष तात्काळ सव्याज परत करणेबाबत कळविले आहे. सन 2014-15 अखेर सदरच्या रक्कमेवर व्याजाची रक्कम मनपाच्या खात्यामध्ये र.रु. 8,32,85,610/- इतकी जमा झाल्याचे रोजकीर्दवरून दिसून येत आहे. सदर अतिरिक्त निधी म्हाडास वित्त नियंत्रक/ प्रा. बँक ऑफ महाराष्ट्र, कलानगर वांद्रे पूर्व शाखा,मुंबई -51 खाते क्र. 60045295530 या खात्यावर भरणा करणे बाबत कळविले आहे. परंतु महानगरपालिकेने मार्च 2015 अखेर एकुण रक्कम रु.16,06.57,000/- आणि त्यापुढील रक्कमेवरील व्याजासह म्हाडाचे खाती भरणा करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असल्याबाबत अनुपालन सादर केलेले आहे.

वसुलपात्र रक्कम:- मुद्रांक शुल्क रु.130200/- + रिटेंशन अमाऊंट रक्कम रु.32,75,019/- + देयकामधुन कपात न केलेली विमा रक्कम रु.2146505/- + प्राप्त अनुदानावरील व्याजाची रक्कम रु. 8,32,85,610/- + योजना 3798 घरकुलाऐवजी 1395 घरकुलापर्यंत सिमित केल्याने शासनास परत करावयाची रक्कम रु.16,06,57,000/- + मोबीलायझेशन ॲडव्हान्सवरील वजा न केलेल्या आयकराची रक्कम रु. 7,01,236/- + स्थानिक संस्था कराची कमी वसूल केलेली रक्कम रु. 3,70,751/- = रु.8,99,09,321/- ची रक्कम वसूलपात्र करणे आणी शासनास वर्ग करावयाची रक्कम रु. 16,06,57,000/-

DATBVGM6801 (Ref No : 101, Hmm No : 172)

21 बांधकाम परवानगी देतेवेळी वसुल केलेली व कामगार कल्याण मंडळाकडे जमा केलेली उपकर रक्कम याबाबत झालेली अनियमितता.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 08

लेखा शीर्ष : नगर रचना 01 निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 10761217.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 10761217.00/-

शासन निर्णय क्र.बी.सी.ए/009/प्र.क्र. 108/काम-7अ, दि.17/06/2010 अन्वये बांधकामाच्या अंदाजित मुल्याच्या 1% रक्कम रुपये 10761217/- कामगार कल्याण मंडळाकडे उपकरा पोटी भरणा करण्यात आलेली नाही. उपकराची रक्कम धनाकर्ष (डीडी) व्दारे न घेता रोखीने वसुल केलेली आहे. विवरणपत्रे व वार्षिक अहवाल परिशिष्ठ 4 प्रमाणे कामगार कल्याण मंडळास सादर केलेला नाही. उपकराची परतावा 1% रक्कम रुपये 231633/- परस्पर कपात करण्यात आलेली आहे. उपकर रोख नोंदवहीची पडताळणी करण्यात आलेली नाही. बँकेने खातेमधुन कॅश क्रेडिट चार्जेस रुपये 9469/- कपात केलेले आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाकडुन सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील बांधकामांना परवानगी देताना शासन निर्णय क्र.बी.सी.ए/009/प्र.क्र. 108/काम-7अ, दि.17/06/2010 अन्वये बांधकामाच्या अंदाजित मुल्याच्या 1% रक्कम कामगार कल्याण मंडळाकडे उपकरा पोटी रक्कम रोखीने किंवा धनादेशाव्दारे वसुल करुन लेखा शाखा/बॅक खातेवर जमा करण्यात आल्याचे उपकर रोखवहीवरुन दिसुन येते.

नगर रचना व लेखा विभागाकडुन उपकर रक्कम जमा करतेवेळी व शासनास भरणा करताना झालेले अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.175 दिनांक 03/01/2019 अन्वये विचारणा केली असता विभागाने लेखापरिक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्याने खालील प्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1.सन 2014-15 मध्ये नगररचनेच्या सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडुन खालील प्रमाणे उपकर रककम रुपये 2,31,63,344/- वसुल करण्यात आलेला असुन सदरची रक्कम युनियन बँक ऑफ इंडिया सांगली येथील शाखेत खाते क्र.424202010507460 मध्ये जमा करण्यात आलेली आहे.

अ.क्र.	विभाग	रक्कम रुपये	कमागार कल्याण मंडळाकडे जमा रक्कम	दिनांक	कपात 1% परतावा	प्रलंबित रक्कम
1	2	3	4	5	6	7
1	सांगली	10409572	1716851	09-08-2016	0	8692721
2	मिरज	10146202	10240527	19-12-2018	103440	+197765
3	कुपवाड	2607570	337896	19-12-2018	3413	2266261
	एकुण	23163344	12295274		106853	10761217

शासन निर्ण्य क्र.बी.सी.ए/009/प्र.क्र.108/काम-7अ, दि.17/06/2010 मधील सोबतच्या मार्गदर्शक तत्वे मधील क्र.5 नुसार बांधकाम मंजुरीसाठी प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जासोंबत कामगार कल्याण मंडळाच्या नांवे उपकरासंबधीचा धनाकर्षव्दारे (डीडी) सादर करणे आवश्यक असताना मनपाकडील नगररचना विभागाने बांधकामधारक व्यक्तीकडुन उपकराची रक्कम रोखीने/मनपाचे नांवे

धनादेशाने जमा करुन घेतली असुन ती कामगार कल्याण मंडळाकडे माहे 03/2015 अखेर जमा केलेली नाही. याबाबत विभागने खुलासा केलेला नाही.

2. शासन निर्णय क्र.बी.सी.ए/009/प्र.क्र.108/काम-7अ, दि.17/06/2010 मधील 3(4) नुसार इमारत व इतर बांधकामास मंजुरी देणारे व त्या संस्थेतील उपकर जमा करणा-या स्थानिक स्वराज्य संस्था यांनी त्यांचे संदर्भातील विवरणपत्रे व वार्षिक अहवाल परिशिष्ठ 4 प्रमाणे कामगार कल्याण मंडळास प्रत्येक पुढील आर्थिक वर्षाच्या 15 मे पुर्वी सादर करणे आवश्यक असताना ते अद्याप सादर केलेले नाही. तरी सदरचे विवरण कामगार कल्याण मंडळास सादर करुन अनुपालन सादर करावे.

3.कागार कल्याण मंडाळास उपकराची रक्कम प्राप्त झाल्यापासुन 30 दिवसांच्या आत उपकर रक्कमेच्या 1% रक्कम महानगरपालिकेस परतावा करणार आहे. परंतु मनपा ने उपकर रक्कम व विवरण पत्र कामगार कल्याण मंडळास पाठविलेले नसल्याने उपकराची परतावा 1% रक्कम रुपये 231633/- ही महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही. याबाबत विभागने खुलासा केलेला नाही.

4.महानगरपालिकेने वरील नमुद रकाना क्र.4 व 5 प्रमाणे उपकराची रक्कम ही रकाना क्र.6 मध्ये नमुद केले प्रमाणे 1% रक्कम रुपये 106853/- ही नियमबाहय परस्पर कपात करुन रक्कम रुपये 12295274/- ही कामगार कल्याण मंडळाकडे विलंबाने पाठविलेली आहे. याबाबत विभागने खुलासा केलेला नाही.

5.सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये बँकेने नमुद खातेमधुन कॅश क्रेडिट चार्जेस रुपये 9469/- कपात करुन घेतली आहे. उपकर खातेमध्ये शासकीय रक्कम भरणा होत असल्याने त्या खातेस कोणातेही चार्जेस लागु होत नसल्याने सदरची रक्कम बँकेशी पत्रव्यवहार करुन परत खातेवर समायेाजित करुन घेवुन शासनाकडे भरणा करण्यात यावी.

6.प्रभाग समिती क्र.4 मिरज कडुन लेखा शाखेकडे रक्कम रुपये 10146202/- जमा केली असुन लेखा शाखेने उपकराची 1% रक्कम रुपये 103440/- ही कपात करुन घेवुन रक्कम रुपये 10240527/- जमा केलेचे दिसुन येते. मिरज प्रभागाकडे जमा व शासनाकडे जमा रक्कम यामध्ये रक्कम रुपये 197765/- इतकी तफावत दिसुन येते. तरी सदर रक्कमेचा ताळमेळ घेवुन अनुपालन सादर करावे.

7 वरील रकाना क्र.7 मध्ये नमुद केलेप्रमाणे प्रलंबित उर्वरित उपकर रक्कम रुपये 10761217/- ही कमागार कल्याण मंडळाकडे जमा केलेली नाही. ती तात्काळ कामागार कल्याण मंडळाकडे वर्ग करुन अनुपालन सादर करावे.

8.लेखा शाखेकडील उपकर रोखवही मधील जमा/खर्च रक्कमाचे मुख्यलेखाधिकारी यांचेकडुन पडताळणी करण्यात आलेली नाही.

DGPGHMM7801 (Ref No : 53, Hmn No : 175)

22 बांधकाम परवानगी देतेवेळी नगर रचना विभागकडुन विकास शुल्क आकारणी करताना झालेली अनियमितता.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : नगर रचना 01 निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 621185.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 394169.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 227016.00/-

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 यामध्ये सुधारणा करणेसाठी सन 2010 महाराष्ट्र अधिनियम क्र.34 अन्वये उक्त अधिनियमाचे कलम 124(ख) मध्ये सुधारणा करणेत आलेली असुन महाराष्ट्र अधिनियम क्र.34 अन्वयेच्या सुधारणा दिनांक 27/12/2010 रोजीच्या शासन राजपत्रनुसार बांधकाम विकास शुल्क आकारणी केले नाही. महासभा ठराव क्र.89 दिनांक 09/08/2002 यास दिनांक 31/03/2014 अखेर मुदतवाढ असताना तंदनंतर विकास शुल्क आकारणी बाबत ठराव नसताना सन 2014-15 साठी जुन्या दरानुसार विकास शुल्क आकारणी केलेली आहे. हार्डसिप प्रिमियम हे महासभा ठराव क्र.127 दि.20/10/2010 नुसार करण्यात आलेली असल्याने व महानगरपालिका/नगर रचना विभागाने सुधारीत दर निश्चिती केलेली नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका अंतर्गत नगर रचना विभागाकडुन सन 2014-15 मधील निवडक महिना माहे 03/2015 मध्ये देण्यात आलेल्या बांधकाम परवानगी संचिका तपासणी केली असता महासभा ठराव क्र.89 दिनांक 09/08/2002 नुसार बांधकाम परवानगी देताना नगर विकास विभागाकडुन खालील प्रमाणे खुली जमीन विकास शुल्क व बांधकाम विकास शुल्क आकरणी करण्यात आलेली आहे. सदर ठरावास दिनांक 31/03/2014 अखेर मुदतवाढ देण्यात आलेली असुन तदनंतर मुदतवाढ देण्यात आलेली नाही.

1.जमीन विकास शुल्क : रुपये 20/- प्रति चौ.मी.

2.बांधकाम विकास शुल्क : 1) रहिवासी वापर - रुपये 40/- प्रति चौ.मी.

2) वाणिज्य वापर - रुपये 80/- प्रति चौ.मी.

3) औद्योगिक वापर - रुपये 60/- प्रति चौ.मी.

नगर विकास विभागाकडुन खुली जमीन विकास शुल्क व बांधकाम विकास शुल्क आकारणी करताना खालील प्रमाणे झालेले अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.176 दिनांक 03/01/2019 अन्वये विचारणा केली असता विभागाने लेखापरिक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्याने खालील प्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1.महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 यामध्ये सुधारणा करणेसाठी सन 2010 महाराष्ट्र अधिनियम क्र.34 अन्वये उक्त अधिनियमाचे कलम 124(ख) मध्ये सुधारणा करणेत आलेली असुन महाराष्ट्र अधिनियम क्र.34 अन्वयेच्या सुधारणा दिनांक 27/12/2010 रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यामध्ये खालील नमुद केलेप्रमाणे दर हे दिनांक 01/04/2013 पासुन लागु करण्यात आलेले असताना सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने सदरचे दरानुसार जमीन/बांधकाम विकास शुल्क आकारणी करण्यात आलेले नसल्याने महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झालेले आहे.

1.जमीन विकास शुल्क : मुद्रांक शुल्क सिध्द गणकामध्ये उल्लेख केलेले विकसित जमीनीच्या दराच्या

0.5% प्रति चौ.मी.

2.बांधकाम विकास शुल्क : अ) रहिवासी वापर - मुद्रांक शुल्क सिध्द गणकामध्ये उल्लेख केलेले विकसित जमीनीच्या दराच्या 2% प्रति चौ.मी.

ब) वाणिज्य वापर - मुद्रांक शुल्क सिध्द गणकामध्ये उल्लेख केलेले विकसित जमीनीच्या दराच्या 4% प्रति चौ.मी.

अ. क्र.	बांधकाम परवाना धारकाचे नांव	प्रभाग/सि.स.नं./आर. एस.नं.	सन 2015 रेडीरेकनर नुसार एकुण विकास शुल्क	वसुल विकास शुल्क सन 2013 चे रेडीरेकननुसार	प्रलबिंत विकास शुल्क
1	श्री सदानंद बसवंत हल्लेवार	सांगली/10641+10638	17779	4630	13149
2	श्री सलीम बाबु महात/सौ.मरियम अनिस महात	सांगली/374	64166	16865	47301
3	श्री शलैंद्र /सुजय/सुहास शंकरराव कुभांर	सांगली/488/2	220810	89760	131050
4	श्री शैलेश/धन:शाम बाबुलाल शहा	सांगली/10594	58413	13491	44922
5	मे.जेमिनी ट्रेडिंग कंपनी ,प्रोप्रा श्री राजेश श्रीमंत सांळुखे	सांगली/14009	54260	14508	39752
6	श्री पांडुरंग रामचंद्र जाधव	सांगली/10134	42463	16266	26197
7	श्रीमती सिमा अमित उपाध्ये तर्फे भगाटे बिल्डर्स	सांगली/5697	59385	15466	43919
8	श्री ईस्माईल इब्राहिम पेंढारी	सांगली/6458	1683	1334	349
9	श्री वसंत नारायण कुकडे	सांगली/1235	8859	2782	6077
10	श्री शैलेंद्र रावसाहेब पाटील	सांगली/558/3ब/3	13972	8212	5760
11	श्री पुष्कर अरुण जांभळेकर	सांगली/118/211/2	9849	4732	5117
12	श्री दिनेश राजेंद्र गुप्ता	सांगली/545/1ब	8393	1938	6455
13	श्री पायगोंडा बापु पाटील	कुपवाड/1876	2208	1561	647
14	श्री तात्यासाहेब रामचंद्र खोत	कुपवाड/304/4/ब	3957	3691	266
15	श्री तेजास्विनी अष्टविनायक काटकर	कुपवाड/360/1+2+3	2702	2197	505
16	श्री शंकर बापु वाघमोडे	कुपवाड/295/1/अ/1	8273	7521	752
17	सौ.आशा प्रभाकर जाधव	मिरज/1897	22589	7776	14813
18	श्री इसाक हसन व	मिरज/7899	4015	1959	2056

	साहेबलाल मच्छिवाले				
19	श्री बाबासाहेब दत्तु पाटील	मिरज/936/2	9560	8498	1062
20	श्री जावेद इमानसो सौदागर	मिरज/3720	4897	2389	2508
21	श्री दस्तगीर बाबु मुत्तवली	मिरज/8178	2952	1440	1512
	एकुण		621185	227016	394169

2.तरी वर नमुद केलेप्रमाणे संबधित बांधकाम परवाना धारकाकडुन बांधकाम/जमीन विकास शुल्क प्रलंबित रक्कम वसुल करुन मनपा फंडात जमा करण्यात यावी. तसेच सन 2014-15 मध्ये देण्यात आलेल्या बांधकाम परवाना जमीन/बांधकाम विकास शुल्क बाबत परिगणना करण्यात येवुन बांधकाम परवाना धारकाकडुन विकास शुल्क वसुल करुन मनपा फंडात जमा करुन अनुपालन सादर करावे.
3.महानगरपालिका महासभा ठराव क्र.127 दि.20/10/2010 नुसार हार्डसिप प्रिमियमसाठी दर निश्चिती करण्यात आलेली असुन त्यास दिनांक 31/03/2014 अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सन 2014-15 मध्ये हार्डसिप प्रिमियम हे महासभा ठराव क्र.127 दि.20/10/2010 नुसार करण्यात आलेली असल्याने व महानगरपालिका/नगर रचना विभागाने सुधारीत दर निश्चिती केलेली नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबाबत विभागाने खुलासा केलेला नाही.
4.महासभा ठराव क्र.89 दिनांक 09/08/2002 यास दिनांक 31/03/2014 अखेर मुदतवाढ असताना तंदनंतर विकास शुल्क आकारणी बाबत ठराव नसताना कशाचे आधारे विकास शुल्क आकरणी करण्यात आला याबाबत विभागने खुलासा केलेला नाही.

DGPGHMM7801 (Ref No : 54, Hmm No : 176)

23 नगर रचना विभागाकडुन बांधकाम परवानगी देतेवेळी उपकराची रककम आकरणी करताना झालेली अनियमितता.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : नगर रचना 02 निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1594193.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 941745.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 652448.00/-

नोंदणी व मुद्रांक विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. का.15/वामुदत/सर्वसाधारण सुचना/1027, दिनांक : 31/12/2014 चे सहपत्र नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सन 2015 चे मिळकतीचे मुल्यांकन प्रति चौरस मीटर 22000/- इतके निश्चिती करण्यात आलेले असताना मनपा ने माहे 03/2015 मध्ये बांधकाम परवानगी देताना सन 2013 चे साठी मुल्यांकन प्रति चौरस मीटर 10200/- नुसार 1% उपकराची आकारणी करण्यात आलेली आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका अंतर्गत नगर रचना विभागाकडुन सन 2014-15 मधील निवडक महिना माहे 03/2015 मध्ये बांधकाम परवानगी देताना नोंदणी व मुद्रांक विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. का.15/वामुदत/सर्वसाधारण सुचना/1027, दिनांक : 31/12/2014 चे सहपत्र नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सन 2015 चे मिळकतीचे मुल्यांकन प्रति चौरस मीटर 22000/- इतके निश्चिती करण्यात आलेले असताना नगर रचना विभागाने माहे 03/2015 मध्ये बांधकाम परवानगी देताना सन 2013 चे साठी मुल्यांकन प्रति चौरस मीटर 10200/- नुसार 1% उपकराची आकारणी करण्यात आलेली आहे.

नगर विकास विभागाकडुन उपकराची आकारणी करताना खालील प्रमाणे झालेले अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.178 दिनांक 03/01/2019 अन्वये विचारणा केली असता विभागाने लेखापरिक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्याने खालील प्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1. खालील नमुद बांधकाम परवाना धारकाकडुन बांधकाम परवानगी देताना उपकराची कमी आकारणी आलेले आहे.

अ. क्र.	बांधकाम परवाना धारकाचे नांव	प्रभाग/सि.स.नं./आर. एस.नं.	सन 2015 चे रेडीरेकनर नुसार उपकर	वसुल उपकर सन 2013 चे रेडीरेकननुसार	प्रलबिंत उपकर
1	श्री सदानंद बसवंत हल्लेवार	सांगली/10641+10638	27108	12568	14540
2	श्री सलीम बाबु महात/सौ.मरियम अनिस महात	सांगली/374	69047	32013	37034
3	श्री राजेंद्र शिवाप्पा शिंगे	सांगली/269/2	3883	1800	2083
4	श्री शैलेंद्र /सुजय/सुहास शंकरराव कुंभार	सांगली/488/2	174680	80988	93692
5	श्री प्रितम रविंद्र घाट	सांगली/382/1अ	27812	12895	14917
6	श्री शैलेंद्र बाबुलाल शहा	सांगली/10594	92655	42958	49697
7	मे.जेमिनी ट्रेडिंग कंपनी	सांगली/14009	39897	18498	21399
8	श्री पांडुरंग रामचंद्र जाधव	सांगली/10134	32177	14919	17258
9	श्री रोहित रामचंद्र सोनीकर	सांगली/5006ब	20887	11224	9663
10	श्री बाबालालअब्दुलगणी पटवेगार	सांगली/422	18797	8715	10082
11	श्री ईस्माईल इब्राहिम पेंढारी	सांगली/6458	7339	3403	3936
12	श्री वसंत नारायण कुकडे	सांगली/1235	21318	9884	11434
13	श्री शैलेंद्र रावसाहेब पाटील	सांगली/558/3ब/3	218021	12992	205029
14	श्री पुष्कर अरुण जांभळेकर	सांगली/118/1/1/2	17354	8130	9224
15	श्री इसहाक अब्दुल करीम मणेर	कुपवाड/954/3/1	19932	9242	10690

16	श्री पायागोंडा बापु पाटील	कुपवाड/1876	8585	3979	4606
17	श्री विलास आप्पा माने	कुपवाड/39/1/2/अ	30384	14088	16296
18	श्री तात्यासाहेब रामचंद्र खोत	कुपवाड/304/4/ब	14669	6797	7872
19	सौ.अनिता अशोक श्रीराम	कुपावाड/44/3/क	16449	7627	8822
20	श्री अक्षय गोपाळराव साळवे	कुपवाड/149/2	7823	3627	4196
21	सौ.छाया प्रकाश माळी	कुपवाड/471/1ब/1	9550	4428	5122
22	सौ.तेजास्विनी अष्टविनयाक काटकर	कुपावाड/360/1+2+3	12080	5601	6479
23	श्री बाळासाहेब आण्णासाहेब शितोळे	कुपवाड/419/1+2	13501	6250	7251
24	श्री दिपक शिवाजीराव सदाकळे	कुपवाड/03/1	21280	9867	11413
25	श्री गजानन अर्जुन मोहिते	कुपवाड/952/2+3+953	9590	4446	5144
26	सौ.सुनंदा विलास मोरे	कुपवाड/42/5ते 47/7	6367	2952	3415
27	श्री शंकर बापु वाघमोडे	कुपवाड/295/1/अ/1	41364	19178	22186
28	श्री मनोहर कृष्णा सपकाळ	कुपवाड/2163	14313	6637	7676
29	श्री मल्लाप्पा खंडेराया कामते	कुपवाड/156/1अ+2अ	8573	7238	1335
30	श्री बाजीराव उमाजीराव पाटील	मिरज/266/1	31885	14783	17102
31	श्री सौ.मासाबी/मासाई इलाही बागवान	मिरज/140/5	42161	19547	22614
32	सौ.आशा प्रभाकर जाधव	मिरज/1897	42768	19829	22939
33	श्री गजानन दत्ता देवमाने	मिरज/849/1अ	15477	3708	11769
34	श्री इसाक हसन व साहेबलाल मच्छिवाले	मिरज/7899/ब	10771	4994	5777
35	श्री संभाजी दत्तात्रय हांगे	मिरज/245/2ड	39734	18423	21311
36	श्री कासिम मंहमद मणेर	मिरज/380/2+3	15963	7402	8561
37	श्री बाबासाहेब दत्तु पाटील	मिरज/936/2	23368	10834	12534
38	सौ.रमेलाबी मुसा अरुणकर	मिरज/1840	48106	22304	25802
39	श्री हरि ओम डेव्हलपर्स	मिरज/134/2+3+4	92825	43037	49788
40	श्री विजय पंडीतराव दाणेकर	मिरज/10-11	149477	69303	80174
41	श्री जावेद इमामसो सौदागर	मिरज/3720	13138	6091	7047
42	श्री दस्तगीर बाबु मुतवली	मिरज/8178	7920	3672	4248
43	श्री शकील चाँदसाहब शेख	मिरज/413/1	25307	11733	13574

44	सौ. संगिता विजय पवार	मिरज/16611	29858	13844	16014
	एकुण		1594193	652448	941745

तरी वरील संबधित बांधकाम परवानाधारक यांचेकडुन प्रलंबित असलेली उपकराची रक्कम धनाकर्षव्दारे (डीडी) वसुल करुन कामगार कल्याण मंडळाकडे जमा करण्यात यावी. तसेच माहे 01/2015 व 02/2015 मध्ये देण्यात आलेले इतर बांधकाम परवानगीस वरील प्रमाणे उपकराची रक्कम आकारणी करुन फरकाची रक्कम वसुल करण्यात यावी.

2.शासन निर्णय क्र.बी.सी.ए/009/प्र.क्र.108/काम-7अ, दि.17/06/2010 मधील सोबतच्या मार्गदर्शक तत्वे मधील क्र.5 नुसार बांधकाम मंजुरीसाठी प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जासोंबत कामगार कल्याण मंडळाच्या नांवे उपकरासंबधीचा धनाकर्षव्दारे (डीडी) सादर करणे आवश्यक असताना मनपाकडील नगररचना विभागाने बांधकामधारक व्यक्तीकडुन उपकराची रक्कम रोखीन/मनपाचे नांवे धनादेशाने जमा करुन घेतली आहे याबाबत विभागाने खुलासा केलेला नाही.

DGPGHMM7801 (Ref No : 56, Hmm No : 178)

24 नगर रचना विभागाकडुन मोबाईल टॉवर उभारणी परवानगी देतेवेळी झालेली अनियमितता.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष : नगर रचना 01 निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1066976.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1066976.00/-

मोबाईल टॉवर उभारणीसाठी (1) महाराष्ट्र शासन नगर विकास निर्णय क्रमांक : टीपीएस 1810/1975 /प्र.क्र.2417/10/न वि 13 दि.27/07/2011 अन्वये प्रोसेसिंग फी रुपये 30,000/- याव्यतिरिक्त (2) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका महासभा ठराव क्र.41 दि.19/05/2011 अन्वये कार्यवाही करण्यात आलेली नाही.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे सन 2014-2015 नगररचना विभागाकडील उपलब्ध करुन देण्यात आलेल्या मोबाईल टॉवर संचिकेचे लेखापरिक्षण केले टॉवर उभारणीसाठी (1) महाराष्ट्र शासन नगर विकास निर्णय क्रमांक : टीपीएस 1810/1975/प्र.क्र.2417/10/नवि-13, दि.27/07/2011 अन्वये प्रोसेसिंग फी रुपये 30,000/- याव्यतिरिक्त (2) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका महासभा ठराव क्र.41 दि.19/05/2011 खालील प्रमाणे शुल्क आकारणी निश्चित केलेली आहे.

अ)नुतनीकरण फी रुपये 5000/- प्रतिवर्ष
आ)अनाधिकृत्त/परवानगीपुर्व मोबाईल टॉवर अधिकृत्त करताना रुपये 100000/-
इ)नविन टॉवर अद्‌याप ज्यांनी कनेक्शन जोडले नाही अशा टॉवर्सना रुपये 25000/- विकास आकार, 5 वर्षाची नमुनीकरण फी रुपये 5000/- प्रमाणे रुपये 25000/- अशी एकुण रक्कम रुपये 50000/-
ई)बांधकाम विकास शुल्क महासभा ठराव क्र.89 दिनांक 09/08/2002 नुसार रुपये 80/- प्रति चौ.मी.
उ)उपकर सन 2014 चे बाजार मुल्यानुसार

नगर विकास विभागाकडुन मोबाईल टॉवर उभारणी परवानगी देताना खालील प्रमाणे झालेले अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.180 दिनांक 09/01/2019 अन्वये विचारणा केली असता विभागाने लेखापरिक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्याने खालील प्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1.खालील नमुद मोबाईल टॉवर हे अनाधिकृत्त उभारण्यात आलेले असुन त्यांना खाली नमुद केले प्रमाणे शुल्क भरणेबाबत संबधिताना नोटीस देण्यात आलेली आहे.

अ. क्र.	टॉवर धारकाचे नांव	रि.स.नं./ सि.स.नं./ भु.क्र.	नोटीस क्र./दिनांक	बांधकाम विकास शुल्क	उपकर	प्रोसेसिंग फी	विना परवाना टॉवर उभारणी दंड	एकुण
1	व्होडोफोन इस्सार सौ.अलका अनिलकुमार पाटील	233/1+234+235/26	10/ 03-04-2014	1020	1301	30000	100000	132321
2	इंडस टॉवर शिव कन्स्ट्रक्शन्स	179	74/ 04-04-2014	1600	2040	30000	100000	133640
3	भारती एअरटेल/इंडस टॉवर सौ.उज्वला सुधीर गवळी	6413	19/ 03-04-2014	692	882	30000	100000	131574
4	21फस्ट सेंच्युरी एन्फ्रा टेलि लि. श्री विजयकुमार एस.पाटील	3273	05-04-2014	4647	5925	30000	100000	140572
5	इंडस टॉवर लि. सौ.मंजु मोहनलाल भाटे	1761	24/ 05-04-2014	1203	1534	30000	100000	131737

6	व्होडाफोन इस्सार श्री इलाई बंडु बारुदवाले	5757	14/ 03-04-2014	1600	2040	30000	100000	133640
7	इंडस/एअरटेल श्री.दिलिप वसंत केडगे	8939	11/ 05-04-2014	668	852	30000	100000	131520
8	भारती एअरटेल सौ.आक्काताई बाबु मांडवकर	10990/1	34/ 03-04-2014	867	1105	30000	100000	131972
	एकुण			12297	15679	240000	800000	1066976

वरील नमुद केले प्रमाणे संबधित टॉवर धारकांना माहे 04/2014 मध्ये रक्कम भरणा करणेबाबत नोटीस देण्यात आलेले आहे परंतु संबधित टॉवर धारकांनी अद्याप रककम भरणा करुन टॉवर अधिकृत्त केल्याचे दिसुन येत नाही व नगर रचना विभागाने माहे 04/2014 नंतर संबधित टॉवर धारकाकडुन रक्कम वसुल करणेबाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही. याबाबत विभागाने खुलासा केलेला नाही.

2.माहे 05/2014 ते माहे 03/2015 अखेर मनपा हद्दी मध्ये किती अनाधिकृत्त मोबाईल आढळुन आले याबाबतची माहिती लेखापरिक्षणास करुन देण्यात आलेली नसल्याने मनपा हद्दीत किती अनाधिकृत्त मोबाईल टॉवर आढळुन आले, त्यांचेवर काय कार्यवाही केली तसेच त्यांचेकडुन किती बांधकाम विकास शुल्क/उपकर/ प्रोसेसिंग फी/ विना परवाना टॉवर उभारणी दंड किती वसुल करण्यात आला व किती प्रलंबित आहे याबाबतची आकडेवारी लेखापरिक्षणास उपलब्ध् करुन दिलेली नसल्याने त्याबाबत खात्री करता आलेली नाही.

3.वरील प्रमाणे रक्कम रुपये 10,66,976/- संबधित टॉवर धारकाकडुन व्याजासह दंडनिय शुल्क वसुल करुन मनपा खाती चलनाने भरणा करुन अनुपालन सादर करावे.

4.सन 2014-15 मध्ये खाली नमुद केलेप्रमाणे फक्त 3 टॉवर परवानगी संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

अ.क्र.	टॉवर धारकाचे नांव	रि.स.नं./सि.स.नं./ भु.क्र.	टॉवर परवानगी क्र./दिनांक
1	इंडस टॉवर श्री लक्ष्मण आंबाजी माळी	447	03/05-12-2014
2	इंडस टॉवर, व्यस्थापक सहकर भवन ट्रस्ट	795	04/05-12-2014
3	एअरसेल लि. शिवम बिल्डर्स	233	09/10-04-2014

सन 2014-15 मध्ये देण्यात आलेले इतर मोबाईल टॉवर परवानगी संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नसल्याने त्याबाबत खात्री करता आलेली नाही.

5.टॉवर उभारणीची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही त्यामुळे महानगरपालिका हद्दीत किती टॉवर आहेत याची माहिती मिळुन आलेली नाही. तरी महानगरपालिका हद्दीत किती टॉवर आहेत याबाबत संख्या लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नसल्याने त्याबाबत अचुक टॉवर संख्या मिळालेली

झालेले अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.181 दिनांक 09/01/2019 अन्वये विचारणा केली असता विभागाने लेखापरिक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्याने खालील प्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1.खालील नमुद केलेप्रमाणे बांधकाम परवाना धारकानी इमारतीत राहण्यासाठी प्रमाणपत्र/भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नसल्याने त्यांचेकडुन स्थानिक संस्था कराची (एल.बी.टी.) रक्कम रुपये 3926564/- प्रलंबित आहे.

अ.क्र.	कार्यालय	बांधकाम परवाना धारकांची संख्या	50% प्रलंबित एलबीटी रक्कम रुपये
1	सांगली	133	1031723
2	कुपवाड	158	1884065
3	मिरज	243	1010776
	एकुण	291	3926564

मुंबई प्रांतिक महानगरपालिका(स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील नियम 40(1)(क) व नियम 48(3) अन्वये स्थानिक संस्था कराची रककम मुदतीत भरणा केलेली नाही तर त्यांचेकडुन ज्या दिनांकास असा स्थानिक संस्था कर भरणे आवश्यक होते त्या शेवटच्या दिनांकानंतरच्या पहिल्या 12 महिन्या करिता स्थानिक संस्था कराच्या दरमहा दोन टक्के इतकी रककम सरळ व्याजासह वसुल करुन घेऊन मनपा फडात जमा करुन अनुपालन सादर करावे.

2.नगर रचना मिरज विभागाकडील सन 2014-15 मधील प्रलंबित एल.बी.टी.रक्कमेची माहिती वांरवार मागणी करुनही उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी सदर माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी.

3.महाराष्ट्र शासन निर्णय क्र.स्था.19क्र.209/प्र.क्र.65/09/नवि-34,दि.30/06/2012 मधील नियम 4 नुसार मनपा हद्दीत जे बांधकाम करणार आहेत त्यांचेसाठी स्थानिक संस्था कराचे दोन पर्याय आहेत.

अ)मनपा हद्दीत जे बांधकाम व्यवसायिक/कंत्राटदार इमारत बांधकामासाठी/वापराकरिता आणलेल्या मालाच्या किंमतीवर स्थानिक संस्था कर भरणे.

ब)बांधकाम चौरस मीटर प्रमाणे नियमानुसार ठोक रक्कम भरणा करणे.

सन 2014-15 मध्ये बांधकाम परवाना धारक यांनी रुपये 100/- चे मुद्रांक शुल्क वर पर्याय "अ" ची निवड केलेली आहे परंतु त्यांनी अद्याप नमुद बांधकामासाठी आणलेल्या मालावर एल.बी.टी.भरणा केलेले चलन सादर केलेले नाही. असे परवाना धारकाची माहिती व त्यांचेकडुन एल.बी.टी.रक्कम वसुल करणे बाबत काय कार्यवाही केली याबाबत लेखापरिक्षणास माहिती उपलब्ध देण्यात आलेली नाही.

4.ज्या बांधकाम परवाना धारकाकडुन स्थानिक संस्था कराची रक्कम वसुल करणेबाबत नगर रचना विभागाकडुन कोणती कार्यवाही करण्यात आली त्याबाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध देण्यात आलेली नाही.

DGPGHMM7801 (Ref No : 58, Hmm No : 181)

26 विधीज्ञांना अदा केलेली देयके/खर्च प्रमाणंके/संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 4

लेखा शीर्ष : विधी 01 निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 419762.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 419762.00/-

विधीज्ञांना अदा केलेली देयके/खर्च प्रमाणंके/संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत. त्यामुळे रक्कम रुपये 419762/- ही आक्षेपाधीन ठेवण्यात आलेली आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे सन 2014-2015 या आर्थिक वर्षाचे विधी विभागाचे लेखापरिक्षण केले असता देयक नोंदवही वरुन सन 2014-15 मध्ये खालील प्रमाणे विधीज्ञांन्याची देयके विधी विभागास प्राप्त झालेले असुन ती संबधित विभागाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आल्याचे दिसुन येते. अंदाजपत्रकीय पुस्तकामध्ये सन 2014-15 मध्ये दावे व खटले यासाठी रक्कम रुपये 405045/- इतका खर्च झालेला आहे. दिनांक 31/03/2015 अखेर 782 दावे प्रलंबित असल्याचे व सन 2014-15 मध्ये 37 दावे निकाली निघल्याचे दिसुन येते.

विधीज्ञांना अदा केलेली देयके/खर्च प्रमाणंके/संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत अर्धसमास पत्र अर्ध समास पत्र क्र.185 दि.22/01/2019 व क्र.191 दिनांक 04/02/2019 अन्वये मागणी करुनही विभागाने लेखापरिक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत विभागने विधीज्ञांना अदा केलेली देयके/खर्च प्रमाणंके/संचिका लेखापरिक्षणास करुन दिलेली नसल्याने खालील प्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1.विधी विभागाकडुन खालील प्रमाणे रक्कम रुपये 419762/- विधीज्ञांना अदा केलेली देयके/खर्च प्रमाणंके/संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नसल्याने रक्कम रुपये 419762/- ही आक्षेपाधीन ठेवण्यात आलेली आहे. तसेच ठरावा प्रमाणे विधीज्ञांना फी व ॲडव्होकेट फी ही व्यावसायीक फी मध्ये समाविष्ठ असून विधीज्ञांना फीचे देयक अदा करतांना आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194(जे) नुसार 10% आयकर कपात करणे आवश्यक असतांना आयकर कपात करण्यात आली असलेबाबत खात्री करता आलेली नाही.

अ.क्र.	दावा क्र.	मागणी दिनांक	वकीलाचे नांव	रक्कम रुपये	विभाग
1	36/2012	01/07/2014	ॲड देशमुख	4500	नगर रचना
2	225/2011	01/07/2014	ॲड देशमुख	4500	नगर रचना
3	10282/09	14/07/2014	ॲड केळुसकर	20000	कर
4	3303/14	21/07/2014	ॲड केळुसकर	3500	नगर रचना
5	4325/14	09/09/2014	ॲड केळुसकर	5000	नगर रचना

6	4326/14	09/09/2014	ॲड केळुसकर	5000	नगर रचना
7	203/12, 316/12	09/09/2014	ॲड केळुसकर	26500	आस्थापना
8	4327/14	09/09/2014	ॲड केळुसकर	5000	नगर रचना
9	137/14	01/10/2014	ॲड विजय शेटे	10000	प्रशासन
10	101/2013	05/11/2014	ॲड विजय शेटे	-	आस्थापना
11	1067/13	01/10/2014	ॲड श्रीनिवास पटर्वधन	70000	एलबीटी
12	7699/13	18/12/2014	ॲड केळुसकर	19500	नगर रचना
13	771/2000	08/12/2014	ॲड पंडीत सांवत, ॲड उज्वला पाटील	2100	मालमत्ता
14	266/2000	06/12/2014	ॲड पंडीत सावंत	57592	एलबीटी
15	44/2001	-	ॲड पंडीत सावंत	35570	एलबीटी
16	311/2013	10/12/14	ॲड देशमुख	4500	पदर्निदेशन
17	237/2014	10/12/14	ॲड देशमुख	4500	शहर अभियंता
18	376/2010	10/12/2014	ॲड देशमुख	4500	मालमत्ता
19	99/2010	10/12/2014	ॲड देशमुख	4500	नगर रचना
20	306/2011	10/12/2014	ॲड देशमुख	4500	नगर रचना
21	73/2014	10/12/2014	ॲड देशमुख	4500	नगर रचना
22	72/2014	10/12/14	ॲड देशमुख	4500	नगर रचना
23	3959/2014	12/12/2014	ॲड केळुसकर	5000	नगर रचना
24	3457/2014	18/12/2014	ॲड केळुसकर	19500	नगर रचना
25	2569/1998	06/01/2015	ॲड सय्यद	6500	नगर रचना
26	3955/2014	12/12/2014	ॲड केळुसकर	5000	नगर रचना
27	392/2010	23/01/2015	ॲड देशमुख	4500	आरोग्य
28	22/2008	23/01/2015	ॲड देशमुख	4500	मालमत्ता
29	268/2011	23/01/2015	ॲड देशमुख	4500	नगर रचना
30	222/2010	23/01/2015	ॲड देशमुख	4500	आरोग्य
31	928/2014	09/02/2015	ॲड विजय शेटे	2000	आस्थापना
32	964/2015	09/02/2015	ॲड विजय शेटे	2000	आस्थापना
33	971/2015	24/02/2015	ॲड विजय शेटे	2000	आस्थापना
34	101/2013	27/02/2015	ॲड विजय शेटे	130000	आस्थापना
35	118/2014	14/03/2015	ॲड देशमुख	4500	नगर रचना
36	182/2009	14/03/2015	ॲड देशमुख	4500	नगर रचना
37	111/2006	14/03/2015	ॲड देशमुख	4500	नगर रचना
	एकुण			419762	

2.ॲडव्होकेट श्रीनिवास पटर्वधन, ॲड उज्वला पाटील, ॲड सय्यद हे महासभा ठराव क्र.34 दि.10/10/2008 व स्थायी समिती ठराव क्र.182, दि.24/12/20014 अन्वये नियुक्त करण्यात आलेले महानगरपालिका पॅनेलवरील ॲडव्होकेट नसताना ही त्यांना कोणत्या नियमान्वये/ठरावान्वये कोर्ट प्रकरणे देण्यात आली याबाबत विभागाने आभिलेखे/संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

3.सांगली पाणी पुरवठा विभागाकडील 8 मिटर रीडर व 1 संगणक चालक अशा 9 कर्मचा-यांची खातेनिहाय चौकशी करणेसाठी ॲडव्होकेट श्री संजीव व्ही.मराठे यांची नेमणुक करुन त्यासाठी रुपये 27000/- मानधन ठरविण्यात आल्याचे दावा नोंदवही वरुन दिसुन येते. ॲडव्होकेट श्री संजीव व्ही.मराठे हे महासभा ठराव क्र.34 दि.10/10/2008 व स्थायी समिती ठराव क्र.182, दि.24/12/20014 अन्वये नियुक्त करण्यात आलेले महानगरपालिका पॅनेलवरील ॲडव्होकेट नसताना ही त्यांना कोणत्या नियमान्वये/ठरावान्वये कोर्ट प्रकरणे देण्यात आली याबाबत सविस्तर खुलासा सादर करुन त्याची अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध् करुन दयावीत. तसेच मनपा पॅनेल विधिज्ञ व्यतिरिक्त सन 2014-15 मध्ये कोण कोणत्या विधिज्ञाना कोर्ट कामे देण्यात आली याबाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाही.

4.दाखल दावे बाबत सांगली व मिरज कार्यालयाकडील नोंदवही ठेण्यात आलेली आहे परंतु त्यामध्ये दाखल दावे व त्याचे माहिती बाबत सविस्तर नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. देयक नोंदवही प्रमाणित करण्यात आलेली नाही

DGPGHMM7801 (Ref No : 64, Hmm No : 191)

27 सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका मालमत्ता विभाग अंतर्गत सांगली कार्यालयाकडुन परवाना अभिलेखे/संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 2

लेखा शीर्ष: परवाना 01 निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 662466.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 662466.00/-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका मालमत्ता विभाग अंतर्गत सांगली कार्यालयाकडुन परवाना कर /शो टॅक्स वसुल बाबतचे अभिलेखे/संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत. त्यामुळे रक्कम रुपये 662466/- ही आक्षेपाधीन ठेवण्यात आलेली आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडील सन 2014-2015 या आर्थिक वर्षाचे

मालमत्ता विभाग अंतर्गत सांगली कार्यालयाकडुन देण्यात येणा-या जाहिरात परवाना/सिनेमा शो टॅक्स रोख नोंदवहीची पडताळणी केली असता खालील नमुद परवाना कर/शो टॅक्स वसुल झाल्याचे दिसुन येते.

सांगली कार्यालयाकडुन देण्यात येणा-या जाहिरात परवाना/सिनेमा शो टॅक्स आकारणी बाबतचे मालमत्ता विभाग अंतर्गत सांगली कार्यालयाकडुन परवाना अभिलेखे/संचिका अर्धसमास पत्र क्र.193 दिनांक 06/02/2019 अन्वये मागणी करुनही विभागाने लेखापरिक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत उपलब्ध करुन दिलेली नसल्याने खालील प्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1.जाहिरात परवाना कर : सांगली मिरज आणि कुपवाड शहर महागनरपालिका महासभा ठराव क्र.287 दि.15/02/2014 अन्वये मनपा हद्दी मध्ये जाहिरातीसाठी जागा भाडे व जाहिरात परवाना कर आकरणी करण्यात येते. सन 2014-15 मध्ये सांगली विभागाकडुन महानगरपालिकेस रक्कम रुपये 475056/- जाहिरात प्राप्त झाल्याचे रोखनोंदवही वरुन दिसुन येते. खालील नमुद जाहिरात परवाना संचिका/अभिलेखे/चलन लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली नसल्याने नमुद जाहिरात परवाना कर ठरावानुसार आकारणी झालेबाबत खात्री करता आलेली नाही. त्यामुळे रक्कम रुपये 475056/- ही आक्षेपाधीन ठेवण्यात आलेली आहे.

अ.क्र.	पावती क्र./दिनांक	परवाना धारकांचे नांव	जहिरात कर/ मनपा जागा भाडे
1	322301/05.04.14	ग्लोबल मॅनेजमेंट	250
2	322302/07.04.14	उदय यशंवत पवार	640
3	322303/29.04.14	नितिन शिंदे	610
4	322304/30.04.14	अमोल सुरगौंडा पाटील	100
5	322305/30.04.14	आदित्य पटवर्धन	200
6	322309/21.05.14	कौस्तुब धंनजय कुलकर्णी	200
7	322311/17.06.14	साजिद एस.नदाफ	1716
8	322312/07.07.14	डॉ.विवेक मधुकर कुलकर्णी	3450
9	322313/11.07.14	साजिद एस.नदाफ	2340
10	322314/11.07.14	सौ.कल्पना कोळेकर	250
11	322315/14.07.14	डॉ.अनिश श्रीराम कानिटकर	2550
12	322316/16.07.14	डॉ.निलिमा भालचंद्र लिमये	3450
13	322318/31.07.14	प्रोपेसर निलकंट सगरे	2300
14	322319/22/07.14	कमलाबाई कल्लाप्पा कुमसंगे	2600
17	322320/22.07.14	आण्णासो कुमसंगे	1300
18	322321/25.07.14	झेड ए.भोजानी	200
19	322322/13.08.14	साजिद एस.नदाफ	2410
20	322326/16.9.14	कर्मवीर गृहनिर्माण संस्था	3000
21	322328/20.09.14	जेमिनी सर्कस	840
22	322330/22.09.14	अमोल पाटील	600

23	322333/03.10.14	एनकरेज कॅन्स्ट्रक्शन	150
24	322336/21.11.14	सांगली जिल्हा सराफ समिती	600
25	322337/27.11.14	मेटकॉन	1130
26	322340/16.12.14	सांगली अॅर्बन बँक	400
27	322341/24.12.14	विजयंता लक्ष्मण हेर्लेकर	480
28	322342/03.01.15	विपुल विजय केरीपाळे	300
29	322347/10.02.15	शेडजी सुबराव मोहिते	330
30	322348/10.02.15	प्रगती क्लासेस	964
31	322349/16.02.15	विशाल शाम गिडवाणी	896
32	322352/23.02.15	डॉ.नानासाहेब धर्माधिकारी	980
33	322353/02.03.15	डॉ.कुलदीप सदाशिव लोकरे	2300
34	322354/07.03.15	विशाल मगदुम	1648
35	322358/23.03.15	सौ.छाया ज्ञानेश्वर मोडे	472
36	322359/24.03.15	श्रीराम कुलकर्णी	1750
37	322367/31.03.15	सांगली जिल्हा कॉग्रेस कमिटी	10100
38	322368/31.03.15	ईगल जाहिरात	43000
39	322369/31.03.15	सागावकर जाहिरात	211850
40	322370/31.03.15	करिटेल आऊट डोअर पुणे	20000
41	322371/31.03.15	मकरंद महेश म्हामुलवार	5000
42	322372/31.03.15	सुप्रिम साईडस पुणे	15000
43	322373/31.03.15	यश जाहिरात	91200
44	322374/31.03.15	वाय टु के सांगली	37500
	एकुण		475056/-

2.सिनेमागृह शो टॉक्स : सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दी मधील सिनेमा गृहास प्रति शो 15 रुपये प्रमाणे शो टॉक्स आकरण्यात येतो. रोख नोंदवहीची पडताळणी केली असता सन 2014-15 मध्ये सांगली विभागाकडुन मनपा हद्दीमधील सिनेमा गृहाकडुन रक्कम रुपये 187410/- शो टॉक्स वसुल झाल्याचे दिसुन येते. सदर शो टॉक्सचा शासन निर्णय तसेच मनपा हद्दीमधील शो टॉक्स भरणा केलेले चलन/संचकिा/ अभिलेखे मौखिक वांरवार मागणी करुनही लेखापरिक्षणास उपलब्ध् करुन दिलेली नाहीत. मनपा सांगली कार्यालया हद्दीत किती सिनेमागृह आहेत याबाबतची माहिती व प्रलंबित शो टॉक्स बाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध् करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे सिनेमा गृहाकडुन रक्कम रुपये 187410/- शो टॉक्स वसुल झालेले व प्रलंबित रक्कमेबाबत खात्री करता आलेली नाही. त्यामुळे रक्कम रुपये 187410/- ही आक्षेपाधीन ठेवण्यात आलेली आहे.

अ.क्र.	पावती क्र./दिनांक	परवाना धारकांचे नांव	कालावधी	शो टॉक्स
1	322306/20.05.14	प्रताप टॉकीज	माहे 04/2014	1800
2	322307/20.05.14	समर्थ टॉकीज	माहे 04/2014	1515

3	322308/20.05.14	स्वरुप टॉकीज	माहे 04/2014	915
4	322310/12.06.14	प्रताप टॉकीज	माहे 05/2014	1350
5	322317/19.07.14	प्रताप टॉकीज	माहे 06/2014	1725
6	322323/13.08.14	स्वरुप टॉकीज	दि.25.07.14 ते 31.07.14	420
7	322324/13.08.14	समर्थ टॉकीज	माहे 06/2014	1440
8	322325/25.08.14	प्रताप टॉकीज	माहे 07/2014	600
9	322327/17.09.14	स्वरुप टॉकीज	माहे 08/2014	1860
10	322329/22.09.14	प्रताप टॉकीज	माहे 08/2014	990
11	322331/13.10.14	स्वरुप टॉकीज	माहे 09/2014	1380
12	322332/03.11.14	प्रताप टॉकीज	माहे 10/2014	1395
13	322334/11.11.14	समर्थ टॉकीज	माहे 10/2014	1650
14	322335/11.11.14	स्वरुप टॉकीज	माहे 10/2014	1755
15	322338/15.12.14	समर्थ टॉकीज	माहे 11/2014	1170
16	322339/15.12.14	स्वरुप टॉकीज	माहे 11/2014	1800
17	322343/12.01.15	स्वरुप टॉकीज	माहे 12/2014	1860
18	322344/12.01.15	समर्थ टॉकीज	माहे 12/2014	1440
19	322345/02.02.15	प्रताप टॉकीज	माहे 12/2014	1410
20	322346/02.02.15	प्रताप टॉकीज	माहे 01/2015	180
21	322350/18.02.15	समर्थ टॉकीज	माहे 01/2015	1110
22	322351/18.02.15	स्वरुप टॉकीज	माहे 01/2015	1830
23	322355/16.03.15	प्रताप टॉकीज	माहे 02/2015	525
25	322356/17.03.15	स्वरुप टॉकीज	माहे 02/2015	1575
26	322357/17.03.15	समर्थ टॉकीज	माहे 02/2015	1320
27	322360/25.03.15	एस.एफ.सी.मॉल	माहे 07/14 ते 12/14	34250
28	322361/25.03.15	न्यु प्राईड	सन 2013-14 व 14-15	88725
29	322362/27.03.15	आनंद टॉकीज	सन 2012-13 व 13-14	19960
30	322363/27.03.15	प्रताप टॉकीज	माहे 03/2015	1080
31	322364/31.03.15	माळी टॉकीज	माहे 03/2015	6975
32	322365/31.03.15	स्वरुप टॉकीज	माहे 03/2015	1755
33	322366/31.03.15	समर्थ टॉकीज	माहे 03/2015	1650
	एकुण रुपये			187410/-

DGPGHMM7801 (Ref No : 66, Hmm No : 193)

28 सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका आरोग्य विभाग अंतर्गत सांगली, मिरज आणि कुपवाड कार्यालयाकडुन ना हरकत दाखले परवाना संचिका/अभिलेखे/ नोंदवहया लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 1

लेखा शीर्ष : परवाना महानगरपालिका स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका आरोग्य विभाग अंतर्गत सांगली ,मिरज आणि कुपवाड कार्यालयाकडुन ना हरकत दाखले परवाना संचिका /अभिलेखे/नोंदवहया लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडील सन 2014-2015 या आर्थिक वर्षाचे आरोग्य विभाग अंतर्गत सांगली,मिरज आणि कुपवाड कार्यालयाकडुन महासभा ठराव क्र.282 दिनांक 15/02/2014 अन्वये मनपा हद्दीमधील व्यवसायाना ना हरकत दाखले नवीन/नुतणीकरण देताना परवाना शुल्क आकरणी करण्यात येते. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीमधील मिरज आणि कुपवाड शहर मधील कार्यालयाकडुन सन 2014-15 मध्ये देण्यात आलेल्या ना हरकत परवाना संचिका/अभिलेखे/परवाना नोंदवही अर्धसमास पत्र क्र.195 दिनांक 06/02/2019 अन्वये मागणी करुनही लेखापरिक्षणास देण्यात आलेले नसल्याने खालील प्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1.सन 2014-15 मध्ये मनपा हद्दीमधील सांगली, मिरज आणि कुपवाड कार्यालयाकडुन देण्यात आलेले ना हरकत परवाना संचिका/अभिलेखे तात्काळ लेखापरिक्षणास उपल्बध करुन देण्यात आलेली नाहीत.

2.परवाना नोंदवही तात्काळ लेखापरिक्षणास उपल्बध करुन देण्यात आलेले नाही.

2.सन 2014-15 मधील ना हकरत परवाना बाबतची खालील नमुद माहिती लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेली नसल्याने त्याबाबत खात्री/पडताळणी करता आलेली नाही.

अ.क्र.	कार्यालय	एकुण परवाना धारकाची संख्या	सन 2014-15 मध्ये नुतणीकरण करण्यात आलेल्या परवाना धारकाची संख्या	सन 2014-15 मध्ये वसुल झालेले परवाना शुल्क	सन 2014-15 मध्ये प्रलंबित नुतणीकरण परवाना धारकाची संख्या	सन 2014-15 मध्ये प्रलंबित परवाना शुल्क
1	सांगली					
2	मिरज					

3	कुपवाड					
	एकुण					

DGPGHMM7801 (Ref No : 68, Hmm No : 195)

29 नगर सचिव विभागाने सन 2014-15 मधील महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची नोटीस स्थानिक वृत्तपत्रामध्ये देताना व महासभेत ऐन वेळेचे प्रस्ताव दाखल करुन घेताना झालेले अनियमितता बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 3

लेखा शीर्ष : नगरसचिव 01 निधी

अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसुची ड प्रकरण 2 मधील नियम 1 अन्वये नगर सचिवाने भरपुर खप असलेल्या निदान एका स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरातीव्दारे दिली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 2, महानगरपालिकेचे कामकाजामधील खंड 1(क) अन्वये नगरसेवकांनी दिलेले 34 प्रस्ताव ऐनवेळच्या विषय म्हणुन दाखल करुन सभेने सर्वानुमते मंजुरीचा निर्णय घेतला आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे सन 2014-2015 या आर्थिक वर्षामध्ये महासभेच्या एकुण 08 सर्व साधारण सभा झाल्या असुन एकुण 178 ठराव पारित करण्यात आले आहेत. तसेच 5 सभा तहकुब करण्यात आलेले असुन दि.31/01/2015 रोजीची सभा महापौर व उप महापौर निवडीसाठी घेण्यात आलेली आहे. नगर सचिव विभागाने सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये वर्तमानपत्रामध्ये सर्व साधारण सभेच्या दिलेल्या जाहिर नोटीसा, सर्वसाधारण सभा व स्थायी समितीच्या ठरावाची कार्यवृत्तांत व इतिवृत्त नोंदवही यांची तपासणी केली असता महासभेच्या कार्यवृत्तांचे पुस्तक नमुना क नियम 4 व 39 प्रमाणे असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची ड प्रकरण 2 महानगरपालिकेचे कामकाज खंड(1)(न) नुसार नगरपालिका सचिव विभागाने प्रत्येक सभेस उपस्थित असलेल्या पालिका सदस्यांची नांवे आणि अशा सभेतील प्रत्येक नगरसेवकाने घेतलेला सहभाग व त्यांनी मांडलेले म्हणने लिखित स्वरुपात इतिवृत नोंदवहीमध्ये पृष्ठ क्र. 01 ते 118 वर नोदविले आहे. त्यामध्ये खालील प्रमाणे अनियमितता असुन त्याबाबत विभागास अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.204 दिनांक 20/02/2019 अन्वये विचारणा केली असता विभागाने लेखापरिक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्याने खालील

प्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत

1.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसुची ड प्रकरण 2 मधील नियम 1 अन्वये महानगरपालिकेच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबधी तरतुदीमधील (आय) नुसार सभेचा प्रत्येक नोटीसात अशी सभा ज्या वेळी व ज्या ठिकाणी भरवायाची असेल ती वेळ व ते ठिकाण आणि कलम 44 खालील प्रश्नाखेरीज अशा सभेत चालावावयाचे कामकाज निर्दिष्ट केले पाहिजे व अशी नोटीस नगर सचिवाने भरपुर खप असलेल्या निदान एका स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरातीव्दारे दिली पाहिजे असे नमुद आहे. या तरतुदीनुसार नगर सचिव विभागाने सन 2014-15 मध्ये सर्व साधारण सभेच्या नोटीसा खालील वर्तमानापत्रामध्ये दिल्या आहेत.

अ.क्र.	महासभा क्रमांक व दिनांक	वर्तमानपत्राचे नांव व दिनांक
1	मनपा विशेष सभा क्र.01, दि.14/07/2014	दैनिक सत्यदुत, दि.08/07/2014
2	मनपा विशेष सभा क्र.02, दि.31/03/2015	दैनिक लोकमत दि.08/03/2015
3	मनपा विशेष सभा क्र.03, दि.20/11/2014	दैनिक पुण्यनगरी दि.16/11/2014
4	मनपा विशेष सभा क्र.-, दि.31/01/2015	दैनिक केसरी, दि.23/01/2015
5	मनपा सुचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्र.01 दि.19/06/14	दैनिक सकाळ दि.17/06/2014
6	मनपा सुचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्र.02 दि.20/08/14	दैनिक तरुणभारत दि.17/08/2014
7	मनपा सुचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्र.04 दि.17/01/15	दैनिक अग्रदुत दि.15/01/2015
8	मनपा सुचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्र.05 दि.20/02/15	दैनिक जनप्रवास दि.17/02/2015
9	मनपा सुचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्र.06 दि.19/03/15	दैनिक ललकार, दि.17/03/2015
5.आकस्मिक खर्च नियम 1965 मधील नियम क्र.95 मधील तरतुदीनुसार प्रत्येक वर्षी माहे जुन मध्ये खरेदी करण्यात आलेल्या नोंदवहीस नोंदी घेण्यात आलेल्या नोंदी व शिल्लक साहित्याची पडताळणी करुन प्रमाणपत्र नोंद करणे आवश्यक असताना ते केलेले नाही.

6.विदयुत विभागाकडे जमा झालेले निर्लेखन साहित्याची मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम क्र.146(अ)(ब) साहित्य निर्लेखन कार्यवाही केलेली नाही.

7.प्रभाग समितीकडील जड वस्तु संग्रह नोंदवही मध्ये माहे 03/2015 अखेर विदयुत अभियंता यांनी पडताळणी करुन स्वाक्षरी केलेली नाही.

8.विदयुत विभागाकडील जड वस्तु संग्रह नोंदवहीस साहित्य प्रात्र झालेची नोंदी घेताना नोंदवहीस बिलाचा तपशील नोदंविण्यात आलेला नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका विद्युत विभागास . अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र .34 दि.27/09/2018 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 13, Hmm No : 34)

42 सन 2014-15 विदयुत विभागाकडुन गणेशोत्सव कालावधीमध्ये तात्पुरती लाईट व्यवस्था करताना झालेली अनियमितता बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : विद्युत 01 निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 412830.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 25802.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 387028.00/-

महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक : भाप्रस 1088/ (2512)/ उदयोग-6, दि.02/01/1992 व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र .जाहिरात 2009/प्र.क.137/का-34, दि.29/08/2009 अन्वये कार्यवाही करण्यात आलेली नाही व आयकर/व्हॅट/एलबीटी रक्कमा कपात करण्यात आलेले नाहीत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये विदयुत विभागाकडुन सन 2014 होणा-या गणेशत्सवाचे वेळी सांगली व मिरज येथील विर्सजन मार्ग व ठिकाणी तात्पुरती लाईट व्यवस्था करणेसाठी वेळेअभवी निविदा प्रक्रिया शक्य नसल्याने विना निविदा, तांत्रिक मान्यता दिनांक 25/07/2014 व प्रशासकीय मान्यता स्थायी समिती ठराव क्र . 149 दि.30/08/2014 व अर्थसंकल्पीय तरतुद रुपये 412830/- अन्वये न्यु आदर्श डेकोरेटर्स सांगली यांचेकडील रक्कम रुपये 412830/- इतक्या खर्चास मंजुरी देण्यात आलेली आहे . त्यामध्ये खालील प्रमाणे अनियमितता झालेचे दिसुन येते.

न्यु आदर्श डेकारेटर्स सांगली			
अ.क्र.	कामाचा तपशील	बिल नं/दिनांक	रक्कम रुपये
1	सांगली येथील विर्सजन ठिकाणी लाईट व्यवस्था	13/12.03.2015	205146
2	मिरज येथील विर्सजन लाईट ठिकाणी व्यवस्था	31/12.03.2015	207684
एकुण रुपये			412830

यावर अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. प्रत्यक्षात नमुद काम निविदा प्रक्रिया करुन करणे शक्य असताना ते केले नसल्याने महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक : भाप्रस 1088/ (2512)/उदयोग-6,दि.02/01/1992 व महा राष्ट्र शासन , सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.जाहिरात2009/प्र.क.137/का-34 दि.29/08/2009 अन्वये निविदा प्रसिध्द करण्यात आलेली नसल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा न घेता जास्तीचा खर्च झालेला आहे.

2. वरील नमुद खर्चाची प्रमाणंके लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाले ली नसल्याने देयकामधुन 2% आयकर कपात रक्कम रुपये 8257/- संचिकेसोबत करारनामासोबत कार्यकंत्राट यांचेकडुन व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र नसल्याने 4% रक्कम रुपये 16513/- व 0.25%एलबीटी रक्कम रुपये 1032/- अशी एकत्रित रक्कम रुपये 25802/- संबधिताकडुन वसुल करुन चलनाने नमुद खाती जमा करण्यात यावी.

3.देयकावर कामाचा तपशील नमुद करुन त्यानुसार देयक सादर करणे आवश्यक असताना देयक अंदाजपत्रका नुसार सांगली व मिरज येथील लाईट व्यवस्था असे नमुद करुन एकत्रित रक्कमेचे सादर केलेले असल्याने प्रत्यक्षात कोठे व किती काम झाले हे समजुन येत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका विद्युत विभागास . अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र .33 दि.27/09/2018 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 14, Hmm No : 33)

43 सन 2014-15 मध्ये स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले कर्मचारी यांचे शेवटचे दिवसाचे वेतन कपात केले नसले बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष : निवृत्ती वेतन 01 निधी

अनियमितता कलम : 9ब

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 नियम 64 अन्वये स्वेच्छेने सेवानिवृत्ती होणा-या कर्मचारी यांची नियम क्र .6 अन्वये सेवानिवृत्तीचा दिनांक /तारीख हा विनाकामाचा दिवस म्हणुन मान्यता येणार असल्याने त्यांचे सेवानिवृत्ती दिनाकांचे त्या दिवसाचे वेतन त्या ना देय होत नसताना

ही त्यांना शेवटचे दिवसाचे वेतन अदा करण्यात आलेले आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महागनरपालिकेकडील सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये खालील नमुद स्वेच्छा सेवानिवृत्त घेतलेले कर्मचारी यांची सेवानिवृत्त प्रकरणे व वेतन देयक तपासणी केली असता महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 नियम 64 अन्वये स्वेच्छेने सेवानिवृत्ती होणा-या कर्मचारी यांची नियम क्र.6 अन्वये सेवानिवृत्तीचा दिनांक/तारीख हा विनाकामाचा दिवस म्हणुन मान्यता येणार असल्याने त्यांचे सेवानिवृत्ती दिनाकांचे त्या दिवसाचे वेतन त्याना देय होत नसताना ही त्यांना शेवटचे दिवसाचे वेतन अदा करण्यात आल्याचे दिसुन येते.

अ.क्र.	कर्मचारी यांचे हुद्दा/नांव	स्वेच्छा सेवानिवृत्ती दिनांक	शेवटचे वेतन व महागाई भत्ता
1	सफाईगार/वैयजंता कृष्णा कांबळे	30/11/2014	8220+1300
2	सफाईगार/सुशीला लक्ष्मण भोर	28/02/2014	7940+1300
3	सफाईगार/सुमन चंद्रकांत कांबळे	31/03/2014	8220+1300
4	सफाईगार/राजाक्का वसंत कांबळे	28/02/2014	7940+1300
5	सफाईगार/बेबी यमन्नाप्पा घणके	28/02/2014	7940+1300
6	सफाईगार/मालन प्रकाश कांबळे	31/07/2014	8250+1300
7	सफाईगार/शांता ज्ञानु चंदनशिवे	28/02/2014	7940+1300
8	सफाईगार/लता मोहन गोंधळे	31/07/2014	8080+1300
9	सफसईगार/सिंधु श्रीरंग सवणे	30/09/2014	8220+1300
10	सफाईगार/लक्ष्मी तुकाराम आडसुळे	31/10/2014	8220+1300
11	वाहन चालक/लक्ष्मण दत्तात्रय कोरे	29/10/2014	11760+2400

तरी वरील नमुद स्वेच्छेने सेवानिवृत्ती झालेले कर्मचारी यांचे देण्यात आलेले सेवानिवृत्तीचे दिनांकाचे एक दिवसाचे वेतन व त्यावरील महागाई व इतर भत्ते याची रक्कम त्यांचेकडुन वसुल करुन

मनपा फंडात जमा करावी.

उपरोक्त अनियमिततेबाबत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महा नगरपालिका आस्थापना/निवृत्ती वेतन विभागास अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र .51 दि.19/10/2018 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 18, Hmm No : 51)

44 चुकीचे वेतन निश्चितीमुळे वेतन/निवृत्ती वेतन/उपदान/अंशराशीकरण/रजा रोखीकरण रक्कमेचे अतिप्रदान झाले बाबत.

NA

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 08

लेखा शीर्ष : निवृत्ती वेतन 01 निधी

अनियमितता कलम : 9ब

वर्ग 4 मधुन वर्ग 3 मध्ये पदोन्नती देताना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.आरटीआर-1174/2032/बारा, दि.23/09/1975 व शासन निर्णय क्र. क्र.आरटीआर-1174/20321390/ बारा, दि.07/07/1976 अन्वये कार्यवाही करण्यात आलेली नाही. चुकीची वेतननिृश्चतीमुळे वेतन/निवृत्ती वेतन/उपदान/अंशराशीकरण रक्कमेचे अतिप्रदान झाले आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 1009/प्र.क्र.169/सेवा-9 दिनांक 06/11/2009 अन्वये सेवानिवृत्ती पुर्वी मुख्य लेखापरिक्षक यांचेकडुन वेतन पडताळणी करुन घेण्यात आलेली नाही. पदोन्नती कार्यपध्दतीनुसार महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एलआरव्ही-1089/3654/ (प्र.क्र.12/89)/बारा,दि.28/03/1990 अन्वये पदोन्नतीसाठी योगायोग्यता तपासताना निवड सुची तयार करावयाचे वेळी त्यांचे अलीकडचे पाच वर्षाचे गोपनीय अहवाल विचारत घेणे आवश्यक असताना ते घेण्यात आलेले नाहीत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महागनरपालिकेकडील सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये सेवानिवृत्त झालेले खालील नमुद कर्मचारी यांची महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम 2009 मधील नियम क्र.12 व 13 व महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील दिनांक 31/04/2009 अन्वये 24 वर्षे सेवा पुर्ण झाल्याने आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ देवुन चुकीची वेतननिश्चती करण्यात आलेली असल्याने वेतन/निवृत्ती वेतन/सेवा उपदान/अंशराशीकरण/शिल्लक अर्जित रजा रक्कम इत्यादीचे अतिप्रदान झालेले आहे.

1)श्री सखाहरी दादा ओतारी - लिपिक,
जन्म दिनांक - 14/08/1956
प्रथम नेमणुक दि. 09/08/1976 - शिपाई पदी
पदोन्नती दि.06/08/1979 - लिपिक पदी
12 वर्षे सेवा पुर्ण केल्याचा लाभ दि.01/10/1994
24 वर्षे सेवा पुर्ण केल्याचा लाभ दि.01/10/2006
सेवा निवृत्ती दिनांक - 31/08/2014
आयुक्त आदेश क्र.187,दि.30/09/2013 - 24 वर्षे सेवा पुर्ण व्दितीय लाभ

दिनांक	देय वेतन	दिनांक	दिलेले वेतन	शेरा
01/07/2006	10430+2400	01/07/2006	10430+2400	नियमित वेतनवाढ
-	-	01/10/2006	10430+2400	-
01/10/2006	10820+4200	01/07/2007	11220+4200	पदोन्नती वेतनवाढ
01/07/2007	11270+4200	01/07/2007	11690+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2008	11740+4200	01/07/2008	12170+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2009	12220+4200	01/07/2009	12670+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2010	12720+4200	01/07/2010	13180+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2011	13230+4200	01/07/2011	13710+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2012	13760+4200	01/07/2012	14250+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2013	14300+4200	01/07/2013	14810+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2014	14860+4200	01/07/2014	15380+4200	नियमित वेतनवाढ

अ.क्र.	तपशील	देय रक्कम	दिलेली रक्कम
1	सेवा निवृत्ती उपदान	314490	323070
2	मुळ निवृत्ती वेतन	9530	9790
3	निवृत्ती वेतन अशंराशीकरणाचा भाग	3812	3916
4	निवृत्ती वेतन अशंराशीकरणाची रक्कम	382923	393370
5	देय निवृत्ती वेतन	5718	5874

उपायुक्त यांचेकडील आदेश क्र.200/2014-15, दि.15/01/2015 अन्वये 300 दिवस शिल्लक अर्जित रजा रोखीकरण मंजुर करण्यात आलेले आहेत.

2)श्री धोंडीराम बाबुराव निकम - लिपिक,
जन्म दिनांक - 01/06/1956
प्रथम नेमणुक दि. 18/10/1980 - शिपाई पदी
पदोन्नती दि.01/07/1987 - लिपिक पदी
24 वर्षे सेवा पुर्ण केल्याचा लाभ दि.01/07/2011
सेवा निवृत्ती दिनांक - 31/05/2014
आयुक्त आदेश क्र.901,दि.19/03/2013 - 24 वर्षे सेवा पुर्ण व्दितीय लाभ

दिनांक	देय वेतन	दिनांक	दिलेले वेतन	शेरा

01/07/2011	10700+2400	01/07/2011	10700+2400	नियमित वेतनवाढ
-	-	01/07/2011	11100+2400	-
01/07/2011	11100+4200	01/07/2011	11410+4200	पदोन्नती वेतनवाढ
01/07/2012	11560+4200	01/07/2012	11990+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2013	12040+4200	01/07/2013	12480+4200	नियमित वेतनवाढ

अ.क्र.	तपशील	देय रक्कम	दिलेली रक्कम
1	सेवा निवृत्ती उपदान	267960	275220
2	मुळ निवृत्ती वेतन	8120	8340
3	निवृत्ती वेतन अशंराशीकरणाचा भाग	3248	3336
4	निवृत्ती वेतन अशंराशीकरणाची रक्कम	326268	335108
5	देय निवृत्ती वेतन	4872	5004

उपायुक्त यांचेकडील आदेश क्र.197/2014-15, दि.07/01/2015 अन्वये 300 दिवस शिल्लक अर्जित रजा रोखीकरण मंजुर करण्यात आलेले आहेत.

3)सौ.निर्मला मोहन नेपते - लिपिक,

जन्म दिनांक - 01/06/1956

प्रथम नेमणुक दि. 18/10/1984 - लिपिक पदी

24 वर्षे सेवा पुर्ण केल्याचा लाभ दि.01/10/2006

सेवा निवृत्ती दिनांक - 31/05/2014

आयुक्त आदेश क्र.187,दि.30/09/2013 - 24 वर्षे सेवा पुर्ण व्दितीय लाभ

दिनांक	देय वेतन	दिनांक	दिलेले वेतन	शेरा
01/07/2006	10610+2400	01/07/2006	10610+2400	नियमित वेतनवाढ
-	-	01/10/2006	11000+2400	-
01/10/2006	11000+4200	01/10/2006	11410+4200	पदोन्नती वेतनवाढ
01/07/2007	11460+4200	01/07/2007	11880+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2008	11930+4200	01/07/2008	12370+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2009	12420+4200	01/07/2009	12870+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2010	12920+4200	01/07/2010	13390+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2011	13440+4200	01/07/2011	13920+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2012	13970+4200	01/07/2012	14470+4200	नियमित वेतनवाढ
01/07/2013	14520+4200	01/07/2013	15030+4200	नियमित वेतनवाढ

अ.क्र.	तपशील	देय रक्कम	दिलेली रक्कम
1	सेवा निवृत्ती उपदान	304200	312488
2	मुळ निवृत्ती वेतन	9360	9615
3	निवृत्ती वेतन अशंराशीकरणाचा भाग	3744	3846
4	निवृत्ती वेतन अशंराशीकरणाची रक्कम	376092	386338

5	देय निवृत्ती वेतन	5616	5769

उपायुक्त यांचेकडील आदेश क्र.157/2014-15, दि.10/12/2014 अन्वये 300 दिवस शिल्लक अर्जित रजा रोखीकरण मंजुर करण्यात आलेले आहेत.

4)श्री रमेश गुंडाप्पा पवार - कुली,

जन्म दिनांक - 01/06/1954

प्रथम नेमणुक दि. 01/07/1987 - कुली पदी परंतु मा.कामगार न्यायालय सांगली यांचेकडील दि.31/01/1989 चे आदेशान्वये व स्थायी समिती ठराव क्र.605/88-89,दि.06/02/1989 अन्वये दिनांक 01/10/1987 पासुन कायम स्वरुपाने नेमणुक व सर्व प्रकाराचे लाभ मंजुर करण्यात आलेले असताना त्यांना नियमित वेतनवाढी व 12 वर्षे/24 वर्षे सेवा पुर्ण लाभ व आयोगाप्रमाणे वेतननिश्चती हया दिनांक 01/10 रोजी देय होत असताना त्या दिनांक 01/07 रोजी देण्यात आलेले आहेत.

12 वर्षे सेवा पुर्ण केल्याचा देय लाभ दि.01/10/1999, दिलेला लाभ दिनांक : 01/07/1999

24 वर्षे सेवा पुर्ण केल्याचा देय लाभ दि.01/10/2011, दिलेला लाभ दिनांक : 01/07/2011

सेवा निवृत्ती दिनांक - 31/05/2014

आयुक्त आदेश क्र.187,दि.30/09/2013 - 24 वर्षे सेवा पुर्ण व्दितीय लाभ

दिनांक	देय वेतन	दिनांक	दिलेले वेतन	शेरा
01/07/2011	7640+1600	01/07/2011	7640+1600	नियमित वेतनवाढ
-	-	01/07/2011	7950+1600	-
01/10/2011	7950+1800	01/07/2011	8240+1800	पदोन्नती वेतनवाढ
01/07/2012	8250+1800	01/07/2012	8550+1800	नियमित वेतनवाढ
01/07/2013	8560+1800	01/07/2013	8860+1800	नियमित वेतनवाढ

अ.क्र.	तपशील	देय रक्कम	दिलेली रक्कम
1	सेवा निवृत्ती उपदान	137270	141245
2	मुळ निवृत्ती वेतन	5180	5330
3	निवृत्ती वेतन अशंराशीकरणाचा भाग	2072	2132
4	निवृत्ती वेतन अशंराशीकरणाची रक्कम	203735	209635
5	देय निवृत्ती वेतन	3108	3198

उपायुक्त यांचेकडील आदेश क्र.103/2015-16, दि.27/05/2015 अन्वये 228 दिवस शिल्लक अर्जित रजा रोखीकरण मंजुर करण्यात आलेले आहेत.

5)श्री ओतारी यांना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.आरटीआर-1174/2032/बारा, दि.23/09/1975 व शासन निर्णय क्र. क्र.आरटीआर-1174/20321390/बारा, दि.07/07/1976 अन्वये वर्ग 4 चे पदावर नियमित 3 वर्षाची नियमित सेवा पुर्ण झालेनंतर वर्ग 3 पदी पदोन्नती देणे आवश्यक असताना तीन वर्षाची सेवा पुर्ण होणेपुर्वी नियमबाहय पदोन्नती देण्यात आलेली आहे.

6)महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 1009/प्र.क्र.169/सेवा-9 दिनांक 06/11/2009 अन्वये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडील कर्मचारी यांची सेवानिवृत्ती पुर्वी वेतन पडताळणी मुख्य लेखापरिक्षक यांचे मार्फत वेतन पडताळणी करणे आवश्यक

असताना अदयाप वेतन पडताळणी केलेली नसल्याने इतर मनपा कर्मचारी यांचीही चुकीचे वेतननिश्चितीमुळे वेतन/निवृत्ती वेतन/सेवा उपदान/अशंराशीकरण/शिल्लक रजा रोखीकरण रक्कमाचे अतिप्रदान झाल्याचे नाकारता येत नाही.

7)पदोन्नती कार्यपध्दतीनुसार महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एलआरव्ही-1089/3654/ (प्र.क्र.12/89)/बारा,दि.28/03/1990 अन्वये पदोन्नतीसाठी योगायोग्यता तपासताना निवड सुची तयार करावयाचे वेळी त्यांचे अलीकडचे पाच वर्षाचे गोपनीय अहवाल विचारत घेण्यात यावेत असे नमुद करण्यात आलेले आहे. महानगरपालिकेकडील अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यात आलेले नाही.

8)तरी वरील नमुद कर्मचारी यांची वरील प्रमाणे फेर वेतननिश्चती करुन त्यांना अतिप्रदान झालेले वेतन/निवृत्ती वेतन/सेवा उपदान/अशंराशीकरण/शिल्लक रजा रोखीकरण रक्कमा वसुल करुन मनपा फंडात जमा करावी.

उपरोक्त अनियमिततेबाबत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका आस्थापना/निवृत्ती वेतन विभागास अनुपालन कामी अर्धसमास पत्र क्र.54 दि.20/10/2018 अन्वये मागणी करुन ही पुर्तता करण्यात आलेली नसल्याने परिच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

DGPGHMM7801 (Ref No : 21, Hmm No : 54)

45 UIDSSMT अंतर्गत माळबंगला,काळीखण व वसंत कॉलनी येथील झोन मधील, वितरण व्यवस्था,माळबंगला केंद्र ते काळी खणसंपपर्यंत रायझिंग मेन पाईप लाईन टाकणेची कामे या केंद्र शासन पुरस्कृत कामातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 7

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा महानगरपालिका स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 915590.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 773493.00/-

सदरच्या कामाकरिता ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमेवर स्थानिक संस्था कराची रक्कम रु. 85,548/- वसूल केलेली नाही. तसेच कामाचा व कामगारांचा विमा काढलेला नसल्यामुळे दंडनीय रक्कम रु. 6,79,645/- वसूल केलेली नाही. त्याचप्रमाणे बँक गॅरंटीकरिता कमी मुद्रांकावर करारनामा घेतल्याने सदरची र.रु.8300/- वसूलपात्र केलेली नाही. सदरच्या कामावर पुरवठा केलेल्या साहित्याकरिता अग्रिम स्वरुपात रक्कम रु. 573396/- इतकी प्रदान केली असून त्या साहित्याचा वापर अद्यापही कामावर केलेला नसल्यामुळे सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमेमधून वसूल केलेली कामगार कल्याण कराची रक्कम रु.

3,42,194/- वसूल केलेली आहे परंतु सदरची रक्कम शासनाकडे जमा केल्याबाबत खात्री झाली नसल्यामुळे सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेण्यात येत आहे.

मनपाच्या माळबंगला जलशुद्धीकरण केंद्र येथे 25 लक्ष लि.क्षमतेचा जलकुंभ, वसंत कॉलनी, काळीखण ईएसआर झोन येथे वितरण व्यवस्था व कम्पाउंड वॉल बांधणेचे कामे केंद्र शासन पुरस्कृत व UIDSSMT कार्यक्रमा अंतर्गत योजनेमधून करण्यात येत आहेत. वरील कामाची निविदा नोटीस क्र. 12/3 सन 2012-13 नुसार निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे निविदा प्रक्रियेनुसार प्रथम लिफाफा -1 दिनांक 14.02.2013 रोजी उघडले असता एकूण 7 पैकी 5 ठेकेदारांची कागदपत्र बरोबर असल्याने मा.उपायुक्त यांचे दिनांक 16.02.2013 रोजी मान्यता घेऊन दिनांक 20.02.2013 रोजी Price Bid चे (दुसरा लिफाफा) उघडण्यात आले असून में. ए.ई.इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि., ठाणे यांचा देकार सर्वात कमीच म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 17.00% जादा दराने सादर केलेला आहे. सदर निविदा हया महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2011-12 च्या दरसूचीवर आधारित आहेत. एम.जी.पी आणि पी.डब्ल्यू. डी. विभागाच्या सन 2012-13 सालच्या दरसूची महानगरपालिकेकडील कामासंठी लागू करणेबाबतच्या केलेल्या ठरावानुसार ठेकेदाराने सादर केलेल्या निविदा दराप्रमाणे सध्या लागू असलेल्या चालू सन 2012-13 च्या दरसूचीनुसार तुलनात्मक तक्ता प्रमाणे 09.65% जादाचे होत असल्याने सदरच्या कामासाठी ठेकेदाराने सादर केलेल्या दरान्वये 17.00% जादाचे दराने काम करून घेण्यास आयुक्त यांनी दिनांक 01.04.2013 रोजी सदर निविदेस मान्यतेसाठी महासभेच्या मान्यतेकरीता सादर करण्याबाबत शिफारस करण्यात आली. त्यानुसार ठेकेदाराने अंदाजपत्रकीय रक्कम रु.5,80,69,345/- च्या 17.00% जादा दराने येणारी रक्कम रु. 6,79,64,533/- इतक्या रकमेची मा.महासभा ठराव क्रमांक 04 दिनांक 06.04.2013 नुसार मंजूर केली आहे.
सन 2013-14 या आर्थिक वर्षापर्यंत सदरच्या कामाचे निविदा प्रकियेवर आतापर्यंत एकूण खर्च रु.3,01,69,696/- इतका खर्च एकूण 4 देयकापर्यंत झालेला आहे. सदरच्या निविदा नस्तीची माहिती खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

अ.क्र.	विवरणपत्र/ निविदासंबधीची माहिती.	तपशील
1.	निविदा क्रमांक.	12/3-2012-13
2.	निविदा अंदाजपत्रकीय रक्कम	5,80,69,345/- ची निविदा
3.	प्रशासकीय मान्यता-	याबाबतचे अभिलेखे उपलब्ध करून देण्यात यावेत.
4.	तांत्रिक मान्यता	तांत्रिक मान्यतेची प्रत उपलब्ध करून देण्यात यावी.
5.	निविदा मान्य दर व रक्कम	महासभा ठराव क्र.04 दिनांक 06.04.2013 अन्वये निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (र.रु. 5,80,69,345/-) 17.00% जादा दराने परंतु रक्कम रु. 6,79,64,533/- च्या मर्यादेत खर्च

		करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे.
6.	ठेकेदाराचे नाव	मे. ए.ई.इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि., ठाणे.
7.	कामाचा कार्यादेश क्रमांक.	पाणीपुरवठा विभाग आदेश क्र. मनपा/पापुवि/सांगली/115/13-14 दिनांक 10.05.2013 अन्वये
8.	कामाचा कालावधी.	कार्यादेशाच्या आदेशापासून 12 महिने दि.09.05.2014 पर्यंत.
9.	कामास प्रथम मुदतवाढ	मुदतवाढ दिनांक 31.12.2014 पर्यंत देण्यात आली आहे.
10.	कामावर 2014-15 अखेरपर्यंत झालेला खर्च	र.रु. 3,42,19,473/- इतकी रक्कम ठेकेदारास अदा केली आहे.
11.	बँक गॅरन्टी बग no.37/2013 दि.10.04.2013	रक्कम रु. 17,00,000/- दिनांक 12.04.2014 पर्यंत मुदत
12.	करारनामा	करारनामा र.रु. 67100/- च्या मुद्रांकावर दि.12.04.13 रोजी करण्यात आला आहे.
13.	लेखाशीर्ष	इतर योजना 4122(A) UIDSSMT

महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून जाहिरात प्रसिद्ध करण्यात आल्याबाबतची मूळ नस्ती (छायाकिंत नस्ती) उपलब्ध झाली नाही. विहित मुदतीत एकूण 7 निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदरच्या निविदा समितीसमोर दिनांक 20.02.2013 रोजी उघडण्यात आल्या असता पाच निविदाधारक कागदोपत्री पात्र असल्याने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदा उघडण्यात आल्या आहेत.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	प्राप्त झालेला दर
1.	मे.व्ही.व्ही.साळुंखे,पुणे.	18.60% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
2.	मे.एस.व्ही.जाधव,	19.00% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
3.	मे.रचना इंजिनिअरींग,कोल्हापूर	19.85% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
4.	मे.लक्ष्मी सिव्हील इंजिनियरिंग	19.40% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
5.	मे.ए.ई.इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि., ठाणे	17.50% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने

वरील पाचही निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या असून निविदेचे दुसरा लिफाफा दिनांक 20.02.2013 रोजी कमिटीसमोर उघडण्यात आले त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. ए.ई.इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि., ठाणे. यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (वाटाघाटीनंतर) 17.00% जादा दराची प्राप्त झाली आहे. त्या निविदेबाबतची माहिती वरीलप्रमाणे आहे. वर नमूद केलेल्या निविदा नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे त्रुटीबाबत अर्धसमास क्रमांक 46 दिनांक 17.10.2018 अन्वये खुलासा मागविण्यात आलेला होता. परंतु विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1. सदरच्या कामाची मूळ निविदा नस्ती, तसेच प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यतेच्या प्रति लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाल्या नाहीत. तरी सदरची (छायांकित प्रत ले.प.साठी उपलब्ध झाली) मूळ

निविदा नस्ती, प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यतेच्या प्रति लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करून देण्याबाबत सूचित करण्यात आले होते परंतु सदरच्या प्रति विभागाने लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिल्या नाहीत.

2) विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3.11.2003 तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत. सदरचे काम दिनांक 10.05.2013 ते 09.05.2014 या कालावधीपर्यंत मुदत होती. परंतु सदरच्या मूळ कालावधीत काम पूर्ण झालेले नसून सदरचे कामा 31.03.2015 पर्यंत काम पूर्ण झाले नसल्याचे दिसून येत असून सदरच्या कामाचा विमा दिनांक 13.11.2013 ते 12.11.2014 या अर्धवट कालावधीचा काढलेला असून व कामगारांचा विमा काढलेला नाही. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रकानुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. वरील कामाचे कंत्राटी मूल्य रक्कम रु. 6,79,64,533/- असून 1% दंडनीय विमा रक्कम रु. 6,79,645/- वसूल करून शासकीय विमा संचालनालयाकडे भरणे आवश्यक आहे. तरी ठेकेदाराकडून सदरची रक्कम रु. 6,79,645/- वसूल करून विमा संचालनालय, मुंबई यांचे कडे जमा करण्यात येऊन जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करण्यात यावे.

3) कामाच्या अटी व शर्तीनुसार कामगार कल्याण कराची रक्कम एकूण झालेल्या कामाच्या रक्कमेवर 1% वसूल करून मनपा खाती जमा करून ठेवण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. सदरची वसूल केलेली रक्कम रु. 3,42,194/- कामगार कल्याण अधिकारी महाराष्ट्र शासन यांच्याकडे भरणा करून सदरच्या चलनासह अनुपालन सादर करण्यात यावे. तो पर्यंत सदरची रक्कम रु. 4,28,151/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4) वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये एकूण एक देयक ठेकेदारास अदा केलेली असून त्यांची अ.क्र. रक्कम प्रमाणक क्र.5 व 14 अन्वये दिनांक 02.07.2014 अन्वये रु. 20,00,000/-व रु. 2049777/- प्रदान केलेले आहे. ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमेवर स्थानिक संस्था कराची रक्कम कपात केल्याबाबत अभिलेख्यावरून खात्री करता आली नाही. तरी ठेकेदारास प्रदान केलेल्या एकूण रक्कम रु. 3,42,19,473/- वर स्थानिक संस्था कराची रक्कम रु. 85,548/- वसूल केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे तरी सदरची रक्कम वसूलपात्र करण्यात यावी.

5) प्रस्तुत कामामध्ये कामाचे अंदाजपत्रकात बाब निहाय पुरवठा केलेले परिमाण व प्रत्यक्षात कार्यान्वयित केलेले बाब निहाय परिमाण यामध्ये खालील प्रमाणे तफावत आहे.

बाब क्र.	बाब	अंदाजपत्रकानु पुरवठा केलेले परिमाण (अदा केलेली टक्केवारी)	कार्यन्वित केलेले परिमाण	तफावत	दर.	एकूण रक्कम
2	P& S DI Specials	4270 (85%)	225	4045	85.74/ 100.88	346818/-
3.	P&s sluice valve	13.00 (85%)	1.00	12.00	5575.38	66905/-

	1)100 mm pn-1 SV	6559.27				
-	2) 150 MM PN-1	2.00 (85%) Rs.9838.4	0.00	2.00	8362.64	16725/-
-	3) 200 MM PN-1	8.00 (85%) Rs.18617.04	2.00	6.00	15824.48	94947/-
-	4) 50 MM K.A.SV	5.00 (85%) Rs.11294.40	0.00	5.00	9600.24	48001
-						573396/-

वरीलप्रमाणे ठेकेदाराने अंदाजपत्रकातील परिमाणाप्रमाणे पुरवठा केलेले संख्या (परिमाण)चे मनपाने रक्कम प्रदान 85% रक्कम प्रदान केली असून सदरच्या प्रदान केलेल्या Sluice valve चे कामावर बसविण्यात आलेले नसताना ठेकेदारास सदरच्या तिन्ही प्रकारच्या Sluice valve ची रक्कम रु. 573396/- इतकी रक्कम ठेकेदारास आगावू प्रदान करण्यात आलेली आहे. याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नसल्यामुळे सदरची रक्कम रु. 573396/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. तसेच कामाच्या ठिकाणी ठेवलेले work order book आणि cross Section Level sheet लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत.

6) (बँक गॅरंटी वर मुद्रांक शुल्काची रक्कम कमी घेतल्यामुळे शासन महसुलाचे झालेले नुकसान)

मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची 1 मधील कलम 54(ii)व 40(b) 2500 पेक्षा जास्त रक्कमेच्या बँक गॅरन्टीवर प्रत्येक हजाराकरिता रु.5/- प्रमाणे मुद्रांक शुल्क वसूल करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने सदरच्या कामाकरिता बँक गॅरंटीची रक्कम रु. 17,00,000/- घेतली असून त्यावर रु.100/- चे मुद्रांक लावून हमीपत्र घेण्यात आले आहे. कमी शुल्क आकारल्यामुळे शासन महसुलाचे रु 8300/- चे नुकसान झाले आहे.सदरची रक्कम वसूलपात्र करण्यात यावी.

अ.क्र.	B.G.No.	बँक ग्यारंटीची रक्कम	वसूल करावयाची मुद्रांक शुल्काची रक्कम	भरलेले मुद्रांक शुल्क	तफावतीची रक्कम रु.
1	BG.No.1144ILG010513 /2013	17,00,000/-	8500	200	8300
				एकूण र.रु.	8300/-

7) बँक गॅरन्टी BG No.1144ILG010513/2013 दिनांक 12.04.2014 पर्यंत मुदत होती. सदरची बँक गॅरन्टीची मुदतवाढीच्या पत्राची प्रत लेखापरीक्षण कालावधीत दिनांक 31.03.2015 पर्यंत घेतल्याचे दिसून आले नाही. तरी

याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

वसूलपात्र रक्कम रु. 7,73,493/- (679645+8300+85548)

आक्षेपाधीन रक्कम रु. 9,15,590/-

DATBVGM6801 (Ref No : 26, Hmm No : 46)

46 UIDSSMT अंतर्गत कोल्हापूर रोड येथे 15 लक्ष लि.क्षमतेची उंच टाकी बांधणे, वितरण व्यवस्था व कम्पाउंड वॉल बांधणे या केंद्र शासन पुरस्कृत कामातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 1213074.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 637646.00/-

कामगार कल्याण कराची रक्कम एकूण झालेल्या कामाच्या रक्कमेवर 1% वसूल करून मनपा खाती जमा करून ठेवण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. सदरची रक्कम रु. 2,64,559/- कामगार कल्याण अधिकारी महाराष्ट्र शासन यांच्याकडे जमा करण्यात यावी. अंदाजपत्रकातील परिमाणापेक्षा कामावर कार्यान्वित केलेले परिमाण यामध्ये र.रु. 948515/- इतकी रक्कम ठेकेदारास जास्तीची अदा केलेली असल्यामुळे सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. तसेच सदरच्या निविदेकरिता ठेकेदाराने कामाचा व कामगारांचा विमा अर्धवट कालावधीचा काढलेला असल्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1% रक्कम रु. 6,22,502/- वसूलपात्र करून शासकीय विमा संचालनालयाकडे भरण्यात यावी. तसेच ठेकेदारास प्रदान करण्यात आलेल्या तिसऱ्या देयकातील बाब क्र. ची रक्कम प्रदान करताना चुकीच्या दराने रक्कम रु. 7459/- इतकी रक्कम अतिप्रदान केलेली आहे ती वसूलपात्र करण्यात यावी.त्याचप्रमाणे बँक गॅरन्टी घेताना कमी रक्कमेच्या मुद्रांकावर करारनामा केलेला असल्यामुळे र.रु.7685/-चे नुकसान झाले आहे. सदरची रक्कम वसूलपात्र करावी. बँक गॅरन्टीची मुदतवाढीच्या पत्राची प्रत लेखापरीक्षण कालावधीत दिनांक 31.03.2015 पर्यंत घेतल्याचे दिसून आले नाही.

सांगली,मिरज व कुपवाड शहर महानगरपालिके अंतर्गत कोल्हापूर रोड, सांगली येथे 15 लक्ष लि. क्षमतेची उंच टाकी बांधणे, वितरण व्यवस्था व कम्पाउंड वॉल बांधणे इत्यादी कामे केंद्र शासन पुरस्कृत व UIDSSMT

कार्यक्रमा अंतर्गत योजनेमधून करण्यात येणार आहेत. वरील कामाची निविदा नोटीस क्र. 12/2 सन 2012-13 नुसार निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे निविदा प्रक्रियेनुसार प्रथम लिफाफा -1 दिनांक 14.02.2013 रोजी उघडले असता 4 ठेकेदारांची कागदपत्र बरोबर असल्याने मा.उपायुक्त यांचे दिनांक 16.02.2013 रोजी मान्यता घेऊन दिनांक 20.02.2013 रोजी Price Bid चे (दुसरा लिफाफा) उघडण्यात आले असून मैं. रचना इंजिनिअर्स, कोल्हापूर यांचा देकार सर्वात कमीच म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 14.95% जादा दराने सादर केलेला आहे. सदर निविदा हया महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2011-12 च्या दरसूचीवर आधारित आहेत. एम.जी.पी आणि पी.डब्ल्यू. डी. विभागाच्या सन 2012-13 सालच्या दरसूची महानगरपालिकेकडील कामासंठी लागू करणेबाबतच्या केलेल्या ठरावानुसार ठेकेदाराने सादर केलेल्या निविदा दराप्रमाणे सध्या लागू असलेल्या चालू सन 2012-13 च्या दरसूचीनुसार तुलनात्मक तक्ता प्रमाणे 8.93% जादाचे होत असल्याने सदरच्या कामासाठी ठेकेदाराने सादर केलेल्या दरान्वये 14.95% जादाचे दराने काम करून घेण्यास आयुक्त यांनी दिनांक 01.04.2013 रोजी सदर निविदेस मान्यतेसाठी महासभेच्या मान्यतेकरीता सादर करण्याबाबत शिफारस करण्यात आली. त्यानुसार ठेकेदाराने अंदाजपत्रकीय रक्कम रु.5,41,54,205/- च्या 14.95% जादा दराने येणारी रक्कम रु. 6,22,50,258/- इतक्या रकमेची मा.महासभा ठराव क्रमांक 07 दिनांक 06.04.2013 नुसार मंजूर केली आहे.

सन 2013-14 या आर्थिक वर्षापर्यंत सदरच्या कामाचे निविदा प्रकियेवर आतापर्यंत एकूण खर्च रु.1,96,26,825/- इतका खर्च एकूण 6 देयकापर्यंत झालेला आहे. सदरच्या निविदा नस्तीची माहिती खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

अ.क्र.	विवरणपत्र/ निविदासंबधीची माहिती.	तपशील
1.	निविदा क्रमांक.	12/2-2012-13
2.	निविदा अंदाजपत्रकीय रक्कम	5,41,54,205/- ची निविदा
3.	प्रशासकीय मान्यता -	याबाबतचे अभिलेखे उपलब्ध करून देण्यात यावेत.
4.	तांत्रिक मान्यता	तांत्रिक मान्यतेची प्रत उपलब्ध करून देण्यात यावी.
5.	निविदा मान्य दर व रक्कम	महासभा ठराव क्र.07 दिनांक 06.04.2013 अन्वये निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (र.रु. 5,41,54,205/-) 14.95% जादा दराने परंतु रक्कम रु. 6,22,50,258/- च्या मर्यादेत खर्च करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे.
6.	ठेकेदाराचे नाव	मे. रचना इंजिनिअर्स, कोल्हापूर
7.	कामाचा कार्यादेश क्रमांक.	पाणीपुरवठा विभाग आदेश क्र. मनपा/पापुवि/सांगली/113/13-14 दिनांक 09.05.2013 अन्वये
8.	कामाचा कालावधी.	कार्यादेशाच्या आदेशापासून 12 महिने दिनांक 08.05.2014 पर्यंत.
9.	कामास प्रथम मुदतवाढ	मुदतवाढ दिनांक 31.12.2014 पर्यंत देण्यात आली आहे.

10.	कामावर 2014-15 अखेरपर्यंत झालेला खर्च	र.रु.2,64,55,931/- इतकी रक्कम ठेकेदारास आदा केली आहे.
11.	बँक गॅरन्टी बग no.37/ 2013 दि.10.04.2013	रक्कम रु. 15,57,000/- दिनांक 09.04.201 4 पर्यंत मुदत
12.	करारनामा	करारनामा र.रु. 61500/- च्या मुद्रांकावर करण्यात आला आहे.
13.	लेखाशीर्ष	इतर योजना 4122(A) UIDSSMT

महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून जाहिरात प्रसिद्ध करण्यात आल्याबाबतची मूळ नस्ती उपलब्ध झाली नाही. विहित मुदतीत एकूण चार निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदरच्या निविदा समितीसमोर दिनांक 20.02.2013 रोजी उघडण्यात आल्या असता चार निविदाधारक कागदोपत्री पात्र असल्याने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदा उघडण्यात आल्या आहेत.

अ.क्र.	ठेकेदाराचे नांव	प्राप्त झालेला दर
1.	मे.व्ही.व्ही.साळुंखे,पुणे.	17.35% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
2.	मे.एस.व्ही.जाधव,	18.10% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
3.	मे.रचना इंजिनिअरींग,कोल्हापूर	14.95% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने
4.	मे.लक्ष्मी सिव्हील इंजिनियरिंग	16.05% अंदाजपत्रकीय रक्कमेच्या जादा दराने

वरील चारही निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरल्या असून निविदेचे दुसरा लिफाफा दिनांक 20.02.2013 रोजी कमिटीसमोर उघडण्यात आले त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. रचना इंजिनिअरींग,कोल्हापूर यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 14.95% जादा दराची प्राप्त झाली आहे. त्या निविदेबाबतची माहिती वरीलप्रमाणे आहे.

वर नमूद केलेल्या निविदा नस्तीचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 47 दिनांक 17.10.2018 अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. परंतु विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत अनुपालन सादर केलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1. विमा संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक जीईएन/1098/1397/प्र.क्र.1966/98 नवी-2 दिनांक 3.11.2003 तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामाचा व कामगारांचा संपूर्ण कालावधीचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्यास तो विमा स्वीकारला जाणार नाही असे स्पष्ट आदेश आहेत. सदरचे काम दिनांक 09.05.2013 ते 08.05.2014 या कालावधीपर्यंत मुदत होती. परंतु सदरच्या मूळ कालावधीत काम पूर्ण झालेले नसून सदरचे कामा 31.03.2015 पर्यंत काम पूर्ण झाले नसल्याचे दिसून येत असून सदरच्या कामाचा विमा व कामगारांचा विमा काढलेला नाही. त्यामुळे नगर विकास विभागाच्या परिपत्रका नुसार कंत्राटी मूल्याच्या 1% रक्कम कपात करून विमा संचालनालय यांना पाठविण्याबाबत तरतूद आहे. वरील कामाचे कंत्राटी मूल्य रक्कम रु. 6,22,50,258/- असून 1% दंडनीय विमा रक्कम रु. 6,22,502/- वसूल करून शासकीय विमा संचालनालयाकडे भरणे आवश्यक आहे.

तरी ठेकेदाराकडून सदरची रक्कम रु. 6,22,502/- वसूल करून विमा संचालनालय, मुंबई यांचे कडे जमा करण्यात येऊन जमा केलेल्या चलनासह अनुपालन सादर करण्यात यावे.

2) कामाच्या अटी व शर्तीनुसार कामगार कल्याण कराची रक्कम एकूण झालेल्या कामाच्या रक्कमेवर 1% वसूल करून मनपा खाती जमा करून ठेवण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. सदरची वसूल केलेली रक्कम रु. 2,64,559/- कामगार कल्याण अधिकारी महाराष्ट्र शासन यांच्याकडे जमा करून सदरच्या चलनासह अनुपालन सदर करण्यात यावे. तो पर्यंत सदरची रक्कम रु. 2,64,559/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3) प्रस्तुत कामामध्ये कामाचे अंदाजपत्रकात बाब निहाय नमूद केलेले परिमाण व प्रत्यक्षात कार्यान्वयित केलेले बाब निहाय परिमाण यामध्ये खालील प्रमाणे तफावत आहे.

बाब क्र.	बाब	अंदाजपत्रकानु पुरवठा केलेले परिमाण (अदा केलेली टक्केवारी)	कार्यन्वित केलेले परिमाण	तफावत	दर.	एकूण रक्कम
2	P& S DI K-7 Pipes-150 MM Dia	1495	2088	593	1599.52	948515/-
	एकूण र.रु.					948515/-

वरीलप्रमाणे अंदाजपत्रकातील परिमाणापेक्षा कामावर कार्यान्वित केलेले परिमाण यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. कामाचे जागेवरील स्थळपाहणी अहवालानुसार अंदाजपत्रक तयार केलेले असताना प्रत्यक्षात कामावर जादा परिमाण वापरण्याची कारणमीमांसा as per site condition या रकान्यात स्पष्टपणे बाबनिहाय नमूद केलेली नाही. तरी याबाबत कामाच्या ठिकाणी ठेवलेले work order book आणि cross Section Level sheet लेखापरीक्षणास उपलब्ध करावी अन्यथा वर नमूद केलेल्या बाबीवर जास्तीच्या केलेल्या खर्चाची रक्कम रु.9,48,515/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची 1 मधील कलम 54(ii)व 40(b) 2500 पेक्षा जास्त रक्कमेच्या बँक गॅरन्टीवर प्रत्येक हजाराकरिता रु.5/- प्रमाणे मुद्रांक शुल्क वसूल करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने सदरच्या कामाकरिता बँक गॅरंटीची रक्कम रु. 15,57,000/- घेतली असून त्यावर रु.100/- चे मुद्रांक लावून हमीपत्र घेण्यात आले आहे. कमी शुल्क आकारल्यामुळे शासन महसुलाचे रु 7685/- चे नुकसान झाले आहे.

अ.क्र.	B.G.No.	बँक ग्यारंटीची रक्कम	वसूल करावयाची मुद्रांक शुल्काची	भरलेले मुद्रांक शुल्क	तफावतीची रक्कम रु.

			रक्कम		
1	BG No.37/2013	15,57,000/-	7785	100	7685/-
				एकूण र.रु.	7685/-

5) बँक गॅरन्टी BG No.37/2013 दिनांक 09.04.2014 पर्यंत मुदत होती. सदरची बँक गॅरन्टीची मुदतवाढीच्या पत्राची प्रत लेखापरीक्षण कालावधीत दिनांक 31.03.2015 पर्यंत घेतल्याचे दिसून आले नाही. तरी याबाबत विभागाने खुलासा सादर करावा.

6) सदरच्या कामाच्या नोदिबाबतची मोजमापपुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाली नाही. तरी सदरची मोजमापपुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात यावी.

7) सदरच्या कामाच्या तिसऱ्या देयकामध्ये प्रदान करण्यात आलेल्या देयकामध्ये providing & supplying of DI K-7 Pipes 150 mm dia चा दर र.रु. 1356.16/- रनिंग मीटरप्रमाणे असताना ठेकेदारास प्रदान करण्यात आलेल्या देयकामध्ये सदरच्या DI K-7 150 MM DIA चा दर 1599.52/- प्रति नग प्रमाणे 5% रक्कम प्रदान करताना दर रु.67.808 प्रमाणे अदा करण्याऐवजी र.रु 79.976/- प्रमाणे रक्कम प्रदान केली आहे. त्यामुळे सदरच्या तफावतीची रक्कम रु.12.168/-प्रमाणे एकूण 613 नग रनिंग मीटरची एकूण रक्कम रु. 7459/- ठेकेदारास जास्तीची रक्कम प्रदान झालेली आहे. तरी सदरची रक्कम ठेकेदाराकडून वसूलपात्र करण्यात यावी.

वसूलपात्र रक्कम रु. 6,37,646/-

आक्षेपाधीन रक्कम रु. 12,13,074/-

DATBVGM6801 (Ref No : 27, Hmm No : 47)

47 पाणीपुरवठा विभागातील पाणी मीटर बंद असल्यामुळे तसेच पाण्याची देयके उशिराने दिल्यामुळे पाण्याच्या प्रत्यक्ष वापराप्रमाणे महसुली उत्पन्न मिळत नसल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 8

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा महानगरपालिका स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

पाणीपट्टीचे दर सन 2005-2006 पासून पुढील तीन वर्षासाठी दर ठरविण्यात आले असून सदरचे दरवाढ करण्याचे धोरण महापालिका सभा क्रमांक 08/2004-05 दिनांक 17.02.2005 अन्वये ठराव क्रमांक 192 मंजूर केलेले होते. सदरच्या ठरावाची मुदत पुढील तीन वर्षाकरिता होती. त्यानुसार मनपाने आज तागायत दिनांक

17.02.2005 अन्वये कार्यवाही करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मनपाच्या महसुली उत्पन्नाचे मोठ्याप्रमाणत नुकसान होत असल्याचे दिसून येत आहे. पाणीपट्टीचे दरामध्ये सुधारणा करणे आवश्यक असताना सदरचे दर सुधारित केलेले नाहीत. मनपाच्या सदरच्या विभागामध्ये नळ कनेक्शनद्वारे पाणीपुरवठा केला जात असून साधारणपणे 64% मीटर बंद असल्यामुळे मनपाचे मोठ्याप्रमाणत नुकसान होत आहे.ग्राहकांनी विहित कालावधीत पाणीपट्टीची रक्कम भरणा करत नसल्यामुळे थकबाकीमध्ये मोठ्याप्रमाणत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. पाणीपट्टीची रक्कम धनाकर्षने भरणा केल्यास आणि धनाकर्ष अनादर झाल्यास त्यांची शुल्काची रक्कम पुढील पाणीपट्टीच्या देयकामध्ये संगणकीय प्रणालीतून देयकामध्ये समाविष्ट होणे अपेक्षित असते. परंतु तसे होत नसल्याचे दिसून येत आहे.

सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका अंतर्गत पाणीपुरवठा विभागाचे 2014-15 चे लेखापरीक्षण केले असता पाणी पुरवठा विभागाची मागणी देयके महानगरपालिकेच्या संगणकीय प्रणालीमध्ये तयार करून ती ग्राहकांना पाणीपुरवठा विभागाच्या मीटर निरीक्षकामार्फत त्यांचे पत्यावर प्रत्यक्ष जागेवर जावून दिली जातात. पाणीपुरवठा विभागाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये ग्राहकास दर दोन महिन्याचे एक या प्रमाणे प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये एकूण 4 मागणी देयके व चार महिन्याचे एक अशी एकूण पाच देयके देण्यात येतात. मागणी देयकाचे नमुन्यामध्ये बिल नंबर, ग्राहकाचे नांव, भाग रि.नंबर, ग्राहक क्रमांक,मीटर जोडणी दिनांक, व देयकाचा कालावधी याबाबी नमूद केल्या आहेत. तसेच देयकाच्या तपशिलामध्ये नळाचा प्रकार, (0.25 इंच, 0.50इंच, 0.75 इंच,1.00 इंच,) ग्राहक प्रकार, पाणी आकारणी आधार चालू वाचन (Reading), मागील वाचन ,वापरलेले पाणी लिटर/ सरासरी पाणी आकारणीचा दर, एकूण भरावयाची रक्कम, विलंब आकार याबाबीचा समावेश देयकामध्ये केला आहे. पाणीपुरवठा विभागातील पाणीपट्टीच्या देयकाचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 57 दिनांक 24.10.2018 अन्वये खुलासा मागविण्यात आलेला होता परंतु विभागाने अनुपालन सादर केलेले नसल्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) मनपाच्या पाणीपुरवठा विभागातील पाणीपट्टी दराचे बाबतीत प्रशासन विभागाकडून सुचविण्यात आलेली व स्थायी समितीने शिफारस केलेली दरवाढ अंशत: मान्य करून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे. पाणीपुरवठा विभागाना "ना नफा ना तोटा" या तत्वावर चालवा ही कल्पना योग्य असली तरीही या संदर्भातील दरवाढ करित असताना केल्या जात असलेल्या पाणी पुरवठ्याचे प्रमाण, एकदम दरवाढ केल्याने त्यांचा पाणी ग्राहकावर पडणारा बोजा व त्यामुळे बिले न भरण्याची वाढणारी प्रवृत्ती व त्यामुळे थकबाकी वाढण्याची शक्यता या बाबीचाही विचार करणे योग्य ठरते. त्यामुळे पाणीपट्टीचे दर सन 2005-2006 पासून पुढील तीन वर्षासाठी खालीलप्रमाणे दरवाढ करण्याचे धोरण महापालिका सभा क्रमांक 08/2004-05 दिनांक 17.02.2005 अन्वये ठराव क्रमांक 192 (विषय क्रमांक 01 अन्वये खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत.

अ.क्र.	वर्ष	घरगुती वापर	बिगर घरगुती वापर	ना नफा ना तोटा तत्वावर

		(प्रती 1000 लिटर्स)		(प्रती 1000 लिटर्स)
1.	2005-06	रु. 6.00	रु. 22.00	रु. 10.00
2.	2006-07	रु. 7.00	रु. 26.00	रु. 11.00
3.	2007-08	रु. 8.00	रु. 30.00	रु. 12.00

पाणी पुरवठा बिलाची आकारणी वरीलप्रमाणे करीत असताना व्यवसायांचे स्वरूप विचारात घेवून बिगर घरगुती या प्रकारामध्ये हॉटेल्स/ खानावळी/लॉज,परमिटबार, हॉस्पिटल्स/दवाखाने/दुध डेअरी,मंगल कार्यालय,रोपवाटिका,दारूचे दुकान,बांधकाम,पोहोण्याचा तलाव,शीतगृहे,रसगृहे इत्यादी जे व्यवसाय पाणी वापराशिवाय चालू शकत नाहीत अशांचा समावेश बिगर व्यवसाय मध्ये करण्यात आलेला आहे. वर नमूद केलेला मनपाचा ठराव क्रमांक 192 दिनांक 17.02.2005 हा पुढील तीन वर्षाकरिता करण्यात आलेला असताना सदरच्या ठरावान्वये सन 2008-09 किंवा पुढील वित्तीय वर्षामध्ये पाणीपट्टीचे दर बदलणे आवश्यक होते. परंतु अद्यापही सदरच्या दरान्वये पाणीपट्टीची आकारणी करणे चालू असल्यामुळे मनपाच्या महसुली उत्पन्नात वाढ झालेली नाही. सदरच्या ठरावान्वये पाणीपट्टीचे दर बदलण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करणेबाबत ठोस उपाययोजना आखणे गरजेचे आहे. त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षणास अवगत करण्याबाबत कळविण्यात आले होते परंतु विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.त्यामुळे मनपाच्या महसुलाचे मोठ्याप्रमाणांत नुकसान होत आहे.

2) आर्थिक वर्ष 2014-15 मध्ये सांगली व कुपवाड भागामध्ये एकूण 470 नवीन मीटर नळ कनेक्शनची जोडणी झाल्याबाबतची माहिती हेड मीटर रीपेरीअर यांच्या अहवालानुसार बसविण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे त्यांचे अभिलेखे प्रत्येक मीटर निरीक्षकाकडे वर्ग केले जातात. त्यानंतर संबधित मीटर निरीक्षकामार्फत ग्राहकांना पाण्याची देयके देण्याबाबतची कार्यवाही केली जाणे आवश्यक असते. परंतु याबाबत मीटर निरीक्षक यांनी विहित कालावधीत नवीन नळ कनेक्शन जोडलेल्या ग्राहकांना देयके दिली किंवा नाहीत याबाबतची खात्री लेखापरीक्षणात करता आली नाही. तरी वर नमूद केलेल्या नवीन नळ कनेक्शन दिलेल्या ग्राहकांना देण्यात आलेली पाणीपट्टीची देयकाची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावी.

3) पाणीपुरवठा विभागातील पाणीपट्टीच्या देयकाचे लेखापरीक्षण केले असता, सांगली व कुपवाड विभागातील ग्राहकांच्या पाणीपुरवठ्याच्या देयकामध्ये बऱ्याच ग्राहकांचे मीटर बंद असल्याचे आढळून आले आहे. आणि बंद मीटर असल्यामुळे ग्राहकांना सरासरी प्रती महिना रु. 160/- असे दोन महिन्यासाठी 320/- चे पाणीपट्टीचे देयक देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे मनपाच्या कार्यक्षेत्रात एकूण मीटर नळ कनेक्शनची संख्या 44606 असून त्यापैकी 28914 बंद मीटर असल्याचे निदर्शनास आले असून त्याचे प्रमाण 64% असल्याचे दिसून येत आहे. विभागनिहाय बंद मीटरची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	भागाचे नांव	एकूण ग्राहक संख्या	मीटर चालू असल्याची संख्या	बंद मीटरची संख्या
1.	मिरज रोड 1	2520	477	2043

2.	मिरज रोड 2	2648	716	1932
3.	मिरज रोड 3	2771	1198	1573
4.	मिरज रोड 4	1967	1038	929
5.	खणभाग-1	1663	248	1415
6.	खणभाग -2	1979	410	1569
7.	वखार भाग 1	2019	709	1310
8.	वखार भाग औ.वखा	3833	1272	2561
9.	पेठ्भाग-1	4778	2203	2575
10.	पेठ्भाग-2	353	78	275
11.	पेठ्भाग सांगलीवाडी	1951	474	1477
12.	शिवाजीनगर-1	3605	1001	2604
13.	शिवाजीनगर-2	1035	285	750
14.	शिवाजीनगर मार्केट यार्ड	482	91	391
15.	गावभाग 1	1679	683	996
16.	गावभाग-2	2527	797	1730
17	गावभाग शिवाजीनगर	1261	329	932
18.	कुपवाड	2484	1465	1019
19.	उल्हासनगर	258	32	226
20.	विध्यांनगर	1887	1071	816
21.	वानलेसवाडी	765	402	363
	एकूण मीटरची संख्या	44606	15692	28914

उपरोक्त माहितीवरून असे दिसून येते कि, महानगरपालिकेच्या बऱ्याच भागातील 50% पेक्षा जास्त मीटर बंद आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 8(1) नुसार पाणी मोजण्याचे प्रत्येक मीटर दुरुस्त ठेवणे आवश्यक आहे. तसेच नियम 11 चे पोटनियम (2) अन्वये आयुक्ताने लेखी नोटीसद्वारे जागेच्या मालकास, भोगवटादारास मीटरमध्ये कोणताही दोष आढळून आल्यास तो काढून टाकण्यास किंवा साफ करण्याचे फर्माविणे आवश्यक आहे. पाण्याच्या वापराबाबतचे जे मागणी देयक ग्राहकास देण्यात येते. त्यामध्ये मीटर बंदचा शिक्का मारण्यात येतो व मागील तीन महिन्याच्या पाणी वापराचे सरासरी काढून त्याप्रमाणे पुढील देयक ग्राहकास पाठविले जाते. परंतु प्रकरण 8 नियम 12(क) नुसार जागेच्या मालकाने मीटर दुरुस्त केले नसल्यास अशा ठिकाणचे नळ कनेक्शन आयुक्त यांनी अधिनियम 1949 चे प्रकरण 12(1) नुसार तोडून टाकणे आवश्यक असते.परंतु पाणीपुरवठा विभागाने सदर कनेक्शन तोडून टाकली नसल्याने बंद मीटरची संख्या वाढत असल्याचे दिसून येत आहे. तसेच ग्राहकाने एकूण किती पाणी वापरले व त्याची एकूण किती रक्कम महानगरपालिकेस मिळणे आवश्यक आहे. याबाबतची नेमकी माहिती समजून येत नसल्याने मीटरप्रमाणे पाणीवापराची योग्य रक्कम मनपास मिळत नसल्याबाबतचे स्पष्ट होते. त्यामुळे मनपाचे

मोठ्याप्रमाणात महसूलाचे नुकसान होत आहे.

4) वर नमूद केलेल्या तक्त्यातील मीटर बंद असल्यामुळे आणि ग्राहकांनी वेळेत देयकाची रक्कम मनपाच्या खात्यामध्ये जमा केलेली नसल्यामुळे थकबाकीची रक्कम मोठ्याप्रमाणात थकीत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत काही ग्राहकांच्या थकबाकीची व विलंब आकारणीची रक्कम प्रलंबित असल्याचे खालील नोंदीवरून दिसून येईल.

ग्राहकाचे नांव	ग्राहक क्रमांक	मागील थकबाकी ची रक्कम रु.	विलंबाची रक्कम रु.	एकूण र.रु.
पेठभाग-गणी बापू मिस्त्री	501	10860	10419	21279
हरिभाऊ भगवान कांबळे	497	3688	8982	12670
इक्बाल गुरमहमद भागवान	499	5440	2344	7784
हनीफ चंद मुजावर	496	9006	32631	51637
दिलावर अजिन मूरआल	464	36070	47614	83684
नारायण मनोहर सूर्यवंशी	444	17756	32154	49910
गावभाग-1 गोविंद सावंत	25	14730	27442	42172
शिवाजीनगर-2 लक्ष्मण गडदे	261	44974	75508	120482
गणपतराव विथोभा ओंकार	642	64208	121486	185694
रामदिन जयनारायण लड्डा	240	48642	80066	128708
पिव्हीपी महमंद	233	43997	103471	147468
शरीफ लतीफ पठाण	1444	57420	107611	165031
मिरजरोड 2.अरुण कानेटकर	1267	69640	28549	108189
विनायक दमोदर कुलकर्णी	1317	29758	31118	60876
एकूण वसूलपात्र रक्कम				1185584

वर नमूद केलेल्या थकबाकीच्या रक्कमेच्या वसुलीबाबत ठोस कार्यवाही करण्यात यावी. तसेच अश्या प्रकारची थकबाकी असलेल्या ग्राहकांची एकूण थकबाकीची रक्कम किती आहे याबाबत मनपाने योग्य ते नियोजन करून वसुलीबाबत कार्यवाही करून सदरची रक्कम एकूण थकबाकीची वसुलीच्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्यात यावी.

5) मनपाच्या सन 2014-15 या वर्षातील पाणीपट्टीच्या देयकाची मागणी एप्रिल-2014 ते सप्टेंबर-2014 या महिन्याचे मागणीचे देयके ग्राहकांना उशिरा दिल्यामुळे मनपाचे महसुली उत्पन्न कमी झालेले आहे. त्याच प्रमाणे मीटर बंद असल्यामुळे सरासरी देयक दिल्यामुळे मनपाचे बऱ्याच प्रमाणात नुकसान झाले आहे. तरी सदरची देयके उशिराने देण्याबाबतची कारणमीमांसासह लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

अ) पावती क्र.359768 रस्ता क्र.DMA-2 माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर-2014 चे देयकामधील श्रीम.अनुसया अपार्टमेंट यांच्याकडून पाणीपट्टी भरणा र.रु. 329/-ची पाणीपट्टी जमा केल्याचे दिसून येत आहे. परंतु सदरचे

अपार्टमेंटमध्ये एकूण किती नळ कनेक्शन आहेत याबाबतची माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. तसेच सदरच्या अपार्टमेंटमधील नळ कनेक्शनच्या पाणीपट्टीची रक्कम जमा केलेल्या नोंदवहीतील जोडणी क्र.18796 असताना रोखपुस्तकामध्ये जोडणी क्र.15531 नमूद केली असल्याने अशा प्रकारच्या चुकीच्या नोदी घेतल्याने ग्राहकाने जमा केलेली पाणीपट्टीची रक्कम त्यांच्या खात्यावर जमा न होता ती प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. त्यांमुळे अशा प्रकारच्या इतर नोंदीची पडताळणी करून तसे अनुपालन सादर करावे.

6) पाणीपुरवठा विभागामधील पाणीपट्टीची रक्कम धनाकर्षाने भरणा केलेल्या नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे उणीवा निदर्शनास आल्या आहेत.

अ) मनपाच्या खात्यामध्ये जमा केलेल्या धनाकर्षची रक्कम मनपाच्या खाती जमा न झालेल्या ग्राहकांनी सादर केलेले धनाकर्ष वटलेले नसल्याबाबतच्या नोंदीचा तक्ता खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

ग्राहक क्र.	ग्राहकांचे नांव	पेठ भागाचे नांव	धनाकर्ष क्र व दिनांक	धनाकर्षची रक्कम रु.	बँकेचे नांव
3210	श्री.समीर व देवांग मेहता	मिरज रोड -2	357842-20.3.15	3063/-	सिंडीकेट बँक
3500	सुनील महादेव भोसले	मिरज रोड -2	38428-16.03.15	606/-	AXIS BANK
1349	कल्लाप्पा शि. चिकर्ड	खणभाग	53680-21.02.15	21600/-	C.B.I.BANK
62	त्रिशला वसंत मुरुमकर	शिवाजीनगर-1	48760-31.01.15	1284/-	IDBI BANK
743	शालन किसन शेंडगे	अभयनगर	211796-28.1.15	1275/-	S.B.I.ABNK
1637	मोहन गोपाल जोशी	मिरज रोड -2	301234-29.01.15	937/-	ICICI BANK
623	हरिकिशन कबरा-शहा	वखारभाग-1	995516-17.01.15	2317/-	Karad urban
35	विजयमाला शि.जाधव	खणभाग-2	491241-07.01.15	1280/-	S.B.I.

वर नमूद केलेल्या धनाकर्षाची रक्कम मनपाच्या खात्यामध्ये जमा झालेली नाही. सदरचा धनाकर्ष अनादर झाल्यामुळे बँकेने अनादरचे शुल्क आणि प्रलंबित पाणीपट्टीची रक्कमेवर लावलेले विलंब आकारणीची संबधीत ग्राहकाकडून वसूल केल्याबाबतच्या नोंदीची पडताळणी करता आली नाही. त्याचप्रमाणे सदरच्या ग्राहकांच्या पुढील पाणीपट्टीच्या देयकामध्ये अनादर धनाकर्ष शुल्काची रक्कम संगणकीय प्रणालीमधून येणे अपेक्षित असते. परंतु सदरच्या देयकामध्ये अनादर धनाकर्ष शुल्क पुढील देयकामध्ये समाविष्ट होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. तरी याबाबत मनपाने केलेल्या कार्यवाहीबाबत लेखापरीक्षणास अनुपालन सादर केलेले नाही.

DATBVGM6801 (Ref No : 28, Hmm No : 57)

48 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत घेण्यात आलेल्या मिरज शहर भुयारी गटर योजनेमधील अनियमिततेबाबत

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

No. of Irregularities: 12

लेखा शीर्ष:00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 8674475.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 593072.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 8081403.00/-

अंदाजपत्रकामध्ये सादर केलेली मोजमापे व प्रत्यक्ष केलेल्या कामाप्रमाणे घेतलेली मोजमापे यामधील तफावत रुपये 87265.65 एवढी रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. पुरवठा झालेले पाईप व प्रत्यक्षात अंथरण्यात आलेल्या पाईपचे परिमाण यात मोठया प्रमाणात तफावत असल्याने तफावतीची रक्कम रूपये 5,29,239.18/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे. गौणखनिजाची रॉयल्टी रक्कम शासनाकडे भरणा केली नसल्याने रक्कम रु. 63832.54/- वसुलपात्र करण्यात येत आहे. मजीप्राने जुनाच डिपीआर महानगरपालिकेस सादर करुनही मजीप्रास महानगरपालिकेने रु.61.50 लक्ष अदा केले असल्यामुळे सदरील रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. महानगरपालिकेने उपयोगिता प्रमाणपत्रे शासनाकडे पाठविलेली नसल्याने दुस-या टप्प्याचे अनुदान महानगरपालिकेस मिळालेले नाही.

मिरज भुयारी गटर योजना राबविणेसाठी UIDSSMT कार्यक्रमांतर्गत दि.28/09/2006 रोजी SLSC ची मान्यता घेऊन केंद्र शासनाकडे मंजूरीस्तव प्रस्ताव पाठविण्यात आला. परंतु त्यास केंद्र शासनाची मान्यता न मिळाल्याने सदरील योजनेचा समावेश महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानामध्ये करणेत आला आहे. सदरचे काम 50% शासकीय अनुदानातून व 50% MUIDCL कडील कर्ज घेवून कररण्यात आले आहे. कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1	कामाचे नाव	महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत घेण्यात आलेल्या मिरज शहर भुयारी गटार योजना
2	महासभा ठराव क्र. व दिनांक	महासभा क्र.08 ठराव क्र.222 दि.20/03/2010
3	स्थायी समिती ठराव क्रमांक	विषय क्रमांक 636 दि.05/03/2012
4	कामाची अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 52,20,73,415/-
5	कंत्राटदाराचे नाव	एस.एम.सी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड
6	निविदा रक्कम	50,45,60,058/-
7	कंत्राट रक्कम	77,54,36,420/- (निवदा रकमेच्या 53.68% जादा

		दराने)
8	स्विकृती पत्र क्रमांक व दिनांक	कार्यकारी अभियंता मलनि:सारण विभाग पत्र क्र. 17, दि.09/04/2013
9	कार्यादेश क्रमांक व दिनांक	क्र.92 दि.30/04/2013

विषयांकित कामाची नस्ती, डि.पी.आर. बी-1 टेंडर, एस्टिमेट, Volume No -I (Technical Bid) & Volume No -II (Price Bid) व मोजमाप पुस्तक यांचे लेखापरीक्षण केले असता अर्धसमास पत्र क्रमांक 122 दिनांक 26/06/2019 नुसार खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाने खुलासा सादर केला नाही. सबब लेखापरीक्षणांअती खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

